सोमवार
३०
मार्च २०२६

अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : ३८२
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

बातम्यांचा गतिमान पाठलाग

अजिंक्य भारत

विराट कोहलीने केला ऐतिहासिक पराक्रम
(पान ७ वर)

थोडक्यात

कुर्दिस्तानमध्ये राष्ट्राध्यक्षांच्या निवासस्थानावर ड्रोन हल्ला

वॉशिंग्टन : इराकच्या कुर्दिस्तानमधून एक ताजे प्रकरण समोर आले असून, तेथे राष्ट्राध्यक्षांच्या निवासस्थानाला लक्ष्य करत मोठा ड्रोन हल्ला करण्यात आला. या हल्ल्यामुळे केवळ कुर्दिस्तानच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही मोठी खळबळ उडाली आहे. कुर्दिस्तान मधून राष्ट्राध्यक्षांच्या निवासस्थानावर हल्ल्याची बातमी समोर येताच अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाने तत्काळ निवेदन जारी केले. अमेरिकेने या हल्ल्याला ''भ्याड दहशतवादी कृत्य'' असे संबोधत तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला. तसेच कुर्दिस्तान आणि इराकच्या सार्वभौमत्व व सुरक्षेसाठी आपण ठामपणे उभे असल्याचे अमेरिकेने स्पष्ट केले. या कटामागील जबाबदार व्यक्तींना उघड करून त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी अमेरिकेने इराकी प्रशासनाकडे केली आहे.

हिंदू एकतेची ऊर्जा, धर्माभिमान प्रेरणादायी

कोल्हापूर: कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज येथे सकल हिंदू समाजाकडून विराट हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले. या विराट हिंदू संमेलनाला मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी उपस्थिती लावली. यावेळी हिंदू बांधवांना संबोधित करण्याची संधी लाभली. या संमेलनात दिसलेली हिंदू एकतेची ऊर्जा आणि धर्माभिमान खरोखर प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. विराट हिंदू संमेलनात बोलताना, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शंभर वर्षांची व्यक्ती निर्माण आणि राष्ट्रनिर्माणाची अखंड यात्रा आजही समाजाला दिशा देणारी आहे. संघाने दिलेले संस्कार, शिस्त आणि राष्ट्रप्रेम यामुळे हिंदू समाज अधिक सक्षम व संघटित होत आहे, असे मंत्री राणे यांनी सांगितले. राणे म्हणाले, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे ठाम हिंदुत्ववादी नेतृत्व असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली लागू झालेला धर्मांतर विरोधी कायदा आपल्या माता-भगिनींच्या सन्मान आणि सुरक्षेसाठी एक मजबूत कवच ठरत आहे. चला, हिंदू एकतेच्या या शक्तीला अधिक बळकट करूया आणि आपल्या धर्म, संस्कृती व राष्ट्रासाठी संघटित होऊया, असे मंत्री नितेश राणे यांनी म्हटले.

सुषमा अंधारेंच्या फोटोबॉम्बने खळबळ

मुंबई: आज पुन्हा एकदा शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी अशोक खरात प्रकरणात पत्रकार परिषद घेतली आहे. या पत्रकार परिषदेमध्ये त्यांनी आजही काही फोटो दाखवले आहेत. या फोटोवरून त्यांनी शिवसेना शिंदे गटाचे नेते दीपक केसरकर यांना काही सवाल केले आहेत? जेव्हा केसरकर म्हणतात माझ्याविरोधात कट कारस्थान आहे, तेव्हा मला हा गंभीर आरोप वाटत नाही, तर हे अतिशय बालिश आणि हास्यास्पद वाटतं. दुसरा मुद्दा असा की, दीपक केसरकर म्हणतात ३९ लोक गेले, मग मला एकट्यालाच का टार्गेट करत आहेत? याचा अर्थच असा होतो की केसरकर स्वतः मान्य करतात की होय मी अशोक खरातकडे गेलो होतो, मी त्याच्या संपर्कात होतो, केसरकर म्हणाले माझी चौकशी का करायची? नाहीतर मी सर्वांचा भांडाफोड करेल. मी या पत्रकार परिषदेमध्ये आव्हान करते की केसरकर एकदा भांड फोडाच.

३०० व्हिडीओ पोलिसांच्या हाती!

भोंदू बाबाची 'कुंडली' उघड होणार

मुंबई: दि.२९ वृत्तसंस्था

नाशिकमध्ये गाजत असलेल्या अशोक खरात प्रकरणात आता तपासाला वेग आला असून, अनेक धक्कादायक माहिती समोर येत आहे. या प्रकरणात तेजस्वी सातपुते यांच्या नेतृत्वाखालील विशेष तपास पथक (एसआयटी) सखोल चौकशी करत आहे.

तपासादरम्यान एसआयटीच्या हाती तब्बल ३०० हून अधिक आक्षेपार्ह व्हिडीओ लागल्याची माहिती समोर आली आहे. हे व्हिडीओ २०२४ मधील असून दोन ते तीन महिन्यांच्या कालावधीत तयार करण्यात आल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या व्हिडीओंच्या आधारे प्रकरणाची व्याप्ती आणखी वाढण्याची चिन्हे आहेत. दरम्यान, एसआयटीने

पोलीस कोठडीत १ एप्रिलपर्यंत वाढ

दरम्यान, आरोपी अशोक खरात याला जिल्हा सत्र न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्याच्या पोलीस कोठडीत १ एप्रिलपर्यंत वाढ केली आहे. तपासासाठी अधिक वेळ आवश्यक असल्याचे सांगत पोलिसांनी कोठडी वाढवण्याची मागणी केली होती. सरकारी वकिलांनी न्यायालयात मांडले की, आरोपी तपासात सहकार्य करत नाही. त्याच्या मोबाईलमधील डेटा आणि संपर्कातील इतर संशयितांची चौकशी अद्याप बाकी आहे. तसेच तक्रारदार महिलांना दिल्या जाणाऱ्या पाण्यात गुंगीकारक द्रव्य मिसळले होते का, याचाही तपास केला जात आहे.

योग्य वेळी माहिती देऊ: मुख्यमंत्री

नागपूर: अशोक खरात प्रकरणात रूपाली चाकणकर यांना काय समज देण्यात आली, याबाबत माझ्याकडे सध्या कोणतीही माहिती नाही. या प्रकरणाची निःपक्षपणे चौकशी सुरू आहे. दररोज अशा प्रकरणांची माहिती दिली जात नाही, असे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे रोखठोकपणे सांगितले.

खरात प्रकरणावर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, प्रकरणात सध्याची स्थिती काय आहे, हेही मला माहित नाही. जी काही चौकशी सुरू आहे, ती निःपक्षपणे होत आहे. आवश्यकता असेल तेव्हाच माहिती घेतो. त्यामुळे योग्य वेळी योग्य माहिती दिली जाईल.

तपासाचा फोकस केवळ गुन्ह्यांपुरता मर्यादित न ठेवता आर्थिक आणि मालमत्तेच्या अंगानेही वाढवला आहे. यासाठी आयकर विभाग, मुद्रांक व नोंदणी विभाग आणि पासपोर्ट विभागाला पत्र पाठवून खरातच्या मालमत्ता, आर्थिक व्यवहार आणि परदेश दौऱ्यांची माहिती मागवण्यात आली आहे. 'ओकस प्रॉपर्टी' हेच या सर्व गैरकृत्यांचे केंद्र असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

या प्रकरणाचे धागेदोरे दूरवर पसरलेले असण्याची शक्यता असल्याने पोलिस आता खरातच्या संपूर्ण नेटवर्कचा तपास करत आहेत. पुढील काही दिवसांत या प्रकरणात आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता असून राज्याचे लक्ष या तपासाकडे लागले आहे.

अमेरिकेत ८० लाख लोकांचा ट्रम्पविरोधात मोर्चा!

वॉशिंग्टन डीसी: दि.२९ वृत्तसंस्था

अमेरिकेत शनिवारी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या विरोधात झालेल्या 'नो किंग्स रॅली'मध्ये ८० लाख लोकांनी भाग घेतला. मीडिया रिपोर्ट्सनुसार, संपूर्ण अमेरिकेतील सर्व ५० राज्यांमध्ये ३,३०० पेक्षा जास्त ठिकाणी हे आंदोलन आयोजित करण्यात आले होते.

आयोजकांनी सांगितले की, ऑक्टोबरमध्ये झालेल्या मागील नो किंग्स आंदोलनाच्या तुलनेत यावेळी सुमारे १० लाख अधिक लोक सहभागी झाले आणि जवळपास ६०० हून अधिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. आंदोलन करणाऱ्या लोकांचे म्हणणे आहे की, ते ट्रम्प सरकारच्या अनेक धोरणांवर नाराज आहेत. त्यांचा राग विशेषतः इराणसोबत वाढलेला तणाव, (पान २ वर)

३,३०० ठिकाणी निदर्शने

इराणची चार क्षेपणास्त्र निर्मिती केंद्रे उद्ध्वस्त

तेहरान: दि.२९ वृत्तसंस्था

अमेरिका आणि इस्रायलने गेल्या चार आठवड्यांत केलेल्या तीव्र हवाई हल्ल्यांमुळे इराणच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्र पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले आहे. वॉशिंग्टन पोस्टने उपग्रहाद्वारे मिळालेल्या छायाचित्रांच्या आधारे केलेल्या विश्लेषणानुसार, इराणमधील क्षेपणास्त्र उत्पादनाशी संबंधित ४ प्रमुख केंद्रे आणि किमान २९ प्रक्षेपण स्थळांना लक्ष्य करण्यात आले आहे. तेहरानजवळील खोजीर, पारचिन, हाकिमीयेह आणि शाहरूद यांसारख्या लष्करी तळांवर झालेल्या हल्ल्यांमुळे क्षेपणास्त्रांसाठी लागणारे घन आणि द्रव इंधन तयार करण्याची इराणची क्षमता तात्पुरती ठप्प झाली



आहे.

खोजीर संकुलात तर तब्बल ८८ इमारती जमीनदोस्त झाल्या आहे. यामुळे इराणला नजीकच्या काळात नवीन क्षेपणास्त्रे तयार करणे कठीण जाणार असल्याचे संरक्षण तज्ज्ञांचे मत आहे. या लष्करी मोहिमेत केवळ उत्पादनच नव्हे, तर इराणच्या क्षेपणास्त्र डागण्याच्या क्षमतेवरही प्रहार करण्यात आला आहे. इराणने डोंगरांच्या आडोशाने तयार केलेल्या अनेक भुयारी तळांची प्रवेशद्वारे हवाई हल्ल्यांनी (पान २ वर)

संभाजीनगरमधील गजानन हॉस्पिटलला भीषण आग

छत्रपती संभाजीनगर: छत्रपती संभाजीनगरमधील (औरंगाबाद) गजानन हॉस्पिटलमध्ये भीषण आग लागल्याची घटना समोर आली आहे, ज्यामुळे रुग्णालयात धुराचे लोट पसरले आणि खळबळ उडाली. शॉर्ट सर्किटमुळे ऑक्सिजन लाईनमध्ये आग लागल्याची प्राथमिक माहिती आहे. अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या असून, सर्व रुग्णांना सुरक्षित बाहेर काढून इतर रुग्णालयात हलवण्यात आले आहे. प्राथमिक अंदाजानुसार शॉर्ट सर्किटमुळे ऑक्सिजन लाईनमध्ये आग. आगीची भीषणता मोठी असून धुरामुळे रुग्णालयात भीतीचे वातावरण निर्माण झाले अग्निशमन दलाच्या दोन गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल होऊन आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

सासू-सासऱ्यांचा सांभाळ करण्याची सुनेवर कायदेशीर सक्ती नाही : हायकोर्ट

अलाहाबाद : दि.२९ वृत्तसंस्था

सासू-सासऱ्यांचा सांभाळ करण्याची सुनेवर कोणतीही कायदेशीर सक्ती नाही. फौजदारी प्रक्रिया संहिता किंवा नवीन भारतीय नागरिक सुरक्षा संहिता मधील तरतुदींनुसार पोटगी मागण्याचा अधिकार फक्त कायद्यात नमूद केलेल्या विशिष्ट नातेवाईकांनाच आहे. सासू-सासरे या कलमांच्या कक्षेत येत नाहीत. सून त्यांना पोटगी किंवा निर्वाह भत्ता देण्यास कायद्याने बांधील नाही, असे निरीक्षण अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मदन पाल सिंग यांच्या खंडपीठाने नोंदवले.

लाईव्ह लॉच्या रिपोर्टनुसार, आग्रा येथील एका वृद्ध दांपत्याने आपल्या सुनेविरुद्ध पोटगी मिळवण्यासाठी

फौजदारी पुनरीक्षण याचिका दाखल केली होती. ऑगस्ट २०२५ मध्ये आग्रा येथील कौटुंबिक न्यायालयाने त्यांचा पोटगीचा अर्ज फेटाळला. यानिकालास उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. याचिकाकर्त्या वृद्ध सासू व सासऱ्याने म्हटलं होतं की, ते ते वृद्ध, अशिक्षित आणि गरीब असून पूर्णपणे त्यांच्या मृत मुलावर अवलंबून होते. सून उत्तर प्रदेश पोलीस दलात कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत असून तिचे उत्पन्न चांगले आहे.मुलाच्या मृत्यूनंतर त्याला मिळणारे सर्व सेवा आणि निवृत्ती लाभ सुनेला मिळाले आहेत. त्यामुळे तिची सासू-सासऱ्यांचा सांभाळ करण्याची नैतिक जबाबदारी ही कायदेशीर जबाबदारी मानली जावी. उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, नैतिक जबाबदारी कितीही मोठी वाटत असली, तरी जोपर्यंत कायद्यात तशी तरतूद नसते, तोपर्यंत तिचे रूपांतर कायदेशीर जबाबदारीत करता येत (पान २ वर)

पोटगीच्या तरतुदीमध्ये सासू-सासरे यांचा समावेश होत नाही

न्यायमूर्ती मदन पाल सिंग यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १२५ किंवा च्या कलम १४४ मधील वैधानिक तरतुदींनुसार, सुनेवर तिच्या सासू-सासऱ्यांचा सांभाळ करण्याची कायदेशीर जबाबदारी नाही.कलम १४४ अंतर्गत पोटगी (निर्वाह भत्ता) मागण्याचा अधिकार हा एक वैधानिक अधिकार आहे. तो केवळ त्या कलमात स्पष्टपणे नमूद केलेल्या व्यक्तींच्या श्रेणींपुरताच मर्यादित आहे, या तरतुदीमध्ये सासू-सासरे या गटाचा समावेश होत नाही, त्यामुळे ते सुनेकडे पोटगीची मागणी करू शकत नाहीत.

एप्रिलमध्ये १४ दिवस बँका बंद!

मुंबई: दि.२९ वृत्तसंस्था

एप्रिल महिण्यापासून नवीन आर्थिक वर्ष सुरु होत आहे आणि त्याचसोबत बँकांनी आपल्या सुट्ट्यांची यादी देखील जाहीर केली आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सुट्ट्यांच्या आयडीनुसार, पुढील महिन्यात तब्बल १४ दिवस बंद राहणार आहेत, ज्यामध्ये रविवार आणि दुसरा व चौथा शनिवार तसेच काही सण आणि विशेष प्रसंगाचा समावेश आहे.

१ एप्रिल (बुधवार): वार्षिक बंदमुळे देशभरातील बँका बंद राहतील. २ एप्रिल (गुरुवार): मौंडी थर्सडे निमित्त कोची आणि तिरुवनंतपुरम येथील बँका बंद राहतील. ३ एप्रिल (शुक्रवार): गुड फ्रायडे निमित्त देशभरात बँकांना सुट्टी असेल. ५ एप्रिल (रविवार): सर्व बँकांना साप्ताहिक रविवारची सुट्टी असेल. ११ एप्रिल (शनिवार): महिन्यातील दुसऱ्या शनिवारची सुट्टी असेल. १२ एप्रिल (रविवार): सर्व बँका रविवारी बंद राहतील. १४ एप्रिल (मंगळवार): डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती/महाविषुव संक्रांती/

बिजू/बुईसू उत्सव/तमिळ नववर्ष दिन/बोहाग बिहू/चिराओबा/बैसाखी निमित्त देशभरातील विविध राज्यांमध्ये बँका बंद राहतील. १५ एप्रिल (बुधवार): बंगाली नववर्ष दिन (नबवर्षा)/बोहाग बिहू/विशू/हिमाचल दिन आगरतळा, गुवाहाटी, इटानगर, कोची, कोलकाता, शिमला आणि तिरुवनंतपुरम येथील बँका बंद राहतील. १६ एप्रिल (गुरुवार): बोहाग बिहू निमित्त गुवाहाटीतील बँका बंद राहतील. १९ एप्रिल (रविवार): देशभरातील सर्व बँका बंद राहतील. २० एप्रिल (सोमवार): बसव जयंती/अक्षय तृतीयेनिमित्त बंगळूरसह अनेक राज्यांतील बँका बंद राहतील. २१ एप्रिल (मंगळवार): गारिया पूजेनिमित्त आगरतळा येथील बँका बंद राहतील. (पान २ वर)

स्फोटात होरपळलेल्या तिन्ही कर्मचाऱ्यांचा मृत्यू

पालघर : दि.२९ वृत्तसंस्था

जिल्ह्यात एका कारखान्यात झालेल्या एसी युनिटच्या स्फोटात जखमी झालेल्या तीन व्यक्तींचा रविवारी मृत्यू झाला. हा स्फोट शनिवारी अबितघर-अभंग पाडा परिसरातील विस्तार मेटल इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत घडला.

मृतकांची ओळख मोहम्मद अन्सारी (३२), अखिलेश कुमार मोतीलाल जयस्वाल (४५) आणि किसान निकम (५७) अशी पटली आहे. घटनेच्या वेळी हे तिघेही तिथे देखभालीचे (मेंटेनन्सचे) काम करत होते. स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू असताना या तिघांचाही मृत्यू झाला. या तिघांनाही कामावर नेमणाऱ्या कंत्राटदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुरुस्तीचे काम सुरू असताना सुरक्षेचे योग्य नियम पाळले गेले होते की नाही, याचा तपास सुरू आहे. या प्रकरणी अद्याप कोणालाही अटक केलेली नाही.

विनाखटला तुरुंगवास ही शिक्षाच!

सर्वोच्च न्यायालयाने आरोपीला मंजूर केला जामीन

नवी दिल्ली: दि.२९ वृत्तसंस्था

खटला सुरू न होता आरोपीला दीर्घकाळ तुरुंगात ठेवणे हे शिक्षेसारखेच आहे, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत सर्वोच्च न्यायालयाने एका आरोपीला जामीन मंजूर केला आहे.

पंजाबमधील हत्येचा प्रयत्न केल्याच्या आरोपाखाली गेल्या दोन वर्षांपासून कारागृहात असलेल्या प्रदीपककुमार उर्फ बानू याला सर्वोच्च न्यायालयाने हा मोठा दिलासा दिला आहे. न्या. दिपांकर दत्ता आणि न्या. पी. व्ही. वराळे यांच्या खंडपीठाने हा निकाल देताना न्यायव्यवस्थेतील विलंब आणि आरोपींच्या मानवी हक्कांवर बोट

ठेवले. प्रदीपककुमार याला फेब्रुवारी २०२४ मध्ये अटक करण्यात आली होती. या प्रकरणात सरकारी पक्षाला एकूण २३ साक्षीदारांची उलटतपासणी करायची आहे. मात्र, गेल्या दोन वर्षांत एकाही साक्षीदाराची साक्ष नोंदवण्यात आलेली नाही. ही बाब लक्षात घेऊन न्यायालयाने सांगितले की, खटला अद्याप सुरूच झालेला नाही आणि तो संपण्याची चिन्हे सध्या दिसत नाहीत. अशा परिस्थितीत आरोपीला आणखी काळ कोठडीत ठेवणे अन्यायकारक ठरेल. यापूर्वी ११ जुलै २०२५ रोजी पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने प्रदीपककुमारचा जामीन अर्ज फेटाळून लावला होता. सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा तो आदेश रद्दबातल ठरवला. तपास आणि खटला पूर्ण होण्यास विलंब लागत असल्यास केवळ संशयावरून कोणालाही अनिश्चित काळासाठी तुरुंगात ठेवता येणार नाही. कारण विनाखटला तुरुंगवास ही एक प्रकारे शिक्षाच ठरते, असे खंडपीठाने आपल्या आदेशात अधोरेखित केले.

युध्दाचा परिणाम — विमान इंधन १५० टक्क्यांनी महागले

पाकिस्तानच्या आकाशात 'आर्थिक' संकट!

इस्लामाबाद: दि.२९ वृत्तसंस्था

शेजारील देश पाकिस्तान सध्या आपल्या इतिहासातील सर्वात भीषण आर्थिक संकटाचा सामना करत आहे. या संकटाचा मोठा फटका आता पाकिस्तानची राष्ट्रीय विमान कंपनी 'पाकिस्तान इंटरनॅशनल एअरलाईन्स' ला बसला आहे. परिस्थिती इतकी गंभीर झाली आहे की, ही एअरलाईन पूर्णपणे बंद होण्याची वेळ आली आहे. याचा थेट परिणाम अशा हजारो प्रवाशांवर होणार आहे, जे व्यापार आणि कामासाठी विमान प्रवासावर अवलंबून आहेत.

गेल्या काही आठवड्यांमध्ये पाकिस्तानात विमान इंधनाच्या किमतीत कमालीची वाढ झाली

आहे. ही वाढ किरकोळ नसून तब्बल १५० टक्क्यांचा मोठा उच्चांक आहे. विशेष म्हणजे, या दरवाढीची कोणतीही अधिकृत घोषणा न करता ती गुपचूप लागू करण्यात आली आहे.

अधिकृत आकडेवारीनुसार, १ मार्च रोजी ज्या जेट फ्यूलची (-१) किंमत १९० रुपये प्रति लिटर होती, ती २१ मार्चपर्यंत ४७२ रुपये प्रति लिटरवर पोहोचली आहे. केवळ २१ मार्च रोजीच किमतीत ८४ रुपयांची (२१.६५ टक्के) वाढ करण्यात आली. विमानाचा परिचालन खर्च इतका वाढल्यामुळे आता प्रवाशांच्या तिकीट दरातही मोठी वाढ होण्याची शक्यता असून, हवाई सफर सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेली आहे. इंधनाच्या किमतीत अचानक लागलेल्या या आगीचे मुख्य कारण म्हणजे अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेले युद्ध. या आंतरराष्ट्रीय तणावामुळे जागतिक पुरवठा साखळी पूर्णपणे विस्कळीत झाली आहे.

जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या अनिश्चिततेमुळे विमान इंधनाचा पुरवठा सातत्याने बाधित होत आहे, ज्याचा सर्वाधिक फटका आधीच 'कंगाल' झालेल्या पाकिस्तानला बसत आहे.

सेवा थांबविण्याची नामुष्की

या आर्थिक दबावाच्या पार्श्वभूमीवर 'पीआयए' कन्सोर्टियमचे अध्यक्ष आरिफ हबीब यांनी अत्यंत गंभीर इशारा दिला आहे. एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी स्पष्ट केले की, जर इंधनाचे दर याच वेगाने वाढत राहिले, तर एअरलाईनचे कामकाज सुरू ठेवणे अशक्य होईल. हबीब यांच्या मते, परिस्थिती सुधारली नाही तर पीआयएला आपली सेवा 'कायमची बंद' करण्यासाठी मजबूर व्हावे लागेल. कोणत्याही देशाच्या सरकारी विमान कंपनीच्या प्रमुखाकडून असे विधान येणे, हे तिथली परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्याचे लक्षण मानले जात आहे.

ऑनलाईन पेमेंट प्रक्रियेत १ एप्रिलपासून मोठे बदल

नवी दिल्ली: दि.२९ वृत्तसंस्था

ऑनलाईन पेमेंटची सुरक्षितता वाढावी, नागरिकांची फसवणूक टळली जावी, यासाठी रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) ऑनलाईन पेमेंटशी संबंधित प्रक्रियेत येत्या १ एप्रिलपासून बदल केले आहेत. सर्व ऑनलाईन पेमेंटसाठी द्विस्तरीय पडताळणी अनिवार्य करण्यात आली आहे. केवळ पासवर्ड किंवा ओटीपी पुरेसा ठरणार नाही. नवीन नियमांनुसार, प्रत्येक पेमेंटसाठी किमान दोन पडताळणी पद्धती आवश्यक असतील. मोबाईल पिन, यूपीआय पिन, फिंगरप्रिंट, ओटीपी अशा इतर पर्यायांची निवड करावी लागणार आहे. लहान रकमेच्या पेमेंटसाठी कमी तपासणी केली जाईल. तर, मोठ्या रकमेसाठी किंवा संशयास्पद व्यवहारांसाठी अतिरिक्त पडताळणी आवश्यक असेल. याला रिस्क-बेस्ड ऑथेंटिकेशन (जोखीमआधारित प्रमाणीकरण) म्हणतात. परदेशी

केवळ पिन पुरेसा नाही

यापूर्वी ऑनलाईन व्यवहारांसाठी केवळ पिन क्रमांक पुरेसा होता. आता पासवर्ड किंवा पिन, वनटाईम पासवर्ड (ओटीपी), बोटांचे ठसे, चेहऱ्याची ओळख यासारखा बायोमेट्रिक पासवर्ड, हार्डवेअर टोकन यासारख्या पद्धतीचा वापर केला जाईल. म्हणजेच एकाहून अधिक सुरक्षा प्रणालीचा वापर करावा लागेल.

संकेतस्थळ किंवा ॲप्सवर केलेल्या पेमेंटसाठी, हे नियम १ ऑक्टोबर २०२६ पासून लागू केले जातील.

पान 1 वरून...

अमेरिकेत ८० लाख लोकांचा...

कठोर इमिग्रेशन कारवाई आणि वाढत्या महागाईबद्दल आहे. अनेक ठिकाणी लोकांनी ट्रम्प आणि उपराष्ट्रपती जेडी वेंस यांच्या विरोधात पोस्टर्स दाखवले आणि त्यांना पदावरून हटवण्याची मागणी केली. व्हाईट हाऊसने या आंदोलनांना थेरपी सेशन असे संबोधत म्हटले की, सामान्य लोकांना याचा फारसा फरक पडत नाही. तर ट्रम्प यांचे म्हणणे आहे की, त्यांचे निर्णय देशाला मजबूत करण्यासाठी आहेत. त्यांनी असेही म्हटले की, ते राजा नाहीत आणि त्यांच्यावर लावण्यात आलेले आरोप चुकीचे आहेत. फक्त अमेरिकेतच नाही, तर जगाच्या इतर भागांमध्येही ट्रम्प यांच्याविरोधात नाराजी दिसून आली आहे. पॅरिस, लंडन आणि लिस्बनसारख्या शहरांमध्येही लोकांनी रस्त्यावर उतरून ट्रम्प यांच्याविरोधात निदर्शने केली आणि त्यांना पदावरून हटवण्याची मागणी केली.

सासू-सासऱ्यांचा सांभाळ...

नाही. विधीमंडळाने आपल्या विवेकाने सासू-सासऱ्यांचा समावेश या कलमात केलेला नाही. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, सुनेवर तिच्या सासू-सासऱ्यांच्या देखभालीची जबाबदारी टाकणे हा या कायद्याचा हेतू नाही. सुनेला पोलीस दलातील नोकरी तिच्या पतीच्या निधनानंतर अनुकंपा तत्त्वावर मिळाली होती, असा कोणताही पुरावा रेकॉर्डवर नसल्याचेही न्यायालयाने नमूद केले. याव्यतिरिक्त, मृत मुलाच्या मालमत्तेच्या वारसा हक्काबाबतचे मुद्दे या पोटगीच्या सुनावणीत विचारात घेतले जाऊ शकत नाहीत, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. कौटुंबिक न्यायालयाच्या आदेशात कोणतीही त्रुटी नसल्याचे नमूद करत उच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली.

इराणची चार क्षेपणास्त्र...

नष्ट केली आहेत. यामुळे तेथे ठेवलेली क्षेपणास्त्रे बाहेर काढणे कठीण झाले आहे. अमेरिकेचे संरक्षण सचिव पीट हेगसेथ यांनी, या हल्ल्यांमुळे शेजारील देशांवरील इराणच्या प्रतिहल्ल्यांचे प्रमाण ९० टक्क्यांनी घटले आहे, असा दावा केला आहे. मात्र, इराणचा क्षेपणास्त्र कार्यक्रम पूर्णपणे नष्ट झालेला नाही. इराण आजही काही प्रमाणात हल्ले करत असून, त्यांच्याकडे असलेले मोबाईल लॉंचर्स आणि विदेशी पुरवठा साखळीच्या मदतीने ते पुन्हा आपली शक्ती उभारण्याचा प्रयत्न करू शकतात, असा इशाराही तज्ज्ञांनी दिला आहे.

एप्रिलमध्ये १४ दिवस...

२५ एप्रिल (शनिवार): महिन्याचा चौथा शनिवार असल्याने बँका बंद राहतील. २६ एप्रिल (रविवार): देशभरातील सर्व बँकांना रविवारची साप्ताहिक सुट्टी असेल. बँका जरी बंद असल्या तरी युपीआय सेवा ही आपल्या हातात म्हणजेच आपल्या फोन मध्ये कायम उपलब्ध तर आहेच. त्यामुळे लक्षात ठेवा पुढील काही दिवस बँकवर अवलंबून न राहता आपला युपीआय सिस्टीम अपडेट करा.

सौर ऊर्जेत नागपूरचे वर्चस्व वाढणार; ८.५ गिगावॅट क्षमतेसह अवादा इलेक्ट्रो सज्ज

विदर्भात भागीदारी विस्तारावर भर

नागपूर , दि. २९ वृत्तसंस्था

भारतातील सौर ऊर्जा क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या अवादा समूहाची उत्पादन शाखा अवादा इलेक्ट्रोने नागपूर येथे चॅनेल पार्टनर आणि ईपीसी मीटचे भव्य आयोजन करून आपल्या विस्तार योजनांना वेग दिला आहे. २० मार्च २०२६ रोजी पार पडलेल्या या विशेष बैठकीत प्रामुख्याने रिटेल आणि वितरित सौर बाजारपेठेतील उपस्थिती बळकट करण्यावर भर देण्यात आला. नागपूरची अत्याधुनिक उत्पादन सुविधा आणि दादरी येथील युनिटच्या जोरावर कंपनीने सध्या ८.५ गिगावॅट इतकी प्रचंड उत्पादन क्षमता साध्य केली आहे. या कार्यक्रमात कंपनीने आपले ७२० डब्ल्यूपी एन-टाइप टॉप कॉन सोलार मॉड्यूल सादर केले, जे उच्च ऊर्जा उत्पादन आणि प्रकल्प खर्चात कपात करण्यासाठी प्रभावी ठरणार आहे.

कार्यक्रमादरम्यान तांत्रिक सत्रांच्या माध्यमातून इन्स्टॉलर आणि वितरक नेटवर्कशी संवाद साधण्यात आला. यामध्ये मॉड्यूल्सची सुलभ उपलब्धता, वॉरंटी आश्वासन आणि सुरक्षा प्रोटोकॉल्स यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. विशेष म्हणजे, नागपूर येथील स्वयंचलित उत्पादन केंद्रात अवघ्या १६ सेकंदांचा सायकल टाइम साध्य केला जात असून, यामुळे गुणवत्ता आणि खर्च कार्यक्षमता राखणे सोपे झाले आहे. या सुविधेमुळे स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होऊन सामाजिक-आर्थिक विकासाला चालना मिळाली आहे. अवादाची ही उत्पादने एएलएमएम -सूचीबद्ध असून बीआयएस आणि आंतरराष्ट्रीय मानकांनुसार प्रमाणित आहेत, ज्यामुळे त्यांची विश्वासार्हता अधिक वाढते.

या प्रसंगी अवादा समूहाचे अध्यक्ष श्री. विनीत मित्तल यांनी भविष्यातील वाटचालीवर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, ''अवादा इलेक्ट्रो तर्फे उच्च कार्यक्षमतेच्या तसेच देशांतर्गत उत्पादित सोलार मॉड्यूल्सचा विश्वासार्ह पुरवठा सुनिश्चित करून रूफटॉप व वितरित सौर परिसंस्था अधिक सक्षम करण्यावर विशेष भर देण्यात येत आहे. नागपूर हे आमच्यासाठी धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचे केंद्र असून, प्रगत एन-टाइप तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आम्ही देशातील सौर ऊर्जा स्वीकाराला नवी दिशा देण्यासाठी कटिबद्ध आहोत''. महाराष्ट्रासह इतर राज्यांतही आपले वितरक जाळे विस्तारण्याचा मानस कंपनीने यावेळी व्यक्त केला.

राष्ट्रवादीच्या दैवतांना डावलून स्वत: देव बनू नका

पोस्टरवरून अमोल मिटकरींचा सुनील तटकरेंवर घणाघात

मुंबई, दि. २९ वृत्तसंस्था

राष्ट्रवादीचे खासदार सुनील तटकरे यांच्या मतदारसंघांमध्ये आयोजित एका कार्यक्रमात लावण्यात आलेल्या पोस्टरवरून पक्षाचे नेते अमोल मिटकरी यांनी टीका केली आहे. ज्यांच्या नेतृत्वावर कार्यकर्त्यांचा विश्वास आहे, त्यांचाच फोटो हटवला जात आहे, असे मिटकरी यांनी म्हटले आहे.

रायगडमध्ये पक्षाकडून जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये विजयी झालेल्या उमेदवारांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता. या समारंभाला सुनील तटकरे यांच्यासह मंत्री आदिती तटकरे देखील उपस्थित होत्या. या कार्यक्रमात स्टेजवर लावलेल्या पोस्टरवर सुनील तटकरे, आदित्य तटकरे आणि आमदार अनिकेत तटकरे यांचेच फोटो होते. मात्र दिवंगत अजित पवार, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे फोटो नसल्याचे दिसले. यावरून मिटकरी म्हणाले, ज्यांच्या नेतृत्वावर कार्यकर्त्यांचा विश्वास आहे, त्यांचाच फोटो हटवला जात आहे, हे सर्वसामान्य कार्यकर्ता कधीही सहन करणार नाही. राष्ट्रवादीच्या दैवतांना डावलून स्वत:देव बनण्याचा कुणीही प्रयत्न करु नये. महाराष्ट्र हे सहन करणार नाही, असे मिटकरी यांनी नाव न घेता सुनिल तटकरे यांना टोला लगावला आहे. दरम्यान, या कार्यक्रमावरून तटकरे कुटुंबियांवर टीका होत असल्याचे पाहायला मिळत आहे.

९४ हजार मेट्रिक टन एलपीजी घेऊन दोन टँकर भारताकडे रवाना

नवी दिल्ली , दि. २९ वृत्तसंस्था

अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या संघर्षामुळे जगभरातील ऊर्जा पुरवठ्यात अडथळा निर्माण झाला आहे. यादरम्यान भारताकडे येणारे सुमारे ९४ हजार मेट्रिक टन एलपीजी घेऊन येणारे दोन टँकर होर्मुझची सामुद्रधुनी सुरक्षितपणे पार करून भारताच्या दिशेने येत आहेत, अशी माहिती सरकारने दिली आहे.

' ' आणि ' ' हे टँकर अनुक्रमे ३१ मार्च रोजी मुंबईत आणि १ एप्रिल रोजी न्यू मँगलोर येथे पोहोचण्याची शक्यता आहे, असे पेट्रोलियम मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे. अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी जहाजांची वाहतूक जवळपास ठप्प झाली आहे.

मात्र, मित्र राष्ट्रांच्या जहाजांनी इराणी प्रशासनाशी समन्वय साधला तर ते या जलमार्गाने प्रवास करू शकतात असे इराणने म्हटले आहे. होर्मुझच्या या अरुंद मार्गाने सुरक्षितपणे बाहेर पडणारी ही भारताची नवी जहाजे आहेत. शुक्रवारी समोर आलेल्या एलएसईजी जहाज ट्रॅकिंग डेटानुसार, आतापर्यंत एलपीजी गॅसच्या ४ टँकर्सनी हा जलमार्ग यशस्वीपणे ओलांडला आहे, तर आणखी ३ टँकर्स अजूनही सामुद्रधुनीच्या पश्चिम भागात आहेत.

भारताचा ध्वज असलेली एकूण १८ जहाजे

पश्चिम आखाती क्षेत्रात अजूनही ४८५ भारतीय खलाशांसह भारताचा ध्वज असलेली एकूण १८ जहाजे आहेत, असे सरकारने म्हटले आहे.भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा एलपीजी आयातदार देश आहे. भारतात गेल्या वर्षी ३३.१५ दशलक्ष टन गॅसचा वापर केला गेला. भारताच्या एकूण गरजेपैकी सुमारे ६० टक्के गॅस हा आयात केला जातो आणि विशेष म्हणजे या आयातीपैकी सुमारे ९० टक्के गॅस हा मध्य पूर्वेतील देशांतून येतो.

श्री शिवाजी महाविद्यालयात इलेक्ट्रिकल अर्थिंग यावर कार्यशाळा संपन्न

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोला, दि. २९ : येथील श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या इलेक्ट्रॉनिक्स विभागाच्या वतीने इलेक्ट्रिकल अर्थिंग: महत्त्व, चाचणी व अपघात या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे आयक्यूएसी समन्वयक डॉ. आशिष राऊत होते. कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक व उद्घाटक म्हणून श्री. मोहन पोकळे सर, जिल्हा विद्युत निरीक्षक अकोला हे उपस्थित होते. याप्रसंगी व्यासपीठावर विज्ञान शाखा प्रमुख डॉ. नितीन मोहोड आणि इलेक्ट्रॉनिक्स विभागप्रमुख प्रा. डॉ. गजानन वजिरे यांची प्रमुख उपस्थिती होती. श्री. पोकळे यांनी आपल्या मार्गदर्शनातून इलेक्ट्रिकल अर्थिंगचे घरगुती व औद्योगिक क्षेत्रातील महत्त्व विशद केले. अर्थिंगची योग्य तपासणी कशी करावी आणि अर्थिंग नसण्याचे संभाव्य धोके व अपघात काय असू शकतात याचे विश्लेषण -- द्वारे त्यांनी विद्यार्थ्यांना दिले. अध्यक्षीय भाषणात डॉ. आशिष राऊत यांनी तंत्रज्ञानातील अशा व्यावहारिक प्रशिक्षणाची गरज व्यक्त केली आणि विद्यार्थ्यांच्या तांत्रिक कौशल्याचे कौतुक केले. विभागप्रमुख प्रा. वजिरे यांनी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून प्रत्यक्ष समाजात जाऊन याबद्दल जनजागृती करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मेघा तिजारे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. अमृता घुटे यांनी केले.

अभिनेते विजय यांच्या टीव्हीकेचा सत्ताधारी द्रमुकविरुद्ध थेट सामना

चेन्नई, दि. २९ वृत्तसंस्था

अभिनेते आणि तमिळगा वेत्री कळघम पक्षाचे सर्वेसर्वा विजय यांनी आज (दि. २९) आपल्या पक्षाच्या उमेदवारांची घोषणा केली. विजय हे तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत दोन मतदारसंघांतून निवडणूक लढवणार आहेत.

विजय म्हणाले, जनतेच्या प्रश्नांची उत्तरे देतील, अशा लोकांना उमेदवारी दिली आहे. मी तुमच्यासाठी सर्व काही सोडले, तसेच हे उमेदवार मी तुम्हाला सोपवत आहे. कृपया आम्हाला एक संधी द्या, असे आवाहन करताना ही निवडणूक केवळ आमच्यात आणि मुख्यमंत्री स्टालिन यांच्या द्रमुकमध्ये आहे. त्यांची राजकीय युतीही एक तडजोड आहे. आमचे उमेदवार हे सामान्य पार्श्वभूमीतून आले असून ते सर्वसामान्यांचे प्रश्न जाणतात, असा दावाही त्यांनी केला. यावेळी विजय यांनी बेरोजगार तरुणांसाठी अनेक गॅरंटी जाहीर केल्या आहेत. यामध्ये नोकरी नसलेल्या २९ वर्षांवरील व्यक्तींना दरमहा ४,००० रुपयांचे अनुदान, डिप्लोमा धारकांसाठी दरमहा २,५०० रुपये, इयत्ता १२ वी ते पीएचडीपर्यंतच्या शिक्षणासाठी २० लाख रुपयांपर्यंतचे विनातारण कर्ज, आदींचा समावेश आहे. तसेच तमिळ एम्प्लॉयमेंट क्रेडिट सिस्टम: ज्या खासगी कंपन्या ७५% स्थानिक लोकांना रोजगार देतील, त्यांना एसजीएसटीमध्ये २.५% सूट आणि वीज बिलात ५% कपात दिली जाईल, असे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले. मतदारांना आवाहन करताना विजय म्हणाले, आम्ही सार्वजनिक पैशाचा कधीही गैरवापर करणार नाही किंवा भ्रष्टाचारात अडकणार नाही. महिलांची सुरक्षा, ड्रग्जमुक्त तामिळनाडू आणि कडक कायदा व सुव्यवस्था आम्ही सुनिश्चित करू, अशी ग्वाही देत मतदारांनी टीव्हीकेच्या शिट्टी या चिन्हाला पाठिंबा देण्याचे आवाहन त्यांनी केले.

पक्षातील कोअर टीमला महत्त्वाच्या जागा

» अभिनेते विजय यांनी तमिळगा वेत्री कळघमच्या उमेदवारांची यादीही जाहीर केली. चेन्नईतील पेरांबूर आणि तिरुचिरापल्ली पूर्व या दोन जागांवरून ''सी. जोसेफ विजय'' निवडणूक लढवतील, असे त्यांनी स्पष्ट केले. पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना संबोधित करताना विजय यांनी त्यांच्या कोअर टीममधील विश्वासू नेत्यांना महत्त्वाच्या मतदारसंघांतून उमेदवारी दिली आहे. यामध्ये एन. आनंद: टी. नगर, व्यंकट रमण: मायलापूर, आदव अर्जुन: विल्लीवाक्कम, के. ए. सेंगोट्टयन: गोबीचेत्तीपलायम, के. जी. अरुणराज: तिरुचेंगोडे, सीटीआर निर्मल कुमार: तिरुप्परनकुंद्रम, जेसीडी प्रभाकर: थाउजंड लाईट्स, व्ही. एस. बाबू: कोलाथूर, डॉ. मारिया विल्सन: आर. के. नगर यांचा समावेश आहे.

पुणे येथे २६.८० कोटींचा गांजा जप्त

पुणे : पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क विभागाने ड्रग्ज तस्करीचा एक मोठा डाव उधळून लावला आहे. थायलंडहून चक्क मँडरिन ऑरेंजच्या बॉक्समध्ये लपवून आणलेला तब्बल ७६ किलो हायड्रोपोनिक गांजा जप्त करण्यात आला. आंतरराष्ट्रीय बाजारात याची किंमत २६.८० कोटी रुपये असून, अत्यंत चलाखीने व्हॅक्यूम सीलबंद पाकिटांत हे ड्रग्ज दडवले होते. या प्रकरणी एकाला अटक करण्यात आली असून तस्करीचे आंतरराष्ट्रीय रॅकेट उघड होण्याची शक्यता आहे. ही संपूर्ण खेळी अगदी स्मार्ट पद्धतीने आखली गेली होती. माल संत्र्याच्या फोडी (मँडरिन ऑरेंज) असल्याचं सांगून थर्माकोलच्या बॉक्समध्ये पॅक करून आणण्यात आला होता. बाहेरून सगळं अगदी नॉर्मल दिसत होतं, त्यामुळे सुरुवातीला कोणालाही संशय येणं कठीण होतं. पण स्कॅनिंग करताना अधिकाऱ्यांना काहीतरी गडबड असल्याचा अंदाज आला.

शेतकरी-सरकार दुवा म्हणून राष्ट्रवादी किसान सभा कार्य करणार - वसंत मानकर

हिंगोलीत राष्ट्रवादी किसान सभेची शासकीय विश्रामगृह येथे बैठक

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

हिंगोली, दि. २९ : राष्ट्रवादी किसान सभा पदाधिकारी व शेतकरी संवाद मिळावा शनिवारी २८ मार्च रोजी सकाळी ११ वाजता शासकीय विश्रामगृह येथे पार पडला या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस किसान सभेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष एडवोकेट वसंत मानकर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे हिंगोली जिल्हाध्यक्ष अनिल भाऊ पतंगे यांच्या उपस्थितीत व राष्ट्रवादी किसान सभा हिंगोली जिल्हाध्यक्ष वसंत मस्के यांच्या नेतृत्वाखाली आढावा बैठक पार पडली यावेळी राष्ट्रवादी किसान सभेचे प्रदेशाध्यक्ष एडवोकेट वसंत मानकर यांनी किसान सभा ही संघटना राज्यात शेतकरी आणि सरकार त्यांच्यातील प्रभावी दुवा म्हणून कार्य करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

राष्ट्रवादी किसान सभेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष वसंत मानकर १३ मार्चपासून महाराष्ट्र दौऱ्यावर आहे ते हिंगोली येथे किसान सभेच्या प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या आढावा बैठकीने झाली. या बैठकीत जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध समस्या मानकर यांनी जाणून घेतल्या. या बैठकीत मार्गदर्शन करताना मनकर म्हणाले की, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने काम करून त्यावर शासनाच्या माध्यमातून उपाययोजना राबवण्यासाठी किसान सभा सक्रिय भूमिका बजावेल. शेतकरी व सरकार त्यांच्यात समन्वय साधत त्यांच्या समस्या सोडविण्यास प्राधान्य दिले बैठकीच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे हिंगोली जिल्हाध्यक्ष अनिल भाऊ पतंगे हे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात राष्ट्रवादी काँग्रेस हा शेतकऱ्यांचा पक्ष असून किसान सभेच्या माध्यमातून ही ओळख अधिक भक्कम करण्याचे आवाहन केले.

प्रास्ताविक करताना किसान सभा हिंगोली जिल्हाध्यक्ष वसंत मस्के यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या गंभीर समस्यांकडे लक्ष वेधले. विशेषतः रानडुकराच्या हल्ल्यांमुळे शेतकरी हवालदिल होत असून, फक्त आर्थिक मदतीऐवजी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली. जंगललगतच्या भागातील शेतकऱ्यांना ६ फूट उंचीचे सौर कुंपण १०० टक्के अनुदानावर देण्याचीही मागणी करण्यात आली. तसेच गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सानुग्रह अनुदान योजना अंतर्गत अपघातग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी वाहन चालविण्याचा परवाना असण्याची अट रद्द करून कुटुंबियांना आर्थिक सहाय्य देण्याची मागणीही केली .

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस किसान सभा प्रदेश सरचिटणीस गणेश डोंगरे किसान सभेचे मराठवाडा अध्यक्ष रामभाऊ हांडोळे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते तथा माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण रवींद्र गडदे अशोक शिरामे रवी डोरले विकास शिंदे अजय भूतनर यांच्यासह अनेक कार्यकते उपस्थित होते.

सुनंदाताई वर लोकस्वातंत्र्य विश्वशक्ती गौरव पुरस्काराने सन्मानित

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोला, दि. २९ : लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघ समाजाभिमुख राष्ट्रीय संघटनेच्या वतीने महिलाचे दिन कार्यक्रमात नारी ललकारच्या कार्यकारी संपादिका, मॉ जिजाऊ सार्वजनिक वाचनालयाच्या कोषाध्यक्षा तसेच वऱ्हाड विकास संस्थेच्या संचालिका सुनंदाताई पंजाबराव वर यांच्या विविध सामाजिक, सांस्कृतीक कार्य त्यांचे हातून होत असल्याने त्यांना मोमेंटो, सन्मानपत्र व साडी देवून मान्यवरांचे हस्ते 'लोकस्वातंत्र्य विश्वशक्ती गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा ज्येष्ठ साहित्यिका, सामाजिक सेवाव्रती देवकाताई देशमुख, प्रमुख उपस्थितीमध्ये मायाताई ईरतकर (सदस्या- राज्य अन्न आयोग, महाराष्ट्र शासन अकोला), मा. संजय देशमुख (संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष, लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघ), राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंदाताई देशमुख, राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक सिमाताई झावरे, शर्मा मॅडम, आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन जया भारती / इंगोले व दिपाली बाहेकर यांनी केले.

बडगा | ३६ हजारांवर थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित

महावितरणचा थकबाकीदारांना हाय व्होल्टेज शॉक

नागपूर , दि. २९ वृत्तसंस्था

आर्थिक वर्षाचे शेवटचे अवघे काही तास उरले असताना महावितरणने थकबाकी वसुलीसाठी आतापर्यंतची सर्वात कठोर भूमिका घेतली आहे. नागपूर जिल्ह्यात तब्बल ४३ कोटी रुपयांचा डोंगर उभा राहिल्याने प्रशासनाने अधिक आक्रमक पवित्रा घेतला असून, आता चक्क पोलीस बंदोबस्तात थकबाकीदारांचा वीज पुरवठा खंडित करण्याची धडाकेबाज मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेत १ मार्च पासून आतापर्यंत ३६ हजाराच्या वर थकबाकीदारांचा वीज पुरवठा खंडित करण्यात आला आहे. बिलाचा भरणा करा अन्यथा अंधारात राहा असा थेट इशारा देत महावितरणने नागपूरसह जिल्ह्याभरात वसुलीचा धडाका लावला आहे.

संवेदनशील भागात खाकीच्या पाहेऱ्यात कारवाई: थकबाकी वसुलीसाठी जाणाऱ्या कर्मचाऱ्यांवर होणारे हल्ले आणि वाढता विरोध लक्षात घेता, महावितरणने आता पोलीस प्रशासनाचे कवच घेतले आहे. नागपूर शहरातील लष्करीबाग उपविभागांतर्गत येणाऱ्या मानकापूर आणि नई बस्ती यांसारख्या संवेदनशील भागांमध्ये आज पोलीस फौजफाट्यासह महावितरणचे पथक धडकले. कोणत्याही दबावाला बळी न पडता, ज्या ग्राहकांनी वारंवार सूचना देऊनही थकबाकी भरली नाही, अशा शेकडो ग्राहकांचा वीज पुरवठा जागीच खंडित करण्यात आला. विशेष म्हणजे, या मोहिमेत राजकीय मध्यस्थी किंवा सामाजिक दबाव झुगारून लावत केवळ वसुलीवर लक्ष केंद्रित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

काटोलमध्ये कर्मचाऱ्यांवर हल्ला; आरोपींवर गुन्हा दाखल: वसुली मोहिमेदरम्यान कायदा हातात घेणाऱ्यांविरुद्धही महावितरणने आक्रमक पवित्रा घेतला आहे. काटोल शहरातील पेठ बुधवार भागात थकबाकी वसुलीसाठी गेलेल्या महावितरणच्या पथकावर काही इसमांनी हल्ला चढवून शासकीय कामात अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मात्र, प्रशासनाने याची तत्काळ दखल घेत संबंधित आरोपींविरुद्ध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही आणि अडथळा आणणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा सज्जड दम प्रशासनाने दिला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांना 'अल्टिमेटम': केवळ सामान्य ग्राहकच नव्हे, तर सरकारी यंत्रणांकडेही महावितरणने आपला मोर्चा वळवला आहे. नागपूर जिल्ह्यात पाणीपुरवठा योजनांची तब्बल १० कोटींची थकबाकी थकली आहे. ही बाब अत्यंत गंभीर असल्याने महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतः मैदानात उतरून नगरपंचायत, नगर परिषदा आणि ग्रामपंचायतींच्या गटविकास अधिकाऱ्यांच्या () भेटी घेतल्या आहेत. ''सार्वजनिक पाणीपुरवठा आणि पथदिव्यांचा पुरवठा खंडित झाल्यास त्याला सर्वस्वी स्थानिक प्रशासन जबाबदार राहील,'' अशा शब्दांत महावितरणने ही अंतिम संधी असल्याचे स्पष्ट केले आहे.

अंतिम ४८ तास; सुटीच्या दिवशीही केंद्रे खुली: चालू आर्थिक वर्षाचा मंगळवार शेवटचा दिवस आहे. आणि मंगळवारी सुटी असली तरी ग्राहकांची सोय व्हावी आणि त्यांना कारवाईपासून वाचता यावे, यासाठी महावितरणची सर्व अधिकृत वीज बिल भरणा केंद्रे पूर्णवेळ सुरू राहणार आहेत. याशिवाय, ग्राहकांनी महावितरणच्या मोबाईल ॲप किंवा संकेतस्थळावरून ऑनलाईन भरणा करून कटू कारवाई टाळावी, असे आवाहन नागपूर परिमंडलाच्या मुख्य अभियंत्यांनी केले आहे.

» पुढील दोन दिवस ही मोहीम अधिक तीव्र होणार असून, थकबाकीमुक्त न होणाऱ्या भागांत अंधार पसरण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

उपमुख्य जनसंपर्क अधिकारी,
महावितरण, नागपूर.

महत्त्वाचे

जगभरात पेट्रोल-डिझेलचे संकट घोंगावतेय

नवी दिल्ली : जगभरातील सुरू असलेल्या संघर्षांमुळे ऊर्जा क्षेत्रावर परिणाम होत असून, यामुळे पेट्रोल आणि डिझेलचे मोठे संकट निर्माण होत असल्याचा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज (दि. २९) मन की बातच्या माध्यमातून दिला.जगाच्या विविध भागांत युद्ध आणि संघर्षाची परिस्थिती मन की बातच्या १३२ व्या भागात बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, मार्च महिना जागतिक स्तरावर अत्यंत घडामोडींचा राहिला आहे. गेल्या काळात कोरोनामुळे संपूर्ण जगाला प्रदीर्घ काळ अनेक समस्यांना सामोरे जावे लागले. कोरोनाच्या संकटातून बाहेर पडल्यानंतर जग एका नव्या सुरुवातीसह प्रगतीच्या पथावर पुढे जाईल, अशी आपल्या सर्वांची अपेक्षा होती; परंतु जगाच्या विविध भागांत युद्ध आणि संघर्षाची परिस्थिती निर्माण होत राहिली. सध्या आपल्या शेजारील क्षेत्रात गेल्या महिनाभरापासून भीषण युद्ध सुरू आहे. या देशांमध्ये, विशेषतः आखाती देशांमध्ये लाखो भारतीय कुटुंबांचे नातेवाईक वास्तव्यास आहेत आणि तिथे काम करत आहेत.

भाजप सत्तेत आल्यास मांसाहार बंद होईल – ममता बॅनर्जी

कोलकाता : पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजताच राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडण्यास सुरुवात झाली आहे. सत्ताधारी तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा आणि मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी पुरुलिया येथील जाहीर सभेत भारतीय जनता पक्षावर जोरदार हल्लाबोल केला. जर पश्चिम बंगालमध्ये भाजपची सत्ता आली, तर राज्यातील जनतेला मांसाहार करण्यापासून रोखले जाईल आणि लोकांच्या खाण्यापिण्याच्या स्वातंत्र्यावर गदा येईल, असा खळबळजनक दावा ममतादिदींनी यावेळी केला. पुरुलियातील जनसमुदायाला संबोधित करताना ममता बॅनर्जी यांनी भाजपला घेरण्याचा प्रयत्न केला. त्या म्हणाल्या की, 'राज्यातील महिलांना लक्ष्मी भंडार योजनेच्या माध्यमातून मोठा आधार मिळत आहे. मात्र, भाजप निवडणुकीच्या तोंडावर काही आर्थिक मदतीचे गाजर दाखवेल आणि निवडणुका संपताच ही सर्व मदत कायमची बंद करून टाकेल. याव्यतिरिक्त, त्यांनी निवडणूक प्रक्रियेवरही संशय व्यक्त केला. बंगाल निवडणुकीपूर्वी एसआयआरच्या () माध्यमातून जवळपास १.२ कोटी मतदारांची नावे जाणीवपूर्वक वगळण्यात आली आहेत, असा गंभीर आरोपही त्यांनी यावेळी केला. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे नाव न घेता टीका करताना मुख्यमंत्री म्हणाल्या की, भाजपचे एक मोठे नेते सध्या टीएमसीच्या विरोधात आरोपपत्र प्रसिद्ध करत आहेत. परंतु, खरी गरज त्यांच्या विरोधात आरोपपत्र दाखल करण्याची आहे. गुजरातमध्ये झालेल्या दंगलींचा इतिहास सर्वांना माहीत आहे.

श्रीलंकेसाठी भारत बनला 'संकटमोचक'!

लंकेला ३८,००० मेट्रिक टन इंधनाची 'संजीवनी'

कोलंबो : दि.२९ वृत्तसंस्था

मध्यपूर्वेतील वाढता तणाव आणि युद्धजन्य परिस्थितीमुळे जागतिक ऊर्जा पुरवठा साखळी पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. या संकटामुळे शेजारील श्रीलंका देश पुन्हा एकदा भीषण अंधकार आणि इंधन टंचाईच्या उंबरठ्यावर येऊन ठेपला आहे. मात्र, अशा कठीण प्रसंगी भारताने नेहमीप्रमाणे एका खऱ्या आणि विश्वासार्ह मित्राची भूमिका बजावत श्रीलंकेला मदतीचा हात दिला आहे. भारताने तातडीने ३८,००० मेट्रिक टन पेट्रोलियम पदार्थांचा मोठा साठा कोलंबोमध्ये पोहोचवला असून, यामुळे श्रीलंकेला मोठा दिलासा मिळाला आहे.

मार्चच्या दुसऱ्या आठवड्यापासून अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या संघर्षामुळे आखाती देशांतून होणारा तेल पुरवठा जवळपास ठप्प झाला आहे. अनेक जागतिक पुरवठादारांनी श्रीलंकेला इंधन देण्यास असमर्थता दर्शवली होती. ही गंभीर परिस्थिती ओळखून २४ मार्च २०२६ रोजी श्रीलंकेचे राष्ट्रपती अनुरा कुमारा दिसानायके आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात फोनवरून सविस्तर चर्चा झाली. या चर्चेनंतर भारताने विलंब न लावता 'लंका आयओसी'च्या माध्यमातून २०,००० मेट्रिक टन डिझेल आणि १८,००० मेट्रिक टन पेट्रोलचा साठा रवाना केला, जो २८ मार्च रोजी श्रीलंकेच्या तटावर सुखरूप पोहोचला आहे. इंधन टंचाईचा श्रीलंकेतील सर्वसामान्यांच्या जीवनावर भीषण परिणाम झाला आहे. ऊर्जा बचतीसाठी सरकारने कडक पावले उचलली असून देशात आता 'फोर डे वर्किंग वीक' (चार दिवसांचा आठवडा) लागू करण्यात आला आहे. रेल्वे आणि बस स्थानकांवर प्रवाशांची वर्दळ कमी झाली असून रस्ते ओस पडले आहेत. खासगी कंपन्यांनी कर्मचाऱ्यांना आठवड्यातून दोन दिवस घरून काम अनिवार्य केले आहे. सरकारी कार्यालयांमध्ये एसीचा वापर टाळून टेबल फॅन वापरण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. रस्त्यावरील दिवे बंद ठेवण्यात आले असून वीज वापर २५ टक्क्यांनी कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. इलेक्ट्रिक वाहन मालकांना रात्रीच्या वेळी गाड्या चार्ज न करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

इंधनाचे हे संकट कायमस्वरूपी सोडवण्यासाठी श्रीलंका आता रशियाकडे आशेने पाहत आहे. जागतिक बाजारपेठेतील तुटवडा लक्षात घेता, अमेरिकेने रशियन तेलवाहू जहाजांवरील निर्बंधांत काही प्रमाणात शिथिलता दिली आहे. याचा फायदा घेत श्रीलंका सरकार आणि रशियाचे ऊर्जा उपमंत्री रोमन मार्शाविन यांच्यात दीर्घकालीन ऊर्जा कराराबाबत उच्चस्तरीय चर्चा सुरू झाली आहे. सध्या श्रीलंकेकडे मे महिन्याच्या मध्यापर्यंत पुरेल इतकाच डिझेलचा साठा शिल्लक असल्याने भारताची ही मदत खरोखरच 'संजीवनी' ठरली आहे.

भारताच्या 'नेबरहुड फर्स्ट' धोरणाचे कौतुक

श्रीलंकेतील राजकीय नेत्यांनी भारताच्या 'पड़ोसी प्रथम' धोरणाची मुक्तकंठाने स्तुती केली आहे. खासदार नमल राजपक्षे यांनी श्रीलंकेला भारताचे 'टॅक्स मॉडेल' स्वीकारण्याचा सल्ला दिला आहे, जेणेकरून संकटकाळात नागरिकांवरील कराचा बोजा कमी करून बाजारपेठ स्थिर ठेवता येईल. राष्ट्रपती दिसानायके यांनी या तत्पर मदतीबद्दल पंतप्रधान मोदी आणि परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांचे आभार मानले आहेत.

इराणचा पाकिस्तानला मोठा दिलासा

होर्मुजमधून २० जहाजांना जाण्याची परवानगी

इस्लामाबाद : दि.२९ वृत्तसंस्था

अमेरिका आणि इस्रायलसोबत वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, इराणने पाकिस्तानला मोठा राजनैतिक दिलासा दिला आहे. होर्मुजच्या सामुद्रधुनीतून पाकिस्तानचे ध्वज असलेल्या २० जहाजांना प्रवास करण्याची परवानगी इराणने दिली आहे. या निर्णयामुळे दोन्ही देशांमधील द्विपक्षीय संबंधांमध्ये सुधारणा होण्याची चिन्हे असून, पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री इशाक डार यांनी याला मैत्रीचे सकारात्मक पाऊल असल्याचे म्हटले आहे.

इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेजेश्कियान आणि पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांच्यात झालेल्या चर्चेनंतर हा निर्णय घेण्यात आला. याअंतर्गत, दररोज पाकिस्तानचा ध्वज असलेल्या दोन जहाजांना या सामरिक जलमार्गातून जाण्याची परवानगी दिली जाईल. दार यांनी सांगितले की, या निर्णयामुळे स्थिरता वाढवण्यास आणि तणाव कमी करण्याच्या प्रयत्नांना बळ देण्यास मदत होईल. इराणने उचललेले हे एक स्वागतार्ह आणि विधायक पाऊल आहे, असे ते म्हणाले. गेल्या काही आठवड्यांमध्ये, इराणने या सामुद्रधुनीतून पाकिस्तानशी संबंधित अनेक जहाजांना जाण्यास आधीच परवानगी दिली आहे; याचे कारण म्हणजे, अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव निवळण्यासाठी पाकिस्तान मध्यस्थाची भूमिका सातत्याने बजावत आहे.

'तर अमेरिकेचे सैनिक शार्क माशांचे खाद्य ठरतील'

इराणी सैन्याचा अमेरिकेला मोठा इशारा

तेहरान : दि.२९ वृत्तसंस्था

अमेरिका-इस्रायल आणि इराण युद्धाला आता जवळपास एक महिना लोटला, तरी या युद्धाबाबत अद्याप स्पष्ट तोडगा निघालेला नाही. सध्या अमेरिकेने पाकिस्तानच्या मध्यस्थीने युद्धबंदीची चर्चा सुरू केली असली तरी इराणने अमेरिकेच्या अटी मान्य केलेल्या नाहीत. मात्र, एकीकडे युद्ध थांबवण्यासाठी हालचाली सुरू असताना दुसरीकडे अमेरिका इराणवर जमिनीवरून हल्ला करण्याची योजना आखत असल्याचा दावा इराण करत आहे.

या पार्श्वभूमीवरून इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने (आयआरजीसी) अमेरिकेला मोठा इशारा दिला आहे. डोनाल्ट ट्रम्प यांनी जर इराणवर जमिनीवरील कारवाईचा प्रयत्न केला, तर अमेरिकेचे सैनिक पर्शियन आखातातील शार्क माशांचे खाद्य बनतील, असा इशारा इराणी सैन्याच्या प्रवक्त्यांनी दिला आहे.

एपस्टीन प्रकरणामुळे 'मोसाद'च्या दबावाखाली असलेले डोनाल्ट ट्रम्प हे इस्रायली पंतप्रधानांचे प्यादे बनले आहेत, अशी टीका इराणच्या सशस्त्र दलाच्या प्रवक्त्यांनी केली. तसेच जर डोनाल्ट ट्रम्प यांनी जमिनीवरील कारवाईचा प्रयत्न केला, तर अमेरिकेचे सैनिक पर्शियन आखातातील शार्क माशांचे खाद्य बनतील, असा इशाराही त्यांनी दिला आहे. इराणच्या संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बागेर कलिबाफ यांनी अमेरिकेबाबत मोठा दावा केला. मोहम्मद बागेर कलिबाफ यांनी म्हटलं की, इराणचे सशस्त्र दल अमेरिकेच्या संभाव्य जमिनीवरील आक्रमणासाठी सज्ज आहेत. अमेरिकेच्या प्रादेशिक मित्र राष्ट्रांनी इराणविरुद्धच्या लष्करी कारवाईला पाठिंबा दिल्यास त्यांना त्याचे परिणाम भोगावे लागतील, असा इशारा त्यांनी दिला. मोहम्मद बागेर कलिबाफ यांनी म्हटलं की, कोणत्याही प्रकारच्या संघर्षाला इराण जोरदार प्रत्युत्तर देईल. अमेरिका जाहीरपणे वाटाघाटींची भाषा करत असताना दुसरीकडे गुप्तपणे जमिनीवरील हल्ल्याची योजना आखत आहे. शत्रू एकीकडे वाटाघाटींबाबत बोलत आहे आणि दुसरीकडे जमिनीवरील आक्रमणाची योजना आखत आहे. अमेरिका १५-कलमी शांतता प्रस्तावाच्या माध्यमातूनही हेच करू पाहत आहे. कारण ते युद्धात जिंकू शकले नाहीत. पण आता आमचंही सैन्य सज्ज आहे आणि आम्ही कधीही शरणागती पत्करणार नाही, असं मोहम्मद बागेर कलिबाफ यांनी म्हटलं आहे.

३,५०० अमेरिकन सैनिक तैनात

मध्य-पूर्वेतील इराण आणि अमेरिका यांच्यातील संघर्ष आता निर्णायक टप्प्यावर पोहोचला आहे. इराणने सौदी अरेबियातील अमेरिकन तळावर केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यानंतर अमेरिकेने आक्रमक पवित्रा घेतला असून, या प्रदेशात ३,५०० हून अधिक अतिरिक्त सैनिक तैनात करण्याचे आदेश दिले आहेत. यामध्ये २,५०० मरीन सैनिकांसह सज्ज असलेले 'युएसएस त्रिपोली' हे आधुनिक जहाज आता युद्धक्षेत्रात दाखल झाले आहे.

तरुणाच्या आयुष्यातील शेवटचा क्षण व्हिडीओत कैद

शिवपुरी : दि.२९ वृत्तसंस्था

तरुणांच्या आत्महत्येचे प्रकार दिवसेंदिवस वाढत जात असून ऑनलाईन लाईव्ह स्ट्रिमिंग करून आत्महत्या करण्याचेही प्रकार वाढत आहेत. मध्य प्रदेशातील शिवपुरी जिल्ह्यात एका २२ वर्षीय तरुणाने इंस्टाग्रामवर लाईव्ह स्ट्रीमिंग दरम्यान आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. देहात पोलीस ठाण्याच्या हद्दीत शुक्रवारी (२७ मार्च) रात्री ही घटना समोर आली. मनोज रजक असे या तरुणाचे नाव असून त्याच्या शेवटच्या क्षणांचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसिद्ध झाला आहे.टाईम्स नाऊने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लाईव्ह स्ट्रिमिंगदरम्यान त्याने स्वतः ला पंख्याला गळपास लावला होता. शेवटच्या क्षणी त्याने ऑनलाईन



असलेल्या मित्रांसमोर हात हलवला तसंच, फ्लाइंग किसही केलं. तो जवळपास १४ मिनिटे लाईव्ह होता. मे अधुरा जी रहा हू हे गाणं तो ऐकत होता. सुरुवातीला त्याने कपड्यांच्या स्टॅण्डवरून पंख्याला लटकण्याचा प्रयत्न केला. परंतु, पहिला प्रयत्न त्याचा फसला. त्यामुळे तो खाली, त्याने आपल्या मोबाईलचा अँगल व्यवस्थित केला. लाईव्ह सेशनमध्ये आलेले कॉमेंट्स त्याने वाचले. सर्व मित्रांना त्याने गुडबाय केलं. फ्लाईंग किसही दिलं. हा सर्व प्रकार लाईव्ह व्हिडिओमध्ये कैद झाला. त्यामुळे तो लाईव्ह असताना जे ऑनलाईन होते, त्यांनी त्याच्या आयुष्याचा शेवटचा क्षण पाहिला. पण त्याच्यापर्यंत पोहोचण्यास असमर्थ ठरले. त्याचे काही मित्र तत्काळ त्याच्या खोलीवर गेले. परंतु, तोपर्यंत त्याचा मृत्यू झाला होता. मिळालेल्या माहितीनुसार, मनोज हा एकटाच भाड्याच्या खोलीत राहत होता आणि प्लंबर म्हणून काम करत असे. त्याच्या आईचं निधन झाल्यानंतर त्याच्या वडिलांनी दुसरं लग्न केलं. तो प्लंबरच्या कामाबरोबरच घरातूनच कपडे विकण्याचाही व्यवसाय करत होता. त्याच्या मित्रांनी त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला, परंतु ते पोहोचेपर्यंत त्याचा मृत्यू झाला होता. पोलिसांनी त्याचा मोबाईल जप्त केला असून अधिक तपास सुरू आहे. दरम्यान, पोलीस तपासात त्याच्या खोलीत सुसाईड नोट आढळून आली नाही. शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर मृतदेह कुटुंबाच्या स्वाधीन करण्यात आला.

अमेरिकेचा मोठा प्लॅन? इराणमध्ये ग्राउंड ऑपरेशनची तयारी, होर्मुझसह खार्ग बेटावरही डोळा

वॉशिंग्टन : दि.२९ वृत्तसंस्था

मध्य पूर्वेतील युद्ध सुरू होऊन एक महिन्याचा कालावधी लोटला आहे. आता अमेरिका इराणमध्ये अनेक आठवडे चालणाऱ्या जमिनीवरील मोहिमांची तयारी करत आहे. यामध्ये खार्ग बेट आणि होर्मुझ सामुद्रधुनीजवळील किनारी भागांवर छाप्यांचा समावेश आहे, असे वृत्त वॉशिंग्टन पोस्टने दिले आहे.

अमेरिका राबविणार असलेल्या विशेष मोहिमेमध्ये पायदळाचा समावेश असू शकतो. मात्र, अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यापैकी कोणत्याही योजनेला मंजुरी देतील का, हे अद्याप अस्पष्ट असल्याचे अमेरिकन अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. या मोहिमा पूर्ण स्वरूपाचे आक्रमण

नसतील, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. इराणचे सर्वात मोठे तेल टर्मिनल असलेल्या खार्ग बेटावर ताबा मिळवण्याबाबत ट्रम्प प्रशासन चर्चा करत असल्याचे वॉशिंग्टन पोस्टने म्हटले आहे. गेल्या महिन्यापासून तेहरानने होर्मुझ सामुद्रधुनी प्रभावीपणे रोखली आहे. त्यामुळे व्यापारी आणि लष्करी जहाजांना लक्ष्य करू शकणारी इराणची शस्त्रे शोधून नष्ट करण्यासाठी या किनारी भागांत छापे टाकले जाऊ शकतात. या मोहिमेच्या कालावधीबाबत मतमतांतरे आहेत. अमेरिकन लष्कराच्या या योजना अत्यंत व्यापक असल्याचे एका माजी संरक्षण अधिकाऱ्याने सांगितले. आम्ही याचा सखोल अभ्यास केला आहे. यावर युद्धसराव झाले आहेत. हे काही शेवटच्या क्षणी केलेले नियोजन नाही, असे अधिकाऱ्याने स्पष्ट केले आहे. इराणी भूभागावर ताबा मिळवल्यास इस्लामिक रिपब्लिकची राजवट अडचणीत येईल आणि भविष्यातील वाटाघाटींमध्ये अमेरिकेच्या हाती ''महत्त्वाचे कार्ड'' येईल, असा दावाही त्यांनी केला. मात्र, ताब्यात घेतलेल्या भागातील अमेरिकन सैनिकांचे संरक्षण करणे हे सर्वात मोठे आव्हान असेल. खार्ग बेटावरील सैनिकांना सुरक्षा पुरवणे हे कठीण काम आहे. त्यावर ताबा मिळवणे कठीण नाही, पण तिथे गेल्यावर आपल्या माणसांचे रक्षण करणे आव्हानात्मक आहे, असेही या अधिकाऱ्याने स्पष्ट केले. इराणच्या एकूण कच्च्या तेलाच्या निर्यातीपैकी ९० टक्के निर्यात खार्ग बेटावरून होते. ट्रम्प यांनी या बेटाचे वर्णन इराणसाठीचा ''मुकुटमणी'' असे केले आहे. होर्मुझ सामुद्रधुनी पुन्हा सुरू करण्यासाठी ट्रम्प यांनी इराणला वारंवार इशारा दिला आहे. व्हाईट हाऊसच्या प्रेस सचिव कॅरोलिन लेविट यांनी मागील आठवड्यात म्हटलं होतं की, इराणने युद्धविरामासाठी करार मान्य केला नाही, तर अध्यक्ष ट्रम्प त्यांच्याविरुद्ध मोठी कारवाई करण्यास तयार आहेत. अध्यक्ष ट्रम्प नुसती धमकी देत नाहीत. इराणने पुन्हा चुकीचे पाऊल टाकू नये.'' मात्र, या लष्करी योजनांचा अर्थ असा नाही की अध्यक्षांनी अंतिम निर्णय घेतला आहे.

२० वर्षांतील सर्वात मोठी लष्करी जमवाजमव

शनिवारी अमेरिकेने जाहीर केले की, ३,५०० मरीन आणि नौसैनिक मध्य पूर्वेमध्ये दाखल झाले आहेत. गेल्या दोन दशकांतील या प्रदेशातील ही सर्वात मोठी अमेरिकन फौज आहे. हे सैनिक यूएसएस त्रिपोली या युद्धनौकेवरून आले आहेत. यामध्ये ट्रान्सपोर्ट आणि स्ट्राईक फायटर विमाने, ओस्प्रे विमाने आणि एफ-३५ फायटर जेट्सचा समावेश आहे.

आक्रमक

बंद गेटवर चढली महिला फॅन, सिक्युरिटी गार्ड्सना शिवीगाळ

हनी सिंहच्या कॉन्सर्टमध्ये उडाला गोंधळ

मुंबई : दि.२९ वृत्तसंस्था

गायक-रॅपर यो यो हनी सिंगने मुंबईत एक कॉन्सर्ट आयोजित केला होता. या कार्यक्रमातील एक व्हिडिओ सध्या व्हायरल होत आहे, ज्यामध्ये एक महिला चाहती बंद गेटवरून चढून पलीकडे जाण्याचा प्रयत्न करताना दिसत आहे. तिला थांबवण्यासाठी सुरक्षा कर्मचारी आले असता, ती त्यांना शिवीगाळ करताना दिसली.

हनी सिंग त्याच्या 'माय स्टोरी इंडिया चॅप्टर' दौऱ्याचा भाग म्हणून शनिवार, २८ मार्च रोजी मुंबईत परफॉर्म करत होता. हा गायक वांद्रे येथील एमएमआरडीए मैदानावर परफॉर्म करत होता. त्याने 'डोप शॉप',

'ब्लू आईज', 'ब्राऊन रंग', 'मिलियनेअर', 'देसी कलाकार' आणि 'लुंगी डान्स' यांसारख्या हिट गाण्यांनी पुन्हा एकदा आपल्या चाहत्यांची मने जिंकली. दरम्यान, कॅमेऱ्यांनी असे काही टिपले ज्यासाठी कोणीही तयार नव्हते. एक महिला बंद गेटवरून चढण्याचा प्रयत्न करत असल्याचे पाहून रक्षकांमध्ये घबराट पसरली. रक्षकांनी तिला थांबवण्याचा प्रयत्न केला आणि तिला कॅम्पसच्या दुसऱ्या बाजूला ढकलण्यास सुरुवात केली. ती आत जाण्यात यशस्वी झाल्याचे दिसत नव्हते, परंतु व्हिडिओमध्ये ती रक्षकाला शिवीगाळ करताना दिसत आहे.

या घटनेचा व्हिडिओ इंटरनेटवर वेगाने व्हायरल होत आहे. खरे तर, त्यावेळी जे घडत होते ते अनेकांनी आपल्या कॅमेऱ्यात कैद केले होते.

कार्यक्रमाच्या व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह

हा व्हिडिओ पाहिल्यानंतर लोक कार्यक्रमाच्या व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत. मात्र, मुंबईत आयोजित या कॉन्सर्टमधील खराब व्यवस्थेबद्दल लोक आधीच तक्रार करत आहेत आणि हा व्हिडिओ त्या गदारोळात आणखी भर घालत आहे.

नॅरेली चक्रीवादळाचे रौद्र रूप

अचानक आकाश झाले रक्तासारखे लाल!

ऑस्ट्रेलिया: दि.२९ वृत्तसंस्था

रौद्ररूप धारण केलेल्या नॅरेली चक्रीवादळाने आज पश्चिम ऑस्ट्रेलियाला जोरदार तडाखा दिला. चक्रीवादळामुळे या भागात निसर्गाचे एक विलक्षण पण धडकी भरवणारे रूप पाहायला मिळाले. वादळाने उडालेल्या लाल मातीमुळे संपूर्ण आकाश गडद लाल रंगाचे झाले होते.

या नैसर्गिक आपत्तीचा ऑस्ट्रेलियातील नैसर्गिक वायू प्रकल्पांना मोठा फटका बसला असून उत्पादन थांबवले आहे. यामुळे आधीच गॅस टंचाईचा सामना करणाऱ्या जगासमोर आणखी भीषण परिस्थिती निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे.

पश्चिम ऑस्ट्रेलियातील शार्क बे परिसरात आज सकाळी लोक झोपेतून उठले तेव्हा त्यांना चकित करणारे दृश्य दिसले. संपूर्ण आकाश रक्तासारखे लाल झाले होते. सोशल मीडियावर याचे व्हिडिओ मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत असून, नेटकऱ्यांनी याला विनाशाची सुरूवात असे म्हटले आहे. नॅरेली चक्रीवादळाचा सर्वाधिक फटका ऑस्ट्रेलियातील नैसर्गिक वायू उद्योगाला बसला आहे. जगातील एकूण एलएनजी उत्पादनापैकी ५ टक्के वाटा असलेल्या शेवरॉन आणि वूडसाइड या कंपन्यांच्या प्रकल्पांमधील कामकाज ठप्प झाले आहे. शेवरॉन कंपनीच्या व्हीटस्टोन प्लॅटफॉर्म आणि गॉरगॉन प्रकल्पातील उत्पादन तांत्रिक बिघाडामुळे थांबवण्यात आले आहे. तर वूडसाइड कंपनीच्या करारा गॅस प्रकल्पालाही चक्रीवादळाचा फटका बसला आहे. २० मार्च रोजी क्वीन्सलँडमध्ये ४ थ्या श्रेणीचे तीव्र चक्रीवादळ म्हणून नॅरेली धडकले होते. नॉर्दर्न टेरिटरी पार करून हे वादळ पश्चिम ऑस्ट्रेलियात पोहोचले. शनिवारी या वादळाची तीव्रता काहीशी कमी झाली असली, तरी ताशी वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यांमुळे मोठ्या प्रमाणावर वित्तहानी झाली असून हजारो नागरिक अंधारात आहेत.

आकाश लाल कशामुळे झाले?

शास्त्रज्ञांच्या मते, या भागातील मातीमध्ये लोह खनिजाचे प्रमाण अधिक आहे. चक्रीवादळाच्या वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यामुळे ही लाल धूळ आकाशात उडाली आणि प्रकाशाच्या विकिरण प्रक्रियेमुळे आकाश लाल रंगाचे दिसू लागले. दरम्यान, सोशल मीडियावर अनेकांनी हे व्हिडिओ बनावट असल्याचा दावा केला, मात्र स्थानिक नागरिकांनी हे दृश्य वास्तव असल्याचे स्पष्ट केले आहे.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके** (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची) आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले साहित्य या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

संपादकीय...

'पल्स-२०२६' आंतरराष्ट्रीय वैद्यकीय परिषद मैलाचा दगड

'पल्स-२०२६' ही आंतरराष्ट्रीय वैद्यकीय परिषद महाराष्ट्राच्या आरोग्य व्यवस्थेला जागतिक स्तरावर अधोरेखित करणारा महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे. महाराष्ट्राने गेल्या काही वर्षात वैद्यकीय सेवेत आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. आधुनिक वैद्यकीय शिक्षण, अत्याधुनिक रुग्णालये, संशोधन संस्था आणि कुशल डॉक्टर यांच्या बळावर राज्य देशाच्या वैद्यकीय व्यवस्थेत अग्रस्थानी आहे. या क्षमतेला जागतिक स्तरावर अधोरेखित करण्यासाठी २७ व २८ मार्च २०२६ रोजी 'पल्स-२०२६' प्लॅटफॉर्म फॉर युनिफाईड लर्निंग, स्किल्स, हेल्थ अँड एज्युकेशन (पल्स) ही महत्त्वपूर्ण आंतरराष्ट्रीय वैद्यकीय परिषद जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे आयोजित करण्यात आली होती. राज्यातील प्रत्येक नागरिकाला सुलभ आणि आधुनिक वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे. राज्याची वैद्यकीय व्यवस्था अधिक आधुनिक, तंत्रज्ञानसज्ज, संशोधनप्रधान आणि सर्वसमावेशक करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. परिषदेत वैद्यकीय शिक्षण क्षेत्रातील विद्यार्थी, अधिष्ठाता, विशेषतज्ज्ञ, खासगी शैक्षणिक संस्था तसेच आधुनिक वैद्यकीय उपकरणे उत्पादक कंपन्या सहभागी झाल्या होत्या. राज्याच्या मेडिकल टुरिझम आणि ग्रामीण भागातील वैद्यकीय सेवेचा दर्जा सुधारणे यासाठी या परिषदेची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. राज्य शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या पुढाकारातून आयोजित ही परिषद वैद्यकीय शिक्षण, संशोधन, तंत्रज्ञान, वैद्यकीय सेवा व्यवस्थापन आणि वैद्यकीय पर्यटन यांना एकत्र आणणारा व्यापक मंच आहे. या परिषदेत देश-विदेशातील नामवंत डॉक्टर, संशोधक, वैद्यकीय शिक्षणतज्ज्ञ, वैद्यकीय क्षेत्रातील धोरणनिर्माते तसेच उद्योजकही सहभागी झाले होते. आधुनिक वैद्यकीय व्यवस्थेतील आव्हाने आणि त्यावरील उपाय यावर सखोल चर्चेसाठी हे एक उत्तम व्यासपीठ ठरले. महाराष्ट्राच्या वैद्यकीय क्षेत्राचा जागतिक लौकिक मेडिकल टुरिझमचा वेगाने विस्तार होत आहे. कमी खर्चात दर्जेदार उपचार मिळण्याच्या दृष्टीने भारत आणि विशेषतः महाराष्ट्राकडे अनेक देशांचे लक्ष आहे. 'पल्स-२०२६' परिषदेत ही संधी अधिक प्रभावीपणे मांडण्यात आली. महाराष्ट्रात वैद्यकीय शिक्षण संस्था, सुपरस्पेशालिटी रुग्णालये आणि संशोधन केंद्रांची मोठी संख्या आहे. या क्षमतेचा उपयोग करून राज्याला जागतिक वैद्यकीय सेवेत एक प्रभावी केंद्र म्हणून विकसित करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. परिषदेकरिता जगभरातून २९०० पेक्षा जास्त तज्ज्ञ, जवळपास १३० नामांकित डॉक्टर्स, वैद्यकीय शिक्षण देणाऱ्या संस्थांमधील अभ्यासक संशोधकांची उपस्थिती होती. परिषदेत वगेवेगळी २० सत्रे आयोजित करण्यात आली. राज्य वैद्यकीय क्षेत्रात अग्रगण्य असून देश-विदेशातील तज्ज्ञ, संशोधक, उद्योगपती आणि धोरणकर्ते यांच्या सहभागामुळे नवीन तंत्रज्ञान, आधुनिक उपचारपद्धती आणि मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक राज्यात येण्यास मदत होईल. याचा थेट फायदा रुग्णांना अधिक चांगल्या सुविधा मिळण्यात, डॉक्टरांना नवीन संधी उपलब्ध होण्यात आणि विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण व संशोधनाचा अनुभव मिळण्यात होणार आहे. विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान आणि उपकरणांची माहिती प्रत्यक्ष अनुभवातून मिळणे, आयुष क्षेत्रात आयुर्वेद आणि ॲलोपॅथी यांच्यात समन्वय साधून एकात्मिक वैद्यकीय व्यवस्था निर्माण करणे, फार्मसी क्षेत्रातील नवीन संशोधन, डॉक्टरांचे संशोधन पेपर आणि नवकल्पना यांचे सादरीकरणही परिषदेत करण्यात आले. 'पल्स-२०२६' परिषदेमार्फत महाराष्ट्राला वैद्यकीय वेलनेस पर्यटनाचे महत्त्वपूर्ण केंद्र बनविण्याचा संकल्प करण्यात आला आहे. 'महाराष्ट्र ब्रँड' म्हणून वैद्यकीय पर्यटनाची ओळख निर्माण करण्यासाठी रुग्णालये, वेलनेस केंद्रे, संशोधन संस्था आणि पर्यटन क्षेत्र यांच्यात समन्वय निर्माण करण्यावर भर दिला जात आहे. यामुळे राज्यात वैद्यकीय सेवा क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक वाढणार आहे. वैद्यकीय उपकरणे, जैवतंत्रज्ञान, वैद्यकीय तंत्रज्ञान आणि संशोधन यांसारख्या क्षेत्रांना नवी चालना मिळणार आहे. याचा थेट परिणाम रोजगारनिर्मितीवर होईल. परिषदेत वैद्यकीय शिक्षणातील सुधारणा आणि संशोधनाला प्रोत्साहन मिळणार आहे. आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल हेल्थ, रोबोटिक सर्जरी, टेलिमेडिसीन यांसारख्या नव्या संकल्पना वैद्यकीय शिक्षणात कशा समाविष्ट करता येतील, यावर चर्चा होणार आहे. वैद्यकीय क्षेत्र अत्यंत वेगाने बदलत आहे. नव्या तंत्रज्ञानामुळे निदान आणि उपचार पद्धती अधिक अचूक आणि परिणामकारक होत आहेत. ही परिषद त्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. 'डीजी होम' आणि 'टेक टॉक' या विशेष संकल्पनासुद्धा परिषदेत असतील. ३६० डिग्री डोममध्ये रोबोटिक सर्जरी, व्हर्च्युअल रिॲलिटीमध्ये मेडिकल प्रशिक्षण, डिजिटल हॉस्पिटल व्यवस्थापन यासारख्या तंत्रज्ञानाचे लाईव्ह आणि इमर्सिव्ह प्रेझेंटेशन सादर केले जाणार आहे. वैद्यकीय क्षेत्रातील विकास हा केवळ शहरांपुरता मर्यादित राहून चालणार नाही. ग्रामीण आणि दुर्गम भागात दर्जेदार वैद्यकीय सेवा पोहोचविणे ही मोठी गरज आहे. या परिषदेमुळे ग्रामीण वैद्यकीय सेवेसाठी नव्या संकल्पना आणि उपाययोजना समोर येतील. टेलिमेडिसीन, मोबाईल हेल्थ युनिट, डिजिटल हेल्थ रेकॉर्ड आणि आधुनिक निदान तंत्रज्ञान यांच्या मदतीने ग्रामीण भागात दर्जेदार वैद्यकीय सेवा कशी उपलब्ध करता येईल, यावर परिषदेत चर्चा करण्यात आली. परिषदेत स्टार्टअप्स, संशोधन संस्था, औषधनिर्मिती उद्योग, वैद्यकीय उपकरण उत्पादक आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्या सहभागी होणार आहेत. यामुळे वैद्यकीय क्षेत्रातील नव्या कल्पना, संशोधनाला प्रत्यक्ष उद्योगाशी जोडण्याची संधी मिळेल. वैद्यकीय तंत्रज्ञानातील नवकल्पना समाजापर्यंत वेगाने पोहोचण्यासाठी अशा मंचांची आवश्यकता असते. नवीन रोगांचे उद्भव, तंत्रज्ञानाचा वेगाने होणारा विकास आणि लोकसंख्येच्या वैद्यकीय गरजा, या सर्वांचा विचार करून भविष्यातील वैद्यकीय व्यवस्थेचा आराखडा तयार करणे आवश्यक आहे. या परिषदेच्या माध्यमातून आता विविध देशांतील अनुभव, संशोधन आणि तंत्रज्ञान यांचे आदानप्रदान होऊन वैद्यकीय व्यवस्थेत अधिक प्रभावी धोरणे तयार करण्यास मदत होईल. ही परिषद महाराष्ट्राच्या वैद्यकीय क्षेत्रासाठी केवळ एक कार्यक्रम नसून भविष्यातील वैद्यकीय व्यवस्थेची दिशा ठरविणारा महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे. डिजिटल हेल्थ आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित वैद्यकीय व्यवस्थेत महाराष्ट्राला देशात अग्रस्थानी नेणे, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधनात जागतिक दर्जाचे केंद्र निर्माण करणे, ग्रामीण आणि आदिवासी भागात मजबूत प्राथमिक वैद्यकीय सुविधा उभारणे आहे. 'पल्स २०२६' ही परिषद महाराष्ट्राला जागतिक वैद्यकीय नकाशावर अधिक ठळकपणे अधोरेखित करणारी ठरली आहे, यात शंका नाही.

॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

नकोच वाजवू
तू तुझी तुतारी ।
आहे ही लाचारी
जाणून घे ॥

अट्टहास का हा
जाणले पाहिजे ।
ऐकले पाहिजे
तुला मित्रा ॥

योग्य वेळ येते
प्रत्येकाची मित्रा ।

व्यर्थ नको मित्रा
चिंता करू ॥

योग्य वेळी तुझी
नक्कीच येणार ।
जग ऐकणार
तुला मित्रा ॥

शाश्वत जगात
विचार अमर ।
तसे तू वावर
जगती या ॥

डोहातली आर्तता

संवाद

सौ. श्रद्धा राऊत बुरले
नागपूर ९६६५९५८८९४

तुझी कथा बघ दूरदूरचा
प्रवाह खेचून नेते
किरणांची असह्य वाणी
सरितेला मिटून घेते.
तिच्यात तडेचा असह्य भाव
मी वाचून गहिवर घेता
तिच्यातला ओल पाऊस
मग मीच होऊन भेटे..

निसर्गाच्या अनंत कलेतले उन्ह सर्वत्र पसरु पाहते आहे. जिथे माती भावली तिथून चटक्याचा घाव बसल्याशिवाय रहात नाही. आणि मातीशिवाय जाणीव ठेवलेल्या फरशीवरही ह्या उन्हाचा भाव चटका देऊन जातोच. बहर म्हणून फुटलेल्या पालविला ओलाव्याचा बंध हा हवा असतो.मातीवर ओळीओळीने हसत मुखाची अवतरलेली मांदिआळी सुखावह असते झाडांची, रोपट्यांची, फक्त तिच्या सजीव बांध्यावर ओलाव्याची सुगंध गाथा झिरपत ठेवावी लागते. तहान तीच्यातही असतेच मुळी. मग बहर सांगणारी तिची कथा पाना फुलांच्या गंधित भावनेचा थंडगार साज आपल्या भोवती गुंफत ठेवते,खोलवर जाऊन, आणि तिच्या अस्तित्वातून तो निसर्ग सूर्य कथेशी एकरूप होऊन जगणे सांगत सुटतो. उन्हाच्या काहिलीतून कुणीच सुटत नाही. मातीच्याच अंश कणातून भरीव माठातल्या थंडगार पाण्यानेच तहान ही क्षमली जाते,प्रत्येकाची.पण ह्या सूर्य कथेतून व्यथित असलेल्या तृष्णकाठातली एक व्यथा फार उध्वस्त करीत जाते.तिच्यातले रितेपण कोरड देऊन जाते.जिथे काही महिन्यांच्या आधी दूरच्या किनारीवर खळखळाट होता,तिथे आज कळवळून तडेचा भाव जागवतो आहे.ती तेव्हा बोलकी असायची, हसायची, आनंदी गाणे गायची. आज तिची वेदना छळत जाते. तिचे अबोल असणे मनाला रुतत जाते. नैसर्गिक संपत्ती असलेली ही सरिता दरवर्षी किरणांच्या कोशात गुरफटून आतून ,खूप आतून आटत येत जाताना तिच्यात पडलेल्या तडेची वेदना तिला सहन करावी लागते.हे असत तसं दरवर्षीच,कुठेतरी दूर तिच्याच पात्रात विव्हळत असलेलं थोडंस पाणी तिच्याच आसवांचे प्रतीकच जणू,दर्शविते हा आभास. तिच्या वेदना तिचे दुःख तिच्या गर्भातच आटून जात असताना ती निशब्द होत जाते.तिला काल प्रवाह माहिती होता, तिच्या उदरात अनेक खडकाचे साम्राज्य होते,तिच्यात अगदी कोमल अवखळ असं संगीत होत. त्या संगीतातून ती आणि आपण अगदी मंत्रमुग्धच, त्यावेळी त्या ओल्या शार भावनेच्या निखळ विचार प्रणालीत ह्या खडकाच्या जवळून, त्यावरून ते अगदी स्वच्छ निर्मळतेने सहज वहात राहिले, पण

आज त्याला पडलेली कोरड निशब्द करून जाते,आणि त्यालाही आलेली भकास रया भावना पिळवटून टाकते.कालपर्यंत अनेक पक्षी नदीच्या प्रवाही गुंजन करीत असताना सरितेशी संवाद होत असावा,अशी निखळ भावना, पण आज त्यांच्यातली तहानही त्यांना तिथे वास्तव्य करू देत नसेल,गुरा ढोरांचा कळप हंबरून येत असताना कालच्या तिच्या सुमधुर संगीतातून तिच्यातले स्मित जागृत होत असेल, आलेल्या वासरांना तृप्त तुशेच्या भावनेतून निरखताना तिच्या डोहातला आनंद गगनात मावत नसेल, पण आज तडेशी झुंजत असताना हंबरून येत असलेली आर्त साद तिला विव्हळत असावी, आणि दूर दूर शोधत जाण्याचा पत्ता वासरांना जवळपास गवसत नसताना तिच्या आणि वासरांच्या मनातली फरफड असह्य होत असावीच ना कदाचित.कुठंतरी पाण्याचा ठाव लागावा भुकेची सांगता व्हावी हा विचार पाखरे आणि गुरांना आता रोज नव्या सामर्थ्यावर प्रवाह घेऊनच सूर्योदयाच्या उमेद वाणीशी निग्रह करीत असावा,आणि मग कुठेतरी समाधान लिहून सूर्यास्ताकाठी पुन्हा घरट्यात विसावा शोधत जाण्याची ध्यासमग्नता सारंच कसं उमेदीवर आहे, पण,,,, हा उरतोच, अश्या भावभावनांची सांगड ह्या उन्ह किरणांचे देणं होऊन जाते. मग फक्त प्रतिक्षेच्या अंतरात लिहिलेला पाऊस कोरड्या पात्रात प्रतीक्षा लिहून जातो आणि तीचं प्रवाही होत जाताना तड्यातली वेदना पात्रात निशब्द होत जाते. आसपासच्या वृक्षलतेच्या हितगुज विचार यात्रेत ही सरिता मात्र निशब्द असते. तसा तर तिलाही प्रवाह लाभेलच पुन्हा. ढगांच्या विशाल किनारीतून तिचा कोरडा श्वास त्याच्याशी हितगुजत असतो. काही काळ दमाने घेण्याची प्रेरणा ठेऊन. मात्र तिच्यातून तहान सांगणारी तृषा मात्र दूरदूर भटकत राहते,, अनंत विचारांचे काहूर घेऊन,, काळ सरत राहणार, बिकट परिस्थितीतून अनुभवांची गाथा मात्र झाडांच्या कत्तलीचा प्रश्न उपस्थित करणार.तद्रंतर ती सूर्य माला उन्हाळ्यात येथूनच फोफावत जाते, ही वाच्यता असणार. खरंच भविष्य धोक्यात आहे आणि त्याची सुरुवात झाली आहे, ही नांदी जाणिवेने आपल्यात फिरते आहे. जागरूक होणे हे फार गरजेचे आहे.आज सरितेच्या मनोगताची व्यथा तिच्या पात्रात गेल्यावरची कोरड पाहून नितांत जाणवते. दुःख होतं, पण पर्याय शोधायला तो निसर्ग संतुलन राखु शकण्यात असमर्थ आहे.त्याला प्रेमाचा ,जिव्हाळ्याचा हात देणे, त्याच्यातल्या हस्तक्षेपाचे जाळे दूर करणे हे मनुष्यासाठी हितावह आहे. त्याला प्रेमानं सांधून त्याच्या दिशेने त्याचा प्रवाह होऊ देण्याची गरज आहे, तो त्याच्या प्रवाही जगताना वृक्ष, लता,वेल, माती, सगळ्यांच्या कोषाशी संलग्नता शोधत आहे, ते शोधू देण्यास त्याला प्रयत्नशील असू, हीच भावना हृदयस्थ किनारीतून, त्या सरितेच्या डोहातली जणू विनवणीच.

लहान मुले खरेच लहान राहिली आहेत का?

विचारमंथन

संस्कृती कैलास सोनटक्के
मो. 9960486361

आजचे जग झपाट्याने बदलत आहे. तंत्रज्ञान आणि विज्ञानाच्या प्रगतीसोबतच मानवी जीवनशैलीतही मोठे बदल झाले आहेत. परंतु, या बदलाच्या वेगात सर्वात मोठी किंमत मोजावी लागत आहे ती आपल्या लहान मुलांना. मुलांमधील निरागस बालकत्व आज कुठेतरी हरवत चालले आहे. शाळा, क्लास आणि स्पर्धा यांच्या चक्रात अडकलेली मुले आज स्वतःचे अस्तित्व शोधताना दिसत आहेत. शैक्षणिक क्षेत्रातील स्पर्धा दिवसेंदिवस उग्र रूप धारण करत आहे. आजच्या प्रत्येक पालकाला वाटते की आपला मुलगा किंवा मुलगी डॉक्टर, इंजिनिअर, सरकारी अधिकारी किंवा सी.ए. व्हावे. या महत्त्वाकांक्षेत वावगे काहीच नाही, पण अडचण तेव्हा येते जेव्हा मुलांच्या क्षमतेपेक्षा पालकांच्या अपेक्षांचे ओझे मोठे होते. नेहमी नंबर १ राहण्याच्या दबावामुळे मुले हतबल झाली आहेत. ज्या वयात मुलांनी हसण्या-बागडण्यात वेळ घालवायला हवा, त्या वयात त्यांच्यावर यशाचे दडपण लादले जात आहे.

त्यांचा जो नैसर्गिक दिनक्रम असायला हवा, तो आता पूर्णपणे विस्कळीत झाला आहे. आजकाल वयाच्या अवघ्या १३-१४ व्या वर्षापासूनच मुलांना फाऊंडेशन कोर्सेसला जुंपले जाते. एक प्रकारचा सामाजिक ट्रेंड म्हणून पालक आपल्या मुलांना या कोर्सेसला

पाठवतात. आपला मुलगा या स्पर्धेत मागे पडू नये, या भीतीने पालक मुलाची क्षमता किंवा आवड न तपासता त्याला प्रवेश मिळवून देतात. यामुळे मुलांच्या मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत. सततचा अभ्यास, टेस्ट आणि रँकिंगमुळे मुलांमध्ये मानसिक तणावाचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. त्यांना इतर छंदांसाठी किंवा मनोरंजनासाठी वेळच उरत नाही. फाऊंडेशन कोर्सेस आणि वाढीव अभ्यासाच्या तासांमुळे मुलांना मैदानी खेळांसाठी वेळ मिळत नाही. शरीराला कोणत्याही प्रकारचा व्यायाम मिळत नसल्याने मुलांच्या शारीरिक विकासात अडथळे निर्माण होत आहेत. कमी वयातच पाठदुखी, डोळ्यांचे विकार आणि लठ्ठपणा यांसारख्या आजारांचा धोका वाढला आहे. ''सुदृढ शरीरातच सुदृढ मन वास करते,'' हे तत्त्व आपण विसरत चाललो आहोत. वर्तमानकाळातील पालक मुलांना यश कसे मिळवायचे हे तर शिकवतात, पण अपयश कसे हाताळायचे हे शिकवत नाहीत. प्रत्येक मूल वेगळे असते आणि प्रत्येकाची आकलनशक्ती वेगळी असते, हे वास्तव स्वीकारायला पालक तयार नाहीत. जेव्हा एखादा मुलगा स्पर्धेत मागे पडतो, तेव्हा त्याला वाटते की आपले आयुष्य संपले. जीवनातील संघर्षाची जाणीव आणि अपयशातून पुन्हा उभं राहण्याची जिद्द निर्माण होण्यासाठी मुलांना वास्तविक जीवनाचा स्पर्श असणे आवश्यक आहे. शिक्षण हे प्रगतीसाठी असावे, ओझ्यासाठी नको. मुलांचे बालपण त्यांच्याकडून हिरावून घेऊ नका. त्यांना मातीत खेळू द्या, चुकू द्या आणि स्वतःचे मार्ग स्वतः निवडू द्या. पालकांनी केवळ रिझल्ट वर लक्ष न देता मुलांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देणे, हीच काळाची गरज आहे.

अंधश्रद्धा आणि आजची पिढी

वास्तव

कल्पना चांभारे / देशमुख
यवतमाळ.

वर्तमानपत्र आणि दूरदर्शनवर अशोक खरात यांचे कारनामे व महिलांचे लैंगिक शोषण याविषयी भयानक बातम्या मन विचलित करत आहे.

आजपर्यंत महिला अश्या भोंदूबाबांच्या जाळ्यात अडकतात व अडकल्या पण पुरुष वर्ग सुद्धा बळी पडला आहे. हिऱ्याचे, सोन्याचे व्यावसायिक यांना आपण कृष्ण, शिव अवतार असून आमिष दाखवून अगदी सहज लुटले.कुठे हरवली या सगळ्यांची सदसदबुद्धी?

एक प्रकरण बाहेर आल्यामुळे अनेक महिला विधवा, कुमारिका, घटस्फोटीता, परित्यकता समोर आल्या. एक प्रश्न सतत सतावतो की, या सर्व प्रकरणात महिला मूर्ख आहे असं माझं स्पष्ट मत आहे. पती पत्नीचा वाद होतो यावर हा भोंदू काय तोडगा काढणार? एखाद्या कौन्सिलरचा सल्ला घ्यावा असे यांना नाही वाटले...

गर्भवती महिला पतीला घेऊन या भोंदूबाबाला भेटायला जाते. पतीला बाहेर ठेऊन एकट्या स्त्रीला हा आत बोलावतो. का संशय आला नाही पुरुष वर्गाला! किती अंधश्रद्धा या विज्ञानयुगात! कमाल आहे.

अहो, एकाच व्यक्तीच्या अंगात इतके अवतार ! खरंच या अशोक खरात नावाच्या भोंदूबाबाने किती सहज सगळ्यांना बनवलं.

आसारामबापूचा हा सुधारित अवतार. त्याने आश्रम काढले.याने आपले दुकान बाबा म्हणून थाटले. पहिले लक्ष्य बायकांनाच केले. स्त्रियांना वाईट नजर, स्पर्श ओळखण्याचे ज्ञान असून का संशय येऊ नये.

आपल्या कौटुंबिक, वैयक्तिक समस्या घेऊन कोणत्याही बाबांकडे जाण्याची काय गरज? ठिक आहे तुम्ही समस्यांनी त्रस्त आहात मानसिकता ढासळली आहे. पण यावर हा उपाय नाही. मंदिरात जा,परमेश्वराचे नामस्मरण करा त्यातून मानसिक समाधान लाभेल.सत्संगात जा.

तांब्याच्या भांड्यातून हा बाबा तीर्थ देतो व आंधळेपणाने तुम्ही घेता. हा बाबा मंत्र म्हणतो.. अरे रे संत गाडगेबाबानी अंधश्रद्धा दूर करा, विज्ञानाची कास धरा असे गावोगावी हिंडून जनजागृती केली. आणि आजची ही सुशिक्षित म्हणवणारी ही पिढी या भोंदूबाबाच्या फालतू गोष्टीला बळी पडतात. काय म्हणावे!

वाईट या गोष्टीचे वाटते की आम्ही कुठे भरकटत आहो. अशोक खरात हा भोंदू तर दोषी आहोत पण त्याच्याकडे जाणारी माणसं सुद्धा दोषी आहेत. त्याला कठोर शिक्षा होईल पण त्याला अँप्रोच होणारी ही सुशिक्षित जनता कधी जागृत होणार?

भुलथापांना बळी पडतांना या सामान्य जनतेची बुद्धी भ्रष्ट झाली का? चार पाच वर्षांपासून त्याने भोंदूगिरीचे दुकान थाटले आणि बडे गिऱ्हाईक त्याला गवसले व लाखोची माया जमा केली. तसेच आपली वासना पूर्ण केली. किती किळसवाना हा प्रकार..! आज सगळ्या महिला समोर येत आहे. त्याच्या धमक्याना भिऊन अत्याचार सहन करत राहिल्या . त्यापेक्षा काही संघटनाना का भेटल्या नाहीत. काहीतरी तोडगा नक्कीच निघाला असता.समाजात बदनामी होऊ नये म्हणून व भोंदूबाबा फार वरपर्यंत पोहचला असल्यामुळे कोणीही तोंड उघडले नाही. त्याचाच फायदा अशोक खरातने घेतला. साहजिक आहे सज्जन व्यक्ती बदनामीला घाबरतो. अब्रू, इज्जत प्रत्येकाला प्रिय आहे. पण त्यामुळेच या भोंदूबाबांचे दुकान चालते.

अत्याचार करणाऱ्या इतक्याच अत्याचार सहन करणाऱ्याही जबाबदार आहे.

सर्व महिलांनी सतर्क राहून पाऊल पुढे टाकले पाहिजे.

महिला, पुरुष वर्गाचा विश्वास संपादन करुन आपले कुकर्म चालू ठेवले. अखेर भगवानके यहाँ देर है अंधेर नही हेच खरे. पापाचा घडा भरला.

यापुढे महिला वर्गानी जागृत राहावे. कोणत्याही बाबाच्या नादी लागू नये. सत्संग व नामस्मरण हा उत्तम मार्ग आहे डिप्रेशन मधून बाहेर येण्याचा. मानवी जीवन जगत असतांना अनेक कठीण प्रसंगाला सामोरे जावे लागते. जीवनात चढउतार असणारच पण त्यासाठी ढोंगी बाबाचे पाय धरूच नये.

स्वतःचे स्वरक्षण करा. भोंदूबाबा जवळचे तीर्थ पितांना दहावेळा विचार करा. आपल्या नवऱ्याला सोबत नेत चला. एकट्याच भोंदूच्या दर्शनाला जाऊच नका. त्यापेक्षा मंदिरात जा. तिथे नतमस्तक व्हा. एवढेच आग्रही सांगणे...

पुतळा की विचार? महापुरुषांच्या स्मरणाचा खरा मार्ग कोणता?

मागोवा

पंकज रामेश्वर ताठे
खामगाव, मो. 7798877247

महाराष्ट्राची ओळख ही केवळ भौगोलिक सीमांनी मर्यादित नाही; ती ओळख आहे एका वैचारिक परंपरेची, सामाजिक परिवर्तनाची आणि असंख्य महापुरुषांच्या कार्याची. या भूमीवर जन्मलेल्या महान व्यक्तींनी आपल्या विचारांनी, संघर्षांनी आणि कार्याने समाजाला दिशा दिली. परंतु आजच्या काळात त्यांच्या स्मरणाचा मार्ग काय असावा, यावरून समाजात मतभेद निर्माण होताना दिसत आहेत. विशेषतः महापुरुषांच्या पुतळ्यांच्या स्थापनेभोवती निर्माण होणारे वाद, परवानगीची किचकट प्रक्रिया आणि त्यातून उभ्या राहणाऱ्या सामाजिक तणावामुळे हा प्रश्न अधिक गंभीर झाला आहे. अलीकडच्या काळात महाराष्ट्रात अनेक ठिकाणी महापुरुषांचे पुतळे अचानक, रातोरात उभारण्याची पद्धत वाढताना दिसत आहे. बुलढाणा जिल्ह्यातील चिखला येथील घटना असो किंवा खामगाव शहरातील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळा, किंवा तालुक्यातील लांजूळ येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळ्याचा मुद्दाया सर्व घटनांमधून एक गोष्ट स्पष्ट होते की, पुतळा स्थापनेचा विषय केवळ भावनिक नसून सामाजिक आणि कायदेशीरदृष्ट्याही अत्यंत संवेदनशील बनला आहे. पुतळा स्थापनेची वाढती प्रवृत्ती आणि त्यामागील मानसिकता तपासून पाहणे गरजेचे आहे. महापुरुषांविषयी आदर व्यक्त करण्याचा सर्वात दृश्यमान आणि पारंपरिक मार्ग म्हणजे त्यांच्या पुतळ्यांची उभारणी. गावाच्या चौकात, शहराच्या प्रमुख रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी उभारलेले पुतळे हे त्या समाजाच्या संस्कृतीचे आणि इतिहासाचे प्रतीक मानले जातात. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा गांधी, महात्मा ज्योतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर , लोकमान्य टिळक, अहिल्यादेवी होळकर यांसारख्या महापुरुषांचे पुतळे महाराष्ट्राच्या प्रत्येक कोपऱ्यात आढळतात. या पुतळ्यांमुळे समाजात अभिमानाची भावना निर्माण होते, प्रेरणा मिळते आणि इतिहासाची जाणीव जिवंत राहते. मात्र, अलीकडच्या काळात पुतळा उभारणीचा हा भावनिक विषय राजकीय, सामाजिक आणि कधीकधी वैयक्तिक प्रतिष्ठेचा विषय बनत चालला आहे. पुतळा स्थापनेची प्रक्रिया कायदेशीरदृष्ट्या गुंतागुंतीची असल्यामुळे काही ठिकाणी लोक परवानगी न घेता थेट पुतळा बसवण्याचा मार्ग अवलंबतात. रातोरात पुतळा उभारला जातो आणि दुसऱ्या दिवशी तो एक ''भावनिक प्रश्न'' बनतो. यानंतर दोन गट तयार होतातएक पुतळ्याच्या समर्थनार्थ आणि दुसरा विरोधात. या संघर्षामुळे सामाजिक तणाव निर्माण होतो, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उभा राहतो आणि कधी कधी परिस्थिती हाताबाहेर जाते. ही प्रवृत्ती लोकशाही आणि कायद्याच्या चौकटीला आव्हान देणारी आहे. महापुरुषांच्या नावाने सामाजिक ऐक्य वाढण्याऐवजी मतभेद निर्माण होणे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. खामगाव आणि चिखला प्रकरण वास्तवाचे प्रतिबिंब अधोरेखित करते. बुलढाणा जिल्ह्यातील चिखला येथे घडलेले प्रकरण हे याचे ज्वलंत उदाहरण आहे. पुतळा स्थापनेवरून निर्माण झालेला वाद सामाजिक संघर्षात परिवर्तित झाला. खामगाव शहरातही साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याचा मुद्दा तापलेला आहे. एका बाजूला नागरिकांची भावना आणि दुसऱ्या बाजूला प्रशासनाचे नियमया दोन्हीमध्ये संघर्ष निर्माण झाला आहे. या घटनांमधून एक महत्त्वाचा प्रश्न समोर येतो महापुरुषांचा सन्मान करताना आपण कायदा आणि सामाजिक जबाबदारी विसरत आहोत का? या बाबत दोन मतप्रवाह दिसून येतात, पुतळा की विचार? महापुरुषांच्या स्मरणाबाबत समाजात दोन स्पष्ट मतप्रवाह दिसून

येतात विचारांचे अनुकरण महत्त्वाचे या मतानुसार, पुतळा उभारण्यापेक्षा महापुरुषांचे विचार आत्मसात करणे अधिक महत्त्वाचे आहे. लहान मुलांना आणि पुढील पिढीला महापुरुषांची ओळख करून देण्यासाठी पुतळे महत्त्वाचे ठरतात. गावातील चौकात उभा असलेला पुतळा म्हणजे त्या समाजाचा इतिहास आणि अभिमान. पुतळा आणि विचार यांचा समतोल प्रत्यक्षात, या दोन्ही मतप्रवाहांमध्ये संघर्ष नसून समन्वय असणे आवश्यक आहे. जर पुतळा उभारला आणि त्यामागील विचार विसरले, तर तो केवळ धातू किंवा दगडाचा तुकडा ठरतो. परंतु, पुतळ्यासोबत त्या महापुरुषांच्या विचारांचे प्रसारण केले, तर तो समाजासाठी प्रेरणास्थान बनतो. कायदेशीर प्रक्रिया आवश्यक पण किचकट असल्याचे दिसून येते. पुतळा उभारण्यासाठी शासनाने ठरवलेली प्रक्रिया अत्यंत सविस्तर आहे: जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी, कला संचालनालयाची मान्यता, पोलीस व स्थानिक रहिवाशांचे एनओसी, स्थानिक स्वराज्य संस्थेचा ठराव, सार्वजनिक बांधकाम विभागाची परवानगी ही प्रक्रिया किचकट वाटली तरी तिच्यामागे एक महत्त्वाचा उद्देश आहेसामाजिक शांतता आणि सुव्यवस्था राखणे. अनेक नागरिकांचा प्रश्न असा आहे की, महापुरुषांच्या महाराष्ट्रात त्यांच्या पुतळ्यासाठी एवढी किचकट प्रक्रिया का? हा प्रश्न योग्य आहे, पण त्याचे उत्तरही तितकेच महत्त्वाचे आहे. जर कोणतीही प्रक्रिया नसेल, तर: कुठेही, कधीही पुतळे उभारले जातील वादग्रस्त ठिकाणी संघर्ष वाढेल वाहतूक आणि सार्वजनिक सुविधा बाधित होतील म्हणूनच, ही प्रक्रिया केवळ अडथळा नसून व्यवस्था टिकवण्यासाठी आवश्यक नियंत्रण आहे. विना परवानगी उभारलेले पुतळे हे अनेक समस्यांचे मूळ ठरतात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न, गटांमध्ये संघर्ष, प्रशासनावर दबाव, शेवटी पुतळा हटवण्याची वेळ यामुळे महापुरुषांचा सन्मान होण्याऐवजी त्यांच्या नावावर वाद निर्माण होतात. या समस्येवर उपाय म्हणून काही महत्त्वाचे मुद्दे विचारात घेणे आवश्यक आहे. यामध्ये प्रक्रिया सुलभ करणे शासनाने परवानगी प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि जलद करावी. जनजागृती लोकांना कायदेशीर प्रक्रियेची माहिती देणे आवश्यक आहे. विचार प्रसारावर भर दिली जावी यामध्ये शाळा, महाविद्यालये आणि समाजमाध्यमांद्वारे महापुरुषांचे विचार पोहोचवावेत. सामाजिक समन्वय पुतळा

डॉ. जयसिंगराव पवार : मराठ्यांच्या इतिहासाला समर्पित व्यक्तिमत्व!

श्रद्धांजली

संतोष झामरे, अकोट
मो. ९९२२६५०४६९

छत्रपती शिवराय म्हणजे महाराष्ट्राची अक्षय ऊर्जा! शिवप्रभूंच्या अद्वितीय कार्याने महाराष्ट्राचा इतिहास, महाराष्ट्राचे समाजमन तेजोमय झाले. त्यांच्यामुळे पारतंत्र्यांमध्ये खितपत पडलेल्या जनतेला स्वातंत्र्य,समता आणि स्वाभिमानाचे बाळकडू मिळाले. त्या छत्रपतींच्या विचाराने प्रभावित होऊन अनेक सामान्य घरातील माणसे मोठ्या कर्तृत्वावर पोहोचली. शिवप्रभूंच्या कार्यामुळे महाराष्ट्राचे सामाजिक जीवन एका समतेच्या धाग्यात ओवल्या गेले. अस्पृश्यता नाकारणाऱ्या शिवप्रभूनी अठरापगड जातीच्या लोकांना सोबत घेऊन रयतेच राज्य निर्माण केलं. ह्या इतिहासाची वास्तवाला धरून पुनर्मांडणी करण्याचे काम अत्यंत आस्थेने,जबाबदारीने आणि सत्याच्या कसोटीवर घासून महाराष्ट्राच्या समाज पटलावर मांडण्याचे काम डॉ. जयसिंगराव पवारांनी गेल्या ५०ते ६० वर्षापासून निरंतर केले. अशा या तपस्वी जयसिंगरावांचा जन्म दिनांक ३९ डिसेंबर १९४१ रोजी भाऊसाहेब आणि राधाबाई या दांपत्याच्या पोटी तडसर ता.कडेगाव जि.सांगली (पूर्वीचे सातारा) ह्या गावी एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे वडील हे एक सामान्य शेतकरी होते परंतु सुशिक्षित असल्यामुळे आपल्या मुलाने शिकावे,असे त्यांना वाटत होते. जयसिंगरावांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण गावातच पूर्ण होऊन ते पुढील महाविद्यालयीन शिक्षणाकरिता कोल्हापूर येथे गेले. तिथे त्यांनी शाहू महाराजांनी स्थापन केलेल्या प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगमध्ये (वस्तीगृहामध्ये) राहून राजाराम महाविद्यालय येथून सन १९६४ मध्ये इतिहास विषयात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. महाविद्यालयामध्ये शिकत असताना त्यांची इतिहासातील गोडी वाढत गेली.आणि त्यांना अनेक वेळा विद्यार्थी दशेतच इतिहास विषयांमध्ये प्राविण्य प्राप्त केल्यामुळे अनेक बक्षीस मिळाली. १९६४ला त्यांचे पदव्युत्तर शिक्षण इतिहासामध्ये पूर्ण होऊन ते कोल्हापूर विद्यापीठांमध्ये संशोधक सहाय्यक म्हणून रुजू झाले. कोल्हापूर विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांचा आवडता विद्यार्थी असलेले जयसिंगराव हे त्यांच्याच तालमीत पुढे संशोधनाचे धडे गिरवू लागले. ताराबाईकालीन कागदपत्रे ,तळबीडच्या मोहित्यांकडचे १६२४ पूर्वीची अस्सल कागदपत्रे आणि इतरही ऐतिहासिक पत्रांची मोडी लिपींतील अवतरणे माहिती करून घेऊन जयसिंगराव इतिहासामध्ये तासांतच गडून जायचे. पुढे त्यांना सेतू माधवराव पगडी, प्रा.न.र.फाटक, वा.सि.बेंद्रे यासारख्या इतिहासाच्या क्षेत्रातील भीष्मपितामहासोबत काम करण्याची संधी मिळाली. त्या संधीचे त्यांनी सोने



केले. पुढे १९६९ ते १९७५ ह्या काळामध्ये ते गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालय कोल्हापूर येथे प्राध्यापक म्हणून रुजू झाले .त्यानंतरच्या काळात १९७५ ते २००१ पर्यंत त्यांनी श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय कोल्हापूर येथे सेवा पूर्ण केली आणि २००१ नंतर त्यांनी राजर्षी शाहू महाराजांचे चरित्र निर्माण करण्यास स्वतःस वाहून घेतले. हे कार्य करत असताना त्यांनी १९८२ला महाराष्ट्र इतिहास परिषदेची स्थापना करून महाराष्ट्राच्या विविध महाविद्यालयातील प्राध्यापक,संशोधक, इतिहास प्रेमी आणि समाजशील लोकांना इतिहासाविषयी आवड निर्माण होण्याकरिता वार्षिक अधिवेशने घेऊन, संशोधन पर लेख लिहून लोकांमध्ये, समाजामध्ये इतिहासाची आवड निर्माण केली आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा, संभाजी महाराजांचा, ताराराणीचा आणि एकंदरच मराठेशाहीचा उज्वल इतिहास लोकांसमोर प्रकट केला. सोबतच त्यांनी कोल्हापूर येथे महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनीची स्थापना केली.आपल्या सेवाकाळात त्यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी सुद्धा भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास,हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, हिंदुस्थानचा राजकीय आणि घटनात्मक इतिहास अशा भारताच्या प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक या तीनही कालखंडातील इतिहास विषयाची क्रमिक पुस्तके लिहून संपूर्ण महाराष्ट्राच्या सर्व विद्यापीठांमध्ये ती लोकप्रिय झाली. गेले ४५ वर्ष या महाराष्ट्राच्या तरुण मनावर आणि एकूणच समाज जीवनावर जयसिंगराव पवार यांच्या त्या इतिहासाच्या पुस्तकांचा पगडा आजही ठामपणे दिसतो.त्यांच्या इतिहास विषयाच्या पुस्तकातून अभ्यास करून आज अनेक विद्यार्थी यूपीएससी,एमपीएससी होऊन मोठमोठ्या पदावर कार्यरत आहेत. हे मोठ्या अभिमानाने तेच अधिकारी सांगतात. जयसिंगराव पवारांनी इतिहास लेखन करताना काही तत्वांना प्रमाणभूत मानून इतिहासाची पुनर्मांडणी केली. त्यामध्ये छत्रपती संभाजी महाराजांचे चरित्र त्यांनी फार अभ्यासपूर्वक, विविध इतिहास संशोधकांच्या ग्रंथांचा धांडोळा घेऊन निर्माण केले आहे. छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ हा संभाजी महाराजांच्या त्रिशताब्दी स्मृतिदिनानिमित्त त्यांनी १९८९ ला प्रकाशित केला. त्याचप्रमाणे शिवछत्रपती:एक मागोवा,मराठीशाहीचे अंतरंग, शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे?, मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध, मोगलमर्दिनी महाराणी ताराबाई,शिवपुत्र छत्रपती राजाराम, सेनापती संताजी घोरपडे, क्रांतिसिंह नाना पाटील आणि अलीकडे त्यांनी राजर्षी शाहू महाराजांचे समग्र चरित्र पाच खंडामध्ये प्रकाशित करून राजर्षी शाहू महाराजांच्या लोककल्याणकारी कार्याला जनतेच्या घराघरात पोहोचवले.भारताच्या १६भाषांमध्ये आणि काही परदेशी भाषांमध्येही हा ग्रंथ प्रकाशित करण्याचा त्यांचा मानस होता आणि त्याकरिता ते आजीवन झटत राहिले. इतिहास परिषदांमधून त्यांनी ५० च्या वर संशोधन लेख सादर करून इतिहासातील दुर्लक्षित राहिलेला सुप्त खजिना महाराष्ट्राच्या समाज पटलासमोर मांडला. यासोबतच त्यांचे सामाजिक कार्य सुद्धा सुरू होत. राजर्षी शाहू महाराज हे अलीकडे त्यांच्या आस्थेचे एक फार मोठे केंद्र होते. राजर्षी शाहू महाराजांचे पंचखंडात्मक चरित्र त्यांनी निर्माण करण्याकरिता स्वतःस वाहून घेतले होते. भारताच्या १६ भाषांमध्ये आणि जगातील इतर भाषांमध्ये शाहूचरित्र निर्माण करून ते देशाच्या कानाकोपऱ्यात,महाराष्ट्राच्या घराघरांमध्ये आणि देशाच्याही बाहेर पोहोचवण्यासाठी त्यांनी आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत अविरत प्रयत्न केले. एक आठवण:राजर्षी शाहू महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण करण्याकरिता सन २०१७ मध्ये अकोट जि. अकोला येथे भाऊसाहेब पोटे विद्यालयामध्ये आले असता आमच्या जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या इतिहास परिषदेला माझ्या आग्रहावरून ते आवर्जून उपस्थित राहिले आणि आमच्या प्राथमिक शिक्षकांचा उदंड प्रतिसाद पाहून साहेबांनी खूप आनंद व्यक्त केला.त्यांनी आमच्यासारख्या नवोदित इतिहास अभ्यासकांना,संशोधकांना प्रोत्साहित करून छत्रपती शिवराय, छत्रपती संभाजी महाराज,राजर्षी शाहू महाराज,महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यासारख्या महाराष्ट्रातील इतिहास पुरुषांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकणारी पिढी पुढे निर्माण होत राहिली पाहिजे, या थोर पुरुषांच्या विचाराचा वसा आणि वारसा हा पुढे गेला पाहिजे.याकरिता त्यांनी नेहमीच नवीन सामान्य संशोधकांना प्रोत्साहित केले. अशा थोर उंचीच्या ह्या एका साक्षेपी इतिहासकाराची दि. २६ मार्च २०२६ रोजी वयाच्या ८५ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या इतिहास क्षेत्राची फार मोठी हानी झाली.त्यांच्या कार्याचा वारसा त्यांच्या सुकन्या डॉ.मंजुश्री पवार ह्या मोठ्या उमेदीने आणि समर्थपणे सांभाळत आहेत. ज्यांनी महाराष्ट्राच्या ऐतिहासिक,सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात बहुमोल कार्य केले त्या थोर इतिहासकार डॉ जयसिंगराव पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली...

पर्यटन

स्वाती कर्वे, पुणे
9420723354

ओमान... मस्कत...

भाग २

मस्कतकडे प्रयाण :
दोन तासाच्या प्रवासात विमानात फार मोकळा वेळ मिळतो असं नाही. थोडी डुलकी काढता येते फार तर ! ओमान एअरचं नियतकालिक दिसल्यावर मी तेच वाचायला घेतलं. ऑन अरायव्ह व्हिसाबद्दल संपूर्ण माहिती त्यात होती. भारतीयांसाठी ही सुविधा कधीच नसते, हेही समजलं. पण हॉटेलचं बुकिंग असेल तर हॉटेल व्हिसा देऊ शकतं. नवऱ्याला भेटायला मी अगदीच त्याच्या पाठोपाठ चालले होते. त्यामुळे कंपनीनं राहण्याची कुठलीही सोय करणं नाकारलं होतं. सुनीलनी ऑफिसजवळचंच परवडेल असं हॉटेल बुक केलं होतं, जवळजवळ पंधरा दिवसांसाठी. आधी माहीत असतं तर त्यांच्याकडून व्हिसा घेता आला असता...!
नंतर मला समजलं की आपण बाहेरच्या देशातून चोवीस तासात परत आलो तर व्हिसा नसताना कसं पाठवलं म्हणून इमिग्रेशन ऑफिसरला जबाबदार धरलं जातं. माझं नशीब फारच जोरावर होतं म्हणायचं ! मस्कतच्या विमानतळावर उतरले.
विमानातून उतरल्यावर बसनी मुख्य इमारतीपर्यंत आल्यावर मोठं काचेचं दार सरकलं आणि मी आत शिरले. सर्वत्र लाल रुजामे अंथरलेले, अन् सगळं चकचकीत... समोरच्या भिंतीवर त्यांच्या राजाचा मोठ्ठा फोटो दिमाखात लटकलेला. हिज हायनेस सुलतान काबूस बिन सैद... सगळ्याच उद्योगात, व्यवसाय धंद्याच्या जागी, दुकानात असा फोटो लावावा लागतो. अलीकडेच वृद्धापकाळाने त्यांचं निधन झालं. चाळीस वर्षांहून अधिक इतकं दीर्घकाळ राज्य केलं त्यानं आणि त्यात सर्वच प्रकारच्या भरपूर सुधारणा घडवून आणल्या कामाच्या पद्धती सुकर केल्या. भारतातूनच कामासाठी आलेली बरीच मंडळी दिसत होती. आधी व्हिसा डिपॉझिट केला आहे का, ते बघण्यासाठी एका रांगेत थांबले. मी आणि आणखी एक गृहस्थ इतरांपेक्षा थोडे वेगळे दिसल्यावर त्या सगळ्यांना फॉर्म भरून देण्याचं काम आमच्याकडे आलं. माझा व्हिसा तिथे ठेवलेला नव्हता. म्हणजे कंपनीनं तेवढंही सहक केलं नव्हत! मग ऑन अरायव्हल व्हिसा विचारायला गेले... त्यासाठी करन्सी बदलून घेतली. ती एक रांग. मग व्हिसा घेण्याची... मी म्हटलं मला सांगितलं होतं ठेवलाय व्हिसा... मिळाला नाही. कंपनीचं नाव विचारलं, ते मोठंच होतं, त्यामुळे लगेच व्हिसाचा शिक्का पडला. रवी कुठल्याही व्हिसाच्या बाबतीत प्रत्येकाच्या काही ना काही स्टोऱ्या असतातच बहतेक. तशी माझी ही स्टोरी. मला दोन वर्षांचा मल्टिपल एन्ट्री व्हिसा मिळाला. मात्र एका वेळी तुम्ही फक्त वीस दिवस राहू शकता. पुन्हा मस्कतमध्ये प्रवेश घेण्यासाठी एकोणीस दिवस मधे जावे लागतात. माझी काळजी मिटली. ऑक्टोबर आणि फेब्रुवारी हे हवा बदलताना सुरुवात आणि शेवटचे महिने. आमचे वाढदिवसही तेव्हाच येतात. एरवी उन्हाळ्यामध्ये जाऊन रहायच म्हटल तर कुठेच बाहेर पडता येणं शक्य नसतं. मी जायर त्यातही रमझानचे काही दिवस यायचे. तेव्हा तर बाहेर खाण्यासाठी काही मिळणंही दुरापास्त असायचं, शिवाय सार्वजनिक ठिकाणी काही खायच प्यायचंही नाही. पण त्याला काही इलाज नसायचा. माझी वर्षातली महिनाभराची सुट्टी पंधरा-पंधरा दिवस अशीच संपायची.
त्यानंतरचं चिमुकलं ड्युटी फ्री शॉप ओलांडून मी बाहेर पडले. पुढे चित्र झपाट्यानं बदलत गेलं. आपल्या विमानतळावरही काही वर्ष सतत कर चालू होतं आणि मस्कतचं विमानतळही बघताबघता बदलत, मोठं होत गेलं. एवढं होईतो बराच उशीर झाला होता. मी आल्ये तरी की नाही, असं सुनीलला वाटू लागलं असलं तर नवल नव्हतं. मला बघितल्यावर त्याच जीव भांड्यात पडला. माझी पहिलीवहिली मस्कत ट्रीप अशा रीतीने सुरू झाली. आता मात्र ओमानचा व्हिसा मिळण्याची पद्धत खूपच सोपी झाली आहे... साधारण २०२३ पासून. आवश्यक ते कागदपत्र सबमिट केल्यावर आता दोन दिवसात ऑनलाई व्हिसा मिळतो. एकट्या महिलेला नवरा किंवा कोणी पुरुष बरोबर असायला हवा अशीही अट आता नाही. कुणी नातेवाईक असायला हवा असंही नाही. किंवा नवरा तिकडे आहे आणि बायकोला जायचं आहे, फॅमिली स्टेट्ससाठी अमुक इतका पगार असायला हवा ही अटसुद्धा आता राहिलेली नाही. अर्थात खर्चाची काळजी ज्याची त्याला घ्यावीच लागते. मुंबईहून सकाळी सातच्या आधीचं विमान. यायला वेळ दोन तासांचा, मस्कत आपल्यापेक्षा दोन तास मागे. सकाळचे पावणेआठ-आठ वाजत असतील. बाहेर चकचकीत ऊन... दहा-साडेदहा वाजता असावं तसं ! निळं, निरभ्र आकाश... सुनीलला सध्या कामासाठी दिलेली मित्सुबिशी लॅन्सर गाडी आणि ड्रायव्हर समोर हजर झाला.
मस्कत ओमान हे राष्ट्र म्हणजे प्रचंड मोठा समुद्रकिनारा लाभलेलं वाळवंट. अर्थात त्या भागात फिरताना तुम्हाला ते वाळवंट वाटत नाही. तर लांबलचक पसरलेल्या ओमानच्या पोटातून तसच दोन-अडीचशे किमीचं वाळवंट जातं. नुसता वालुकामय, बराचसा सपाट प्रदेश ! काही भागात दमट हवा आणि एकूणच भरपूर कोरडा उन्हाळा.

(क्रमशः)

मराठीतले वाक्य आणि अक्षयचे आयुष्यचे बदलले

बॉलिवूडचा खिलाडी अभिनेता अक्षय कुमार याने हिंदी चित्रपटसृष्टीत आपलं वेगळं स्थान निर्माण केलं आहे. अत्यंत शिस्तबद्ध जीवनशैली आणि आपल्या जीवनात वेळेचे काटेकोरपणे पालन, ही त्याची खासियत. मात्र त्याच्या आयुष्यात असा एक प्रसंग आला की, अभिनयाशी काही देणं- घेणे नसताना एका प्रसिद्ध अभिनेत्याने त्याला एक सल्ला दिला आणि त्याचे नशीब पूर्णपणे बदलले. त्या अभिनेत्याच्या सल्ल्यानेचं बॉलिवूडला एक ॲक्शन हिरो मिळाला. अक्षय कुमारने आज या चित्रपटातून हिंदी चित्रपटसृष्टीत प्रदार्पण केले. या चित्रपटात त्याची फक्त ७ सेकंदाची भूमिका होता. या चित्रपटात कुमार गौरव आणि अनिता राज मुख्य भूमिकेत होते. तर अक्षय कुमार मार्शल आर्ट्स इन्स्ट्रक्टरच्या भूमिकेत दिसला होता. या चित्रपटात अभिनेता कुमार गौरव याच्या पात्राचे नाव अक्षय होते. हे पात्र त्याला इतके आवडले की त्याने राजीव भाटिया हे नाव बदलून त्याने अक्षय कुमार असे आपले नाव ठेवले. रजत शर्मा यांच्या आप की आदलत दरम्यान अक्षय कुमारने आपल्याला एका प्रसिद्ध अभिनेत्याने चित्रपटात जाण्यासाठी सल्ला दिल्याचे सांगितले. अक्षय कुमार जय शेठ या फोटोग्राफरच्या हाताखाली लाईटमॅन म्हणून काम करायचा. त्यावेळी जय शेठ याच्याकडे अभिनेता अनिल कपूर, जॅकी श्रॉफ, संगीता बिजलानी, गोविंदा यासारखे मोठे कलाकार फोटो काढायला यायचे.

युध्द

युध्द नकोच असतं
तो दाह,मिसाईल चे आवाज
आणि भडकलेल्या ज्वाला....

सूं सूं करीत येणारी
मिसाईल्स,कमजोर नाही
हे दर्शवीत असली
तरी आर्त किंकाळ्यांचे
आवाज क्षणाचा ही विलंब न
लावता, दफन होतात तिथल्या
तिथेच...

जळलेली अर्धवट शरिरांची लक्तरे
रस्त्यावर धुळीत मलीन
होताना दिसतात....हृदय चिरत
जातं तेव्हा नि:शब्द सुन्न वादळांची
भयावह शांतता असते...

ती अनुभवताना
विंध्वसक ही मनोवृत्ती थेट घुसते,
कोसळलेल्या इमारतीसारखी, मेंदूच्या
छिंद्रातून आरपार अहंकाराचा शाप
घेऊन....

माणूस माणूस म्हणून
जगायला तेव्हा पासूनचा हा पाठलाग
या युगातही तह करतो आहे,
अमानुष अत्याचारांचा...

युध्द दोघातलं असो,घरातलं
असो,प्रांतातलं असो की सातासमुद्रा
पलीकडचं... सर्वनाश होणारच हे
ठाऊक असतं प्रत्येकाला....

महाभारतात श्रीकृष्णनं तयार केलं
होतं अर्जुनाला, आपल्याच दुराचारी
भ्रष्ट नातलगांशी लढायला,
पण त्याला तरी कुठे माहित
होतं,द्वपारयुगातील युध्दांची ही
शापित धरोहर पुढच्या कित्येक
पिढ्यांपर्यंत अखंड सुरूच राहणार
आहे..

त्या कारण एकच
अभिलाषा,द्वेष,असूया अन्
श्रेष्ठत्वाच्या बोथट ,अदृष्य
राजमुकूटाखालची असंतोषाची
रणनीती...

ती कायमच
विनाशाचे बीज रूजवत आली
आजवर,केवळ अस्तित्व
टिकविण्याचा अट्टहास म्हणून ....

या मुळेच संवेदनांचा गळा दाबला
गेला, तेव्हा निसर्ग,जीव आणि
वित्तहानी यांची कुठलीच तमा
शिल्लक रहात नाही उरते ती फक्त
उन्मादाची राख ...

आकाशात उठतात..
काळ्या धुरांचे लोट ते साक्ष देतात
मृत सांगाड्याची मूळसकट जळून
गेलेली धग...ती प्रत्येक युगात
आजही प्रतिशोध घेण्याची वाट
पहात रहाते.....

दीपक शिव
९८२२२४००१२

आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 350



संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे शब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

संकेत शब्द :–

दोन अक्षरी
- अर्थ
- आग
- आप
- आर्त
- कटी
- कल
- काळ
- गाणे
- डग्गा
- तत्र
- तीस
- त्याग
- दंड
- दमा
- दर
- दानी
- धंदा
- परी
- पक्ष
- प्रत
- बक
- माग
- मास
- यम
- रन
- राम
- रीत
- रेती
- लळा
- वंग
- वारा
- संत
- साक्ष
- हल
- ज्ञान

तीन अक्षरी
- अनिल
- आजोळ
- ईस्टर
- कपात
- कळस
- कानस
- कामसु
- कुरूप
- ग्रहण
- चरण
- डवरा
- तरूण
- थडगे
- दरारा
- दरोगा
- नलगे
- नापास
- पतित
- प्रतीक
- बेकरी
- मातणे
- मान्यता
- लगाम
- विकास
- वेगळा
- वेदना
- संचित
- समान
- सुसर
- हुरूप

चार अक्षरी
- अपव्यय
- आगमन
- कन्यादान
- कसरत
- कुतूहल
- गजगती
- जादूगर
- टमटम
- डमडम
- तडजोड
- तरूतल
- ताबेदारी
- दरवाजा
- पानचक्की
- बकासुर
- बागायत
- बाणेदार
- मनोरथ
- मसलत
- मळवट
- रगडणे
- सत्याग्रह
- सराईत
- सवलत

पाच अक्षरी
- कर्तव्यशून्य
- कुसुमाग्रज
- नयनबेटी
- पाणीग्रहण
- वासरमणी
- सहगमन

सहा अक्षरी
- दूरचित्रवाणी
- नगरपालिका
- पतितपावन

(उत्तर पुढील अंकी)

मागील महाशब्दकोडेचे उत्तर



Uday Munde - 8446302691

महाशब्दकोडे 731

–: आडवे संकेत :–
1) ज्याला आजार जडला आहे असा
2) संमती देणे, स्वीकृत करणे
4) ज्या व्यक्तिसाठी समारोह आयोजित केला जातो अशी ती प्रमुख व्यक्ती
7) मोठा सर्प
9) शरीर, देह
10) चिंतन, बारा वर्षांचा कालावधी
11) मनाला टोचणारी गोष्ट
12) उत्तर प्रदेशातील गंगा यमुना या दोन नद्यांच्या संगमाचे स्थान
13) श्रीयुतचे संक्षिप्त रूप
14) चिकित्सा करणारा
16) बातमी, वृत्तान्त
18) सरळपणा, साधेपणा
20) अंधार
21) जेथे उपमान व उपमेय यांचा अभेद वर्णिला जातो तेथे हा अलंकार होतो
23) आस्वाद घेणे, पेय पिणे
25) राखड, जळालेल्या निखाऱ्यांची भुकटी
27) जत्रा, धार्मिक स्थानी जाणे
29) पति किंवा पत्नीचे माहेर
30) चहूकडून येणाऱ्या अडचणींमुळे होणारा मनाचा कोंडमारा आणि त्यावेळी सुटणारे धैर्य
31) नम्रतापूर्वक विनंती, अर्ज
34) देवालयातील मुख्य अंतर्भाग
36) सरकार चालविणारा
37) दिल्लीजवळून वाहणारी एक प्रमुख नदी
38) रांजण, मोठे पोट
40) रामायणात श्रीरामचंद्रांचा वानर मित्र
41) शाश्वत, चिरकाल टिकणारे
43) बारीक कंगवा, केळींचा समुदाय
44) कल्पनेचा विस्तार करण्याची शक्ती, बुद्धिसामर्थ्य
47) वक्र, पोंक
49) घर, आश्रय घेण्याचे ठिकाण
51) लालसा, प्रेम, माया
52) गुलाबांच्या पाकळ्यांसोबत साखर घालून केलेला मुरब्बा
54) सुंदर, लहान पण छानदार
56) विडीचा झुरका
57) विस्तवाचा चटका, आग
58) नातलग, सगेसोयरे
59) जनावरांचा समूह
61) पृथ्वी, जमीन
62) फक्त, नाममात्र, अगदी
63) अधिक चांगला
64) घोडा
65) जिने गुणावयाची ती संख्या
67) टिकाव
69) दुःख, विलाप
70) ज्याला लिहिता वाचता येते असा
71) काढून टाकलेला
72) काकवीपेक्षा दाट उसाचा रांधा (मळी)
73) शक्ति देणारे
75) सुंदर, रमणीय
76) दास्यत्व, कुणाच्या तरी अधीन राहून कार्य करणे
77) घ्राणेंद्रिय
78) सडलेला, नासलेला
82) फळाच्या आतील रसाळ भाग
83) दिवसभर उपवास करून रात्री जेवण करण्याचे व्रत
84) मनासारखी गोष्ट घडल्यावर समाधान होणे
85) स्वामी विवेकानंदांचे स्मारक असलेले भारताचे दक्षिण टोक

–: उभे संकेत :–
1) अत्यानंदाने अंगावर काटा उभा राहील अशी स्थिती
2) पुढे उत्कर्ष पावेल असा तरुण, प्रत्येक कार्य आपणहून समोर येऊन तत्परतेने करणारा तरुण
3) कर्णेंद्रिय
4) इलाज
5) ताब्यातील, अधीन
6) किमती, मौल्यवान
7) विवर, भुईघर
8) रान, वन, अरण्य
10) फिकीर, पर्वा
12) बाळंतपणाच्यावेळी होणाऱ्या वेदना
15) जादू
16) पौष्टिक
17) ताप येण्यापूर्वी अंग मोडून येणे
19) चांदणी, नक्षत्र
22) अस्ताव्यस्त पसरलेल्या वस्तू, कचरा
24) पचनास सहाय्य करणारे
26) चित्रपटात दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांचा सरदार
28) संतापाच्या भरात स्वतःलाच दुखापत करून घेणे
32) डोळे, चक्षू
33) सर्वात लहान मुलगा किंवा मुलगी
35) किराया, भाडे
36) छावा, हत्तीचे पिल्लू
39) राजाची बायको
40) चांगल्या विचारांचे आदानप्रदान, सलोखा
41) बळजबरी, कठोरपणा
42) ..... पत्र, गरम मसाल्यातील एक पदार्थ
45) नष्ट, पराभूत
46) बुद्धिबळात प्रतिस्पर्ध्याला त्याचा राजा वाचविण्यासाठी दिलेला इशारा
47) तुफान, वायूचा क्षोभ
48) नाशकाजवळील एक सुप्रसिद्ध ज्योतिर्लिंग
50) अचूक उपाय करणारे
52) कुणाला कळणार नाही अशा पद्धतीने केलेले मतदान
53) लग्न मौंजीमध्ये मातापित्यांनी धार्मिक विधीने मनगटाला दोरा बांधून व्रतस्थ होणे
55) वेंध, मिठी
57) सेवक, नोकर
60) चित्रपटाचे कथानक लिहिणारा
64) ज्याला क्षमा नाही असे
65) कोंडमारा होणे, दम कोंडणे
66) निश्चयी, बाणेदार
68) दुर्लक्ष 70) उंट हाकणारा
71) सोळा वर्षांच्या आतल्या वयाची मुलगी
73) व्यर्थ बडबड
74) सत्वांश, जातीचा गुण
79) भय, भीती, शंका 80) वजा, कमी करणे
81) गावाची हद्द, मर्यादा (उत्तर पुढील अंकी)

मागील महाशब्दकोड्याचे उत्तर



Uday Munde - 8446302691

...तर सरकार अडचणीत, केसरकरांनी आमदारांची यादी द्यावी

विजय वडेट्टीवार यांची मागणी

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

नागपूर, दि. २९ : अशोक खरात प्रकरणामुळे राज्यात खळबळ माजली आहे. शिवसेना नेते दीपक केसरकर यांच्या वक्तव्यात ३९ आमदार भेटल्याचे सांगितले जाते. केवळ ''माझं नाव का घेत आहात?'' असा प्रश्न केसरकर यांनी उपस्थित केला आहे. त्यांना साथ देणारे आणि श्रद्धा ठेवणारे उच्च पदस्थ लोक आहेत. जादूटोणा प्रतिबंधक कायद्यानुसार त्यांच्यावर गुन्हे दाखल झाले पाहिजेत. कायद्याच्या विरोधात वागणाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे. केसरकर यांनी त्या ३९ आमदारांची यादी जाहीर करावी. यासंदर्भात पेन ड्राइव्ह उघड झाला तर महाराष्ट्रात मोठा हादरा बसेल. आणि सरकार अडचणीत येईल असा दावा काँग्रेस गटनेते विजय वडेट्टीवार यांनी माध्यमांशी बोलताना केला.

मध्यंतरी लहान मुलीच्या शोषणाच्या प्रकरणात एन्काऊंटर करण्यात आला होता. त्याला वाचवण्याचा प्रयत्न झाला, कारण मोठ्या लोकांना वाचवायचे होते. उद्या खरात यांच्याबाबत काहीही घडू शकते आणि अनेक पुरावे नष्ट होण्याची शक्यता आहे. कायद्याने खरात यांना शिक्षा झाली पाहिजे. अमावस्येच्या दिवशी मोठे नेते अंधारात आपली पापे लपवण्यासाठीच जात असावेत. अशा भेटींची चौकशी झाली पाहिजे. एसआयटीकडून काही ठोस निष्पन्न होत नसल्यास, न्यायाधीशांच्या पुढाकाराने चौकशी झाली पाहिजे असेही ते म्हणाले.

देश मोदी सरकारने वाऱ्यावर सोडलेला आहे. निवडणुका जिंकणे आणि सत्ता मिळवणे हेच भाजपचे काम आहे. कोरोनाच्या काळात जसे लोकांचे जीव धोक्यात आले, तसेच आता गॅस सिलेंडरच्या रांगेत नागरिकांचे मृत्यू होत आहेत. छगन भुजबळ यांनी सांगितले की, पंधरा दिवसांत एलपीजीचा मोठा तुटवडा भासू शकतो. इराण पूर्वी आपला मित्र होता, पण आता तो दूर गेला आहे. केवळ हिंदू-मुस्लिम किंवा भारत-पाकिस्तान या मुद्द्यांवर देश पुढे जाऊ शकत नाही. भारताचे परराष्ट्र धोरण कुचकामी ठरत आहे.

ऑपरेशन टायगर, फुसका बार

शिवसेनेच्या ज्योती वाघमारे या नवीन खासदार आहेत. खासदार झाल्यानंतर लक्ष वेधण्यासाठी त्या अशा प्रकारची वक्तव्ये करत असाव्यात असे मला वाटते. दुसरीकडे राष्ट्रवादी विलीनीकरण हा त्यांचा विषय आहे त्यांच्या अंतर्गत वादांमध्ये मला पडायचे नाही. मात्र, सध्याची राष्ट्रवादीची वाटचाल फार काळ टिकेल असे वाटत नाही. भारतीय जनता पार्टी एकेक पक्ष गिळंकृत करण्याचे काम करत आहे. काँग्रेसमध्ये संघटनात्मक फेरबदल दिसतील.संघटन सृजन प्रक्रिया सुरू झाली आहे आणि ती अनेक राज्यांमध्ये सुरू आहे. १५तारखेपर्यंत हे अभियान चालणार असल्याचे स्पष्ट केले.

महत्त्वाचे

रस्ते अपघातात दोघांनी गमावले प्राण

नागपूर : मानकापूर हद्दीतील कलेक्टर कॉलनीतल्या गजानन महाराज मंदीराकडून प्रभात सभागृहाकडे जात असताना पाठीमागून आलेल्या दुचाकीने धडक दिल्याने अदृत शिवदयाल बंसोडकर (७४, रा. नझूल ले-आऊट, बेझनबाग) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. प्राणांतिक अपघाताची दुसरी घटना हिंगणा पोलीस हद्दीत घडली. प्रविण बाबरावजी घोरमारे (३४, रा. महाजनवाडी) या ट्रक व्यावसायिकाकडे लालेश्वर विश्वेश्वर मिस्त्री (५०, रा. बागोधर, झारखंड) हे काम करतात. ट्रकमध्ये खडी भरुन चालक लालेश्वर मिस्त्री कान्होलीबाराकडून हिंगणाकडे येताना ट्रकचे समोरचे टायर फ ुटले. यात लालेश्वर यांचे ट्रकवरील नियंत्रण सुटल्याने ट्रक झाडावर आदळला. अपघातामध्ये ट्रकचालक दगावला.

अल्पवयीनाचे लैंगिक शोषण

नागपूर :अल्पवयीन मुलीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून अफसर उर्फ रऊफ खान (१९, रा. कपीलनगर) याने तिच्या इच्छेविरुद्ध लैंगिक शोषण करत तिला गरोदर केले. अफसरने तिला वेगवेगळ्या पोलीस ठाणे हद्दीत नेऊन तिच्याशी निर्जनस्थळी इच्छेविरुद्ध शारीरिक संबंध ठेवले. मुलगी गरोदर राहिल्यानंतर हा प्रकार चव्हाट्यावर आला. या प्रकरणी मुलीच्या नातेवाईकांनी दिलेल्या तक्रारीवरून कोराडी पोलिसांनी पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करत अफसरला अटक केली.

किलोभर गांजासह दोन तस्कर जेरबंद

नागपूर :गांजाची खेप एकाठिकाणाहून दुसरीकडे पोचवत असताना निळ्या रंगाच्या अक्टिवा गाडीच्या डिकीतून तब्बल एक किलोग्राम गांजाची खेप पोचववत असताना गुन्हे शाखा पथक पाचने एकाला रंगेहाथ अटक केली. तेजकुमार नेकप्रताप शाहू (३०, रा. बौद्ध विहार जवळ कळमना) असे या गांजा तस्कराचे नाव असून त्याला शांतीनगरातील महिला सलोनी रणवीर सिंग चौधरी (२०, रा. प्रेम नगर झेंडा चौक) हीने हा गांजा पुरवला होता. या घडामोडीत सदर पोलिसांच्या रात्र गस्त पथकानेही शेख असलम शेब बबलू (२१, रा. गोवा कॉलनी, संतोषी माता मंदीर मागे) यालाही १०० ग्रॅम गांजासह अटक केली.

महाविद्यालयीन तरुणीची आत्महत्या

नागपूर : प्रियकराचा विवाह ठरल्याने त्याच्या विरहातून महाविद्यालयीन तरुणीने खोलीत गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना हिंगणा परिसरात चव्हाट्यावर आली. विंध्येश्वरी दिनेशकुमार आपटे (२३, रा. जुना काटा रोड वाशीम) असे आत्महत्या केलेल्या विद्यार्थीनीचे नाव आहे. डिएनडी हाईट्स धनगरपूरा येथे ही घटना घडली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार विध्येश्वरीचे अमित बागेश्वर याच्याशी प्रेम होते. दरम्यान अमितचे लग्न ठरल्यापासून विध्येश्वरी नैराश्यात होती.

जमीन व्यवहारातून सव्वा दोन कोटींची फसवणूक

नागपूर :आम मुखत्यारपत्र मिळवत त्याचा गैर वापर करून एकाच कुटुंबातील तिघांन जमिनीची परस्पर विक्री करत सव्वा दोन कोटी रुपयांची फसवणूक केली. या तिघांनी कुटुंबातील वारसदारांकडून कसलीही परवानगी न घेता विश्वासघात केल्या प्रकरणात पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. रमणाकर कृष्ण मोहनराव कोरपाटी, मधुकर कृष्ण मोहनराव कोरपाटी, श्रीनिवास कृष्ण मोहनराव कोरपाटीअशी फसवणूक करणाऱ्या एकाच कुटुंबातील तीन ठगबाजांची नावे आहेत. संजय सुरेंद्रलाल जयस्वाल असे तक्रारदाराचे नाव आहे. बेलतरोडी पोलीस ठाण्यात त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, जयस्वाल यांना मौजा वरोडा, नागपूर ग्रामीण येथील वडिलोपार्जित जमीन संदर्भात आममुखत्यार पत्र देण्यात आले होते.

आश्रमशाळेतील ८ वर्षीय विद्यार्थ्याचा तलावात बुडून मृत्यू

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

गडचिरोली, दि. २९ : शाळेमागील परिसरात शौचास गेलेल्या विद्यार्थ्याचा तलावात बुडून मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी(ता.२७) दुपारी कुरखेडा तालुक्यातील वडेगाव येथे घडली. वेदांत शंकर पदा (वय- ८ वर्षे, रा.नवेझरी, ता.कुरखेडा) असे मृत विद्यार्थ्याचे नाव आहे.

वेदांत पदा हा वडेगाव येथील क्रांतिवीर नारायणसिंह उईके आदिवासी आश्रमशाळेत इयत्ता दुसरीत शिकत होता. शाळेच्या शौचालयात पाणी नसल्याने शुक्रवारी दुपारी पावणेतीन वाजताच्या सुमारास तो शाळेतील एका मित्रासह शाळेमागे असलेल्या तलावाकडे शौचास गेला. परंतु तोल गेल्याने तो तलावात बुडाला. माहिती मिळताच शाळेचे कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी तलावाकडे धाव घेऊन वेदांतला पाण्याबाहेर काढले. त्यावेळी तो हालचाल करीत होता. त्याला तत्काळ कुरखेडा येथील उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. परंतु डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले. याप्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून, चौकशी सुरु असल्याचे पोलिस निरीक्षक महेंद्र वाघ यांनी सांगितले.

या घटनेबद्दल नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला असून, शाळा व्यवस्थापनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. आश्रमशाळेतील शौचालयात पुरेशा पाण्याची व्यवस्था नसते काय?, असेल तर लहान मुलावर बाहेर शौचास जाण्याची पाळी का आली?, विद्यार्थ्यांकडे कर्मचाऱ्यांचे लक्ष नसते काय?, असे नानाविविध प्रश्न उपस्थित केले जात आहेत. आदिवासी विकास विभागाने संबंधित शाळेवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

विद्यार्थ्यांना उन्हाळ्याच्या सुट्टीमध्येही शासकीय वसतिगृहांत राहता येणार

नागपूर: सामाजिक न्याय विभागांतर्गत शासकीय मागासवर्गीय वसतीगृहातील इयत्ता ११ वी व १२ वी च्या वर्गामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना उन्हाळी सुट्टीच्या कालावधीमध्ये शासकीय वसतीगृहांमध्ये निवासाची सुविधा चालू ठेवण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना एमएचटी-सीईटी, नीट, जेईई या परीक्षांची तयारी करता यावी, यासाठी सरकारने हा निर्णय घेतला आहे. यामुळे राज्यातील हजारो विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. अनेक विद्यार्थ्यांना भाड्याच्या खोलीत राहावे लागत होते. मात्र, आता सरकारने हा निर्णय घेतल्याने त्यांना मोठा लाभ मिळणार आहे. निवास आणि भोजनाची सुविधा लागू राहणार आहे.

शासन निर्णयातील तरतुदीनुसार सामाजिक न्याय विभागांतर्गत शासकीय मागासवर्गीय वसतिगृहातील मुलामुलींचे वसतिगृह प्रवेश नियमावलीनुसार, वसतिगृहात प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना शाळा, महाविद्यालय सुरू होण्यापूर्वीच्या अगोदरच्या दिवसापासून ते वार्षिक परीक्षा पूर्ण झाल्यानंतरच्या दिवसापर्यंत वसतिगृहात राहता येते. राज्यातील महाविद्यालयांमध्ये इयत्ता ११ वी व १२ वी च्या वार्षिक परीक्षा संपल्यानंतर उन्हाळी वर्ग घेण्यात येतात.या कालावधीत एमएचटी-सीईटी, नीट, जेईई प्रवेश पूर्व परीक्षेची तयारी सुद्धा विद्यार्थी करीत असतात. परिणामी, उन्हाळी सुट्टीच्या कालावधीमध्ये विभागांतर्गत शासकीय वसत्तिगृहे बंद असल्याने विद्यार्थ्यांना निवासाची सुविधा उपलब्ध होत नसल्याने यापासून ते वंचित राहतात. यामुळे अनेक विद्यार्थ्यांना भाड्याच्या खोलीत काही महिने राहावे लागते.

३० मार्च ते ४ एप्रिल दरम्यान विदर्भासह राज्यात वादळी पाऊस

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

नागपूर, दि. २९ : ३० मार्चपासून राज्यात आभाळी हवामान आणि दुपारनंतर होणाऱ्या वादळी पावसाचे नवीन सत्र सुरू होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. ३० मार्च रोजी प्रामुख्याने खानदेश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ तसेच मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरातील जिल्ह्यांमध्ये विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही ठिकाणी गारपिटीची शक्यता आहे. उर्वरित विदर्भात देखील काही प्रमाणात हवामानात बदल दिसून येऊ शकतो.

३० मार्चच्या तुलनेत ३१ मार्च रोजी एकंदरीत वादळी पावसाचे प्रमाण कमी होण्याची शक्यता आहे. मात्र, या भागांमध्ये काही प्रमाणात अस्थिर हवामान आणि वादळी पाऊस पडू शकतो. त्यानंतर १ ते ४ एप्रिल दरम्यान वादळी पावसाचे प्रमाण वाढण्याचा प्राथमिक अंदाज आहे. त्यामुळे या कालावधीत मध्य महाराष्ट्र, खानदेश, मराठवाडा आणि विदर्भातील ठिकठिकाणी आभाळी हवामान, दुपारनंतरचा वादळी पाऊस, आणि काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या या स्थितीनुसार शेतीची कामे नियोजित करावीत. सध्या रब्बी पिकांची काढणी सुरू असल्याने काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी. तसेच वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीटीपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे. मेघगर्जना आणि विजेच्या कडकडाटाच्या वेळी नागरिकांनी व शेतकऱ्यांनी स्वतःची तसेच पाळीव जनावरांची सुरक्षितता सुनिश्चित करावी. अशा वेळी झाडाखाली, टिनशेडखाली तसेच विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ उभे राहणे टाळावे, असेही आवाहन करण्यात येत आहे.

१५०० फुटांपर्यंतची अतिक्रमणे नियमित होणार-चंद्रशेखर बावनकुळे

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

नागपूर, दि. २९ : राज्य सरकारने २०११ पर्यंतची सरकारी जमिनीवरील केवळ निवासी वापरासाठी असलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचा निर्णय घेतला आहे. ५०० चौ. फ ुटांपर्यंतची अतिक्रमणे पूर्णपणे विनामूल्य नियमित केली जाणार आहेत. यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. मात्र, सार्वजनिक जागांवरील अतिक्रमणे काढण्याची कारवाई कायम राहणार असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज माध्यमांशी बोलताना सांगितले.

यापूर्वी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरे मिळत होती; मात्र आता सर्वसामान्य नागरिकांसाठी पट्टेवाटपाचा निर्णय घेण्यात आला असून, पट्टा मिळाल्यानंतर केवळ १००० रुपयांत नोंदणी (रजिस्ट्रेशन) करण्याची सोयही सरकारने केली आहे.

राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादनात शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळावा यासाठी २८ हजार प्रकरणे प्रलंबित होती. त्यासाठी ५७ आर्बिट्रेटर्सची नियुक्ती करण्यात आली असून, लवकरच शेतकऱ्यांच्या प्रकरणांचा निकाल लागेल अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

राज्यात कुठेही पेट्रोल किंवा एलपीजीचा तुटवडा नाही. सोशल मीडियावरील अफवांमुळे नागरिक घाबरून साठेबाजी करत आहेत. अल्पभूधारक शेतकऱ्यांना कर्जमाफीची गरज आहे. त्यासाठी तयार होत असून, थोडा वेळ लागेल; पण कर्जमाफी निश्चित होईल. ज्यांच्याकडे मोठी मालमत्ता आहे, त्यांना कर्जमाफी देणे योग्य नाही. काटोल-वरुड महामार्गावरील भेगांबाबत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासोबत बैठकीत चर्चा केली जाणार आहे.संजय राऊत यांच्यावर भाष्य करण्यासारखे काही नाही असे सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत' संकल्पनेच्या आधारावर २०४७ पर्यंत होणाऱ्या निवडणुकांमध्ये भाजप आघाडी विजय मिळवेल, असा विश्वास आहे. ममता बॅनर्जी या निवडणुकांमुळे दबावात असून, भाजप हे आघाडीला जनतेचा पाठिंबा मिळेल. माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी आरोप केलेल्या चांदिवल आयोग अहवाल संदर्भात सरकार विचार करेल असे बावनकुळे म्हणाले.

सन्नी वाईन बार ची परवानगी रद्द करावी-सचिन चन्ने

सारख्याच प्रकरणात दोन वेगवेगळे निर्णय – उत्पादन शुल्क विभागाचा सावळागोंधळ

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

कोपरणा, दि. २९ : राजुरा तालुक्यातील रामपूर ग्रामपंचायत अंतर्गत येणा-या सन्नी वाईन बार असलेल्या इमारतीचे सर्व मालकी हक्क असलेल्यांची परवानगी नसतांनाही तिथे बिनदिक्कत पणे वाईन बार सुरू आहे. याबाबत तक्रार करूनही उत्पाद शुल्क विभागाकडून जाणीवपुर्वक टाळाटाळ केली जात असून या बारमालकाला अभय तर देत आहेच, शिवाय कागदपत्रांची पुर्तता न करता सतत नविन वर्षाकरीता परवानगी देत आहे. त्यामुळे सन्नी वाईन बार ची आमच्या जागेवरील परवानगी रद्द करावी आणि आता नविन २०२६-२७ मध्ये या वर्षाचे नूतनीकरण करू नये, अशी मागणी या मालमत्तेचे वारसा हक्क असलेले मालक सचिन जगन्नाथराव चन्ने यांनी दिनांक २९ मार्च रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेत केली.

कौशल्याबाई जगन्नाथ चन्ने यांच्या मालकीची रामपूर येथे मालमत्ता क्रमांक ७६४ ही इमारत आहे. कौशल्याबाई यांचे निधन दिनांक २ जानेवारी २०२१ रोजी झाले. त्यांचे निधन झाल्यानंतर त्यांची भाऊराव, संतोष व सचिन ही तिन मुले आणि सुनिता खामनकर, वैशाली झोरे व इंदिरा सावरकर या तिन मुलींची नावे वारसाहक्काने कब्जेदार व मालक म्हणून नोंदवण्यात आली. त्यामुळे या सर्वांचा या मालमत्तेत सामायिक अधिकार आहे आणि याची सातबारावर नोंद असून वारसा प्रमाणपत्रात सुध्दा नोंद आहे. सन्नी वाईन बार व रेस्टॉरंट यांची अनुज्ञाप्ती क्रमांक एफएल - ३ क्रमांक १८५ असून ती संतोष जगन्नाथ चन्ने यांचे नावे आहे. मात्र ज्या इमारतीत हे बार सुरू आहे, त्या इमारतीचे सचिन व भाऊराव हे दोघेही सहमालक व सहकब्जेदार आहेत. मात्र त्यांची संमती नसतांना आणि परवानगी न घेता गेल्या पाच वर्षापासून या बारला बिनदिक्कतपणे परवानगी मिळत आहे. वास्तविक दरवर्षी या बारची अनुज्ञप्ती नूतनीकरण करावे लागते आणि नव्याने कागदपत्रे सादर करावे लागतात. मात्र सन्नी वाईन बारचे बाबत राज्य उत्पाद शुल्क विभाग जुन्याच कागदपत्रांचे आधारावर परवानगी देत आहे.

याबाबत सचिन व भाऊराव चन्ने यांनी संयुक्तपणे उत्पाद शुल्क विभागाकडे रितसर तक्रार केली. मात्र राज्य उत्पादन शुल्क विभागाचे चंद्रपूर जिल्हा अधिक्षक नितीन धार्मिक यांनी सचिन व भाऊराव चन्ने यांचा अर्ज फेटाळून लावला. याच प्रकारे संतोष जगन्नाथ चन्ने यांनी सामायिक प्रॉपर्टी असलेल्या व भाऊराव चन्ने यांच्या सचिन वाईन बार ची तक्रार केली. त्यावर उत्पादन शुल्क विभागाने तातडीने मा. जिल्हाधिकारी यांचेकडे सुनावणी घेऊन त्या बार ची परवानगी रद्द केली. त्याचप्रमाणे सचिन चन्ने यांच्या सीएल ३ या मे. चन्ने देशी दारू दुकान याची तक्रार संतोष चन्ने व तिन बहिर्णीनी केली होती. यावर तातडीने निर्णय घेऊन चंद्रपूर जिल्हाधिकारी यांचेकडे सुनावणी घेण्यात आली आणि नंतर राज्य उत्पादन शुल्क विभागाने हेही दुकान बंद केले. मात्र अगदी तशीच तक्रार सचिन चन्ने व भाऊराव चन्ने यांनी सन्नी वाईन बार बाबत उत्पादन शुल्क विभागाकडे केली. त्यांनी या दोन्ही भावांचे बयाण घेतले, मात्र त्यानंतर रितसर सुनावणी न घेता एकतर्फी निकाल देत सचिन व भाऊराव चन्ने या बंधूंचा अर्ज निकाली काढला. राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक यांनी याबाबत मोठा अजब आदेश दिला आहे. संतोष चन्ने यांच्या तक्रारीवरून ताबडतोब कारवाई करीत मे. चन्ने देशी दारू दुकान आणि सचिन वाईन बार या दोन्ही आस्थापनांना परवानगी नाकारली आणि त्याच कारणांसाठी व आधारावरील तक्रारीवर सन्नी वाईन बार ला मात्र परवानगी दिली आहे.

जि.प.च्या १५८५ शाळांमध्ये फुलणार परसबागा

शिक्षण विभागाचा निर्णय: विद्यार्थ्यांची होणार निसर्गाशी जवळीक

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अमरावती, दि. २९ : केंद्र शासनाने प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत शाळांमध्ये वारस बाजार निर्माण करून पारस भागांमधून उत्पादित भाजीपाला व इतर पदार्थांचा समावेश शालेय पोषण आहारामध्ये करण्याचे आदेश राज्याचे शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दिले आहेत त्यामुळे झेडपी १ हजार ५८१ शाळा व विद्यालयांमध्ये परत बघा फुलणार असून विद्यार्थ्यांची निसर्गाशी जवळीक होणार आहे. पोषण शक्ती निर्माण योजनेत परसबागा निर्माण करण्याचा उपक्रम प्रभावीपणे शाळा स्तरावर राबविण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यासाठी उत्कृष्ट परसबाग स्पर्धाही घेतली जाईल. विद्यार्थ्यांनी परसबागेत पिकवलेला भाजीपाला फळे आदीचा पोषण आहारात उपयोग केला जाणार आहे. पोषण आहारामुळे कुपोषण दूर व्हावे असे विविध उद्देश या उपक्रमामुळे साध्य करण्याचा प्रयत्न आहे. केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे शाळांमध्ये परसबाग निर्माण विविध प्रकारच्या भाजीपाल्याची लागवड केली जाणार असल्याचे शालेय पोषण आहार विभागाचे लेखा अधिकारी स्वप्निल सुपासे यांनी सांगितले.

अशा प्रकारचा भाजीपाल्याची लागवड

परबागामधून उत्पादीत ताजा भाजीपाला या पदार्थाचा वापर शालेय पोषण आहारामध्ये करण्यात यावा परसबागामध्ये आपत्कालीन सूक्ष्म भाजीपाल्यांमध्ये मेथी, वाल, हरभरा, मूग ,बीट ,मका ,मुळा, मोहरी, सूर्यफूल ,कांदा, वाटाणा, चवळी, पालक, राजमा,आदीची लागवड करावी. हा पौष्टिक भाजीपाला सात ते दहा दिवसात तयार होतो. मायक्रोग्रीन्स मध्ये पोषक घटक मुबलक प्रमाणात असतात. त्यांच्यातील पोषक घटक अर्क स्वरूपात असतात पूर्णपणे वाढलेल्या भाज्यांच्या तुलनेत सूक्ष्म जीवनसत्वे क्षार ऑक्सीडंटची पातळी अधिक असते.प्रत्येक मायक्रो ग्रीन मधील पोषक घटकांमध्ये फरक असला तरी बहुतेक प्रकारांमध्ये पोटॅशियम, लोह, झिंक ,मॅग्नेशियम आणि तांबे हे घटक मुबलक प्रमाणात असतात.

परत बागेसाठी घ्या मार्गदर्शन

विद्यार्थ्यांचा वयोगट विचारात घेऊन शाळांमध्ये परसबाग सेंद्रिय पद्धतीने निर्माण करावी विद्यार्थ्यांना कंपोस्ट गांडूळ अशी पर्यावरण पूरक खते तयार करण्यास शिकवावे शाळांनी नवजीतच्या कृषी विज्ञान केंद्र कृषी शाळा कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या अशासकीय संस्था सेंद्रिय शेती करणारे पालक शेतकरी कृषी तज्ञांचे मार्गदर्शन घ्यावी असेही सूचना दिल्या आहेत.

कुसळचा आरओ संच बंद; बाहेर गावातून पाण्यासाठी भटकंती

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

कोपरणा, दि. २९ : पिपर्डा ग्रामपंचायत अंतर्गत गट ग्रा प हद्दीतील कुसळ येथिल पाणी शुद्धीकरण संच गेल्या अनेक महिण्या पासून धुळ खात दुर्लक्षीत ग्राम पंचायती च्या अनागोंदी कारभार मुळे नागरीकाना शुद्ध पाण्यापासून वंचित होत ३ कि मी अंतरावरील धानोली किवा कोरपना येथून कॅन भरूण आणण्याची नामुष्की गावावर ओढावली आहे गावातील वर्षभरापासून दोन कुपनलिका बंद असल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे हे गाव पेसा क्षेत्रात असून निधिचा गैरवापर झाल्याचे तक्रारी पंचायत समीती कडे प्रलंबित असून चौकशी झालेली नाही १५ वित्तीय आयोग निधितून स्वच्छता व पाणी पुरवठा योजना वर खर्च करणे अभिप्रेत असताना ग्राम पंचायती च्या लहरी कारभाराने गावाच्या विकासाचा बोझवारा झाला आहे गावात जनावराना पाणी व घरगूती वापर करीता बोरवेल दुरुस्ती आवश्यक असताना पदाधिकारी मनमानी कारभार चालत असल्याने वार्ड क्र ३ च्या दोन सदस्यांनी निषेध म्हणून गेल्या १६ महिन्यापासून ग्राम पंचायत सभेला पाठ फिरवली आहे उन्हामुळे तुष्णा भागविण्या साठी शुद्ध व थंड जल उपलब्ध करूण द्यावा अशी मागणी बाबाराव सिडाम वैभव किन्नाके अजय पोराते लालशाव पोराते मनोज तोडासे यांनी केली आहे.

महत्त्वाचे

पहिल्याच सामन्यात इशान किशनचे वादळ!

नवी दिल्ली: आयपीएल २०२६ स्पर्धेची दमदार सुरुवात झाली आहे. स्पर्धेतील पहिला सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि सनरायझर्स हैदराबाद या दोन्ही संघांमध्ये सुरु आहे. बंगळुरूतील एम चिन्नास्वामी स्टेडियमवर सुरु असलेल्या या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचा कर्णधार रजत पाटीदारने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दरम्यान प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या सनरायझर्स हैदराबाद संघाकडून संघाचा नवा कर्णधार इशान किशनने मोठ्या रेकॉर्डला गवसणी घातली आहे.

या सामन्यात सनरायझर्स हैदराबाद नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्यासाठी यावं लागलं. पण हैदराबादला हवी तशी सुरुवात करता आली नाही. संघातील प्रमुख फलंदाज स्वस्तात माघारी परतले. बंगळुरूचं मैदान छोटं आहे. त्यामुळे अभिषेक शर्मा आणि ट्रॅव्हिस हेडकडून चांगल्या सुरूवातीची गरज होती. पण ही जोडी स्वस्तात माघारी परतली.

मुंबईच्या माजी क्रिकेटपटूला अटक

मुंबई: नुकत्याच भारतात पार पडलेल्या टी-२० वर्ल्ड कप २०२६ मधील तिकीट काळाबाजाराचे मोठे रॅकेट मुंबई पोलिसांनी उघडकीस आणले आहे. या प्रकरणात मुंबईच्या एका माजी २२ वर्षीय क्रिकेटपटूला पोलिसांनी बेड्या ठोकल्या असून, क्रिकेट वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. भारत आणि इंग्लंड यांच्यातील उपांत्य फेरीच्या सामन्याच्या तिकिटांची चढ्या दराने विक्री केल्याचा ठपका त्याच्यावर ठेवण्यात आला आहे.

टी-२० वर्ल्ड कप २०२६ चा उपांत्य फेरीचा सामना मुंबईच्या ऐतिहासिक वानखेडे स्टेडियमवर भारत आणि इंग्लंड दरम्यान खेळवण्यात आला होता. या हाय-व्होल्टेज सामन्याच्या तिकिटांची मोठ्या प्रमाणावर काळाबाजारी झाल्याची तक्रार पोलिसांकडे प्राप्त झाली होती. तपासादरम्यान, मुंबईच्या १९ वर्षांखालील (-१९) संघाचा माजी क्रिकेटपटू बलवंत सिंह स्वरूप सिंह सोढा याचे नाव समोर आले. २६ वर्षीय सोढा याला या गुन्ह्यातील सातवा आरोपी म्हणून पोलिसांनी अटक केली आहे.

प्रभावशाली खेळी:संघाला चॅम्पियन बनविण्यावर पूर्ण लक्ष-शशांक सिंह

३१ मार्च रोजी गुजरात टायटन्सशी भिडणार पंजाब किंग्स

नवी दिल्ली: दि.२९ वृत्तसंस्था

पंजाब किंग्सचा फिनिशर शशांक सिंहने आयपीएल २०२६ पूर्वी आपल्या ध्येयाबद्दल स्पष्टपणे सांगितले आहे की, या हंगामात त्याचे संपूर्ण लक्ष प्रभावी खेळी खेळण्यावर असेल. त्याने सांगितले की, त्याचे उद्दिष्ट जास्त धावा करणे किंवा वैयक्तिक आकडेवारीच्या मागे धावणे नाही, तर संघासाठी सामना जिंकवणारी भूमिका बजावणे आहे.

शशांक म्हणाला की, त्याची फलंदाजीची क्रमवारी अशी आहे जिथे त्याला अनेकदा दबावाखाली क्रीजवर यावे लागते. अशा परिस्थितीत त्याची पहिली प्राथमिकता कोणत्याही परिस्थितीत संघाला विजय मिळवून देणे असते.

गेल्या हंगामाची आठवण करून देत तो म्हणाला की, सुरुवातीला त्याला त्याच्या भूमिकेबद्दल जास्त स्पष्टता नव्हती, परंतु टीम मॅनेजमेंटने त्याला फिनिशरची जबाबदारी दिली. आता तो आपली भूमिका चांगल्या प्रकारे समजून घेतो. शशांक म्हणाला की, २० चेंडूत ५० धावांसारख्या खेळी खेळणे हेच त्याचे खरे काम आहे आणि यावेळीही

त्याचे लक्ष्य तेच राहील. त्याने स्पष्ट केले की, वैयक्तिक यशापेक्षा संघाचा विजय आणि विजेतेपद अधिक महत्त्वाचे आहे. शशांक म्हणाला, मला माहीत आहे की ३१ मे रोजी आम्ही चिन्नास्वामीमध्ये खेळू आणि कप उचलू. ही फक्त एक भावना नाही, मला खात्री आहे की हे घडेल. हा स्वतःवर आणि संघावर विश्वास आहे. सर्वजण एकाच विचाराचे आहेत. सर्वांमध्ये आत्मविश्वास आहे. आम्ही सामन्यागणिक पुढे जाऊ कारण अंतिम ध्येय ट्रॉफी जिंकणे आहे. जर आपण विचार करत राहिलो की आपण गेल्या वर्षी फायनलमध्ये पोहोचलो होतो, तर आपल्यावर खूप दबाव येईल. म्हणून आपले सध्याचे ध्येय गुजरात टायटन्सविरुद्धच्या आपल्या पहिल्या सामन्याची, नंतर चेन्नई सुपर किंग्स आणि कोलकाता नाइट रायडर्सविरुद्धच्या आपल्या सामन्यांची तयारी करणे आहे.

आयपीएल २०२६ ची सुरुवात २८ मार्च रोजी चिन्नास्वामी स्टेडियममध्ये रॉयल चॅलेंजर्स बेंगळूरु आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यातील सामन्याने झाली. पंजाब किंग्स आपल्या मोहिमेची सुरुवात न्यू चंदीगडमध्ये गुजरात टायटन्सविरुद्ध ३१ मार्च रोजी करेल. पंजाबने मागील हंगामात उत्कृष्ट प्रदर्शन केले. लीग स्टेजमध्ये संघ गुणतालिकेत अव्वल स्थानी होता. त्यांनी ती गती प्लेऑफमध्येही कायम ठेवली, परंतु अंतिम सामन्यात आरसीबीकडून अटीतटीच्या लढतीत ६ धावांनी पराभव पत्करावा लागला.

विदेशी खेळाडूंवर कठोर कारवाई करा

सुनील गावस्करांनी बीसीसीआयला सुनावले

नवी दिल्ली: दि.२९ वृत्तसंस्था

इंडियन प्रीमियर लीग २०२६ च्या हंगामापूर्वी दिल्ली कॅपिटल्सला मोठा धक्का बसला आहे. इंग्लंडचा सलामीवीर बेन डकेटने आगामी हंगामातून माघार घेण्याचा निर्णय घेतला असून, त्याच्या या निर्णयावर भारताचे माजी कर्णधार सुनील गावस्कर यांनी खडेबोल सुनावले आहेत. शेवटच्या क्षणी माघार घेणाऱ्या विदेशी खेळाडूंवर बीसीसीआयने अधिक कठोर कारवाई करावी, अशी मागणी गावस्कर यांनी केली आहे.

दिल्ली कॅपिटल्सने लिलावात बेन डकेटला २ कोटी रुपयांना खरेदी केले होते. तो केएल राहुलसोबत डावाची सुरुवात करेल अशी अपेक्षा होती. आपल्या निर्णयाचे समर्थन करताना डकेट म्हणाला, ''आयपीएलमधून माघार घेणे आणि मोठ्या रकमेवर पाणी सोडणे हा निर्णय सोपा नव्हता. जगातील सर्वोत्तम खेळाडूंसोबत खेळण्याची संधी मी गमावत आहे, पण इंग्लंडसाठी खेळणे माझ्यासाठी किती महत्त्वाचे आहे हे सिद्ध करण्यासाठी मी हे पाऊल उचलले आहे.'' दरम्यान, इंग्लंडच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटवर लक्ष केंद्रित करण्यासाठी बेन डकेट याने आयपीएलमधून माघार घेतली असली तरी स्पर्धेला अवघे काही दिवस उरले असताना घेतलेल्या या निर्णयामुळे दिल्लीच्या नियोजनावर परिणाम झाला आहे. ''आयपीएलमधून एखाद्या खेळाडूने माघार घेतली तर सध्या लागू असलेली दोन वर्षांची बंदी पुरेशी ठरत नाहीये, हे स्पष्ट आहे. बीसीसीआयने आता अशा काही ठोस उपाययोजनांचा विचार करायला हवा ज्याचा खेळाडूंवर खरोखर परिणाम होईल. जोपर्यंत खेळाडूच्या आयपीएलमधील पुनरागमन करण्याच्या संधीवर परिणाम होत नाही, तोपर्यंत असे नियम काम करणार नाहीत. डकेटला द हंड्रेड स्पर्धेत चांगली किंमत मिळाल्यामुळे कदाचित त्याने आयपीएलपेक्षा इंग्लंडच्या कसोटी कारकिर्दीला प्राधान्य देणे सोयीचे मानले असावे, असेही गावस्कर यांनी स्पष्ट केले.

झाशीचे पोरगे आयपीएल गाजवतेय! अनिकेत वर्माचा शून्यातून विश्व निर्माण करण्याचा अंगावर काटा आणणारा प्रवास

नवी दिल्ली: दि.२९ वृत्तसंस्था

आयपीएलमध्ये अनेक नव्या चेहऱ्यांना संधी मिळते आणि हे खेळाडू आपल्या मेहनतीच्या, कौशल्याच्या बळावर आपलं नाव कमावतात. सध्या सनरायझर्स हैदराबादमधील अनिकेत वर्मा याने यंदाच्या सीझनमधील पहिल्याच सामन्यात आपल्या फटकेबाजीने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. त्याने आरसीबीविरूद्ध पहिल्याच सामन्यात १८ चेंडूत ४३ धावा करत संघाला २०० धावांचा पल्ला पार करून दिला. पण त्याची आयपीएलपर्यंत पोहोचण्याचा हा प्रवास खूपच खडतर होता. आईच्या मृत्यूनंतर वडिलांनी दुसरं लग्न केलं आणि काकांनी त्याचा सांभाळ करत त्याला इथपर्यंत आणण्यात मोलाची मदत केली.

अनिकेतच्या यशात त्याच्या काकांनी महत्त्वाची भूमिका बजावली. लहान वयातच त्याने आपल्या आईला गमावलं आणि

त्यानंतर त्यांच्या वडिलांनी दुसरे लग्न केलं. अनिकेतने क्रिकेटपटू व्हावं असं त्याच्या काकांनी पाहिलेले स्वप्न त्याने सत्यात उतरवलं आहे.

अनिकेत वर्माच्या चार उत्तुंग षटकारांनी त्याला रातोरात इंटरनेट स्टार बनवलं. अनिकेतच्या या खेळीदरम्यान इयान बिशप यांनी त्याचा आतापर्यंतचा क्रिकेट प्रवास सांगितला आणि त्याची ही अंगावर काटा आणणारी कहाणी सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरली आहे. आयपीएलच्या झगमगाटापर्यंतचा अनिकेतचा प्रवास हा धैर्य आणि दृढनिश्चयाची गाथा आहे. निकेतने फक्त ३ वर्षांचा असताना त्याच्या आईचं निधन झालं. अनिकेतचा सांभाळ त्याच्या काकांनी केला. आर्थिक अडचणी आणि क्रीडा सुविधांचा अभाव असूनही, अनिकेत भारतीय क्रिकेटचा नवा 'फिनिशर' म्हणून उदयास आला आहे. अनिकेतच्या आईच्या मृत्यूनंतर काका, अमित वर्मा, यांनी त्याची जबाबदारी घेतली. झाशीसारख्या एका लहान गावापासून ते आयपीएल स्टार बनण्यापर्यंतचा हा प्रवास अडचणींनी भरलेला होता. वयाच्या १८ व्या वर्षी, भावाच्या दुसऱ्या लग्नानंतर, त्याच्या काकांनी अनिकेतला आपल्यासोबत भोपाळला नेण्याचा निर्णय घेतला. त्यांनी लहान वयातच काम शोधलं आणि त्याला क्रिकेटपटू बनवण्याचं स्वप्न पाहिलं.

भोपाळमधील प्रशिक्षक नंदजीत यांनी अनिकेतच्या काकांच्या स्वप्नाला पाठिंबा दिला. शेजारच्या रेल्वे अकादमीमध्ये त्याने खेळायला सुरूवात केली. लहानपणी, अनिकेत दिवसातील दहा तास मैदानावर क्रिकेट खेळायचा. काही महिन्यांनंतर तिथल्या कोचने सांगितलं, जर क्रिकेटमध्ये भविष्य घडवायचं असेल तर अंकुर क्रिकेट अकॅडमीमध्ये जे कोच आहेत तिथे घेऊन जा. काका तेव्हा गाड्यांच्या वर्कशॉपमध्ये काम करायचे, फक्त ३ ते साडेतीन हजार त्यांना सॅलरी होती. त्यामुळे मोठ्या अकॅडमीची फी कोण देणार. पण अनिकेतमधील चमक पाहून तिथल्या कोचने एकही पैसा घेतला नाही, शिवाय क्रिकेटसाठी लागणाऱ्या सर्व वस्तूही त्याला पुरवल्या.

विराट कोहलीने केला ऐतिहासिक पराक्रम; आरसीबीने मोडला राजस्थान रॉयल्सचा रेकॉर्ड

नवी दिल्ली: दि.२९ वृत्तसंस्था

आयपीएल २०२६ च्या सलामीच्या लढतीत सनरायझर्स हैदराबादने दिलेले २०२ धावांचे तगडे आव्हान आरसीबीने केवळ १५.४ ओव्हरमध्ये पूर्ण करत ६ गडी राखून विजय मिळवला. या विजयाचा शिल्पकार ठरलेल्या विराट कोहलीने नाबाद ६९ धावांची खेळी करताना आयपीएलमध्ये 'धावांचा पाठलाग ' करताना ४००० धावा पूर्ण करणारा जगातील पहिला फलंदाज होण्याचा बहुमान मिळवला आहे. विराट कोहलीने आतापर्यंत आयपीएलमध्ये धावांचा पाठलाग करताना ४०२७ धावा केल्या आहेत. या यादीत त्याच्या आसपासही कोणी नाही. दुसऱ्या क्रमांकावर असलेला डेव्हिड वॉर्नर (३२८५ धावा) कोहलीपेक्षा जवळपास ८०० धावांनी मागे आहे. हैदराबादविरुद्ध विराटने ३८ चेंडूत ५ चौकार आणि ५ षटकारांच्या मदतीने ६९ धावांची नाबाद वादळी खेळी केली. या सामन्यात २०२ धावांचे लक्ष्य अवघ्या १५.४ ओव्हरमध्ये गाठून आरसीबीने आयपीएलमधील एक मोठा विक्रम आपल्या नावावर केला. २०० पेक्षा जास्त धावांचे लक्ष्य सर्वात कमी षटकांत गाठण्याचा विक्रम आता आरसीबीच्या नावावर आहे. यापूर्वी २०२५ मध्ये राजस्थान रॉयल्सने गुजरात टायटन्सविरुद्ध २१० धावांचे लक्ष्य १५.५ ओव्हरमध्ये गाठले होते, तो रेकॉर्ड आता आरसीबीने मोडला आहे.

अमेरिकन कोर्टाने मान्य केले - तरुणांमध्ये सोशल मीडिया व्यसनासारखे

नवी दिल्ली: अमेरिकेतील एका न्यायालयाने ऐतिहासिक निर्णयात मेटाला मुलांना ऑनलाइन धोक्यांपासून वाचवण्यात अपयशी ठरल्याबद्दल दोषी ठरवले. न्यू मेक्सिकोच्या ज्युरीने असे मानले की फेसबुक आणि इंस्टाग्रामवर अश्लील व्हिडिओ आणि फोटो, गैरकृत्यांसाठी फसवणूक आणि मानवी तस्करी यांसारख्या धोक्यांपासून मुलांना वाचवता आले नाही. या प्रकरणात ज्युरीने मेटावर ३१४१ कोटी रुपयांचा मोठा दंड ठोठावला आहे.आणखी एका प्रकरणात, कॅलिफोर्नियाच्या एका ज्युरीने मेटा आणि गुगलला एका तरुणीच्या डिप्रेशन आणि एंग्जायटीसाठी जबाबदार धरले. तरुणीचा आरोप आहे की, मेटासह सोशल मीडिया कंपन्यांनी जाणूनबुजून अशी उत्पादने तयार केली, जी व्यसन लावणारी आहेत. यामुळे तिच्या मानसिक आरोग्यावर परिणाम झाला. या प्रकरणात न्यायालयाने मेटा आणि गुगलवर २८ कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे. यापैकी ७०% रक्कम म्हणजेच सुमारे २० कोटी रुपये मेटाला द्यावे लागतील. न्यायालय दोन्ही कंपन्यांवर अतिरिक्त दंडही लावेल. न्यू मेक्सिकोचे ॲटर्नी जनरल राउल टोरेज यांनी याला मोठ्या टेक कंपनीविरुद्ध मुलांना-युवकांना हानी पोहोचवल्याच्या प्रकरणात कोणत्याही राज्याच्या चाचणीतील पहिला विजय म्हटले. ते म्हणाले, मेटाने मुलांच्या सुरक्षिततेपेक्षा नफ्याला प्राधान्य दिले.

तेलाचे दर वाढल्याने भारतासमोर नवे संकट

अमेरिका- इराण युद्धाचा जगावर परिणाम! : जागतिक बाजारात अस्थिरता

नवी दिल्ली: दि.२९ वृत्तसंस्था

अमेरिका आणि इराण यांच्यातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, जागतिक बाजारपेठा एका मोठ्या भू-राजकीय बदलाकडे दुर्लक्ष करत आहेत. सिस्टिमॅटिक्सच्या अहवालानुसार, सध्याची परिस्थिती केवळ एक तात्पुरता चढउतार नसून, जागतिक स्तरावरील एका मोठ्या बदलाचे लक्षण आहे, जो पुन्हा उद्भवू शकतो आणि दीर्घकालीन अनिश्चितता निर्माण करू शकतो.

जागतिक बाजारपेठेत अस्थिरतेचा फेरा अहवालानुसार, युद्धाशी संबंधित प्रत्येक बातमीवर बाजारपेठा सध्या आशा आणि भीती यांच्यात हेलकावे खात आहेत.

परंतु, एक अधिक मोठा बदल घडत आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नेतृत्वाखाली बदलती धोरणे आणि इराणचा प्रतिसादामुळे अशी परिस्थिती निर्माण होत आहे, जिथे गुंतवणूकदारांना दीर्घकालीन जोखमींचे मूल्यांकन करणे कठीण जात आहे. अहवालात याचे वर्णन जागतिक भू-राजकीय रचनेतील एक मोठे स्थित्यंतर असे केले की, त्यामुळे अमेरिका आणि चीनच्या नेतृत्वाखालील 'ग्लोबल साउथ' यांच्यातील सत्तेचे संतुलन बदलत आहे. भविष्यात अशाच प्रकारचा तणाव आणि संघर्ष पुन्हा उद्भवू शकतो.

ऊर्जा बाजारावरात खळबळ आर्थिक आघाडीवर, या संकटाचा ऊर्जा बाजारावर थेट परिणाम होत आहे, असा इशारा अहवालात देण्यात आला आहे. ब्रेंट क्रूडच्या किमती प्रति बॅरल सुमारे १०० डॉलर्स किंवा त्याहून अधिक पोहोचल्या आहेत, जे केवळ पुरवठ्यातील धोकेच नव्हे, तर वाढता भू-राजकीय प्रीमियम देखील दर्शवते. तणाव कमी झाला तरी, कच्च्या तेलाच्या व वायूच्या पुरवठ्यातील व्यत्यय कायम राहू शकतो. ज्यामुळे किमती दीर्घकाळ उच्च राहतील.

जागतिक कर्ज देखील चिंतेचे एक प्रमुख कारण बनत आहे. अहवालानुसार, २०२५ पर्यंत जागतिक कर्ज अंदाजे २९ डॉलर्स ट्रिलियनने वाढून ३४८ डॉलर्स ट्रिलियनच्या विक्रमी उच्चांकावर पोहोचण्याचा अंदाज आहे. त्यामुळे सरकारांची आर्थिक प्रोत्साहन देण्याची क्षमता मर्यादित होईल.

'सेबी'कडून सात कृषी वस्तूंच्या वायदेबंदीला मुदतवाढ

मुंबई: दि.२९ वृत्तसंस्था

भांडवली बाजार नियामक सेबीने गहू, मूग आणि भात (बिगर-बासमती) यांसह सात कृषी वस्तूंच्या वायदे (डेरिव्हेटिव्ह) व्यवहारांवरील स्थगिती कायम ठेवली आहे. किमतींवर नियंत्रण ठेवण्याच्या उद्देशाने, ही स्थगिती आणखी एका वर्षाने ३१ मार्च २०२७ पर्यंत वाढवली गेली आहे.

गेल्या पाच वर्षांपासून ही वायदेबंदी सुरू असून, महागाई निश्चित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या प्रमुख अन्नधान्य, कृषी वस्तूंच्या बाजारातील अतिरेकी सट्टेबाजी आणि अस्थिरता रोखणे हा त्यामागील उद्देश आहे.

ज्या इतर वस्तूंच्या व्यवहारांवर

स्थगिती लागू आहे, त्यामध्ये हरभरा, क्रूड पाम तेल (आणि त्याचे डेरिव्हेटिव्ह), मोहरी (आणि तिचे डेरिव्हेटिव्ह) तसेच सोयाबीन (आणि त्याचे डेरिव्हेटिव्ह) यांचा समावेश आहे. हा निर्देश मूळात १९ डिसेंबर २०२१ रोजी जारी करण्यात आले, ज्याद्वारे या करारांमधील व्यवहार २० डिसेंबर २०२२ पर्यंत पहिल्यांदा स्थगित करण्यात आले. मात्र तेव्हापासून, या वायदेबंदीची मुदत अनेकदा वाढवण्यात आली आहे.

प्रथम २० डिसेंबर २०२३ पर्यंत, त्यानंतर २० डिसेंबर २०२४ पर्यंत, त्यानंतर ३१ जानेवारी २०२५ पर्यंत, ३१ मार्च २०२५ पर्यंत आणि त्यानंतर ३१ मार्च २०२६ पर्यंत वाढवली होती. उपरोक्त निर्देशांच्या अनुषंगाने, वरील करारांमधील व्यवहारांची स्थगिती आता ३१ मार्च २०२७ पर्यंत आणखी वाढवण्यात आली आहे, असे सेबीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

या स्थगितीमुळे बाजारातील सहभागींना त्यांच्याकडील विद्यमान व्यवहारांची पूर्तता करण्याची मुभा मिळते, परंतु या वस्तूंच्या संदर्भात कोणतेही नवीन 'फ्युचर्स ट्रेडिंग' (वायदा व्यवहार) करण्यास मात्र मनाई करण्यात आली आहे.

'जेएनपीए'चा ८० लाख कंटेनर हाताळणीचा विक्रम

उरण : दि.२९वृत्तसंस्था

जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाने (जेएनपीए) २०२५-२६ या आर्थिक वर्षात ८० लाखांची विक्रमी वार्षिक कंटेनर हाताळणी केली. बरोबरीने बंदराने १०० दशलक्ष मेट्रिक टनाची उच्चांकी माल हाताळणी केली. उपलब्ध आकडेवारीनुसार, जेएनपीए बंदरात गुरुवारपर्यंत ८० लाख टीईयू (ट्वेंटी-फूट इक्विव्हेंलेंट युनिट्स) कंटेनर हाताळणीचा टप्पा गाठला आहे. बंदराच्या कामगिरीचा हा लक्षणीय टप्पा आहे. शिवाय, बंदराने स्थापनेपासूनचा सर्वाधिक वार्षिक कामगिरीचा विक्रम नोंदवत एकूण शंभर दशलक्ष मेट्रिक टन (एमएमटी) मालाची हाताळणीही केली. यापूर्वी २०२५ मध्ये बंदरातून ७९ लाख कंटेनर हाताळणी करण्यात आली आहे. जेएनपीएमधील चौथ्या सिंगापूर बंदराच्या दुसऱ्या टप्प्याला सुरुवात

झाली असून, तो पूर्णत्वाला गेल्यास बंदराला कंटेनर हाताळणीत वार्षिक १ कोटींचा टप्पा गाठणे शक्य होणार आहे.जेएनपीएने हा महत्त्वाचा टप्पा साजरा करण्यासाठी टर्मिनल ऑपरेटरसह, भागधारकांची बैठक आयोजित केली होती. बंदराची ही कामगिरी सागरी व्यापारातील सर्व घटकांमधील मजबूत सहकार्याचा एकत्रित परिणाम आहे. या सातत्यपूर्ण भागीदारीमुळे जेएनपीएच्या स्थिर वाढीला आणि कार्यक्षमतेतील उत्कृष्टतेला महत्त्वपूर्ण चालना मिळाली आहे.टर्मिनल ऑपरेटरना संबोधित करताना जेएनपीएचे अध्यक्ष तसेच व्हीपीपीएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक गौरव दयाल म्हणाले, विक्रमी कामगिरीचा टप्पा गाठला जाणे हा जेएनपीए आणि संलग्न संपूर्ण व्यापार समुदायासाठी अभिमानाचा क्षण आहे. टर्मिनल ऑपरेटर आणि आमचे कर्मचारी यांच्या चिकाटी, कार्यक्षमता आणि समर्पणाचे हे द्योतक आहे. भारताला जागतिक सागरी केंद्र बनविण्यासाठी हे मोलाचे योगदान असल्याचे त्यांनी नमूद केले.जेएनपीएची वाहतूक प्रामुख्याने गेटवे-आधारितच राहिली असून, देशाच्या गेटवे कार्गो हाताळण्यात त्याची प्रमुख भूमिका अधोरेखित होते; तर ट्रान्सशिपमेंटचे प्रमाण हळूहळू वाढत आहे. वाढत्या व्यापार मागण्यांची पूर्तता करण्यासाठी आणि आपली जागतिक स्पर्धात्मकता बळकट करण्यासाठी, जेएनपीए धोरणात्मक पायाभूत सुविधांचा विकास आणि डिजिटल परिवर्तनाचे उपक्रम सातत्याने हाती घेत राहिल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

थोडक्यात

राष्ट्रीय लोक अदालत

नागपूर : जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने ९ मे रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी आपले वाद मिटविण्याकरीता या लोक अदालतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर प्रवीण उन्हाळे यांनी केले आहे.

एक गाव एक कृषी अवजारे बँक

नागपूर : गावातील नोंदणीकृत महिला शेतकरी गट यांचे मार्फत "गावस्तरावरील कृषि अवजारे बैंक" स्थापन करण्याकरीता एक गाव एक कृषी अवजारे बँक या तत्वानुसार, गावातील एमएसआरएलएम (उमेद) व माविम पुरस्कृत महिला बचत गट तसेच महिला गाव संघ यांनी ५ एप्रिलपर्यंत महाडीबीटी पोर्टलवा ऑनलाइन अर्ज सादर करावेत, असे आवाहन कृषी विभाग यांचे मार्फत करण्यात आले आहे औजार बैंक स्थापन करण्यासाठी एका गावातून एकापेक्षा जास्त गटांचे अर्ज प्राप्त झाल्यास, अर्जांची निवड प्रक्रिया ऑनलाईन लॉटरी पद्धतीने करण्यात येईल, गावस्तरीय कृषी औजारे बँक या घटकासाठी प्रकल्पाच्या FPO-DBT पोर्टलवर ऑनलाईन अर्ज प्रकल्प गावातील महिला शेतकरी गटांनी ५ एप्रिल पूर्वी करावा.

अल्पवयीन मुलीवर अत्याचार

नागपूर: एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर प्रेमाच्या जाळ्यात ओढून अत्याचार केल्याची धक्कादायक घटना कोराडी पोलीस स्टेशनच्या हद्दीत उघडकीस आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी १९ वर्षीय आरोपीला अटक केली असून, पीडिता ८ महिन्यांची गर्भवती असल्याचे समोर आले आहे. अफसर उर्फ रौफ खान (वय १९ वर्षे, रा. कपिलनगर, नागपूर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. माहितीनुसार, जून २०२५ पासून आरोपी अफसर आणि १७ वर्षीय पीडित मुलगी यांच्यात ओळख झाली होती. पीडिता ही अल्पवयीन आहे हे माहीत असूनही आरोपीने तिचा फायदा घेतला. त्याने तिला लग्नाचे आमिष दाखवून कोराडी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील कामठी ते अमरावती रोडवरील निर्जन स्थळी नेले. तिथे तिच्या इच्छेविरुद्ध बळजबरीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले. आरोपीने पीडितेला वारंवार विविध ठिकाणी नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. या सततच्या शोषणामुळे पीडित मुलगी ८ महिन्यांची गर्भवती राहिली आहे. पीडितेने २७ मार्च २०२६ रोजी कोराडी पोलीस स्टेशन गाठून घडलेला प्रकार सांगितला. तिच्या तक्रारीवरून पोलिसांनी तातडीने पावले उचलत आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) च्या कलम ६४(२)(m), ८८ आणि पोक्सो (POCSO) कायद्याच्या कलम ४, ६ व ८ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक निशा गवळी या प्रकरणाचा पुढील सखोल तपास करत आहेत. या घटनेमुळे परिसरात संताप व्यक्त केला जात असून, अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रशासनाचे उन्हाळी वेळापत्रक जाहीर, नागपूरहून दररोज सरासरी सत्तर विमान फेऱ्या

उपराजधानीतून चौदा शहरांसाठी थेट विमानसेवा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

नागपूर, दि. २९ : उपराजधानी नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रशासनाने रविवार, २९ मार्चपासून आपले नवीन उन्हाळी वेळापत्रक लागू केले आहे. प्रवाशांची वाढती मागणी लक्षात घेता आता नागपूरहून देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय अशा एकूण १४ शहरांसाठी थेट विमानसेवा उपलब्ध करून देण्यात आली असून, आठवड्याला तब्बल ४८६ विमानांची ये-जा होणार आहे. हे वेळापत्रक आगामी २४ ऑक्टोबरपर्यंत प्रभावी राहील.

नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी एक अत्यंत दिलासादायक बातमी आहे. विमानतळ प्रशासनाने आपले सुधारित आणि नवीन उन्हाळी वेळापत्रक लागू केले आहे. या नव्या वेळापत्रकानुसार आता नागपूरवरून एकूण चौदा गंतव्यस्थानांसाठी थेट विमानसेवा उपलब्ध झाली आहे. मागील हिवाळी वेळापत्रकात तेरा शहरांसाठी उड्डाणे उपलब्ध होती, परंतु प्रवाशांची वाढती मागणी लक्षात घेता त्यात आता नांदेड या नवीन आणि महत्त्वाच्या सेक्टरची भर पडल्याने शहरांची संख्या चौदावर पोहोचली आहे. नव्या उन्हाळी वेळापत्रकानुसार नागपूर विमानतळावरून दर आठवड्याला एकूण ४८६ विमानांची ये-जा होणार आहे. मागील हिवाळी वेळापत्रकाच्या तुलनेत उड्डाणांमध्ये आठ फेऱ्यांची विशेष वाढ करण्यात आली आहे. म्हणजेच विमानतळावरून दररोज सरासरी ७० विमान फेऱ्यांचे यशस्वी नियोजन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. या वाढीव फेऱ्यांमुळे प्रवाशांचा मोठा वेळ वाचणार असून देशातील विविध भागांशी कनेक्टिव्हिटी अधिक सुलभ आणि वेगवान होणार आहे. सध्या नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळावरून सहा प्रमुख विमान कंपन्या आपली निरंतर सेवा देत आहेत. यामध्ये प्रामुख्याने स्टार एअर, एअर अरेबिया, कतार एअरवेज, एअर इंडिया एक्सप्रेस, इंडिगो आणि एअर इंडिया या आघाडीच्या कंपन्यांचा समावेश आहे. या कंपन्यांच्या माध्यमातून नागपूरहून देशातील मुंबई, नवी मुंबई, दिल्ली, बेंगळुरू, पुणे, हैदराबाद, अहमदाबाद, इंदूर, कोलकाता, पणजी आणि किशनगड यांसारख्या प्रमुख शहरांसाठी उड्डाणे उपलब्ध आहेत. यासोबतच, आंतरराष्ट्रीय स्तरावर दोहा आणि शारजाह या दोन महत्त्वाच्या शहरांसाठी थेट उड्डाणे पूर्वीप्रमाणेच अविरत सुरू राहणार आहेत. प्रवाशांचा वाढता प्रतिसाद आणि उद्योग क्षेत्राची गरज लक्षात घेऊन विमानतळ प्रशासनाने अतिशय नियोजनबद्ध पावले उचलली आहेत. या नव्या आणि अद्ययावत वेळापत्रकामुळे संपूर्ण विदर्भातील व्यवसाय, पर्यटन आणि धार्मिक प्रवासाला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

नागपूर ते नांदेड बहुप्रतिक्षित विमानसेवा

नागपूर-नांदेड ही नवीन बहुप्रतिक्षित विमानसेवा ३१ मार्चपासून स्टार एअर कंपनीकडून सुरू केली जाणार आहे. शुक्रवार वगळता आठवड्यातील इतर सर्व दिवशी ही सेवा प्रवाशांसाठी उपलब्ध राहील. नांदेडहून सकाळी ११.२० वाजता निघून हे विमान दुपारी १२.२० वाजता नागपूरला पोहोचेल. परतीच्या प्रवासात नागपूरहून दुपारी १२.५० वाजता उड्डाण घेऊन दुपारी १.३० वाजता नांदेडला दाखल होईल. ८८ आसनक्षमता असलेल्या या इकॉनॉमी विमानामुळे भाविकांची मोठी सोय होणार आहे.

आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत कनेक्टिव्हिटी

नागपूर विमानतळावरून प्रवाशांना आता देशातील प्रमुख शहरांसोबतच आंतरराष्ट्रीय कनेक्टिव्हिटीचाही लाभ मिळत आहे. कतार एअरवेज आणि एअर अरेबियाच्या माध्यमातून दोहा व शारजाहसाठी थेट उड्डाणे सुरू आहेत. देशांतर्गत प्रवासात मुंबई, दिल्ली, पुणे, बंगळुरू या महानगरांसह किशनगड आणि नवी मुंबईसाठीही सेवा उपलब्ध असल्याने व्यावसायिक व पर्यटकांचा प्रवास अधिक सुकर झाला आहे. नवीन वेळापत्रकामुळे या सर्व मार्गांवरील प्रवासी संख्येत मोठी वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

CAPTION लाईट...कॅमेरा ...ॲक्शन...

नागपूर : पुढील काही वर्षात 'नागपूर फिल्मसिटी' प्रारंभ होणार असतानाच नागपुरात चित्रपटांचे छायाचित्रण सुरू झाले आहे सावनेर तालुक्यातील खैरी ढालगांव येथे 'दिव्य नगाजी' चित्रपटाचे छायाचित्रण करण्यात आले यात स्थानिक कलाकारांना संधी देण्यात आली आहे. विदर्भातील अनेक ठिकाणी ' लाईट...कॅमेरा ...ॲक्शन' हा आवाज ऐकू येणार आहे

मनपाच्या रुग्णालयांचे पीपीपी तत्वावर बळकटीकरण

महापौर ठाकरे यांचे अधिकाऱ्यांना निर्देश, १६ बेडचे आयसीयू कक्ष उभारणार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

नागपूर दि. २९ : एलएडी चौकातील मनपाच्या इंदिरा गांधी रुग्णालय तसेच पाचपावली सुतिका गृहाचे बळकटीकरण करून रुग्णांना चांगल्या व अत्याधुनिक आरोग्य सुविधा पुरवाव्या, असे निर्देश महापौर निता ठाकरे यांनी अधिकाऱ्यांना दिले.

सार्वजनिक, खासगी व भागीदारी (पीपीपी) तत्वावर मनपाच्या रुग्णालयाची देखरेख, व्यवस्थापन व संचालन करण्याच्या संदर्भात महापौरांनी आढावा बैठक घेतली. उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी वखरे, सत्ता पक्षनेते नरेंद्र बोरकर, अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, आरोग्य विशेष समितीच्या सभापती मनीषा अतकरे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, प्रकल्प अभियंता राजीव गौतम, सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार उपस्थित होते.

गांधीनगर परिसरात असलेले मनपाच्या इंदिरा गांधी रुग्णालयाचा तिसरा माळा खासगी हॉस्पिटलला पीपीपी तत्वावर देऊन नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याच्या संदर्भात सादरीकरण करण्यात आले. यासंदर्भात वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांनी पीपीपी तत्वावर इंदिरा गांधी रुग्णालयाचा तिसरा माळा दिल्यानंतर महानगरपालिकेला आर्थिक भार उचलावा लागणार नसल्याचे सांगितले. यात १६ बेडचे आयसीयू कक्ष सुद्धा उभारण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे पाचपावली भागातील पाचपावली सुतिकागृहात या पद्धतीने आरोग्य सुविधा बळकट करण्याचे प्रस्तावित असल्याचे सांगितले. पीपीपी तत्वावर ही रुग्णालये विकसित केल्यास गरीब व वंचित नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध होण्यास मदत होईल, असेही डॉ. सेलोकर यांनी यावेळी सांगितले. शहरातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघात एक असे सहा नवे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र (यूपीएचसी) उभारण्याच्या प्रस्तावावर या बैठकीत चर्चा करण्यात आली. शहरात असलेल्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बळकटीकरण करण्यात येणार आहे. यासंदर्भात प्रशासनाने आराखडा तयार करावा, असे निर्देश महापौर ठाकरे यांनी सांगितले.

दीक्षाभूमीत पंचशील धम्म ध्वज यात्रा

भंते आर्य नागार्जुन सुराई ससाई यांची उपस्थिती

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

नागपूर , दि. २९ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर दीक्षाभूमी दक्षता समिती तसेच अन्य सामाजिक संघटनांच्या वतीने प्रियदर्शी चक्रवर्ती सम्राट अशोक यांच्या २३३० व्या जयंती निमित्ताने राहाटे कॉलनी मेट्रो रेल्वे स्टेशन चौकातून ' पंचशील धम्म ध्वज यात्रा' चे आयोजन करण्यात आले

डॉ.बाबासाहेब आंबेडकर दीक्षाभूमी स्मारक समितीचे अध्यक्ष भंते आर्य नागार्जुन सुराई ससाई यांनी पंचशील ध्वज दाखवून धम्मा ध्वज यात्रेचे शुभारंभ केले. याप्रसंगी दीक्षाभूमी दक्षता समितीचे सल्लागार व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ता किशोर गेडाम उर्फ भाऊसाहेब, दीक्षाभूमी दक्षता समितीचे अध्यक्ष माया उके, सम्राट अशोक सेनेचे आशिष बनसोड, सामाजिक कार्यकर्ता अभिषेक थुलकर प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी दीक्षाभूमी येथील प्रियदर्शी चक्रवर्ती सम्राट अशोक यांच्या पूर्ण आकृती पुतळ्याला दीक्षाभूमी दक्षता समितीचे सलाकार किशोर गेडाम यांच्या शुभहस्ते माल्यार्पण करण्यात आले.

चक्रवर्ती सम्राट अशोक यांच्या जन्मदिनानिमित्त केक कापण्यात आला. पंचशील धम्म ध्वज यात्रेचे मुख्य आकर्षण १२५ फूट लांबीचा पंचशील ध्वज ठरले. रॅलीमध्ये बौद्ध उपासक उपासिकांनी भाग घेतला. कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी राजेंद्र बोबडे, माला अंबुलकर, केथरिन बोदिले, वर्षा वालदे, कल्पना मेश्राम, वैशाली डबरासे, सुनंदा गायकवाड, किरण गौरखेडे, कविता लांडगे, रुकमा नानवटकर, सुधा पाटील, ताराचंद पखिडे, शिल्पा धमगाये, गंगा टेंभुर्ण यांनी सहकार्य केले

भीषण अपघातात चालकाचा मृत्यू

नागपूर, दि. २९ : हिंगणा पोलीस स्टेशन हद्दीतील कान्होलीबारा ते हिंगणा मार्गावर २७ मार्च २०२६ रोजी दुपारी दीडच्या सुमारास ट्रकचे टायर अचानक फुटल्याने भीषण अपघात झाला. खडी भरून जाणारा ट्रक रस्त्याशेजारील झाडावर उलटल्याने चालक लालेश्वर मिस्त्री यांचा ट्रक आणि झाडामध्ये दबून मृत्यू झाला. अनपेक्षित तांत्रिक बिघाडामुळे ही दुर्घटना घडली आहे. मालक प्रवीण बाबारावजी घोरमारे यांचा ट्रक चालक लालेश्वर मिस्त्री चालवत असताना कान्होलीबारापासून एक किमी अंतरावर टायर फुटले. नियंत्रण सुटल्याने ट्रक कडुलिंबाच्या झाडावर उलटला. जखमी चालकाला एम्स रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक गायत्री चव्हाण यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून हिंगणा पोलीस अधिक तपास करत आहेत.

सभापतींनी सुसबिडी, भूमी ग्रीन प्रकल्पाची जाणून घेतली माहिती

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

नागपूर, दि. २९ : मनपा स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे आणि वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती सभापती मनीषा अतकरे यांनी भांडेवाडी स्थित एकीकृत घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाला भेट देत प्रकल्पाची पाहणी केली.

नगरसेवक प्रदीप पोहणे, शारदा बराई यांच्यासह मनपाचे उपायुक्त राजेश भगत, अधीक्षक अभियंता डॉ. श्वेता बॅनर्जी, मुख्य स्वच्छता अधिकारी गजेंद्र महल्ले प्रामुख्याने उपस्थित होते. शहरात दररोज १३०० मेट्रिक टन कचरा निर्माण होत आहे. सध्या सुसबिडीच्या मध्यामातून २५०-३०० मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया केली जात असून, भूमी ग्रीन प्रा.लि. कंपनीद्वारे ५०० मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया केली जाणार आहे. आता नवीन कचऱ्यावर दररोज प्रक्रिया केल्यामुळे या नव्याने कचऱ्याचे ढिगारा निर्माण होणार नाही, आणि जुन्या कचऱ्यावर सुद्धा प्रक्रिया सुरू आहे. परिणामी भांडेवाडी परिसरात दिसणारे कचऱ्याचे ढिगारे कमी होऊन जागा मोकळी होण्याची शक्यता आहे. याप्रसंगी स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे आणि वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती सभापती मनीषा अतकरे यांनी संपूर्ण प्रकल्पाची पाहणी करीत प्रकल्पाच्या प्रत्येक टप्प्याची माहिती जाणून घेतली. भूमी ग्रीन प्रा.लि. कंपनीचे विजय टिळेकर,पंकज पासनकर, श्रीकृष्ण दीक्षित यांनी प्रकल्पाची माहिती दिली. विशेष म्हणजे, पुणे येथील भूमी ग्रीन एनर्जी एन्व्हायरोकेअर एलएलपी कंपनीच्या प्रक्रिया केल्या जाणाऱ्या कचऱ्यातून सेंद्रिय खत निर्मिती व आरडीएफ तयार केले जाणार आहे

प्रादेशिक परिषदेत शेती उत्पादनवाढीसंदर्भात चर्चा

नैसर्गिक शेती: प्रगतीशील शेतक-यांचा गौरव, उत्पन्न वाढवण्यासंबंधीची धोरणांवर सविस्तर चर्चा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

नागपूर, दि. २९ : केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाअंतर्गत नागपूर मधील गोंडखैरी येथील प्रादेशिक सेंद्रीय आणि नैसर्गिक शेती केंद्राच्या वतीने 'नैसर्गिक शेती' या विषयावर प्रादेशिक परिषदेचे आयोजन करण्यात आले. ही परिषद सिव्हिल लाईन्स परिसरातील राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल अकादमीत ही पार पडली. शेतकरी, कृषी तज्ज्ञ आणि अधिकारी सहभागी झाले होते. पारंपरिक ज्ञानाची आधुनिक तंत्रज्ञानासोबत एकात्मिकरण घडवून आणत नैसर्गिक शेती पद्धतींना प्रोत्साहन देणे, असे परिषदेचे उद्दिष्ट होते.

डॉ. येलोककर (पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला), डॉ. अजय सिंह राजपूत (प्रादेशिक संचालक, प्रादेशिक सेंद्रिय आणि नैसर्गिक शेती केंद्र, नागपूर), ब्रिगेडियर आर. सत्यनारायण (राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, नागपूर) आणि डॉ. पांडुरंग (शेतकरी संचालक, कृषी विभाग, महाराष्ट्र) यांनी या परिषदेतील उपस्थितांना मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शातून त्यांनी नैसर्गिक शेतीमुळे उत्पादन खर्चात साध्य करता येणारी घट, जमिनीची सुपीकतेत सुधारणा घडून येणे तसेच पर्यावरणीय शाश्वततेचे उद्दिष्ट साध्य करता येणे, या आणि अशा होणाऱ्या लाभांविषयी सांगितले. परिषदेत सहभागी झालेल्या तज्ज्ञांनी नैसर्गिक शेतीची यशस्वी उदाहरणे, सेंद्रीय उत्पादनांची वाढती मागणी आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासंबंधीची धोरणे अशा मुद्यांवर सविस्तर चर्चा केली.

या परिषदेच्या निमित्ताने प्रगतीशील शेतकऱ्यांना सर्वोत्कृष्ट शेतकरी पुरस्कार देऊन सन्मानित केले गेले. पुरस्कार प्राप्तकर्त्यांमध्ये एन. रामचंद्रय्या आणि एल. पद्मा रेड्डी (तेलंगणा), पद्मेश गुप्ता (देवलापार), भाग्यश्री स्वानंद गौशा (सौसर), किशोर भुडे (नागपूर), लक्ष्मण दाडमल, राजेश मोहोरीया, नारायण चौधरी, चिंधू आत्माराम ठाकर (नागपूर), श्याम सुंदर राजपूत (मनसर), साकरकर भिल्ली (धामण गाव) आणि प्रशांत गुलहांडे यांचा समावेश होता. या परिषदेच्या यशस्वी आयोजनात राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या पथकाने मोलाचे योगदान दिले.

एनटीपीसी मौदातर्फे लापका येथे सामुदायिक सभागृह

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

नागपूर, दि. २९ : एनटीपीसी अर्थात नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशनच्या मौदा शाखेने नागपूर जिल्ह्यातील लापका गावात सामुदायिक सभागृहाची सुविधा उपलब्ध करून दिली

एनटीपीसीचे मौदा येथील प्रकल्प प्रमुख जोसेफ बॅस्टियन यांनी सभागृहाचे उद्घाटन केले. लापका ग्रामपंचायतीचे सरपंच योगेश कवडुजी गोंगले, कंपनीचे मनुष्यबळ विकास प्रमुख सागर रंजन साहू, तसेच वरिष्ठ अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. हा उपक्रम कंपनीच्या सीएसआर अर्थात कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी उपक्रमांतर्गत राबवण्यात आला असून, त्यातून कंपनीची समाजविकास आणि कल्याणाविषयी असलेली बांधिलकी पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे, असे नमूद करत एनटीपीसीच्या समावेशक विकासासाठीच्या वचनबद्धतेवर जोसेफ बॅस्टियन यांनी भर दिला. तसेच, पायाभूत सुविधा उभारणीमुळे स्थानिक नागरिकांचे जीवनमान कसे सुधारते, यावर भाष्य केले. जनजागृतीपर कार्यक्रम, शैक्षणिक, आरोग्य आणि कल्याणकारी उपक्रम गावपातळीवर राबवण्यासाठी हे सभागृह वापरता येईल. अशा उपक्रमांमुळे आवश्यक सामुदायिक सुविधा मिळतात, सामाजिक संवाद, क्षमता वाढ आणि सामूहिक सहभाग यांना चालना मिळते स्थानिक नागरिकांचे सक्षमीकरण होऊन समाजविकासात त्यांचा सक्रिय सहभाग वाढतो, असे 'एनटीपीसी' सूत्राने सांगितले.

अजिंक्य भारत
आपलं अकोला
अकोला, सोमवार, दि.३० मार्च २०२६ www.ajinkyabharat.com

महापालिकेची आज विशेष सभा

अकोला: अकोला महापालिकेची विशेष सर्वसाधारण सभा आज, सोमवार ३० मार्च रोजी सकाळी ११:०० वाजता आयोजित करण्यात आली आहे. महापालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात ही सभा पार पडणार असून, यामध्ये प्रामुख्याने शहराच्या आगामी वर्षाच्या अर्थसंकल्पावर चर्चा होऊन अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. सभेच्या विषय पत्रिकेनुसार, सन २०२५-२६ चे सुधारित अंदाजपत्रक आणि सन २०२६-२७ या आगामी आर्थिक वर्षासाठी स्थायी समितीने शिफारस केलेल्या मूळ अंदाजपत्रकावर सविस्तर चर्चा करण्यात येईल. स्थायी समितीने सुचवलेल्या तरतुदी आणि शहरातील विकासकामांच्या नियोजनावर लोकप्रतिनिधी आपली मते मांडतील, त्यानंतर या अर्थसंकल्पाला सभागृहाची अंतिम मंजुरी दिली जाईल. शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि इतर पायाभूत सुविधांसाठी अर्थसंकल्पात नेमकी किती आणि कशी तरतूद केली जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

महत्त्वाचे

शेतकऱ्यांना नऊ कोटी रुपये सानुग्रह अनुदान

अकोला: सिंचन प्रकल्पासाठी जमीन दिलेल्या शेतकऱ्यांना नऊ कोटी रुपये सानुग्रह अनुदानाचे वितरण करण्यात आले. यासाठी बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेने सातत्याने पाठपुरावा केला होता. विदर्भातील जलसिंचनाचा अनुशेष भरून काढण्यासाठी तत्कालीन सरकारने सन २००६ ते २०१३ या काळात विदर्भातील विविध जिल्ह्यांमध्ये धरणे उभारण्यासाठी मान्यता प्रदान केली होती. धरणे तातडीने पूर्ण व्हावीत या हेतूने विदर्भातील शेतकऱ्यांच्या जमिनी अत्यंत कवडीमोल दराने सरकारने सरळ खरेदी पद्धतीने संपादित केल्या होत्या, असे संघटनेचे म्हणणे आहे. योग्य मोबदल्यासाठी बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेच्या नेतृत्वात प्रकल्पग्रस्तांचा संघर्ष सुरू झाला.

भगवान महावीर जयंती महोत्सवाचे आयोजन

अकोला: सत्य, अहिंसा, अचौर्य, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह या महान तत्वांचा उपदेश देणारे जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांचा जयंती महोत्सव संपूर्ण भारतात चैत्र शुद्ध १३, सोमवार ३० मार्च २०२६ रोजी उत्साहाने साजरा करण्यात येत आहे. या महोत्सवाचे आयोजन किल्ल्याजवळील सैतवाळ दिगंबर जैन मंदिर येथे करण्यात आले आहे.

जिल्हा बँक निवडणूक: ११ जागांसाठी मतदान पूर्ण

२३ उमेदवारांच्या नशिबाचा आज फैसला

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अकोला, दि. २९ : अकोला आणि वाशिम जिल्ह्यांचे कार्यक्षेत्र असलेल्या अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक पदासाठी रविवारी, २९ मार्च रोजी अत्यंत चुरशीने मतदान पार पडले. बँकेच्या एकूण २१ जागांपैकी १० जागा आधीच अविरोध झाल्या असून, उर्वरित ११ जागांसाठी २३ उमेदवार रिंगणात आहेत. या उमेदवारांच्या राजकीय भवितव्याचा निकाल आज, सोमवारी जिल्हा परिषद कर्मचारी भवन येथे होणाऱ्या मतमोजणीनंतर स्पष्ट होणार आहे.

दोन्ही जिल्ह्यांतील १३ मतदान केंद्रांवर सकाळी मतदानाला सुरुवात झाली. दुपारपर्यंत मतदारांचा उत्साह कायम होता, दुपारी ३ वाजेपर्यंत सुमारे ९८.३२ टक्के इतके विक्रमी मतदान नोंदवण्यात आले. मतदानासाठी अकोला, वाशिम, अकोट, तेल्हारा, मूर्तिजापूर यासह सर्व तालुका मुख्यालयी चोख पोलीस बंदोबस्तात प्रक्रिया पार पडली. मतदानानंतर आता सर्वांचे लक्ष सोमवारी होणाऱ्या मतमोजणीकडे लागले असून प्रशासकीय यंत्रणा निकालासाठी सज्ज झाली आहे.

सहकार पॅनेल विरुद्ध परिवर्तन

राज्यात आणि देशात आर्थिकदृष्ट्या प्रगत असलेल्या या बँकेवर अनेक वर्षांपासून सहकार पॅनेलची एकहाती सत्ता आहे. यावर्षी देखील सत्ताधाऱ्यांसमोर आव्हान उभे करण्याचा प्रयत्न झाला, मात्र परिवर्तनाची लाट कितपत यशस्वी ठरते हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. अकोल्यातील आदर्श कॉलनीतील मतदान केंद्रावर सत्ताधारी पॅनेलचे दिग्गज आणि महानंदाचे संचालक वामनराव देशमुख यांच्या पत्नी उमेदवार असल्याने या केंद्रावर मोठी चुरस पाहायला मिळाली.

१३ थेट सरपंच व १२६ सदस्यांसाठी पोटनिवडणूक; आज होणार नोटीस जाहीर

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अकोला, दि. २९ : राजीनामा, निधन आणि अनर्हता यांसारख्या विविध कारणांमुळे रिक्त झालेल्या ग्रामपंचायत सदस्य व थेट सरपंच पदांसाठी राज्य निवडणूक आयोगाने पोटनिवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. या कार्यक्रमानुसार, जिल्ह्यातील ७६ ग्रामपंचायतींमधील रिक्त असलेल्या १३ थेट सरपंच पदांसाठी आणि १२६ सदस्य पदांसाठी ही निवडणूक होणार आहे. यासंदर्भातील अधिकृत निवडणूक नोटीस आज, ३० मार्च रोजी तहसीलदारांमार्फत जाहीर करण्यात येणार आहे.

जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी निवडणूक क्षेत्रात आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश दिले आहेत. या पोटनिवडणुकीमुळे आता गावपातळीवरील राजकीय वातावरण चांगलेच तापणार असून, ७ एप्रिलपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे.

निवडणूक कार्यक्रम

निवडणूक नोटीस प्रसिद्धी: ३० मार्च
नामनिर्देशन पत्र दाखल करणे: ७ एप्रिल ते १३ एप्रिल **अर्जांची छाननी:** १५ एप्रिल **अर्ज मागे घेण्याची मुदत:** १७ एप्रिल (दुपारी ३ वाजेपर्यंत) **निवडणूक चिन्ह वाटप:** १७ एप्रिल **मतदान:** २८ एप्रिल **मतमोजणी:** २९ एप्रिल

या १३ ग्रामपंचायतींमध्ये होणार थेट सरपंच निवड

जिल्ह्यातील खालील १३ गावांमध्ये थेट जनतेतून सरपंच निवडला जाणार आहे:
तेल्हारा: हिंगणी खु., **अकोट:** धारगड, वडाळी सटवाई, धामणगाव, बांबर्डा., **मूर्तिजापूर:** वडगाव., **अकोला:** भौरद, सांगवी मोहाडी., **बार्शीटाकळी:** परंडा, जनुना, उजळेश्वर., **पातूर:** गोंधळवाडी, तुलंगा खु.

गॅस सिलिंडर तुटवड्याचा पहिला बळी

नियोजनाच्या अभावावर ॲड. प्रकाश आंबेडकरांचा संताप

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अकोला, दि. २९ : शहरात सुरू असलेल्या गॅस सिलेंडरच्या तीव्र तुटवड्याने आज एका निष्पाप नागरिकाचा जीव घेतल्याची धक्कादायक घटना घडली आहे. वंचित बहुजन आघाडीचे माजी सरपंच शंकरराव सिरसाठ (वय अंदाजे ५५) यांचा गॅस सिलेंडरसाठी रांगेत उभे असताना मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शंकरराव सिरसाठ हे आज सकाळी सुमारे ९ वाजता गॅस सिलेंडर मिळवण्यासाठी स्थानिक गॅस एजन्सीसमोर रांगेत उभे होते. मात्र, प्रचंड उन्हात आणि वाढत्या गर्दीत जवळपास चार-पाच तास उभे राहिल्यानंतर दुपारी दीडच्या सुमारास त्यांना अचानक चक्कर आली. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तत्काळ मदत करण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांचा जागीच मृत्यू झाल्याचे समोर आले.

या घटनेनंतर परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनी प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला. ''गॅससारख्या मूलभूत गरजेसाठी लोकांना तासन्तास रांगेत उभे राहावे लागत असेल, तर ही प्रशासनाची मोठी अपयश आहे,'' अशी प्रतिक्रिया नागरिकांनी दिली.

दरम्यान, या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी शासनाच्या नियोजनशून्यतेवर कठोर शब्दांत टीका केली. ''गॅस सिलेंडरचा तुटवडा होणार असल्याची पूर्वसूचना देण्यात आली होती. तरीही शासनाने योग्य नियोजन केले नाही. वेळेवर उपाययोजना केल्या असत्या, तर शंकरराव सिरसाठ यांचा जीव वाचू शकला असता,'' असे त्यांनी म्हटले.

तसेच, त्यांनी केंद्र व राज्य सरकारचा निषेध नोंदवत, ''गॅस सिलेंडरसाठी लोकांचे जीव जाण्याची वेळ येऊ नये. यासाठी तात्काळ ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी शासनाने जबाबदारीने काम करावे,'' अशी मागणी केली.

या घटनेमुळे गॅस पुरवठा व्यवस्थेतील त्रुटी पुन्हा एकदा समोर आल्या असून, नागरिकांनी तातडीने सुरळीत पुरवठा सुरू करण्याची मागणी केली आहे. प्रशासनानेही या घटनेची दखल घेत आवश्यक ती कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

डिजिटल युगात अकोला पोलिसांची झेप; 'ई-शासन'स्पर्धेत राज्यात तृतीय क्रमांक

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अकोला, दि. २९ : महाराष्ट्र शासनाच्या वतीने शासकीय कार्यालयांमध्ये डिजिटल सेवा अधिक प्रभावीपणे राबवण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या ''१५० दिवसांच्या ई-शासन कार्यक्रमात'' अकोला पोलीस अधीक्षक कार्यालयाने उल्लेखनीय कामगिरी करत राज्यात तृतीय क्रमांक पटकावला आहे. या यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अकोला जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांचा प्रशस्तिपत्र देऊन गौरव करण्यात आला.

या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत राज्यातील विविध शासकीय कार्यालयांमध्ये १५० दिवसांचा सुधारणा कार्यक्रम राबविण्यात आला होता. यामध्ये कार्यालयांच्या कामकाजातील पारदर्शकता, गतिमानता आणि नागरिकाभिमुख सेवा यांचा विशेष भर होता.

या स्पर्धेत सहभागी कार्यालयांचे सात प्रमुख बाबींवर मूल्यमापन करण्यात आले. त्यामध्ये कार्यालयाचे संकेतस्थळ, 'आपले सरकार' प्रणालीची अंमलबजावणी, ई-कार्यालयाचा वापर, कामकाजाचा आढावा दर्शविणारा फलक, संदेश सेवा आधारित स्वयंचलित सुविधा, कृत्रिम बुद्धिमत्ता व साखळी तंत्रज्ञानाचा वापर तसेच भौगोलिक माहिती प्रणालीचा समावेश होता.

मुख्यमंत्री यांच्या हस्ते गौरव

राज्यस्तरीय कडवी स्पर्धा

राज्यातील एकूण ३४ जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयांचे दोन टप्प्यांत सखोल परीक्षण करण्यात आले. या कडव्या स्पर्धेत अकोला पोलीस अधीक्षक कार्यालयाने सातही निकषांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत तृतीय क्रमांक मिळवला.

गौरव समारंभात सन्मान :

मुंबई येथे आयोजित विशेष समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्चित चांडक व त्यांच्या संपूर्ण पथकाचा सन्मान केला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. अकोला पोलिसांनी मिळवलेले हे यश केवळ सन्मानापुरते मर्यादित नसून, या उपक्रमामुळे पोलीस दलाची कार्यक्षमता अधिक वाढणार असून नागरिकांना अधिक जलद, पारदर्शक आणि सुलभ सेवा मिळण्यास मोठी मदत होणार आहे.

पुरवठादारांची लाखोंची देयके थकीत; आरोग्य सेवा निधीअभावी व्हेंटिलेटरवर

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अकोला, दि. २९ : अकोला जिल्ह्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था सध्या निधीच्या टंचाईमुळे मोठ्या संकटात सापडली आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीतून जिल्ह्यात औषध खरेदी केली जाते; मात्र गेल्या दोन वर्षांपासून औषध पुरवठादारांची लाखो रुपयांची देयके थकीत असल्याने आरोग्य सेवेला घरघर लागली आहे. जिल्हा परिषदेअंतर्गत येणारी प्राथमिक आरोग्य केंद्रे, जिल्हा शल्य चिकित्सकांच्या नियंत्रणातील सर्वोपचार रुग्णालय आणि लेडी हार्डिंग रुग्णालय या सर्वच ठिकाणी पुरवठादारांची देयके रखडली आहेत.

शासनाकडून प्राप्त होणाऱ्या अनुदानाचा मोठा हिस्सा केवळ कर्मचाऱ्यांच्या वेतनावर खर्च होत असल्याने, औषध खरेदीसाठी आणि जुनी देयके फेडण्यासाठी प्रशासनाकडे पैसेच शिल्लक नसल्याचे वास्तव समोर आले आहे.

जिल्हा परिषद आरोग्य विभागांतर्गत असलेल्या औषध पुरवठादारांची सुमारे ७४ लाख रुपयांची देयके अद्याप प्रलंबित आहेत. अशीच परिस्थिती जिल्हा सामान्य रुग्णालय आणि लेडी हार्डिंग रुग्णालयाची असून, तेथेही दोन वर्षांपासून पुरवठादारांना त्यांच्या हक्काचे पैसे मिळालेले नाहीत. वारंवार पाठपुरावा करूनही देयके मिळत नसल्याने पुरवठादारांमध्ये तीव्र असंतोष पसरला असून, याचा थेट परिणाम चालू वर्षाच्या औषध खरेदीवर झाला आहे. नवीन औषधे खरेदी करण्यासाठी निधी उपलब्ध नसल्याने ग्रामीण आणि शहरी भागातील रुग्णांना वेळेवर औषधे मिळणे कठीण झाले आहे. एनएचएमचा निधी प्रामुख्याने कर्मचाऱ्यांचे वेतन, रुग्णवाहिकांचे इंधन आणि जननी सुरक्षा योजनेसारख्या कामांवर खर्च होत असल्याने औषधांचा प्रश्न मार्गी कसा लागणार, हा मोठा प्रश्न आहे.

प्रशासनाची कमालीची सुस्ती; मोर्णा नदी जलकुंभीच्या विळख्यात!

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अकोला, दि. २९ : मोर्णा नदीच्या स्वच्छतेबाबत महापालिका प्रशासन कमालीचे उदासीन असल्याचे चित्र पुन्हा एकदा समोर आले आहे. उन्हाळ्याची चाहूल लागताच नदीपात्रातील जलकुंभीने उग्र रूप धारण केले असून, प्रशासनाच्या भोंगळ कारभारामुळे नदीचे पात्र हिरव्या चादरीखाली लुप्त झाले आहे. विशेष म्हणजे, गतवर्षी मार्च महिन्यात ही मोहीम अंतिम टप्प्यात होती; मात्र यंदा एप्रिल उजाडत आला तरी प्रशासनाला स्वच्छतेचा मुहूर्त सापडलेला नाही.

वाढत्या जलकुंभीचा मुद्दा ऐरणीवर आल्यानंतर महापौर शारदा खेडकर यांनी प्रशासनाला तातडीने कार्यवाही करण्याचे कडक निर्देश दिले होते. मात्र, महापौरांच्या या आदेशाला प्रशासकीय अधिकाऱ्यांनी केराची टोपली दाखवल्याचे स्पष्ट दिसत आहे. जलकुंभी वाढू नये, यासाठी संबंधित स्वच्छता निरीक्षकांवर जबाबदारी निश्चित करण्यात आली होती; पण कागदावरच्या या जबाबदाऱ्या प्रत्यक्षात कुठेही दिसून येत नाहीत.

अधिकाऱ्यांच्या ढिसाळ नियोजनामुळे मोर्णा नदीची अवस्था पुन्हा जैसे थे झाली असून, नदीपात्रात जलकुंभीचा प्रचंड विस्तार झाला आहे.

नदीपात्रातील जलकुंभी एका रात्रीत वाढत नाही. दरवर्षीचा हा अनुभव असतानाही प्रशासनाने पूर्वतयारी का केली नाही, असा सवाल आता नागरिक विचारत आहेत. गतवर्षी ज्या काळात जलकुंभी झपाट्याने वाढते, त्याच काळात युद्धपातळीवर मोहीम राबवून नदी मोकळी करण्यात आली होती. मात्र, यंदा प्रशासनाच्या सुस्त कारभारामुळे नदीचे पात्र पूर्णपणे तुंबले आहे. ही केवळ दिरंगाई नसून शहराच्या आरोग्याशी चालवलेला खेळ आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया जनमानसातून उमटत आहे. नदीपात्रात साचलेल्या या जलकुंभीमुळे पाण्याचा प्रवाह पूर्णपणे थांबला असून, हे साचलेले पाणी आता डासांचे उत्पत्ती केंद्र बनले आहे. नदीकाठावरील नागरी वस्त्यांमध्ये डासांचा प्रादुर्भाव प्रचंड वाढला असून डेंग्यू, मलेरिया आणि चिकनगुनियासारख्या आजारांची टांगती तलवार नागरिकांवर आहे. रात्रीच्या वेळी डासांच्या त्रासामुळे नागरिकांना घरात राहणे कठीण झाले आहे.

जिल्ह्यात बुवाबाजी रोखण्यासाठी अंनिस सज्ज

चंद्रकांत तराळ जिल्हाध्यक्ष तर ॲड. अनिल लव्हाळे जिल्हा संघटक

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अकोला, दि. २९ : नाशिक येथील भोंदू बाबाकडून झालेल्या लैंगिक शोषणाचे प्रकरण राज्यात गाजत असतानाच, अकोला जिल्ह्यात अशा घटना रोखण्यासाठी अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीने (अंनिस) कंबर कसली आहे. जिल्ह्यातील कोणतीही व्यक्ती किंवा महिला शोषणा बळी पडू नये, यासाठी संघटनेने आपली नवी जिल्हा कार्यकारिणी जाहीर केली आहे.

जादूटोणा विरोधी कायद्याचे प्रणेते प्रा. श्याम मानव यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतीच अकोल्यात महत्त्वाची बैठक पार पडली. यामध्ये ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व माजी क्रीडा अधिकारी चंद्रकांत तराळ यांची जिल्हाध्यक्षपदी, तर युवा विधिज्ञ ॲड. अनिल लव्हाळे यांची जिल्हा संघटक म्हणून निवड करण्यात आली आहे. युवा आणि महिला वर्गाला चळवळीत जोडण्यासाठी सौरभ वाघोडे (युवा संपर्क प्रमुख) आणि ॲड. रुपाली राऊत (महिला संपर्क प्रमुख) यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली आहे. तसेच अनिकेत लाहोळे यांची डिजिटल मीडिया जिल्हा संयोजक म्हणून निवड झाली आहे.

शरद वानखडे, अशोक घाटे, पुरुषोत्तम आवारे पाटील, डॉ. स्वप्ना लांडे यांच्यासह १५ लोकांचे मार्गदर्शक मंडळही स्थापन करण्यात आले आहे. पुढील महिन्यात जिल्ह्यात दोन एकदिवसीय शिबिरांचे आयोजन करून जनजागृतीचा नवा टप्पा गाठला जाणार आहे.

नूतन कार्यकारिणी

जिल्हा कार्याध्यक्ष: अमोल ठाकरे
जिल्हा सचिव: शेषराव गव्हाळे
जिल्हा उपाध्यक्ष: मंगेश वानखडे
कोषाध्यक्ष: भारत तायडे
सहसचिव: कौशिक पाठक

पाल्म संडे उत्साहात | प्रभू येशूंच्या जयघोषाने आसमंत दुमदुमला

ख्रिश्चन कॉलनीतून निघाली 'झावळ्यांची दिंडी'!

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अकोला, दि. २९ : वधस्तंभावर खिळले जाण्यापूर्वी सहा दिवस अगोदर प्रभू येशू ख्रिस्ताचा यरुशलेम शहरात जयोत्सवाने प्रवेश झाला. त्या दिवसाची आठवण म्हणून संपूर्ण जगभरात आजचा रविवार हा पाल्म संडे म्हणून साजरा करतात. याला झावळ्यांचा रविवार असेही म्हणतात. अकोला शहर आणि जिल्ह्यातही आज हा सण मोठ्या भक्तिभावाने आणि हर्षोल्हासात साजरा करण्यात आला.

फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यापासून ख्रिश्चन धर्मियांच्या लेंथ या पवित्र महिन्यास सुरुवात झाली. दरवर्षी या पवित्र महिन्यात ख्रिश्चन धर्मीय घरोघरी कॉटेज प्रेयरचे आयोजन करतात. पाल्म संडेच्या दिवशी म्हणजे आज सकाळी विदर्भातील एकमेव अशा ख्रिश्चन कॉलनी मधून झावळ्या हाती घेऊन आबालवृद्धांनी मोठी दिंडी काढली. यावेळी होसान्ना होसान्ना, प्रभूच्या नावाने येणारा राजा धन्यवादीत असो अशा प्रकारच्या घोषणा देण्यात आल्या. अकोला शहरातील आठ आणि जिल्ह्यातील सुमारे ३० चर्चेसमधून आज प्रार्थना सभांचे आयोजन करण्यात आले होते. खदान ख्रिश्चन कॉलनी येथील बेथेल सेव्हीअर्स अलायन्स चर्चसोबतच इतरही सर्व चर्चेसमध्ये धर्मगुरुंनी बायबल मधील वचनांच्या आधारे संदेश दिला. यावेळी विविध धार्मिक गीते सादर करण्यात आली. संडेस्कूलच्या मुलांनी तसेच महिलांनी यावेळी विशेष गीते सादर केली. हातात झावळ्या घेऊन जगाचे अशांततेपासून संरक्षण व्हावे, सर्वत्र शांतता, बंधुभाव नांदावा अशी प्रार्थना करून पाल्म संडे भक्तिभावाने आणि हर्षोल्हासात साजरा करण्यात आला.

येत्या शुक्रवारी ३ एप्रिल रोजी प्रभू येशूच्या वधस्तंभावरील बलिदानाची आठवण म्हणून गुड फ्रायडे अर्थाता उत्तम शुक्रवार हा सण जगभरात भक्तीभावाने साजरा करण्यात येईल. यावेळी बायबल अभ्यासक प्रभू येशूच्या वधस्तंभावरील सात वाक्यांवर प्रकाश टाकतील. त्यानंतर ५ एप्रिल रोजी रविवारी संपूर्ण जगभर ईस्टर संडे अर्थात प्रभू येशू यांचा पुनरुत्थान दिन मोठ्या उत्साहात चर्चेसमध्ये साजरा करण्यात येईल. यावेळी प्रार्थना सभेसोबतच इतरही कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती जस्टिन मेश्रामकर, सरला मेश्रामकर, अरविंद बिरपॉल, रूबेन वाळके, राजेश ठाकूर, अमित ठाकूर यांनी दिली आहे.

उकाड्याने हैराण नाग-नागिणीचा जोडा थेट शोरूममध्ये!

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अकोला, दि. २९ : राज्यात वाढत्या उष्णतेचा तडाखा अधिकच तीव्र होत असून, अकोल्यात तापमानाने ४१ अंश सेल्सिअसचा टप्पा पार केला आहे. या असह्य उकाड्यामुळे नागरिक त्रस्त झाले असतानाच, आता वन्यजीवही त्याचा फटका सहन करत असल्याचे समोर आले आहे. बाळापूर रोडवरील एका नामांकित शोरूममध्ये थंडाव्याच्या शोधात चक्क नाग-नागिणीचा जोडा शिरल्याने एकच खळबळ उडाली.

शनिवारी रात्री घडलेल्या या घटनेमुळे शोरूममधील कर्मचारी व ग्राहक काही काळ भीतीच्या छायेत होते. साप दिसताच कर्मचारांची एकच धांदल उडाली आणि काही वेळ कामकाजही ठप्प झाले. घटनेची माहिती मिळताच 'अकोला जिल्हा सर्पमित्र ३०' टीम तात्काळ घटनास्थळी दाखल झाली. सर्पमित्र सूरज इंगळे यांनी अत्यंत शिताफीने आणि कोणताही धोका न पत्करता या नाग-नागिणीच्या जोड्याला सुरक्षितपणे पकडले. त्यानंतर दोन्ही सापांना कोणतीही इजा न करता नैसर्गिक अधिवासात सुरक्षितपणे सोडण्यात आले.

उन्हाळ्यात जमीन प्रचंड तापल्यामुळे आणि साप हे थंड रक्ताचे प्राणी असल्याने ते थंड व ओलसर जागेच्या शोधात बाहेर पडतात. पाण्याचा व अन्नाचा शोध घेताना ते मानवी वस्तीत शिरण्याच्या घटना वाढतात. उष्णतेमुळे ते अधिक अस्वस्थ व आक्रमकही होऊ शकतात, त्यामुळे नागरिकांनी विशेष सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.

महत्त्वाचे

ग्राम अडोळी येथे धम्मदेशना कार्यक्रम

वाशिम : तालुक्यातील ग्राम अडोळी येथे रविवार, २९ मार्च रोजी अमिताभा बुद्धीस्ट सोसायटी पुणेच्या वतीने धम्मदेशना कार्यक्रम उत्साहात घेण्यात आला. यावेळी भन्ते राहुल वटफळी यांनी उपस्थित राहून उपासक उपासिकांना धम्मदेशना दिली. कार्यक्रमात भन्ते राहुल यांनी जगात चाललेल्या युद्धावर भाष्य करतांना सांगीतले की, आज जगाला युद्धाची गरज नसुन बुद्धाची नितांत गरज आहे. जगात शांतता नांदावी म्हणून अनेक देश हे धम्माचरणात अग्रेसर दिसत आहेत. त्यांनी विविध बौद्ध संप्रदायाचे आचार केल्यास मानवी जीवनात सुखशांती प्राप्त होईल. धम्म हा आचरणावर अवलंबुन आहे. आचरण शुद्ध असेल तरच धम्म आपली प्रगती करेल. त्यासाठी सर्वांनी करुणा, मुदीता, मेत्ता, भावना बाळगावी. कार्यक्रमाला संदीप पडघान, प्रशांत पडघान, शरद खंडारे, हरिष पडघान, ॲड. प्रमोद पट्टेबहादूर, वासुदेव खंडारे, राजु खंडारे, धिरज पडघान यांनी सहकार्य केले. पंकज पडघान यांनी उपस्थितांचे आभार मानले.

श्रमदान व स्वच्छता मोहीम उत्साहात

वाशिम : सामाजीक कार्यात अग्रेसर असलेल्या शिवछत्रपती तरुण मित्र मंडळ, हिंदवी परिवार, आपत्ती व्यवस्थापन पथक व पतंजली परिवाराच्या वतीने मुर्तीजापुर तालुक्यातील पुंडलिकनगर येथील पुंडलीकबाबांचा जन्मोत्सव व यात्रा कार्यक्रमात २५ मार्च रोजी श्रमदान व स्वच्छता मोहीम राबवून परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्याचा संदेश दिला. योगगुरू डॉ. भगवंतराव वानखेडे यांनी सकाळी पाच ते सात या वेळेत योग वर्ग घेतला. भाविकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आरोग्यदायी उपक्रमाचा लाभ घेतला. त्यानंतर चहापान झाल्यावर स्वच्छता मोहिमेला सुरुवात करण्यात आली. सुमारे तीन तास चाललेल्या या मोहिमेत कार्यकर्ते व भाविकांनी मंदिर परिसरातील प्लास्टिक, कागद, उष्टावळ, प्लास्टिक ग्लास, चमचे व इतर कचरा गोळा करून परिसर स्वच्छ केला. श्रमदानातून स्वच्छतेचा आदर्श घालून देत 'स्वच्छता हीच सेवा' हा संदेश देण्यात आला.

कारंजात भव्य मोफत नेत्र तपासणी शिबिर संपन्न

कारंजा लाड : डोळे ही ईश्वराची अनमोल भेट असून त्यांची जपवणूक करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. याच उदात्त हेतूने आणि श्री १००८ भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सव २०२६ च्या निमित्ताने कारंजा शहरात भव्य मोफत नेत्र तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते . या शिबिराचे उदघाटन रविवार दि. २९ मार्च रोजी सुंदरलाल सावजी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक चे अध्यक्ष शिरीष चवरे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी व्यासपीठावर समीर जोहरापुरकर, डॉ अजय कांत, डॉ शार्दुल डोणगावकर , नेत्रतज्ञ डॉ. सुदेश राऊत , अस्थिरोग तज्ञ डॉ आकाश मोरे ,डॉ विजय जवाहरमलाणी, केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष आशिष बंड, समितीचे अध्यक्ष नितीन बुरसे, सचिव संदेश जिंतूरकर, कोषाध्यक्ष स्वप्नील गुलालकरी व्यासपीठावर उपस्थित होते.

ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे ४२ दिवसांपासून असहकार आंदोलन सुरूच

मार्च एंडिंगमध्ये प्रशासनासोबत ग्रामीण जनतेची कामे प्रभावीत

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

वाशिम, दि. २९ : जिल्हा परिषद प्रशासनाचे ग्रामपंचायत अधिकारी यांच्या मागण्याकडे दुर्लक्ष झाल्याने महाराष्ट्र राज्य तांत्रिक ग्रामपंचायत अधिकारी संघटना जिल्हा शाखा वाशिम यांनी असहकार आंदोलन सुरू केले आहे, यावर ४२ दिवसांनी कोणताही तोडगा न निघाल्याने परिणामतः मार्च एंडिंग मध्ये जिल्हा परिषद प्रशासनाचे काम प्रभावित झाले असून ग्रामीण जनतेला याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

महाराष्ट्र राज्य तांत्रिक ग्रामपंचायत अधिकारी संघटना जिल्हा शाखा वाशिम दि २०मार्च २६ पासून आणि इतर संघटनांनी मागील ४२ दिवसापासून सनदशीर मार्गाने जिल्ह्यातील ग्रामपंचायत अधिकारी यांच्या प्रलंबित मागण्याकरिता आंदोलन सुरू केले आहे. अनेक निवेदन दिले दोन बैठका घेतल्या त्यावर चर्चा सुद्धा झाल्या परंतु सभेतील चर्चे नुसार एक दोन मागण्या वगळता दिलेल्या आश्वासनानुसार प्रमुख मागण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात आले नाही.

मा मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चव्हाण अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कोवे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बोंद्रे तसेच जि प चे सर्व विभाग प्रमुख सर्व पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्यासोबत निवेदनानुसार चर्चा झाली परंतु एक दोन काम वगळता कुठलाच मार्ग न निघाल्यामुळे महाराष्ट्र राज्य तांत्रिक ग्रामपंचायत अधिकारी संघटना यांनी असहकार आंदोलनात उतरविले त्यामुळे जिल्हा परिषद व ग्रामपंचायत स्तरावरील कामकाज प्रभावित झाले आहे.

सदर असहकार आंदोलनाची स्वरूपानुसार ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायतचे दैनंदिन कामकाज करतील परंतु त्यांच्यावर खालील आरोप करण्यात आले.
शासकीय व्हाट्सअप ग्रुप मधून बाहेर पडणे, कोणतीही अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर न करणे, वरिष्ठाच्या कोणत्याही सभेला न बसणे, मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानावर बहिष्कार टाकने, वरिष्ठ वरिष्ठांना तपासणी करिता रेकॉर्ड उपलब्ध न करणे. त्यामुळे अशाप्रकारे आंदोलन सुरू असून जिल्हा परिषद प्रशासनाने कोणतीही ठोस पाऊल उचलल्याचे दिसून येत नाही तसेच मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येणार असल्याचे कळते मार्च एंडिंग काळातील महत्त्वाचे जिल्हा परिषद प्रशासनाचे प्रशासकीय कामात अडथळा निर्माण होत असून त्यात जिल्हा परिषद प्रशासन जबाबदार असणार आहे असे दिसून येते

जयस्थंभ चौकातील मेडिकलला भीषण आग; मोठा अनर्थ टळला

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

कारंजा, दि. २९ : शहरातील जयस्थंभ चौक परिसरातील ऑर्बिट मेडिकल येथे शॉर्ट सर्किटमुळे भीषण आग लागल्याची घटना दि. २९ मार्च रोजी पहाटे २ वाजण्याच्या सुमारास घडली. मध्यरात्रीच्या सुमारास लागलेल्या या आगीमुळे परिसरात एकच खळबळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे वाहन तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. आग मोठ्या प्रमाणात भडकलेली असतानाही अग्निशमन कर्मचाऱ्यांनी धाडस आणि तत्परता दाखवत अथक प्रयत्न केले. त्यांच्या वेळेवर केलेल्या कार्यवाहीमुळे आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले आणि मोठा अनर्थ टळला. या मोहिमेत चालक चंदू खराडे यांनी वाहन योग्य वेळी घटनास्थळी पोहोचवले. तसेच फायरमन सचिन ठाकूर, शुभम झोपाटे, अनुराग बारबोले, जाहेद अली, इम्रान खान, मुकेश सावळे आणि रोहित शिंदे यांनी जीवाची पर्वा न करता आग विझवण्यासाठी परिश्रम घेतले. या संपूर्ण कारवाईदरम्यान वरिष्ठ अधिकारी विवेक वळसे यांच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात आली. अग्निशमन दलाच्या समयसूचकता, शौर्य आणि कार्यक्षमतेमुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळली असून नागरिकांकडून त्यांच्या कामगिरीचे कौतुक केले जात आहे.

इसाफच्या दोन कर्मचाऱ्यांवर ९.८९ लाखाच्या फसवणुकीचा गुन्हा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

कारंजा (लाड), दि. २९ : कारंजा शहर पोलीस स्टेशनमध्ये एका फायनान्स बँकेच्या दोन कर्मचाऱ्यांवर ९ लाख ८९ हजार रुपयांच्या फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी फिर्यादी प्रफुल्ल प्रहल्लाद भामरे (वय ३०) यांनी कारंजा शहर पोलीस स्टेशनला २८ मार्च रोजी तक्रार दिली. भामरे हे कारंजा (लाड) येथील इसाफ स्माल फायनान्स बँक लिमिटेडच्या प्लॉट क्र. १२३, मिरा कॉम्प्लेक्स, कृषी उत्पन्न बाजार समिती मार्केट जवळ, मंगरूळपिर रोड, कारंजा, जि. वाशिम या शाखेचे क्लस्ट हेड आहेत.

त्यांच्या कार्यकक्षेत वाशिम, अकोट, कारंजा, अकोला, मुर्तीजापुर अशा एकूण ५ शाखा आहेत आणि त्यांच्यावर पर्यवेक्षण करण्याचे काम त्यांच्याकडे आहे. कारंजा येथील ब्रँच मॅनेजर निकीता रामेश्वर कपीले यांनी त्यांच्या टीममधील कस्टमर सर्वीस ऑफिसर किरणकुमार गोपाल चव्हाण आणि रोहीत लक्ष्मण गायकवाड यांनी कामात कसूर करून शाखेची ९ लाख ८९ हजार रुपयांची फसवणूक केल्याचे भामरे यांना सांगितले.

त्यांच्या लेखी रिपोर्टवरून, आरोपी किरणकुमार गोपाल चव्हाण (राहणार खेर्डा, पो. गिरडा ता. मानोरा जि. वाशिम) आणि रोहीत लक्ष्मण गायकवाड (वय २७ वर्ष, राहणार चिंचोली, ता. दिग्रस जि. यवतमाळ) यांच्या विरोधात कलम ३१८ (४), ३१६ (५), ३ (५) बिएनएस नुसार कारंजा शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा तपास ठाणेदार दिनेशचंद्र शुक्ला यांच्या मार्गदर्शनात सुरू आहे.

दोन वर्षे उलटली तरी कोंडोलीचा बंधारा अर्धवटच; निधी पाण्यात

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

कोंडोली, दि. २९ : येथील स्मशानभूमी परिसर आणि कोंडोली ते गुंडी मार्गावरील अरुणावती नदीवर मंजूर झालेल्या मोठ्या बंधाऱ्याचे काम गेल्या दोन वर्षांपासून रखडले आहे. ''मुबलक जलसाठा होईल आणि गावाचे सौंदर्य वाढेल'' अशी स्वप्ने प्रशासनाने दाखवली खरी, पण आजघडीला या अर्धवट कामामुळे ग्रामस्थांच्या अपेक्षांचा पार चुराडा झाला असून, हा निधी नेमका कोणाच्या घशात गेला, असा संतप्त सवाल विचारला जात आहे.

दोन-तीन वर्षांपूर्वी या बंधाऱ्याचे काम मोठ्या थाटात सुरू करण्यात आले. परिसरातील शेतीला पाणी मिळेल आणि पाणीटंचाई दूर होईल, या आशेवर शेतकरी होते. मात्र, काम अर्धवट सोडून कंत्राटदार आणि संबंधित विभागाने याकडे पाठ फिरवली आहे. जर बंधारा पूर्ण करायचा नव्हता, तर शासनाचा लाखो रुपयांचा निधी यावर खर्च कशाला केला? असा प्रश्न आता नागरिक उपस्थित करत आहेत.

विशेष म्हणजे, याच काळात गोकी नाल्यावर मंजूर झालेल्या बंधाऱ्याचे काम पूर्ण होऊन त्यात आता जलसाठाही उपलब्ध आहे. मग केवळ कोंडोलीच्याच कामात खोडा कुणी घातला? असा संशय व्यक्त होत आहे. प्रशासकीय दिरंगाईमुळे या भागातील पाणीपातळी वाढण्याऐवजी केवळ सिमेंटचे सांगाडे उभे राहिले आहेत.

या प्रकरणाची वरिष्ठांनी दखल घेऊन कामात दिरंगाई करणाऱ्या अधिकारी व कंत्राटदारावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. अन्यथा, आगामी काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

गॅस बचतीचा संदेश घराघरात; एनसीसी विद्यार्थ्यांची मोहीम

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

वाशिम, दि. २९ : वाढती महागाई आणि इंधनाची टंचाई लक्षात घेता भविष्यातील ऊर्जा बचतीसाठी आजच्या पिढीने पुढाकार घेणे अत्यंत गरजेचे आहे. याच उद्देशाने स्थानिक श्री बाकलीवाल विद्यालय, वाशीम येथील एनसीसी कॅडेट्सनी रविवारी (२९ मार्च) 'इंधन बचत' या विषयावर विशेष जनजागृती मोहीम राबवली.

या उपक्रमात विद्यालयातील एकूण ४८ कॅडेट्सनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. केवळ घोषणा न देता विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या कल्पक व माहितीपूर्ण पोस्टर्सच्या माध्यमातून स्वयंपाकघरातील गॅस बचतीचे महत्त्व प्रभावीपणे मांडले. इंधन वाचवा, देश वाचवा आणि गॅसची बचत, पैशांची भरभराट अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. कॅडेट्सनी आपल्या पोस्टर्समधून दैनंदिन जीवनातील काही सोपे पण प्रभावी उपाय नागरिकांसमोर मांडले. अन्न शिजवताना भांड्यावर झाकण ठेवल्यास १५ ते २० टक्के गॅसची बचत होते, गॅस पेटवण्यापूर्वी आवश्यक तयारी केल्यास इंधनाची नासाडी टळते, बर्नर स्वच्छ ठेवल्यास निळी ज्योत मिळून गॅसची बचत होते, तसेच प्रेशर कुकरचा वापर केल्याने वेळ आणि इंधन दोन्ही वाचते. फ्रिजमधील पदार्थ थेट गॅसवर न ठेवता सामान्य तापमानाला आणणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी कॅडेट्सनी सुरक्षिततेवरही विशेष भर दिला. स्वयंपाक झाल्यानंतर रेगुलेटर बंद ठेवणे ही सवय गॅस गळती रोखण्यासाठी व संभाव्य अपघात टाळण्यासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या स्पर्धेत अथर्व चांगटे यांनी प्रथम, गौरी कानकटाव यांनी द्वितीय, तर अनुष्का वानखेडे यांनी तृतीय क्रमांक पटकावला. सेजल सरनाईक व शुभांगी काकडे यांना प्रोत्साहनपर पारितोषिक देण्यात येणार आहे. सहभागी सर्व कॅडेट्सचे बाकलीवाल चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष अड. सुरेंद्रकुमारजी बाकलीवाल, मुख्याध्यापक बबनराव बिल्लारी, उपमुख्याध्यापक दंभीवाल, एनसीसी अधिकारी अमोल काळे तसेच शिक्षकवृंद यांनी कौतुक केले.

शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल समाजाकडून मागणी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

प्रा. मनोहर धोंडेंना राज्यसभा किंवा विधानपरिषदेवर नियुक्त करा

वाशिम, दि. २९ : महाराष्ट्रासह देशभरातील बहुजन, वीरशैव-लिंगायत, ओबीसी, दलित, आदिवासी व सर्वसामान्य समाजाच्या भावना लक्षात घेऊन, कर्तृत्ववान आणि चारित्र्यसंपन्न प्रा. मनोहर धोंडे यांची राज्यसभा किंवा महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य म्हणून नियुक्ती करावी, अशी ठाम मागणी वीरशैव लिंगायत, बहुजन समाज आणि शिवा संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

शिवा संघटनेने निवेदनात म्हटले आहे की, भारतीय राज्यघटनेनुसार राज्यसभा व विधानपरिषदेसाठी सामाजिक, शैक्षणिक व राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय व निस्वार्थ योगदान देणाऱ्या व्यक्तींना संधी दिली जाते. प्रा. धोंडे हे या सर्व निकषांमध्ये परिपूर्ण बसणारे व्यक्तिमत्त्व आहे.

त्यांना महाराष्ट्र शासनाचा प्रतिष्ठेचा ''महात्मा बसवेश्वर सामाजिक समता शिवा पुरस्कार'' प्राप्त झाला असून, त्यांच्या कार्याला शासनस्तरावर मान्यता मिळाली आहे. ते गोल्ड मेडलिस्ट व आदर्श प्राध्यापक असून, त्यांनी शिक्षण क्षेत्रातून समाजपरिवर्तनाचे कार्य केले आहे. गेल्या ४० वर्षांपासून त्यांनी कोणतेही पद नसताना निस्वार्थपणे सामाजिक कार्य करत विविध समाजघटकांसाठी न्याय मिळवून देण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. शिवा संघटनेच्या माध्यमातून देशभरात ५,००० पेक्षा अधिक शाखा स्थापन करून लाखो लोकांना संघटित करण्याचे मोठे कार्य त्यांनी केले आहे.

महाराष्ट्रात २५ जातींना आरक्षण मिळवून देण्यात त्यांचे योगदान महत्त्वाचे राहिले असून, विविध सामाजिक प्रश्नांवर त्यांनी यशस्वी लढे दिले आहेत. महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांचा प्रसार करून त्यांच्या जयंतीला शासकीय मान्यता मिळवून देण्यातही त्यांनी भूमिका बजावली आहे. राष्ट्रीय स्तरावर संसद भवनात महात्मा बसवेश्वरांचा पुतळा उभारण्यात तसेच ''अनुभव मंटप'' ही जगातील पहिली लोकशाही असल्याचा विचार शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात त्यांचा सहभाग राहिला आहे.

त्याचबरोबर आर्थिक विकास महामंडळ, मोक्षधाम योजना, कपिलधार तीर्थक्षेत्र विकास यांसारख्या उपक्रमांमध्ये त्यांनी योगदान दिले आहे. नांदेडलातूर रेल्वे मार्गाच्या मंजुरीसाठी त्यांनी पाठपुरावा करून, स्वखर्चाने न्यायालयीन लढा लढून हा मार्ग जनतेच्या कल्याणाचा व शासनाच्या कसा फायद्याचा आहे, हे सिद्ध करून या मार्गाच्या मंजुरीला यश मिळवले आहे. यासह बहुजन व वीरशैव लिंगायत समाजाची शेकडो कामे त्यांनी सदनशील मार्गाने न्याय मिळवून, बहुजन समाजाला न्याय आणि शासनाचे नुकसान न होऊ देता हित जोपासले आहे.

प्रा. धोंडे हे निर्व्यसनी, निष्कलंक व चारित्र्यसंपन्न नेतृत्व म्हणून ओळखले जातात. त्यांच्या कार्यामुळे ते जनतेच्या विश्वासाचे प्रतीक बनले आहेत. त्यांना राज्यसभेवर किंवा विधानपरिषदेत संधी देणे म्हणजे सामाजिक न्यायाला बळ देणे व लोकशाही अधिक सक्षम करणे होय, असे समाज बांधवांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे.

नवसंजीवनी | आसोला धरणाचे पाणी नाल्यात

गव्हातील बॅरेज काठोकाठ भरले; पाणीटंचाईवर मोठा दिलासा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

मानोरा, दि. २९ : तालुक्यातील गव्हा परिसरासाठी दिलासादायक ठरणारी घडामोड घडली असून, आसोला धरणातून नाल्यात सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे गव्हा येथे बांधण्यात आलेले बॅरेज काठोकाठ भरले आहे. या पाणीसाठ्यामुळे परिसरातील जलस्रोतांना नवसंजीवनी मिळाली असून, येत्या उन्हाळ्यात जाणवणाऱ्या पाणीटंचाईवर मोठा दिलासा मिळणार असल्याचे चित्र आहे.

धरणातून सोडण्यात आलेले पाणी नाल्याद्वारे बॅरेजमध्ये साठवले गेले आहे. यामुळे मोठ्या प्रमाणावर पाणी जमिनीत मुरण्यास सुरुवात झाली असून, त्याचा थेट परिणाम गावातील विहिरी व विंधन विहिरींच्या पाणीपातळीवर दिसून येण्याची शक्यता आहे. गेल्या काही वर्षांपासून उन्हाळ्यात पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या ग्रामस्थांसाठी ही बाब अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

दरम्यान, नाल्यात सध्या मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध असल्याने गावातील महिलांनी कपडे धुण्यासाठी या पाण्याचा वापर सुरू केला आहे. यामुळे घरगुती पाण्यावरील ताण काही प्रमाणात कमी झाला आहे. तसेच, गुरांसाठी पिण्याच्या पाण्याचीही सोय उपलब्ध झाल्याने शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण आहे. स्थानिकांच्या मते, अशा प्रकारे योग्य नियोजन करून धरणातील पाणी वेळोवेळी नाल्यात सोडण्यात आले, तर परिसरातील भूजलपातळी वाढण्यास मोठी मदत होईल. त्यामुळे विहिरी, बोअरवेल यांमध्ये दीर्घकाळ पाणी उपलब्ध राहून शेती व दैनंदिन गरजांसाठी पाणीपुरवठा सुलभ होईल.

आसोला धरणातून सोडलेल्या पाण्यामुळे गव्हा गाव व परिसरातील नागरिकांना तात्पुरता नव्हे तर दीर्घकालीन दिलासा मिळण्याची आशा व्यक्त केली जात आहे.

उमरा सर्कलमध्ये गव्हाचा बहर! पोषक हवामानामुळे उत्पादनात मोठी वाढ

दर कमी असल्याने शेतकरी चिंतेत

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

उमरा, दि. २९ : यंदाच्या रब्बी हंगामात उमरा सर्कल परिसरात गव्हाचे पीक समाधानकारक आले असून सर्वत्र पीक कापणीची लगबग पाहायला मिळत आहे. गेल्या काही वर्षांच्या तुलनेत यंदा हवामान अनुकूल राहिल्याने आणि कडाक्याच्या थंडीचा कडाका दीर्घकाळ टिकल्याने गव्हाच्या दाण्यांची भरवण चांगली झाली आहे. परिणामी, उत्पादनात लक्षणीय वाढ झाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

यंदा पावसाळ्याच्या शेवटी झालेला समाधानकारक पाऊस आणि थंडीचा पोषक कालावधी यामुळे गव्हाच्या वाढीस मोठी मदत झाली. परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी यंदा पारंपारिक पद्धतीला फाटा देत सुधारित वाणांच्या बियाणांचा वापर केला. संतुलित खत व्यवस्थापन, ठिबक व तुषार सिंचनाचा प्रभावी वापर आणि कृषी विभागाच्या मार्गदर्शनामुळे यंदा पिकावर कीड व रोगांचा प्रादुर्भाव अत्यंत कमी राहिला. पिकाच्या वाढीच्या प्रत्येक टप्प्यावर घेतलेल्या योग्य निगेमुळे गव्हाच्या उंब्या भरघोस लागल्या आहेत. सध्या परिसरात गहू कापणीचा हंगाम अंतिम टप्प्यात असून, मळणी यंत्रांच्या साहाय्याने गहू काढणी सुरू आहे. उत्पादनाचा उतारा अपेक्षेपेक्षा चांगला मिळत असला तरी, बाजारपेठेत गव्हाचे दर मात्र घसरलेले पाहायला मिळत आहेत. उत्पादनात वाढ झाली असली तरी रास्त भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांच्या आनंदावर काहीशी विरजण पडले आहे. तरीही, एकंदरीत उत्पादनातील वाढ पाहता उमरा सर्कलसाठी यंदाचा हंगाम फायदेशीर ठरेल, अशी चिन्हे आहेत.

कृषी विभागाचे मार्गदर्शन ठरले मोलाचे

उमरा सर्कलमध्ये कृषी विभागाने वेळोवेळी दिलेल्या शेतभेटी आणि कीड नियंत्रणाबाबत केलेल्या जनजागृतीमुळे यंदा पीक निरोगी राहिले. कमी खर्चात जास्त उत्पादन या सूत्राचा अवलंब केल्याने शेतकऱ्यांचा उत्पादनाचा खर्च कमी होऊन उत्पादकता वाढण्यास मदत झाली आहे.

महत्त्वाचे

कर्ता हनुमान मंडळाच्या रोगनिदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

अकोला : स्थानिक दाबकी रोडवरील वानखडे नगर येथील कर्ता हनुमान मंडळाच्या वतीने शिवपुराण उत्सवानिमित्त रविवारी आयोजित मोफत रोगनिदान व औषध वितरण शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या भव्य शिबिरात शेकडो रुग्णांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करून त्यांना मोफत औषधींचे वाटप करण्यात आले.

या शिबिरात डॉ. पंकज थोरात, डॉ. मनोहर घुगे, डॉ. अजय वानखडे, डॉ. सुमित गोतमारे, डॉ. विवेक गोतमारे, डॉ. मेघा मोगरे, डॉ. अंकुश तोष्णीवाल यांच्यासह डॉ. अशोक ओळंबे, डॉ. संकेत चतर, डॉ. श्वेता पंचोली, डॉ. दुर्गा तोष्णीवाल, डॉ. लक्ष्मीकांत वाघमारे, डॉ. विक्रांत नरवाडे व डॉ. प्रियंका थोटे यांनी रुग्णांना वैद्यकीय मार्गदर्शन केले. तसेच सत्य साई सेवा संघटनेचे डॉ. तेजराव नराजे, डॉ. प्रमोद हेलगे आणि गजानन पाटील माऊली (कास्य थेरपी) यांनीही आपली सेवा दिली.शिबिराच्या यशस्वीतेसाठी मंडळाचे अध्यक्ष सुभाष म्हैसने, माजी नगरसेविका मंगला म्हैसने, विठ्ठलराव चिकटे, वसंत जायदे, शरद कोकाटे, विलास आगरकर, अनिल गावंडे, चंद्रकांत ताठे व संजय देशमुख यांच्यासह कार्यकर्त्यांनी अतोनात परिश्रम घेतले. परिसरातील नागरिकांनी या आरोग्य उपक्रमाचे विशेष कौतुक केले आहे.

उद्धव धुमाळे यांना 'तिफन कृषी गौरव पुरस्कार २०२५' जाहीर

जानोरी मेळ : कृषी क्षेत्रातील उत्कृष्ट आणि पारदर्शक कामगिरीची दखल घेत, अकोला जिल्ह्यातील कृषी सहायक उद्धव धुमाळे यांना प्रतिष्ठेचा 'तिफन कृषी गौरव पुरस्कार २०२५' जाहीर झाला आहे. तिफण फाउंडेशन आणि 'सहायक कृषी अधिकारी' फेसबुक पेज यांच्या संयुक्त विद्यमाने हा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान केला जातो.

उद्धव धुमाळे यांनी बाळापूर तालुक्यात फलोत्पादन अभियानांतर्गत सामूहिक शेततळे आणि 'रोहयो'च्या माध्यमातून फळबाग लागवडीचे उद्दिष्ट प्रभावीपणे राबवले आहे. कोरोना काळात त्यांनी ऑनलाइन प्रशिक्षणाद्वारे शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन केले. वाडेगाव, बटवाडी, तामशी, पिंपळगाव, तांडली, बल्हाडी यांसह अनेक गावांत कृषी विस्तार योजनांची अंमलबजावणी करून शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले.त्यांच्या या नियोजनबद्ध कार्यपद्धतीमुळे कृषी क्षेत्रात सकारात्मक बदल घडून आले आहेत. या यशाबद्दल कृषी विभाग आणि जिल्ह्यातील शेतकरी वर्गातून धुमाळे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

धानोरा (घा) येथे भागवत कथेचा शुभारंभ

मानोरा:तालुक्यातील धानोरा (घाडगे) येथील श्री महादेव संस्थानमध्ये आयोजित भागवत कथेच्या पहिल्या दिवसाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या धार्मिक सोहळ्यात प्रमुख भागवत वाचक अनाम कबीर पंथी, वाणीभूषण ह.भ.प. श्रीराम महाराज चिखलीकर यांनी आपल्या ओजस्वी वाणीने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. कथेच्या प्रारंभी महाराजांनी भक्ती, ज्ञान आणि वैराग्य यांचे जीवनातील महत्त्व अधोरेखित करत सखोल विवेचन केले. अज्ञानामुळे दिशाहीन झालेल्या जीवांना भागवत कथेच्या माध्यमातून योग्य मार्गावर कसे आणता येते, याचे प्रभावी उदाहरणांसह मार्गदर्शन त्यांनी केले. त्यांच्या प्रवचनातून उपस्थित भाविकांना आध्यात्मिक उर्जा व मानसिक समाधान लाभले.

गहू जळाला; तुटपुंज्या पंचनाम्यामुळे शेतकरी हतबल!

बिडगावच्या शेतकऱ्याचे लाखोंचे नुकसान

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोला, दि. २९ : तालुक्यातील बिडगाव येथे महावितरणच्या कथित दुर्लक्षामुळे लागलेल्या आगीत एका शेतकऱ्याचा कष्टाचा गहू जळून खाक झाला. शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या या भीषण आगीत ४ एकर शेतातील सुमारे ५० ते ६० क्विंटल गव्हाचे नुकसान झाले असून, शेतकरी आता पूर्णपणे हतबल झाला आहे.

बिडगाव येथील शेतकरी प्रवीण कुऱ्हाडे यांनी वर्षभर कष्ट करून पिकवलेला गहू कापून शेतात पेंड्यांच्या स्वरूपात साठवून ठेवला होता. मात्र, वीज वितरण कंपनीच्या तारांमधील शॉर्ट सर्किटमुळे अचानक ठिणगी पडून भीषण आग लागली. काही क्षणांतच संपूर्ण गहू डोळ्यादेखत जळून राख झाला. या आगीत लाखोंचे आर्थिक नुकसान झाले असून, कुटुंबाचा वर्षभराचा आधार हिरावला गेला आहे.

घटनेनंतर महसूल प्रशासनाने घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला. मात्र, प्रत्यक्ष नुकसान ५०-६० क्विंटल (लाखो रुपये) असताना प्रशासनाने केवळ ९० हजार रुपयांचे नुकसान दाखवल्याचा आरोप प्रवीण कुऱ्हाडे यांनी केला आहे. वास्तविक नुकसान आणि सरकारी आकडेवारी यातील या मोठ्या तफावतीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्याला न्याय मिळणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. आधीच संकटात असलेला शेतकरी या सरकारी अनास्थेमुळे अधिकच खचला असून, महावितरण आणि प्रशासनाने तातडीने फ ेरपंचनामा करून योग्य भरपाई द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

श्री संत सिदाजी महाराज यात्रा महोत्सव उत्साहात; आ. नितीन देशमुख यांनी घेतले दर्शन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

सुकळी, दि. २९ : पातूर शहराचे आराध्य दैवत संत श्री सिदाजी महाराज यांचा वार्षिक यात्रा महोत्सव २८ मार्च रोजी मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने संपन्न झाला. या महोत्सवात पातूर शहरासह पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी हजेरी लावून दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी बाळापूर मतदारसंघाचे आमदार नितीन देशमुख यांनीही मंदिरात नतमस्तक होऊन दर्शन घेतले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री संत सिदाजी महाराज संस्थांच्या वतीने यात्रेचे जय्यत नियोजन करण्यात आले होते. यावर्षी महाप्रसादासाठी संस्थानाकडून सुमारे ६० क्विंटल गव्हाच्या पिठाची सोय करण्यात आली होती. विशेष म्हणजे, मागील वर्षांच्या तुलनेत यंदा भाविकांची संख्या दुप्पट असल्याचे दिसून आले. सकाळपासूनच मंदिर परिसरात भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या, ज्यामुळे संपूर्ण परिसराला जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. यावेळी सिदाजी महाराज पंचमंडळाच्या वतीने आमदार देशमुख यांचा शाल व श्रीफळ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शिवसेनेचे आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच परिसरातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी पंचमंडळ व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

मंगरुळपीर कृषी विभागात मार्चअखेर गोंधळ; फळबाग अनुदान धोक्यात?

बिलांवरील स्वाक्षऱ्या खोडल्याचा आरोप; तांत्रिक पेचामुळे शेतकरी, कर्मचारी तणावात

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

मंगरुळपीर, दि. २९ : तालुक्यातील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या (रोहयो) फळबाग लागवड घटकातील प्रलंबित अनुदानाचा मुद्दा आता गंभीर वळणावर पोहोचला आहे. ३१ मार्चची मुदत संपण्यास अवघे दोन दिवस उरले असताना, प्रभारी तालुका कृषी अधिकाऱ्यांनी काही तांत्रिक कारणास्तव देयकांवरील स्वाक्षऱ्या खोडून ती बिले परत केल्याचा खळबळजनक आरोप होत आहे. या प्रकारामुळे कोट्यवधींचे अनुदान रखडण्याची भीती निर्माण झाली असून, शेतकरी व कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड तणावाचे वातावरण आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सन २०२५-२६ मधील फळबाग लागवडीची कुशल (सामुग्री) देयके सहायक कृषी अधिकाऱ्यांनी मापन पुस्तिकेत नोंदवून सादर केली होती.

मात्र, प्रभारी तालुका कृषी अधिकाऱ्यांनी या बिलांवरील स्वाक्षऱ्या खोडून, ज्या काळात साहित्य खरेदी झाले त्यावेळच्या तत्कालीन अधिकाऱ्यांची स्वाक्षरी आणण्याचे तोंडी व लेखी निर्देश दिल्याचे समजते. विशेष म्हणजे, संबंधित तत्कालीन अधिकारी सध्या निलंबित असून, निलंबित अधिकारी अशा अधिकृत कागदपत्रांवर स्वाक्षरी कशी करणार? असा कायदेशीर प्रश्न आता उपस्थित झाला आहे.

नियमानुसार, पक्क्या बिलावर खाडाखोड करणे किंवा उपरीलेखन करणे हे वित्त व लेखा संहिता नियमांचे उल्लंघन मानले जाते. ही सर्व बिरे ३१ मार्चपूर्वी ऑनलाइन प्रणालीद्वारे नागपूर येथील नरेगा आयुक्तांकडे पोहोचणे अनिवार्य आहे.

मात्र, ऐनवेळी निर्माण झालेल्या या तांत्रिक पेचामुळे ही प्रक्रिया रखडल्यास शेतकऱ्यांचे हक्काचे अनुदान बुडण्याची दाट शक्यता आहे. या गोंधळामुळे तालुक्यातील सहायक कृषी अधिकारीही विवंचनेत असून, अनुदानाची जबाबदारी कोणाची, असा प्रश्न विचारला जात आहे.

या गंभीर प्रकरणाबाबत आणि बिलांवरील खाडाखोडीच्या आरोपांबाबत वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी प्रभारी तालुका कृषी अधिकारी यांच्याशी वारंवार भ्रमणध्वनीवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांनी प्रतिसाद दिला नाही. प्रशासकीय स्तरावर सुरू असलेल्या या आडमुठ्या धोरणामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांचा बळी दिला जात असल्याची भावना व्यक्त होत आहे.

मुंडगाव उपोषण : चार उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावली!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

मुंडगाव, दि. २९ : अमीनपूर येथील समाजमंदिराच्या मागील खुल्या जागेचा ८-अ उतारा मिळण्याच्या मागणीसाठी मुंडगाव ग्रामपंचायत समोर सुरू असलेल्या आमरण उपोषणाचा आज चौथा दिवस उजाडला. पाण्याचा थेंबही न घेता उपोषणास बसलेल्या ६ महिला व २ पुरुषांपैकी चौघांची प्रकृती खालावली असून, तरीही प्रशासन ढिम्म असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

अमीनपूर येथील शांतीदूत बुद्धविहार चॅरिटेबल ट्रस्टच्या समाजमंदिरामागील मोकळ्या जागेचा रीतसर उतारा मिळवण्यासाठी ग्रामस्थांनी वारंवार पाठपुरावा केला. मात्र, ग्रामपंचायत सरपंच आणि ग्रामसेवक यांनी याकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष केल्याचा आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे. या जागेत जातीपातीचे राजकारण करून सामाजिक सलोखा बिघडवण्याचा प्रयत्न सरपंचांकडून होत असल्याचा खळबळजनक आरोपही यावेळी करण्यात आला. या विरोधात २७ मार्चपासून मंगला पोहोरकर, सिंधु सोनोने, निता गवई, मालता पिंपळे, कमला सरकटे, सपना पुंडकर या महिलांसह तोताराम सरकटे व सुरेश सरकटे हे उपोषणास बसले आहेत. उपोषणाचा चौथा दिवस असूनही अकोटचे गटविकास अधिकारी यांनी अद्याप उपोषणकर्त्यांची भेट घेतलेली नाही. दुसरीकडे, सरपंच आणि ग्रामसेवक यांनीही या प्रकरणातून हात झटकल्याने उपोषणकर्त्यांच्या जिवाचे काही बरे-वाईट झाल्यास जबाबदार कोण? असा प्रश्न निर्माण झाला आहे. दरम्यान, सपना पुंडकर, निता गवई, सिंधु सोनोने आणि तोताराम सरकटे यांची प्रकृती खालावल्याने वैद्यकीय उपचारांची गरज निर्माण झाली आहे.

प्रशासनाच्या या उदासीन भूमिकेमुळे संतप्त झालेल्या उपोषणकर्त्यांनी आता थेट मुंडगाव ग्रामपंचायत कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे. शांतीदूत बुद्धविहारच्या मागील अतिक्रमित बांधकाम तातडीने काढण्यात यावे आणि जागेचा उतारा ट्रस्टच्या नावे करावा, या मागणीवर उपोषणकर्ते ठाम आहेत. या उपोषणाला त्रिमूर्ती प्रतिष्ठानसह गावातील असंख्य नागरिकांनी पाठिंबा दर्शविला असून, अकोला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी यात तातडीने लक्ष देऊन न्याय द्यावा, अशी मागणी केली जात आहे.

दहीहंडा मुख्य रस्त्याचे आमदार सावरकरांच्या हस्ते भूमिपूजन!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोला, दि. २९ : अकोला पूर्व विधानसभा मतदारसंघातील १८ गावांना जोडणाऱ्या अत्यंत महत्त्वाच्या दहीहंडा फाटा ते दहीहंडा मुख्य रस्त्यावरील किनखेड पूर्णा येथील अप्रोच रस्त्यांचे भूमिपूजन आमदार रणधीर सावरकर यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. या रस्ते विकासामुळे दळणवळणाची उत्तम सोय होऊन शेतकऱ्यांचा माल बाजारपेठेत वेळेवर पोहोचेल, तसेच विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मोठी मदत होईल, असा विश्वास आमदार सावरकर यांनी यावेळी व्यक्त केला.

आमदार सावरकर पुढे म्हणाले की, अकोला, अकोट आणि अमरावती या भागांना जोडणारा हा रस्ता परिसराच्या विकासाचा मुख्य केंद्रबिंदू ठरेल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपा जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर होते.

यावेळी प्रामुख्याने राजेश नागमते, विठ्ठल वाकोडे, सरपंच ओईंबे, रमेश वानखडे, विवेक भरणे, ज्ञानेश्वर झांबरे, अनिल इंगळे, नितीन गोंडचवर, विनोद मंगळे, बाबुराव इंगळे, बळीराम इंगळे, ज्ञानेश्वर इंगळे, रामदास नवघरे, पुरुषोत्तम गोंडचवर, गोविंद गोयंका, माधव बकाल, चराटे, अनिल गासे, गणेश पोटे, कल्पना पळसपगार, वाधवाणी, संजय गावंडे, मधुकर पाटकर, दत्तू पाटील गावंडे, प्रकाश गोंडचवर, शंकर इंगळे, खोले महाराज, प्रवीण डिक्कर, किशोर बुले, आशिष देशमुख, मंगेश घुले यांच्यासह ग्रामस्थ व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

५१ क्विंटलचा महाप्रसाद | हजारो भाविकांच्या उपस्थितीत रंगणार सोहळा

ईचा-नागी येथे बारस निमित्त महादेव यात्रा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

मंगरुळपीर, दि. २९ : वाशिम जिल्ह्यातील मंगरुळपीर तालुक्यातील अ वर्ग तीर्थक्षेत्र म्हणून ख्याती असलेल्या श्रीक्षेत्र महादेव संस्थान, ईचा-नागी येथे सोमवार, ३० मार्च रोजी बारस उत्सवानिमित्त भव्य यात्रा महोत्सव व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा ५१ क्विंटलचा भव्य महाप्रसाद तयार करण्यात येत असून, संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

महादेव संस्थानच्या वतीने दरवर्षी हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यावर्षीही विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असून, महाप्रसादासाठी रविवारी सकाळी ९ वाजेपासूनच तयारीला सुरुवात करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, सध्याच्या गॅस टंचाईच्या काळातही न डगमगता स्वयंसेवकांनी पारंपरिक इंधनाचा (लाकूड व सरपण) वापर करून हजारो भाविकांसाठी भोजन तयार करण्यास सुरुवात केली आहे. त्यांच्या या नियोजनाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

भाविकांच्या सुविधेसाठी संस्थानने चोख व्यवस्था केली आहे. सुमारे १००० महिला व पुरुष स्वयंसेवक स्वच्छता, सुव्यवस्था आणि भोजन वितरणासाठी तैनात करण्यात आले आहेत. भाविकांसाठी थंड व शुद्ध पिण्याचे पाणी, सावलीसाठी मंडप आणि बसण्याची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. या महाप्रसादाचा लाभ पंचक्रोशीतील सर्व भाविकांनी घ्यावा, असे आवाहन श्रीक्षेत्र महादेव संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

पारंपरिक इंधनाचा वापर: एक आदर्श

जगभरात गॅस टंचाईचे संकट असताना, ईचा-नागी येथील स्वयंसेवकांनी पारंपरिक इंधनाचा वापर करून महाप्रसाद तयार करण्याचा निर्णय घेतला. आधुनिक साधनांअभावी काम न थांबवता श्रद्धेच्या जोरावर हजारो भाविकांची भोजन व्यवस्था पूर्ण करणाऱ्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

ज्ञानेश्वर महाराज वाघ विदर्भ रत्न पुरस्काराने सन्मानित!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोट, दि. २९ : संत श्री वासुदेवजी महाराज यांचा संस्काराचा वारसा समर्थपणे जोपासत, गेल्या ३८ वर्षांपासून बालसंस्कार शिबिरांच्या माध्यमातून हजारो विद्यार्थ्यांना सुसंस्कृत करण्याचे महान कार्य करणारे भागवताचार्य ज्ञानेश्वर महाराज वाघ यांना विदर्भ रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

श्री भागवत समिती तथा श्री महादेव संस्थान, उरळ बु. यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीराम नवमीच्या पावन पर्वावर हा सोहल्ला पार पडला. श्रीयुत गोपाळ महाराज उरळकर यांच्या शुभहस्ते आणि हजारो वारकऱ्यांच्या उपस्थितीत वाघ महाराज यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी बोलताना गोपाळ महाराज उरळकर म्हणाले की, ''ज्ञानेश्वर महाराज हे वासुदेव महाराजांच्या शिष्य परंपरेतील एक अनमोल रत्न आहेत. आपल्या परखड शैलीतून आणि निष्ठेतून ते संप्रदायाचा वारसा समर्थपणे पुढे चालवत आहेत.

सत्काराला उत्तर देताना ज्ञानेश्वर महाराज वाघ म्हणाले की, ''वास्तविक पाहता हा सन्मान वैयक्तिक माझा नसून, वारकरी संप्रदायातील निस्वार्थ सेवेचा आणि पर्यायाने सर्व सेवाधाऱ्यांच्या श्रद्धेचा हा गुणगौरव आहे.'' या पुरस्कारामुळे वारकरी संप्रदायातून आणि अकोट परिसरातून महाराजांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

महत्त्वाचे

छत्रपती ते घटनापती प्रबोधन वारीचा अकोल्यात जागर!

मूर्तिजापूर : छत्रपती शिवाजी महाराज यांची पुण्यतिथी आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती यांचे औचित्य साधून अकोला जिल्ह्यात 'छत्रपती ते घटनापती प्रबोधन वारी १३५' या भव्य मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या ३ एप्रिल ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत जिल्ह्यातील १३५ गावांमध्ये ही प्रबोधन वारी फिरणार असून, याद्वारे नव्या पिढीला समृद्ध वैचारिक वारसा देण्याचा संकल्प 'प्रबोधन वारी समिती'ने केला आहे. या अभिनव उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील निवडक १३५ गावांमध्ये मोफत व्याख्याने आयोजित केली जातील. शिव, शाहू, फुले आणि आंबेडकरी विचारांचा जागर करणे, हा या वारीचा मुख्य उद्देश आहे. विशेष म्हणजे, या कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या गावांना समितीमार्फत स्वतः वक्ते, सूत्रसंचालक आणि पाहुणे उपलब्ध करून दिले जाणार आहेत. या वारीच्या निमित्ताने प्रत्येक ग्रामपंचायतीला भारतीय संविधानाची प्रत सप्रेम भेट दिली जाणार असून, गावातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरवही केला जाणार आहे.

डॉ. पूजा खेतान यांची हिंदू सुरक्षा सेवा संघाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती

अकोला: अकोला महानगरातील ख्यातनाम नेत्ररोग तज्ज्ञ आणि समाजसेविका डॉ. पूजा सुमित्रा रमाकांत खेतान यांची हिंदू सुरक्षा सेवा संघाच्या चिकित्सा प्रकोष्ठच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. हिंदू सुरक्षा सेवा संघ ही राष्ट्रीय स्तरावर कार्यरत असणारी संघटना असून, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ हे या संघटनेचे मुख्य संरक्षक आहेत. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष महंत राजूदास महाराज (हनुमान गढी, यूपी) यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महाराष्ट्र प्रभारी सुनील महाराज यांच्या संमतीने ही निवड करण्यात आली. चिकित्सा प्रकोष्ठचे प्रदेशाध्यक्ष अभय बंगाळकर यांनी या निवडीसाठी पुढाकार घेतला. डॉ. पूजा खेतान या वैद्यकीय व सामाजिक क्षेत्रात अग्रेसर आहेत. त्या सुमिरमा फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा असून, या माध्यमातून त्या बेघर, अनाथ आणि गरजू रुग्णांना आधार देत आहेत. सध्या त्या आयकॉन येथे नेत्ररोग तज्ज्ञ म्हणून कार्यरत असून, अकोल्यातील प्रसिद्ध तुकाराम कॅन्सर हॉस्पिटलमध्ये विश्वस्त म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. याशिवाय, केंद्रीय मानवाधिकार संघटन (नवी दिल्ली) च्या महाराष्ट्र प्रदेश सचिव पदावरही त्या कार्यरत आहेत. आपल्या निवडीबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना डॉ. खेतान यांनी केंद्रीय पदाधिकाऱ्यांचे आभार मानले. ''संघटनेच्या माध्यमातून आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी आणि संघटनात्मक कार्याला गती देण्यासाठी मी सातत्याने उपक्रम राबवेन.

उमरा शिवारात चोरट्यांचा धुमाकूळ

ट्रान्सफॉर्मर लंपास केल्याने शेकडो एकर पिके धोक्यात!

महावितरण व पोलिसांकडे सामूहिक तक्रारीचा पवित्रा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

पिंपळखुटा, दि. २९ : पातूर तालुक्यातील उमरा शेत शिवारात चोरट्यांनी पुन्हा एकदा डोके वर काढले असून, जिवंत विद्युत तारा असलेल्या ट्रान्सफॉर्मरवर (डीपी) डल्ला मारला आहे. या चोरीमुळे केवळ एका शेतकऱ्याचे नव्हे, तर त्या डीपीवर अवलंबून असलेल्या अनेक शेतकऱ्यांचा वीजपुरवठा खंडित झाला आहे. परिणामी, ऐन उन्हाळ्यात लाखो रुपयांच्या केळीच्या बागा आणि उन्हाळी पिके जळून खाक होण्याची भीती निर्माण झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, उमरा येथील शेतकरी रामेश्वर संपत मुके यांच्या शेतातील (गट क्र. १/२) ट्रान्सफॉर्मर अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन फोडला. चोरट्यांनी यातील मौल्यवान तांब्याच्या तारा आणि महागडे ऑईल लंपास केले. हा ट्रान्सफॉर्मर या परिसरातील सिंचनाचा मुख्य स्रोत असल्याने, रामेश्वर मुके यांच्यासह शेजारील १० ते १५ शेतकऱ्यांचा पाणीपुरवठा पूर्णपणे ठप्प झाला आहे.

सध्या मार्च महिना असल्याने कडाक्याचे ऊन पडू लागले आहे. अशा स्थितीत केळीच्या पिकाला दररोज पाण्याची नितांत गरज असते. मात्र, वीज नसल्याने सिंचन व्यवस्था कोलमडली असून उभी झाडे आता डोळ्यादेखत सुकू लागली आहेत. महावितरणची नवीन डीपी बसवण्याची क्लिष्ट प्रक्रिया आणि लागणारा वेळ पाहता, तोपर्यंत पिके वाचवणे हे बळीराजासमोर मोठे आव्हान ठरत आहे. या चोरीच्या प्रकारामुळे उमरा शिवारात भीतीचे वातावरण असून, प्रशासनाने याची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी त्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे.

> ❑ डीपी चोरीला गेल्यामुळे आम्हा सर्व शेतकऱ्यांचे जगणे कठीण झाले आहे. वीज पुरवठा खंडित झाल्याने उभी पिके डोळ्यादेखत जळून जात आहेत. महावितरणने तातडीने नवा ट्रान्सफॉर्मर बसवून द्यावा आणि पोलिसांनी या भागात रात्रीची गस्त वाढवावी; अन्यथा शेतकऱ्यांचे कधीही भरून न निघणारे आर्थिक नुकसान होईल.
>
> **- रामेश्वर संपत मुके,** शेतकरी, उमरा

बाजार समितीत दोन कोटींचा घोटाळा उघड; एकाला अटक, तीन फरार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

मूर्तिजापूर, दि. २९ : येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत उघडकीस आलेल्या २ कोटी रुपयांहून अधिकच्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणामुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. शेतकरी, अडते आणि मजुरांची मोठी आर्थिक फसवणूक होऊनही मुख्य आरोपी अद्याप मोकाट असल्याने पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. या प्रकरणात चार लोकांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मात्र, पोलिसांनी आतापर्यंत केवळ सुनील अग्रवाल यालाच अटक केली असून, उर्वरित तिघे आरोपी अद्याप फरार आहेत.

अटक करण्यात आलेल्या केवल अग्रवाल याला २८ मार्च रोजी न्यायालयात हजर केले असता, ४ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. याप्रकरणी कृषी उत्पन्न बाजार समिती व शेतकऱ्यांच्या वतीने ॲड. सचिन चंद्रमणी वानखडे यांनी प्रभावी युक्तिवाद केला. सध्या आर्थिक गुन्हे शाखेचे उपविभागीय अधिकारी अनील जुमळे या प्रकरणाचा तपास करीत असून, आतापर्यंत २४ अडत्यांनी तक्रारी नोंदवल्या आहेत.

या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, रविवारी २९ मार्च रोजी बाजार समितीमध्ये एका विशेष पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सचिव रितेश मडगे, संचालक कीर्ती भारुका, अडतदार असोसिएशनचे अध्यक्ष सुनील तामखाने, आशिष अग्रवाल, सचिन खोकले, तुलसीदास महल्ले यांच्यासह मोठ्या संख्येने अडतदार उपस्थित होते. ''केवळ एका आरोपीच्या अटकेने समाधान होणार नाही; जोपर्यंत मुख्य सूत्रधार जेरबंद होत नाहीत, तोपर्यंत घोटाळ्याचे मूळ समोर येणार नाही,'' अशी आक्रमक भूमिका यावेळी मांडण्यात आली. फरार आरोपींना तात्काळ अटक न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही बाजार समिती व व्यापाऱ्यांनी दिला आहे. आता संपूर्ण परिसराचे लक्ष पोलिसांच्या पुढील पावलांकडे लागले आहे.

महाराजस्व अभियान सामान्यांसाठी ठरेल लाभदायक!

आमदार रणधीर सावरकर यांचा विश्वास; चोहोट्टा बाजार येथे शिबीर

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोला, दि. २९ : अकोला पूर्व मतदारसंघातील अकोट तालुक्यांतर्गत चोहोट्टा बाजार मंडळात येणाऱ्या सर्व गावांमधील शेतकरी बांधवांसाठी आयोजित श्री छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान, समाधान शिबीर व जनसंवाद कार्यक्रम हा सर्वसामान्य शेतकरी आणि ग्रामस्थांना खऱ्या अर्थाने लाभदायक ठरेल, असा विश्वास आमदार रणधीर सावरकर यांनी व्यक्त केला.

स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समिती, चोहोट्टा बाजार येथे आमदार रणधीर सावरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. शासनाच्या विविध सेवा थेट नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचवणे आणि त्यांना तात्काळ दिलासा देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या शिबिराचा परिसरातील तब्बल ५२ गावांनी लाभ घेतला.

यावेळी व्यासपीठावर उपविभागीय अधिकारी लोणारकर, तहसीलदार सुनील चव्हाण, गटविकास अधिकारी माळी, कृषी अधिकारी, महावितरण व डीडीआर कार्यालयाचे वरिष्ठ अधिकारी, मंडळ अधिकारी आणि तलाठी उपस्थित होते. तसेच भाजप जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर, राजेश नागमते, गोविंद गोयंका, दादाराव पेठे, विवेक भरणे, माधव बकाल, विठ्ठल वाकोडे, विनोद मंगळे, विजयसिंह सोळंके, मधुकर पाटकर, प्रवीण डिक्कर, खोले महाराज, शिवाजीराव देशमुख, पवन वर्मा, दत्तू गावंडे, रमेश वानखडे, शेषराव पाटील वसू, अनिल गासे, गणेश पोटे यांच्यासह चोहोट्टा मंडळातील शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिबिरामुळे प्रलंबित शासकीय कामांना गती मिळाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

गॅस तक्रारींसाठी जिल्हा पुरवठा विभागात कक्षाची स्थापना

अवैध वापराला लगाम बसवण्यासाठी प्रशासनाचे पाऊल

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोला, दि. २९ : जिल्ह्यातील घरगुती एलपीजी गॅसचे वितरण सुरळीत व्हावे आणि गॅसचा अवैध व्यावसायिक वापर रोखला जावा, यासाठी जिल्हा प्रशासनाने कंबर कसली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा स्तरावर दक्षता व फिरते पथक तैनात करण्यात आले असून, नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निवारण करण्यासाठी जिल्हा पुरवठा कार्यालयात विशेष तक्रार निवारण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

सध्याच्या स्थितीत पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅस या इंधनांच्या पुरवठ्याबाबत नागरिकांच्या अनेक तक्रारी प्राप्त होत आहेत. या तक्रारींची दखल घेऊन प्रशासनाने ८०१०१५३७८० हा हेल्पलाइन क्रमांक जारी केला आहे. या कक्षामध्ये जबाबदार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून, दूरध्वनीद्वारे प्राप्त होणाऱ्या तक्रारींवर तातडीने कारवाई केली जाणार आहे.

> **एजन्सीमध्ये गर्दी करू नका; प्रशासनाचे आवाहन**
>
> जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, गॅस सिलिंडर मिळवण्यासाठी किंवा इतर कामांसाठी गॅस एजन्सीमध्ये अनावश्यक गर्दी करू नये. गॅस सिलिंडरबाबत काहीही अडचण किंवा समस्या असल्यास थेट हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधून आपली तक्रार नोंदवावी. या तक्रारींचे निराकरण प्रशासकीय स्तरावर तातडीने केले जाईल, अशी ग्वाही देखील पुरवठा विभागाने दिली आहे.

हिदायत पटेल हत्याकांडातील आरोपींना तातडीने अटक करा

ठाणेदारांना निवेदन : कठोर कारवाईची नागरिकांची मागणी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

मूर्तिजापूर, दि. २९ : महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा प्रदेश उपाध्यक्ष हिदायत पटेल यांच्या बहुचर्चित हत्याकांडाने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ माजली आहे. या प्रकरणातील मुख्य सूत्रधारासह सर्व आरोपींना लवकरात लवकर अटक करण्यात यावी, या मागणीसाठी आज मूर्तिजापूर शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार अजित जाधव यांना परिसरातील नागरिकांच्या वतीने निवेदन देण्यात आले.

हिदायत पटेल यांच्या हत्येनंतर परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे. या गुन्ह्यातील जे आरोपी अद्यापही मोकाट आहेत, त्यांचा तातडीने शोध घेऊन त्यांना गजाआड करावे आणि त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी यावेळी उपस्थित नागरिकांनी केली.

निवेदन देतेवेळी निजामुद्दीन इंजिनिअर, गुलाम हबीब, छोटू मेकॅनिकल, मोहम्मद अनीस, मोहम्मद शहाबुद्दीन, सुधीर शेवणे, सय्यद नौशाद यांच्यासह शहरातील इतर प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

''हिदायत पटेल यांच्या हत्येमुळे जनतेमध्ये मोठी नाराजी आहे. पीडित कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत आणि गुन्हेगारांना शिक्षा होईपर्यंत नागरिक शांत बसणार नाहीत. शहरात शांतता कायम राहावी यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवावीत, अशा भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केल्या. ठाणेदार अजित जाधव यांनी निवेदन स्वीकारून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून, दोषींवर लवकरच कठोर कारवाई केली जाईल, असे आश्वासन दिले आहे.

आमदारांच्या आमसभेकडे प्रशासनाची पाठ

आमसभा की खाजगी सभा? चर्चेला उधाण

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

पातूर, दि. २९ : बाळापूरचे आमदार नितीन देशमुख यांनी पातूर तालुक्यातील दिग्रस येथे आयोजित केलेल्या आमसभेला तहसीलदार व गटविकास अधिकाऱ्यांसह प्रमुख प्रशासकीय यंत्रणेने दांडी मारल्याचा प्रकार समोर आला आहे. यामुळे आमदारांची प्रशासनावर पकड नसल्याचे चित्र निर्माण झाले असून, ही सभा रद्द करण्याची नामुष्की ओढवली.

या सभेसाठी सर्व विभागांना पूर्वसूचना देण्यात आली होती; मात्र अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे आमदारांच्या आदेशाला केराची टोपली दाखवण्यात आल्याची चर्चा आहे. ही सभा जनतेच्या समस्यांसाठी होती की ठराविक कार्यकर्त्यांच्या तक्रारींवरून अधिकाऱ्यांना लक्ष करण्यासाठी, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. वारंवार होणाऱ्या मानसिक त्रासामुळेच अधिकाऱ्यांनी सभेकडे पाठ फिरवल्याची चर्चा दबक्या आवाजात सुरू आहे. आता आमदार या अनुपस्थितीवर काय भूमिका घेतात, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

> ❑ सध्या शासकीय निवडणूक कार्यक्रमाची व्यस्तता आणि इतर कार्यालयीन कर्तव्यावर असल्यामुळे मी वैयक्तिकरित्या दिग्रस येथील आमसभेला उपस्थित राहू शकलो नाही. मात्र, प्रशासनाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी तहसील कार्यालयाचे नायब तहसीलदार या सभेला आवर्जून उपस्थित होते.
>
> **- डॉ. राहुल वानखडे,** तहसीलदार, पातूर.

> ❑ प्रकृती अस्वास्थ्यामुळे मी आमसभेला उपस्थित राहू शकलो नाही. याबाबत मी स्वतः आमदार महोदय आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, अकोला यांची रीतसर पूर्वपरवानगी घेतली होती. आमच्या पंचायत समितीचे इतर सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी या सभेला उपस्थित होते.
>
> **- सतीश नायसे,** बी.डी.ओ., पातूर.

रसाचा गोडवा

नैसर्गिक अमृतपेय म्हणून उसाच्या रसाला पसंती

उन्हाच्या झळांनी जीव कासावीस; रसवंती गृहात घुंगरांचा छनछनाट!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

मंगरुळपीर, दि. २९ : फेब्रुवारी महिन्यापासूनच उन्हाचा पारा चढू लागल्याने नागरिकांच्या अंगाची लाहीलाही होत आहे. उन्हाच्या या तीव्र झळांपासून सुटका मिळवण्यासाठी सध्या नागरिकांची पावले रसवंती गृहांच्या घुंगरांच्या आवाजाच्या दिशेने वळू लागली आहेत. मागील वर्षी अवकाळी पावसामुळे रसवंती व्यावसायिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले होते, मात्र यंदा हंगाम लवकर सुरू झाल्याने बाजारपेठेत रसाचा गोडवा वाढला आहे.

रस्त्याच्या कडेला असलेल्या रसवंती गृहांमधून एक ग्लास द्या, बर्फ टाकू नका असे संवाद आता सर्वत्र ऐकू येत आहेत. यंत्राला बांधलेल्या घुंगरांचा मंजूळ आवाज जणू प्रवाशांना साद घालत असतो. उसाचा ताजा रस हे केवळ तहान भागवणारे पेय नसून ते आरोग्यासाठीही उत्तम मानले जाते. यामध्ये असलेले अल्फा हायड्रॉक्सी ॲसिड त्वचेसाठी फायदेशीर ठरते, तर कॅल्शिअम आणि मॅग्नेशिअममुळे शरीरातील पाण्याची कमतरता भरून निघते. डिहायड्रेशनपासून बचाव करण्यासाठी हे एक उत्तम एनर्जी ड्रिंक ठरत आहे.

पूर्वी बैलाच्या घाण्याद्वारे रस काढला जात असे. त्या परंपरेची आठवण म्हणून आजही यंत्रांना बैलाच्या गळ्यातील घुंगरू बांधले जातात, असे जुन्या व्यावसायिकांनी सांगितले. अनेक शेतकरी आता साखर कारखान्याला ऊस न देता स्वतः रस्त्याच्या कडेला रसवंतीचा व्यवसाय करून आर्थिक घडी बसवताना दिसत आहेत. आले आणि लिंबू घातलेल्या या रसाचा आस्वाद घेण्यासाठी बालगोपालांपासून वृद्धांपर्यंत सर्वच गर्दी करत आहेत.

> ❑ यंदा उन्हाचा कडाका लवकर सुरू झाल्याने रसवंती व्यवसायाला चांगला प्रतिसाद मिळत आहे. मागील वर्षी अवकाळीने नुकसान झाले होते, पण आता ग्राहकांची गर्दी पाहून समाधान वाटत आहे. उसाच्या खरेदी दरात वाढ झाली असली, तरी आम्ही रसाच्या ग्लासचे दर वाढवलेले नाहीत. सर्वसामान्यांना परवडेल अशाच दरात आम्ही आरोग्यदायी रस उपलब्ध करून देत आहोत.
>
> **- रवी देवळे,** रसवंती चालक, मंगरुळपीर.

अजिंक्य भारत
आपलं बुलडाणा
बुलडाणा, सोमवार, दि.३० मार्च २०२६ www.ajinkyabharat.com

महत्त्वाचे

निलेश शर्मा यांची बीएलए-१ विधानसभा प्रमुखपदी नियुक्ती

जळगाव जामोद : भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने मतदार यादी पुनर्निरीक्षण अभियानाच्या पार्श्वभूमीवर महत्वपूर्ण संघटनात्मक नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. या अंतर्गत २७ जळगाव जामोद विधानसभा क्षेत्रासाठी -१ (विधानसभा प्रमुख) पदावर निलेश शर्मा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. २६ मार्च २०२६ रोजी जाहीर करण्यात आलेल्या या नियुक्तीपत्रावर प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची स्वाक्षरी असून, संबंधित जबाबदारी पार पाडण्यासाठी निलेश शर्मा यांना शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. या नियुक्तीद्वारे विधानसभा क्षेत्रातील मतदार यादी पुनर्निरीक्षणाचे काम अधिक प्रभावीपणे राबवले जाणार असून, स्थानिक स्तरावर संघटन बळकट करण्यास मदत होणार आहे. तसेच, -२ पदांच्या नियुक्त्यांबाबत जिल्हाध्यक्ष, स्थानिक आमदार व पदाधिकाऱ्यांशी समन्वय साधून पुढील कार्यवाही करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. या नियुक्तीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, पक्षाच्या संघटनात्मक कार्याला नवसंजीवनी मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे. निलेश शर्मा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, प्रदेश सरचिटणीस आम दार डॉ. संजय कुटे यांचे आभार व्यक्त केले.

शेती साहित्यावर चोरट्यांचा डल्ला

डोणगाव : डोणगाव परीसरात सध्या शेती चोरटे सक्रिय झाले असून चक्क समृद्धी जवळ असलेल्या शेतातून अज्ञात चोरटय़ांनी शेतातील पाईप व केबल चोरुन नेल्याची घटना दि. २८ मार्च ला उघडकीस आली. शेलगाव देशमुख रोडवर समृद्धी महामार्गाजवळ प्रशांत तुकाराम आवटी यांचे शेत आहे सदर शेतात असलेल्या बोअर वेल वरील खंब्यापासून १०० फुट केबल तसेच ६पाईप अज्ञात चोरटय़ांनी चोरून अंदाजे १०हजाराचे नुकसान झाले आहे. सध्या उन्हाळा सुरू झाला असल्याने चोरट्यांनी शेतातील पाईप व केबल चोरी वर सपाटा लावला असून याकडे पोलीस प्रशासनाने गस्त वाढवून चोरट्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी होत.

कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

वान	भाव
ज्वारी	२०५० - २१५०
गहू	१७०० -२२७५
तुर	४६२५ - ८०२५
हरभरा	४२०० - ५२००
सोयाबीन	४५००- ५४६०
उडीद	३५०० - ६०००
मुग	४८०० - ४८००
मका	११०० - १६००

बुकिंग होत नसल्याची तक्रार: दररोज ५०० सिलिंडरचे वितरण

ग्राहकांची गर्दी वाढली; हाजीर तो वजीर!

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

बुलडाणा दि. २९ : आखाती संघर्षाच्या पार्श्वभूमीवर गॅसचा तुटवडा निर्माण झाला आहे. बुकिंग होत नसल्याच्या तक्रारी ग्राहकांकडून उपस्थित केल्या जात आहेत. सिलेंडरसाठी एजन्सीसमोर रांगा लावण्याची वेळ आली आहे. दररोज ५०० सिलेंडर वाटप केल्या जात असून हाजीर तो वजीर अशी परिस्थिती आहे.

गॅस वेळेवर उपलब्ध होत नसल्यामुळे ग्राहकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. पूर्वी सहज गॅस बुकिंग होत होती. आता त्यामध्ये बदल करण्यात आला आहे. आधीचे सिलेंडर घेतल्यानंतर २५ दिवसांनी बुकिंग करता येणार आहे. त्यातही अनेकजणांना ओटीपी मिळत नाही. अनेकदा फोन लावावा लागत आहे. बुकिंग झाले तरी एजन्सीवर सिलेंडर कधी मिळेल हे सांगता येत नाही. जेवढे सिलेंडर उपलब्ध आहेत, तेवढे वाटप करण्यात येतात. वेळप्रसंगी अर्ध्यावर परत जाण्याची वेळ सुद्धा ओढावते. सकाळी आठ वाजेपासून एजन्सीसमोर वाटप सुरु होते. हजर असलेल्या ग्राहकांना वाटप करण्यात येते. उपलब्ध साठा पाहता ग्राहकांची गर्दी होत आहे. बऱ्याचदा अफवा पसरल्याने सिलेंडरसाठी एकच झुंबड उडते. सिलेंडर मिळणार नाही, या भीतीने नागरिक गर्दी करीत आहेत. यासंदर्भात प्रशासनाने भूमिका जाहीर केली असून तुटवडा नसल्याचे म्हटले आहे. शहरातील ग्राहकांची संख्या पाहता दररोजचा उपलब्ध साठा कमी असल्याचे दिसून येत आहे. लवकर ही परिस्थिती सुधारावी, अशी मागणी ग्राहकांकडून होत आहे. एलपीजी गॅस टंचाईची समस्या गंभीर बनली असून नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. गेल्या काही दिवसांपासून गॅस सिलिंडर वेळेवर उपलब्ध होत नसल्याने घरगुती कामकाजावर परिणाम झाला आहे. अनेक ग्राहकांना बुकिंग करूनही उशिरा सिलिंडर मिळत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. वितरकांकडून पुरवठा कमी झाल्याचे कारण सांगितले जात आहे. विशेषतः ग्रामीण भागात परिस्थिती अधिक बिकट असून पर्यायी इंधनावर अवलंबून राहावे लागत आहे. प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन नियमित पुरवठा सुरळीत करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

वितरण सुरळीत केंव्हा होणार?

धावपळीच्या जीवनशैलीत गॅस अत्यावश्यक झाला आहे. घरात गॅस नसेल तर स्वयंपाकघरात लॉकडाऊन लागते. सर्वच कामे थांबतात. गॅस नाही मग जेवण नाही,चहा- नाश्ता नाही अशी परिस्थिती निर्माण होते. गृहिणींची कामे रखडतात. पूर्वी ग्रामीण भागात चुलीचा वापर केला जात होता. आज तिथेही गॅसशिवाय पर्याय राहिलेला नाही. लाकूड, गोवऱ्या उपलब्ध होऊ शकत नाहीत. त्यामुळे पंचाईत झाली आहे. दैनंदिन जीवनातील आवश्यक घटक झालेले गॅस वितरण सुरळीत केंव्हा होणार असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

बुकिंग केलेल्या ग्राहकांना सिलेंडरचे वाटप करण्यात येत आहे. अफवांमुळे नागरिक जास्त बुकिंग करीत आहेत. मागणी वाढल्याने गर्दी होणे साहजिक आहे. वेळेत हजर असलेल्या ग्राहकांना सिलेंडर मिळत आहे.

- सचिन श्रीवास
व्यवस्थापक, गॅस एजन्सी

सोप्या गोष्टीतून मुलांवर संस्कार होतात- डॉ. व्यवहारे

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

बुलडाणा दि.२९ : तर शाळांपेक्षा वेगळेपण जपत तोमोई मॉन्टेसरी स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना घडवण्यासाठी प्रयत्न केला जातो. पारंपारिकता जपतांनाच नवीन शैक्षणिक कौशल्य विद्यार्थ्यांकडून करून घेण्यासाठी शाळेतील शिक्षिका सातत्याने प्रयत्न करत असतात. लहान मुलांना मार्गदर्शन करण्याची भूमिका व त्यांना त्यांच्या वयानुसार शैक्षणिक वातावरण निर्माण करून देण्याचा प्रयत्न तोमोई माध्यमातून सातत्याने करण्यात येतो.

या वातावरणातूनच मुले स्वतः शिकत असतात. लहान वयात अगदी साध्या साध्या गोष्टींमधून त्यांच्यावर संस्कार होत असतात.. जसे की जिथली वस्तू तिथे ठेवणे. शाळेत स्वतःचा डबा किंवा टिफिन बॉक्स स्वतः उघडणे. जेवण करत असताना हळूहळू जेवण करण्याच्या सवयी त्यांना लावणे. जेवणाआधी प्रार्थना म्हणणे. जेवण झाल्यानंतर आपला डबा स्वतः तो बॅग मध्ये किंवा थैलीत ठेवणे. अशा साध्या व सोप्या गोष्टी मुलांना ईथे शिकवल्या जातात.सोबतच शैक्षणिक अभ्यासक्रम देखील पूर्ण केल्या जातो. शिक्षकांचा विद्यार्थ्यांसोबत व पालकांसोबत सातत्याने संवाद असतो इतर शाळांपेक्षा वेगळेपण जपणारी तोमोई विद्यार्थी संस्कारक्षम घडवण्याचा प्रयत्न सातत्याने करत असते असे प्रतिपादन डॉ. प्रतिमा व्यवहारे यांनी सोमवारी मॉन्टेसरी स्कूलच्या एम ३ च्या विद्यार्थ्यांच्या पदवी वितरण कार्यक्रम प्रसंगी अध्यक्ष स्थानावरून बोलतांना केले याप्रसंगी संस्थेच्या संचालिका सोनाली दळवी म्हणाल्या की लहान मुलांकडून पालकांनी खूप साऱ्या अपेक्षा करू नका. थोडा धीर धरा हळूहळू लहान मुलं प्रगती करत असतात इयत्ता पहिलीत गेल्यावर ती एकदमच मोठी झाल्यासारखी वाटतात. म्हणून त्यांच्याकडून टप्प्याटप्प्याने अपेक्षा करा. शनिवारी दि.२८ सायंकाळी ५ वाजता विद्यार्थ्यांच्या पदवी वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी शास्त्रज्ञ प्रल्हाद निकम, डॉ. गजानन व्यवहारे, ललित चोपडा यांची उपस्थिती होती. तोमोई मॉन्टेसरी स्कूल मुख्य शाखा व एकता नगर शाखेतील एम ३ च्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी वितरण करण्यात आली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केलेत. पालक म्हणून अमोल दिघुळे,डॉ. निखिल नलावडे, भाग्यश्री भोसले, डॉ. रुधिरा जाधव यांनी मनोगते व्यक्त केल. पालकांच्या बोलण्याचा आशयात तोमोई मॉन्टेसरी माध्यमातून मुलांमध्ये सामाजिक व भावनिक विकास झाल्याचे पालकांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नम्रता सुपे,अंजली यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पूजा सरकार, रूपाली शिंबरे यांचेसह शिक्षक वृंदांनी पुढाकार घेतला. पालक मोठ्या संख्येने या प्रसंगी उपस्थित होते.

रेणुका माता चरणी पातळ अर्पण

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

मंगरूळ नवघरे दि.२९ :चिखली शहराचे आराध्य दैवत नवसाला पावणारी आई रेणुका माता यात्रेनिमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी चिखली तालुका होमगार्ड समदेशक कार्यालयाच्या वतीने पातळ चढवण्याचा कार्यक्रम पार पडला.

याप्रसंगी चिखली पोलीस स्टेशनचे ठाणेदार भूषण गावंडे तालुका समादेशक शवसिंग साळोख, सर्व आयुक्त अधिकारी अनायुक्त अधिकारी चिखली पथकातील सर्व महिला व पुरुष होम गार्ड सैनिक उपस्थिती होती. याप्रसंगी शहरातून मिरवणूक काढून आई रेणुका मातेच्या चरणी पातळ अर्पण केले. तसेच मंदिर प्रशासनाच्या वतीने शाल श्रीफळ देऊन तालुका होमगार्ड समादेशक शिवसिंग साळोख यांचा सत्कार करण्यात आला. राष्ट्रगीत व वंदे मातरम गीत गाऊन कार्यक्रमाची तालुका होमगार्ड कार्यालय येथे. सांगता करण्यात आली .

आ. श्वेता महाले यांच्या वाढदिवसानिमित्त ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सन्मान

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

चिखली दि.२९ : चिखली विधानसभा मतदारसंघाच्या आ.श्वेता महाले पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त एक अनोखा आणि प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत, आयुष्यभर पक्षाच्या विचारासाठी निष्ठेने कार्य करणाऱ्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यात आला.

भारतीय जनता पक्ष हा समर्पित कार्यकर्त्यांचा पक्ष असून, त्यांच्या योगदानाची कृतज्ञतेने दखल घेणे हीच खरी परंपरा असल्याचे आणी या निष्ठावंत सेवेला आपला मानाचा मुजरा असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. या उपक्रमांतर्गत सुमारे २५०० ज्येष्ठ कार्यकर्त्यांना ''ध्येयनिष्ठ तपस्वी सन्मान पत्र'' प्रदान करून त्यांच्या प्रदीर्घ व निःस्वार्थ सेवेला गौरविण्यात आले. विविध ठिकाणी हा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. पदाधिकारी, माजी पदाधिकारी तसेच स्थानिक कार्यकर्तांनी पुढाकार घेत ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सत्कार केला. बूथस्तरावरील कार्यकर्त्यांनीही मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवत कार्यक्रम यशस्वी केला. त्यांच्या संघर्षमय प्रवासाच्या आठवणी नव्या पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. आ. श्वेता महाले पाटील यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांचा सन्मान करण्याची ही परंपरा अधिक बळकट होत असून, हा उपक्रम पक्षाच्या मजबूत पायाभरणीचा गौरव करणारा आणि कार्यकर्त्यांना प्रेरणा देणारा ठरला.

शासनाने घेतली दखल: गौण खनिज प्रकरणी जलसंपदा विभागाकडून तात्काळ कारवाईचे आदेश

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

देऊळगाव राजा दि.२९ : जलसंपदा विभागाशी संबंधित गंभीर तक्रारीच्या प्रकरणी शासनाने अधिकृतपणे दखल घेतली असून संबंधित यंत्रणेला तात्काळ आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या संदर्भात मंत्रालय, मुंबई येथून कार्यवाहीबाबतचे पत्र निर्गमित करण्यात आले आहे.

प्राप्त माहितीनुसार, सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत ज्ञानदेव खरात यांनी जलसंपदा विभागाच्या अखत्यारीतील धरण व नदी पात्रांमध्ये सुरू असलेल्या गौण खनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणी गंभीर अनियमितता होत असल्याची तक्रार शासनाकडे सादर केली होती. सदर तक्रारीत विभागीय अधिकाऱ्यांच्या कर्तव्य व जबाबदारीबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले होते तसेच शासनाच्या महसुलाचे संभाव्य नुकसान होत असल्याचेही नमूद करण्यात आले होते.या पार्श्वभूमीवर शासनाने संबंधित निवेदनाची गंभीर दखल घेत कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांना प्रकरणाची सखोल चौकशी करून नियमानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, तक्रारदारास कार्यवाहीबाबत अवगत करण्यासही सांगण्यात आले आहे.

सैलानी येथे दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांच्या वाहनाला अपघात

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

चिखली दि.२९ : नांदेड जिल्ह्यातील अहमदपूर येथील भाविक मालवाहू पिकअपने सैलानी बाबांच्या दर्शनासाठी जात असतांना मेहकर ते चिखली रोड वरील नांद्रा धांडे फाट्याजवळ पिकअप उलटून झालेल्या अपघातात अदनान शरीब बागवान व रिहान सय्यद बागवान या दोघांचा मृत्यू झाला. तर १४ जण जखमी झाले असून, त्यांच्यावर मेहकर येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अहमदपूर येथून बागवान परिवारातील भाविक बुलढाणा तालुक्यातील सैलानी येथे सैलानी बाबाच्या दर्शनासाठी निघाले होते. मेहकर ते चिखली मार्गावर नांद्रा धांडे फाट्याजवळ दि.२९ मार्च सकाळी सहा वाजता चालकाला डुलकी लागल्याने (एम एच-१३-सीटी-७८७०) महिंद्रा पिकअप हे वाहन उलटले. या अपघातात अदनान शरीब बागवान आणि रिहान सय्यद बागवान या दोघांचा जागीच मृत्यू झाला. अपघातात जखमी झालेले शहाना नबीसाहब बागवान (वय ३४), शबाना शरीफ बागवान (वय ३५), रफत शरीफ बागवान (वय १२), आफीफा आरिफ बागवान (वय ६), बुशरा आरिफ बागवान (वय १३), आलिया अनिस बागवान (वय २५), अफिस रौफ बागवान (वय २५), पाशा मोहंमद शाह बागवान (वय ७५), मैमिश नबीसाहब बागवान (वय १५), हिना अरिफ बागवान (वय ३०), अमीर बागवान (१३), अनस बागवान (वय १२), अबुजर बागवान (वय १०), साहेरा बागवान (वय ६५) सर्व राहणार अहमदपूर जि. नांदेड, या घटनेचा तपास मेहकर पोलीस करीत आहेत.

ऐतिहासिक वारसा संवर्धनासाठी एकवटले शेकडो तरुण हात

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

बुलडाणा दि.२९ : करवंड तालुका चिखली येथील ऐतिहासिक वारसा लाभलेले बुरुज व राजवाडा परिसरात आज करवंड महोत्सव कृती समिती, शिव प्रतिष्ठान करवंड, शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान बुलढाणा, हॅपी रिव्हर ग्रुप बुलढाणा यांचे वतीने व करवंड, शेलसूर, धोत्रा भनगोजी येथील गतरुणांच्या सहकार्याने दिनांक २९ मार्च २०२६ रोजी स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

यामध्ये प्रामुख्याने प्लास्टिक बॅग निर्मूलन, बागेश्वर मंदिर परिसर सफाई, राजवाडा परिसरातील साफसफाई, ऐतिहासिक बुरुजांवरील काटेरी झाडाझुडपांची साफसफाई करण्यात आली. यासोबतच महोत्सवासाठी निश्चित केलेल्या जागेचे सपाटीकरण व तेथील दगड गोटे उचलून तो परिसर स्वच्छ करण्यात आला. यावेळी करवड महोत्सव कृती समितीचे अध्यक्ष अरविंद देशमुख, उपाध्यक्ष बाबाराजे माने इंगळे संग्राम भैय्या देशमुख, डॉक्टर सुशांत देशमुख,तहसीलदार मुरलीधर गायकवाड, प्राध्यापक विजय घ्याळ, अमोल साठे, अमोल इंगळे, अनिल इंगळे, प्रवीण कापसे, सरपंच श्री मोरे, उपसरपंच सचिन गरड, एकनाथ राजे जाधव, प्रकाश चव्हाण,सुनील करंडे श्याम जाधव,गजानन जाधव, रवींद्र इंगळे प्रवीण राजे जाधव,देविदास दोतोंडे,भास्कर आढळकर यांच्यासह बहुसंख्येने गावकऱ्यांनी श्रमदानात सहभाग घेतला.

समस्या

रॉकेल आहे...पण स्टोव्ह कुठे?

सरकारच्या निर्णयावर नागरिकांचा थेट सवाल!

अजिंक्य भारत/ गोपाल तोष्णीवाल

लोणार दि. २९ : आखाती भागात भडकलेल्या युद्धामुळे देशात गॅस टंचाई तीव्र होत चालली आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांना दिलासा देण्यासाठी राज्यशासनाने पुन्हा एकदा केरोसिन (रॉकेल) वितरण सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र या निर्णयावर आता नागरिकांकडूनच प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे स्टोव्हच नाहीत तर रॉकेल वापरायचे कसे? असा सवाल ते करीत आहेत. असे असले तरी कधी काळी या स्टोव्हचा वापर केलेल्यांच्या मनी मात्र स्टोव्हच्या सुखद आठवणी जागल्या आहेत.

पूर्वी घराघरांत केरोसिनवर चालणारे स्टोव्ह हे स्वयंपाकघराचे अविभाज्य घटक होते. चहा बनवण्यापासून ते दैनंदिन स्वयंपाकापर्यंत स्टोव्हचा मोठ्या प्रमाणात वापर होत असे. खानावळीतही ते हमखास दिसत. घरात स्टोव असणे तसेच लग्नात मुलीला तो देणे प्रतिष्ठेचे मानले जाई शहरात शिकायला किंवा नोकरीसाठी गेलेल्या तरुणांचे स्वयंपाकही याच स्टोव्हवर होत असत, पंपाने चालणारे, उभ्या-आडव्या टाकीचे, वातीचे स्टोव्ह असे त्यावेळीस्टोव्हचे विविध प्रकार होते. त्यांची दुरुस्ती करणारे फिरस्ते गावोगावी असत. नोजलमध्ये कचरा अडकला तर तो काढण्यासाठी लागणारी पिन, पंपासाठीचे वायसर, ग्रीस, हवा सोडण्या बंद करण्यासाठीची चावी अशा वस्तू किराणा दुकानातही उपलब्ध होत्या. मात्र कालांतराने गॅस शेगड्या, इलेक्ट्रिक उपकरणे आणि इंडक्शन कुकटॉप यांसारखे अत्याधुनिक पर्याय उपलब्ध झाल्याने स्टोव्ह हळूहळू कालबाह्य झाले. केरोसिनमुळे होणारा धूर, वारंवार करावी लागणारी दुरुस्ती आणि किचकट वापर यामुळे लोकांनी गॅसला प्राधान्य दिले या पर्याय उपलब्धीमुळे सरकारनेही हळूहळू केरोसिन कपात केली व पुढे

तर ती कायमची बंद केली परिणामी स्टोव्हचे उत्पादन बंद झाले आणि बाजारातून ते पूर्णतः गायब झाले. आजच्या पिढीला तर स्टोव्ह कसा होता व तो कसा वापरायचा हेही माहीत नाही. आज शासनाने केरोसिन वितरण सुरू केले असले, तरी प्रत्यक्षात त्याचा वापर करण्यासाठी आवश्यक साधनांचीच कमतरता असल्याने हा निर्णय कितपत परिणाम कारक ठरेल, हा खरा प्रश्न आहे. खरे तर जुन्या उपाययोजना पुन्हा राबवताना बदललेल्या काळाची जाणीव ठेवणे आवश्यक असते मात्र शासन प्रशासनला त्याचा विसर पडल्याचे त्यांच्या केरोसिन वितरण निर्णयावरून दिसत आहे.

''शासनाने केरोसीन देण्याचा निर्णय घेतला असला तरी त्यासाठी आवश्यक असलेली साधनसामग्री उपलब्ध नाही, ही वस्तुस्थिती दुर्लक्षित केली आहे. एकेकाळी लोणारसारख्या शहरात प्रत्येक भांडी दुकानात सहज मिळणारे स्टोव्ह आज पूर्णपणे दुर्मिळ झाले आहेत. गॅस शेगड्या आणि इंडक्शनसारख्या आधुनिक पर्यायांच्या वाढत्या वापरामुळे स्टोव्हची मागणी कमी होत गेली. माझ्यासह अनेक व्यापाऱ्यांना, ग्राहक नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात स्टोव्ह भंगारात विकावे लागले. युद्धजन्य किंवा आपत्कालीन परिस्थिती तात्पुरती असते, पण बंद पडलेले उद्योग गुंतवणूक करून पुन्हा उभे करणे हे सोपे काम नाही. याशिवाय स्टोव्हची मागणी किती टिकेल, याची खात्रीच नसल्याने कोणताही उद्योजक नव्याने स्टोव्ह निर्मितीत गुंतवणूक करण्यास'' तयार नाही.

-मोतीलाल गांधी
भांडे व्यापारी, लोणार

प्रशासनाचा दणका; नियमांचे उल्लंघन करून इंधन विक्री करणाऱ्या पेट्रोल पंप मालकावर गुन्हा दाखल

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

चिखली दि.२९ :जिल्ह्यात इंधन पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रशासकीय नियमांचे काटेकोर पालन व्हावे, यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत विशेष खबरदारी घेतली जात आहे. जिल्हाधिकारी बुलढाणा यांच्या आदेशानुसार, सर्व पेट्रोल पंपांवर इंधन केवळ वाहनांच्या इंधन टाकीतच वितरित करणे बंधनकारक असून कॅन, बाटली किंवा इतर उघड्या कंटेनरमध्ये इंधन देणे सुरक्षिततेच्या कारणास्तव प्रतिबंधित करण्यात आले आहे.

या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध आता प्रशासनाने कडक पाऊले उचलण्यास सुरुवात केली आहे. चिखली येथील जालना रोडवर असलेल्या रेणुका पेट्रोल पंप येथे दि. २६ मार्च २०२६ रोजी प्रशासकीय सूचनांकडे दुर्लक्ष करून अनधिकृतपणे खुल्या टाक्या आणि बाटल्यांमध्ये इंधन विक्री होत असल्याचे निदर्शनास आले. अशा प्रकारच्या बेकायदेशीर विक्रीमुळे सार्वजनिक सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, ही बाब लक्षात घेऊन तहसील कार्यालय चिखली येथील पुरवठा निरीक्षक रविंद्र संजय वाघ यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चिखली पोलीस ठाण्यात संबंधित पेट्रोल पंप मालकावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. भारतीय न्याय संहिता (), २०२३ च्या कलम २२३ आणि २८७ अन्वये ही कारवाई करण्यात आली असून पोलीस हवालदार कैलास गोपाळराव चाटारकर या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. प्रशासनाकडून जनतेला आवाहन करण्यात येते की, इंधन पुरवठा पुरेसा असून नागरिकांनी विनाकारण साठवणूक करू नये. तसेच, सर्व पेट्रोल पंप चालकांनी शासनाने ठरवून दिलेल्या सुरक्षा नियमांचे पालन करूनच इंधन वितरण करावे. नियमांचे उल्लंघन करून सार्वजनिक सुरक्षेला बाधा पोहोचवणाऱ्या घटकांवर यापुढेही कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे प्रशासनाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे.

महत्त्वाचे

अंकूर देशपांडे यांची विधानसभा प्रमुखपदी निवड

साखरखेर्डा : येथील भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष अंकूर उल्हासराव देशपांडे यांची नुकतीच भाजपा सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाच्या प्रमुखपदी निवड करण्यात आली आहे. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश तर्फे मतदार याद्यांचे पुर्ननिरीक्षण म्हणजेच एसआयआर अभियान सुरु आहे. या अभियानाकरिता १-विधानसभा प्रमुख पदी प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी एका पत्रकान्वये ही निवड केली आहे. १ (विधानसभा प्रमुख) विधानसभा क्षेत्रातील मतदार याद्यांच्या पुर्ननिरीक्षण कामास वेळ देऊन आपल्या अनुभवाचा योग्य उपयोग करावा अशी याव्दारे सुचना करण्यात आली असून आपण जिल्हाध्यक्ष, स्थानिक आमदार व पदाधिकारी यांच्याशी चर्चा करुन -२ च्या प्रत्येक बूथवर नियुक्त्या कराव्यात व त्याची माहिती सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

तेंग-सु-डो स्पर्धेत यशस्वी गमेची कामगिरी

खामगाव : येथील एसएसडीव्ही ज्ञानपीठ शाळेतील विद्यार्थीनी यशस्वी पंकज गमे हीने तेंग सुडो क्रीडा स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत बेस्ट तेंग सु डो चॅम्पियन हा बहुमान पटकावला आहे. तीच्या या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच तेंग-सु डो स्पोर्टस असोसिएशन ऑफ म हाराष्ट यांच्या तांत्रिक सहकार्याने नांदुरा येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तर शालेय तेंग सु-डो क्रीडा स्पर्धेत येथील एसएसडीव्ही ज्ञानपीठ शाळेतील वर्ग ७ ची विद्यार्थीनी यशस्वी पंकज गमे हीने उत्कृष्ट कामगिरी करत बेस्ट लेंग-सु-डो चॅम्पियन हा बहुमान पटकावला. या स्पर्धे त राज्यभरातील अनेक प्रतिभावान खेळाडूंनी सहभाग घेतला होता. कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण सराव आणि आत्मविश्वासाच्या जोरावर यशस्वीने प्रतिस्पर्ध्यावर मात करत हा मानाचा किताब मिळवला. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे कुटुंबीय, प्रशिक्षक आणि शाळेचा गौरव वाढला आहे. यशस्वी या यशाबद्दल सर्व स्तरातून तिचे कौतुक होत आहे.

स्थापत्य शाखेचा उत्कृष्ट निकाल

बुलडाणा : स्थानिक व्हिजन बुलडाणा अण्ड एज्युकेशनल वेलफेयर सोसायटीद्वारा संचालित पंकज लद्दड अभियांत्रिकी महाविद्यालय यांचा हिवाळी २०२५ चा निकाल नुकताच जाहीर झाला. यामध्ये स्थापत्या अभियांत्रिकी शाखेचा व्दितीय वर्षांचा उत्कृष्ट निकाल लागला आहे. या निकालामध्ये प्रियंका भागवत सोनवणे हिने ८१.५०% गुणांसह प्रथम क्रमांक, स्वप्निल राजू काळे याने ७८.५०% गुणांसह द्वितीय क्रमांक आणि प्रियांका विठोबा बुंधे हिने ७७.५०% गुणांसह तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. महाविद्यालयाच्या उत्कृष्ट निकालाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. दिपक लद्दड, सचिव डॉ. संगीत लद्दड, उपाध्यक्ष रविंद्र लद्दड, सहसचिव डॉ. ध्रुव लद्दड, कोषाध्यक्ष -अर्चाना लगुड तसेच म हाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य सचिन दांडगे, स्थापत्य अभियांत्रिकी विभाग प्रमुख प्रा. स्वप्निल -देशम ुख, सर्व प्राध्यापकबूंद यांनी उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले व व्यांच्या भावी आयुष्याच्या वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

हवाई पाहणी करूनच ठरवा राज्यात गॅस व डिझेल पेट्रोलचा तुटवडा आहे का- सुबोध सावजी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

डोणगाव दि. २९ : युद्धजन्य परिस्थितीमध्ये जनता हवालदिल झालेली असून दररोज वेगवेगळ्या प्रकारच्या अफवा पसरत आहेत ज्याला पाहता सध्या पेट्रोल पंप व गॅस सिलेंडर घेण्यासाठी जनतेच्या रांगा दिसून येत आहे अशा परिस्थितीमध्ये मुख्यमंत्री यांनी सांगितले की पेट्रोल व डिझेल याचे भाव कमी करण्यात आले मात्र वाढवलेल्या भावामधे दोन रुपये कमी करणे म्हणजे जनतेचा कोणता भला झाला तर राज्यामध्ये पेट्रोल डिझेल व गॅस यांचा तुटवडा आहे याची पाहणी करण्यासाठी मुख्यमंत्री यांनी जिल्ह्याच्या पालकमंत्र्याना सोबत घेऊन ही पाहणी करावी नंतरच सांगावे की गॅस पेट्रोल व डिझेलचा तुटवडा आहे की नाही अशा आशयाचे एक पत्र माजी राज्यमंत्री सुबोध सावजी यांनी मुख्यमंत्री यांना दिले.

युद्धजन्य स्थितीमध्ये सर्वीकडे पेट्रोल डिझेल व घरगुती गॅस साठी रांगा लागत आहेत यावर माजी राज्यमंत्री सुबोध सावजी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र देवून व सोशल मीडिया द्वारे आव्हाहन केले की आपण व प्रत्येक जिल्हाच्या पालकमंत्र्यांना सोबत घ्यावेत व हेलिकॉप्टर मधून हवाई पाहणी करावी या पत्रात सांगितले की दिनांक २७ मार्च रोजी आपण मुंबई येथून महाराष्ट्राच्या जनतेला सांगितले पेट्रोल मध्ये दोन रुपये दर कमी करण्यात आले परंतु जे दर वाढलेले आहेत तेच परवडणारे नाहीत तसेच राज्यामध्ये पेट्रोल डिझेल गॅस याची इतकी कमतरता आहे हे आपण हवाई पाहणी केल्यास पेट्रोल पंपावर लागलेल्या रांगा समृद्धी महामार्गावर उभे असलेली वाहने त्याचप्रमाणे प्रत्येक गावात घरगुती गॅसची कम तरता हे आपणास लक्षात येईल आपण जनतेला आव्हान केले देशाचे पंतप्रधान मोदीजी व राज्यातून आपण पेट्रोल डिझेल व ग्यास याची कमतरता किवा तुटवडा पडू देणार नाही पेट्रोल डिझेल व गॅस या प्रम णात पाहिजे त्याच प्रमाणात वाहनधारक ते विकत घेतो कारण त्याच्या वाहनात जितके बसेल त्यापेक्षा तो जास्त विकत घेऊ शकत नाही व त्यामुळे विकत घेणारा साठा करू शकत नाही राज्यामध्ये आर्थिकदृष्ट्या इतकी हलाखीची परिस्थिती आहे या परिस्थितीत पेट्रोल डिझेल व ग्यास साठवूने शक्य नाही आमची मागणी आपण त्वरित मान्य करून महाराष्ट्राची सर्व जिल्ह्यातून हवाई पाहणी करावी व यामध्ये लवकरात लवकर जनतेला दिलासा द्यावा अन्यथा राज्यांमध्ये आक्रोश वाढल्याशिवाय राहणार नाही.

नवोदय परीक्षेत यशस्वी विद्यार्थिनींच्या यशाचा जल्लोष

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

खामगाव दि.२९ : सुटाळा बु. ता. खामगाव येथील जि. प.म. उच्च प्रा. कन्या शाळेतील विद्यार्थिनींनी विविध शालेय परीक्षांमध्ये मिळवलेले यश म्हणजे एक अभिमानाचा क्षण. एन.एम.एम. एस. व जवाहर नवोदय विद्यालय परीक्षेत विद्यार्थिनींनी अतुलनीय कार्य एन.एम .एम.एस. परीक्षेत ७ विद्यार्थिनी मानवी हेलोडे,आदिती बगाडे ,गायत्री वानखेडे ,मानवी रिठे कनिष्का निंबाळकर ,सोनल उमाळे, जानवी हुंबर्डे तसेच जवाहर नवोदय विद्यालय परीक्षेत ८ विद्यार्थिनी श्रुती वाघ, स्पर्शिका राऊत, दीप्ती गव्हाड ,जानवी उगले, आचल इंगळे, संस्कृती बकाल, गौरी वानखडे ,आरुषी नाईक यशस्वी झाल्या आहेत.

या यशस्वी विद्यार्थिनींचे शाळेतील अत्यंत उत्साहात स्वागत मिरवणूक आयोजित करून सन्मानीत करण्यात आले. विद्यार्थिनींना फेटे बांधून, बँड वाजवून जोरदार स्वागत करण्यात आले. विद्यार्थिनींची गाडीत बसवून मिरवणूक काढण्यात आली. अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात सदर स्वागत रॅली संपूर्ण गावातून काढण्यात आली. त्याचप्रमाणे इयत्ता पहिली दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचेही स्वागत करण्यात आले. केशव समाधान इंगळे यांच्या बैलगाडीतून विद्यार्थिनींची मि रवणूक काढण्यात आली. गावकरी व पालकांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. मॅथ ओलंपियाड परीक्षेतही४९ विद्यार्थिनी गोल्ड मेडलिस्ट ठरले आहे सर्वत्र सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे. सदर स्वागत रॅलीचे आयोजन हे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश आमले तथा सर्व सदस्य, सदस्या यांनी केले असून मुख्याध्यापक अरुण सावंग, शिक्षक अभिमन्यू तायडे, अमोलसिंग राजपूत, नितेश पुंडे, शिक्षिका अलका धाडे, कल्पना चोपडे ,सुरेखा चव्हाण ,सुनीता अवचार, वर्षा हुसे,मनीषा शंखे, प्रिया देशमुख यांच्या संकल्पनेतून सदर स्वागत रॅली काढण्यात आली असून सर्व विद्यार्थिनींनी माझी शाळा माझा अभिमान असा जयघोष करत सर्व यशस्वी विद्यार्थिनींचे स्वागत केले. सदर स्वागत मिरवणुकीमध्ये डॉ. उमेश बोहरा यांनी विद्यार्थिनींना चॉकलेट वाटप केले व शरबत व पाण्याचे वाटप श्रीकृष्ण वानखेडे, रम ेश सातव, शिवा सुलतान यांनी केले असून सर्व यशस्वी विद्यार्थिनींना नोटबुक व कंपास किट देऊन श्रीमती सुनीताताई जाधव यांनी कौतुक केले .सदर कार्यक्रमास पांडुरंग राखोंडे सौ. सुरेखा राखोंडे,नारायण होनाळे,सुभाष वानखेडे , यांचे सहकार्य लाभले. जिल्हा परिषदेच्या शाळेच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे

जुगावरावर पोलिसांचा छापा; सात जुगारी अटक

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

शेगाव दि.२९ : तालुक्यातील माटरगाव बुद्रुक शिवारात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर जलंब पोलिसांनी २७ मार्च रोजी दुपारी ३.४५ वाजताच्या सुम ारास कारवाई केली. शेतातील निंबाच्या झाडाखाली रंगलेला बादशाह जुगाराचा डाव पोलिसांनी उधळून लावत ७ जणांना रंगेहाथ पकडले असून, एक आरोपी पसार होण्यात यशस्वी झाला आहे.

माटरगाव बुद्रुक शिवारातील स्वर्गीय शशी तायडे यांच्या शेतात काही जण पैशाच्या हार-जितीवर जुगार खेळत होते. जलंब पोलीस स्टेशनचे पोकाँ रवींद्र रामेश्वर गायकवाड व त्यांच्या पथकाने पंचासमक्ष या ठिकाणी छापा टाकला. अचानक झालेल्या या कारवाईमुळे जुगारांची एकच खळबळ उडाली. यामध्ये विशाल गजानन वाकोडे (३३), संतोष हरी धोटे (४१), शांताराम श्रीकृष्ण कोकाटे (४१), अजय संजय वानखडे (३०), तेजराव गजानन बाजारे (२४), विठोबा बाळू रावणचौरे (२९), नरेंद्र उर्फ बाळू श्रीधरराव देशमुख (५२) सर्व राहणार माटरगाव बुद्रुक, ता. शेगाव यांना अटक केली. या कारवाई दरम्यान, आरोपी गजानन भगवान मेहेते (३८) हा घटनास्थळावरून फरार झाला.पोलिसांनी घटनास्थळी जुगाराच्या डावावरील व अंगझडती तील रोख ८,१९० रुपये, ५० रुपये किमतीचे ५२ ताशपत्ते असा एकूण ८,२४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी जलंब पोलीस स्टेशनमध्ये अपराध क्रमांक १००/२०२६, कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नरवेल गावात भुरट्या चोरट्यांचा धुमाकूळ; पोलिस प्रशासनावर प्रश्नचिन्ह

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

मलकापूर दि.२९ : तालुक्यातील नरवेल गाव परिसरात भुरट्या चोरट्यांचा धुमाकूळ सुरू असून शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या तीन दिवसांत कोटेश्वर मंदिर परिसरातील शिवारात सतत चोरीच्या घटना घडत आहेत. तीन दिवसांपूर्वी रात्री अज्ञात चोरट्यांनी तीन शेतकऱ्यांच्या शेतातील पाण्याच्या मोटारी चोरी करून नेल्या. या प्रकरणी शेतकऱ्यांनी तक्रार दाखल करूनही अद्याप पंचनामा करण्यासाठी पोलीस कर्मचारी घटनास्थळी पोहोचलेला नाही, अशी गंभीर बाब समोर आली आहे.

दरम्यान, पोलिसांच्या विलंबाचा फायदा घेत चोरट्यांनी पुन्हा एकदा त्याच परिसरात आणखी एका शेतकऱ्याची पाण्याची मोटार चोरी केली. सतत घडणाऱ्या या घटनांमुळे शेतकरी वर्ग चिंतेत असून उन्हाळी पिकांना पाणी देण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर दसखेंड पोलिसांच्या कार्यपद्धतीवर गावकऱ्यांकडून नाराजी व्यक्त होत आहे. वारंवार विचारणा करूनही ''मनुष्यबळ कमी आहे, आम्ही इतर कामात व्यस्त होतो'' असेच उत्तर मिळत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. त्यामुळे पोलिस प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे चोरट्यांचे मनोबल वाढत असल्याची चर्चा गावात रंगू लागली आहे. काही ग्रामस्थांनी तर या चोरट्यांना अप्रत्याक्ष पाठिंबा मिळत असल्याची शंका व्यक्त केली आहे. पोलिसांकडून वेळेवर कारवाई होत नसल्याने जनतेचा विश्वास ढळत असल्याचे चित्र आहे. ''सदरक्षणाय खलनिग्रहणाय'' या ब्रीदवाक्याचा विसर तर पडला नाही ना, असा सवालही उपस्थित केला जात आहे.

सिंचन विहिरीचे मस्टर काढण्यास टाळाटाळ

साखरखेर्डा दि.२९ : रोजगार हमी योजने अतर्गत ग्रामपंच्यात साखरखेर्डा सिचंन विहीर मजुरांचे मस्टर काढण्यात टाळाटाळ करणाऱ्या सबंधितांवर तातडीने कारवाई करावी अशी मागणी साखरखेर्डा येथील गजानन दिलीप कोरडे यांनी जिल्हाधिकारी बुलढाणा यांचेकडे केली आहे. त्यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे,

साखरखर्डा भाग १ मध्ये माझ्या नावे गट क्र २८० मध्ये ०.६८ आर जमीन आहे आमच्या ग्रामपंचायत कार्यालयाने सिंचन विहीर मंजूर करून दिली आहे आर्थिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये माझ्या विहीरचे काम १००% पूर्ण झाले असून तरीही अद्याप मला रोजगार हमी योजने अंतर्गत एकाही मंजुराचे मस्टर जमा केले नाही ही विहीर खोदताना मला सुमारे सहा लाख रुपये एवढा खर्च आला आहे . हा पैसा मी खाजगी बँक, खाजगी सावकार, मित्र मंडळी, नातेवाईक, यांच्या कडून उसनवारी पध्दतीने तजवीज केला आहे. मष्टर न काढल्याने माझी आर्थिक गोची होत आहे माझा मानसिक छळ होत आहे ग्रामपंचायत मध्ये चौकशी केली असता मला उडवा उडवीचे उत्तर मिळत आहे. जाणूनबुजून व कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणा मुळे सदर कामावरील मस्टर निघाले नाही ग्रामपंचायत साखरखेर्डा येथे जे लोक आर्थिक दृष्ट्या सक्षम आहे व ज्यांना राजकीय पाठबळ आहे अशा मर्जीतल्या व्यक्तीची सिचंन विहीर सद्या स्थिति ऑनलाईन आहे व त्याचे मस्टर पडणे चालू आहे या प्रकाराची सखोल चौकशी करून संबंधितांवर कडक कारवाई करावी अन्यथा उपोषणाला बसण्याचा इशारा कोरडे यांनी निवेदनाच्या शेवटी दिला आहे.

प्रा.किशोर जाधव यांना महाराष्ट्र शासनाचा राज्यस्तरीय व्यसनमुक्ती पुरस्कार प्रदान

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

वडनेर भोलजी दि.२९ : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन यांच्या वतीने देण्यात येणारा राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसमुक्ती सेवा पुरस्कार २०२१/२२ सामाजिक कार्यकर्ता गटातुन चांदूर बिस्वा येथील रहिवासी अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचे माजी तालुका सेवाधिकारी तथा विद्यमान ग्रामसेवाधिकारी प्रा. किशोर अशोकराव जाधव यांना दि. २६ मार्च२०२६ रोजी प्रदान करण्यात आला.

पुरस्कार वितरण सोहळ्यात केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारीता राज्यमंत्री ना. रामदास आठवलें , महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे मंत्री संजय सिरसाठ, विभागाचे सचिव डॉ. हर्षदिप कांबळे, समाजकल्याण आयुक्त डॉ दिपा मुधोळ, जेष्ठ प्रबोधनकार सत्यपाल महाराज,नशाबंदी मंडळाच्या सरचिटणीस श्रीमती वर्षा विद्या विलास व विभागाचे अधिकारी यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. गेल्या दशाकापासून श्री गुरुदेव सेवा मंडळाचे माध्यमातून ग्रामगिता जिवन विकास परीक्षा, वृक्षारोपण, व्यसनमुक्ती प्रबोधन, क्रीडा क्षेत्रात कार्य करित आहेत.

जी.एस.कॉलेज येथे इंडस्ट्री अकॅडेमिया संवाद संपन्न

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

खामगाव दि.२९ : जी. एस. कॉलेज, खामगाव येथे अकाउंटिंग आणि चार्टर्ड अकाउंटंट सेवा क्षेत्रावर आधारित इंडस्ट्रीअकॅडेमिया इंटरॅक्शन सत्राचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

-२०२० चे महत्वाचे उद्दिष्ट म्हणून इंडस्ट्रीअकॅडेमिया इंटरॅक्शन वाढवून शिक्षण आणि इंडस्ट्री म धील संवाद वाढवावा ही काळाची गरज आहे ही बाब लक्षात घेऊन महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल द्वारे - -२०२६ अंतर्गत अकाउंटिंग अँड चार्टर्ड अकाउंटंट सर्विसेस इंडस्ट्री हा वेबीनार दिनांक २७ मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून खामगाव येथील सुप्रसिद्ध चार्टर्ड अकाउंटंट उमेशजी अग्रवाल उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना अकाउंटिंग क्षेत्रातील करिअर संधी, व्यावसायिक अपेक्षा, ऑडिट, टॅक्सेशन तसेच बदलते आर्थिक नियम व उद्योगातील नव्या घडामोडींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना अकाउंटिंग, ऑडिट, करप्रणाली तसेच आर्थिक नियमांचे पालन याबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच चार्टर्ड अकाउंटंट क्षेत्रातील करिअर संधी, आवश्यक कौशल्ये आणि सध्याच्या उद्योग क्षेत्रातील अपेक्षा याबाबत मार्गदर्शन केले. अग्रवाल यांनी आपल्या अनुभवातून विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्ये, प्रामाणिकपणा, अद्ययावत ज्ञान आणि सातत्यपूर्ण अभ्यासाचे महत्व पटवून दिले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना अकाउंटिंग व सीए क्षेत्रातील वास्तव परिस्थितीची स्पष्ट जाणीव झाली. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्लेसमेंट सेलचे समन्वयक डॉ. एच. एस. चांडक यांनी प्रस्ताविक करत कार्यक्रमाचे उद्दिष्ट स्पष्ट केले. या सत्रादरम्यान विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध प्रश्न विचारले व शंकांचे निरसन करून घेतले. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरला असून, त्यांना व्यावसायिक क्षेत्राची प्रत्यक्ष माहिती मिळाली. तसेच विद्यार्थ्यांच्या करिअरविषयी जागरूकता वाढून त्यांना योग्य दिशा मिळण्यास मदत झाली आहे अशे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य धनंजय तळवणकर यांनी केले.

धार्मिक

गुढीपाडवा ते श्री हनुमान जन्मोत्सवा पर्यंत उपासना

पेठेतील श्रीराम मारुती मंदिर संस्थानमध्ये श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

यावेळी मंदिर परिसरात सकाळपासून भक्तांचा उत्साह आणि आनंद ओसंडून वाहत होता.मंदिर परिसरात आकर्षक फुलांची सजावट, रांगोळी आणि विद्युत रोषणाईने उजळून निघाला होता,यावेळी बाबा वरणगावकर, संजय काळे, स्वप्निल पोद्दार यांनी ताकांचे वाटप केले. शेकडो भाविकांनी त्याचा लाभ घेतला.

बुलडाणा दि.२९ : येथील पेठेतील श्रीराम मारुती मंदिरात श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.

बुलडाणा शहराचे अध्यात्मिक वैभव असलेल्या श्रीराम मारुती मंदिर परिसरात सकाळपासून भाविकांची मोठी गर्दी पहायला मिळाली. राम जन्मला ग सखे, राम जन्मला या पारंपरिक गजराने आणि श्रीराम जय राम जय जय राम च्या गजराने मंदिर परिसर अक्षरशः दुमदुमून गेल्याचे पाहायला मिळाले.गुढीपाडवा ते श्री हनुमान जन्मोत्सव निमित्ताने श्रीराम रायास अभिषेक,मातृवर्गाची भजनसेवा, दैनिक व साप्ताहिक उपासना तसेच श्री क्षेत्र औदुंबर येथील वरदबुवा जोशी, शरद गुरव, तसेच राष्ट्रीय किर्तनकार श्री चारुदत्त आफळे यांचे किर्तन असे भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. ११५ वर्षाची वैभवशाली परंपरा असलेल्या पेठेतील श्रीराम मारुती मंदिरात भाविकांनी जयश्री राम च्या घोषणांनी एकच गर्दी केली होती.

गुरुवार दि २६ मार्च रोजी सकाळी १० वाजता श्री वरदबुवा जोशी यांचे गुलालाचे किर्तन सुरू झाले,व राम जन्माचा भावपुर्ण सोहळा १२ वाजता साजरा करण्यात आला. यावेळी श्रीराम मारुती मंदिर संस्थानचे अध्यक्ष डॉ प्रमोद देशपांडे, बुलडाणा अर्बन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक उपाख्य भाईजी,उपाध्यक्ष मधुसूदन कुलकर्णी, अनंताभाऊ देशपांडे,यांच्या शुभहस्ते श्री रामाची आरती करण्यात आली. यावेळी बोलताना बुलडाणा अर्बन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक उपाख्य भाईजी यांनी सांगितले की संपूर्ण जगात सध्या जे युद्धाचे व अस्थिरतेचे सावट आहे, त्यामुळे संपूर्ण मानव समाज होरपळून निघत असल्याने जगाच्या विश्वशांती साठी श्री रामाच्या चरणी प्रार्थना केली. यावेळी संस्थानचे अध्यक्ष डॉ प्रमोद देशपांडे यांनी संस्थानची ११५ वर्षाची गौरवशाली परंपरा विषद केली. दि २७ शुक्रवार सायंकाळी ७ वाजता हभप चारुदत्त आफळे यांनी आपल्या ओजस्वी वाणीतून विश्वधर्म ही संकल्पना आजच्या अस्थिर, संघर्षमय जगात अधिकच सुसंगत वाटते जात, धर्म, लिंग या भेदांच्या पलीकडे जाऊन माणूस म्हणून एकमेकांना स्विकारणं हिच खरी साधना आहे,असे म्हणत उपस्थित भाविकांच्या अंत:करणाला स्पर्श केला.यावेळी संस्थानचे विश्वस्त संजय कुलकर्णी, रामानंद कविश्वर, आशुतोष वाईकर, मोहन मामा कुलकर्णी,सुयोग अन्वेकर,प्रदिप कविमंडन, नितीन भालेराव,दादा भालेराव, पुजारी मंगेश सलफळे, धनंजय महाजन,विजय व्यवहारे, तसेच श्रीमती वैजयंती कस्तुरे, सौ.संध्या महाजन,सौ.वसुधा शास्त्री,सौ. माधुरी कुलकर्णी, नलिनी वरणगावकर, कल्पना भालेराव, या महिलांनी मोलाचे सहकार्य केले.

हिमालयीन समर्पण ध्यानयोग शिबीराचे शेगावमध्ये आयोजन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

शेगाव दि.२९ : श्री शिवकृपानंद स्वामी फाऊंडेशन द्वारा आयोजित आणि भारत सरकारच्या आयुष मंत्रालय द्वारा समर्थित हिमालयीन समर्पण ध्यानयोगाचे शिबीर श्री गजानन महाराजांच्या सान्निध्याने पावन झालेल्या शेगावमध्ये येत्याा ३१ मार्च २०२६ ते २ एप्रिल २०२६ या कालावधीत संध्याकाळी ६ वाजता स्व. गजानन दादा पाटील मार्केट यार्ड (कॉटन मार्केट) मैदान येथे सद्गुरू श्री शिवकृपानंद स्वामीजींच्या प्रत्यक्ष सान्निध्यात आयोजित करण्यात आले आहे. हिमालयीन समर्पण ध्यान योग शिबिर हे निःशुल्क आहे.

श्री शिवकृपानंद स्वामीजी एक आत्मसाक्षात्कारी ऋषी आहेत आणि हिमालयीन समर्पण ध्यानयोगाचे प्रणेते आहेत. सद्गुरु श्री गजानन महाराजांचे शेगाव येथील समाधी स्थान हे स्वामीजींचे प्रेरणास्रोत आहे. श्री गजानन महाराजांच्या कृपेने आणि प्रेरणेने स्वामीजी हिमालयात गेले व तिथून स्वामीजींना आत्मज्ञानाची प्राप्ती झाली.सद्गुरू श्री शिवकृपानंद स्वामीजी यांनी हिमालयात १६ वर्षे ध्यानसाधना करून ८०० वर्षांची प्राचीन समर्पण ध्यानयोग परंपरा समाजात रुजवली आहे. आज या ध्यानयोगाचा प्रसार ७२ हून अधिक देशांमध्ये झाला आहे. त्यांच्या जागतिक कार्याची दखल घेत, त्यांची वर्ल्ड मेडिटेशन फाऊंडेशनच्या जागतिक मेडिटेशन एक्स्पर्ट कमिटीमध्ये नियुक्ती करण्यात आली आहे. गाव येथे आयोजित हिमालयीन ध्यान शिबिराला ७२ देश विदेशातून येणार हजारो साधक येणार असून याचा विदर्भातील लोकांनी देखील लाभ घेऊन आपले आभा मंडळ विकसित करण्याकरीता या संधीचा लाभ घ्यावा. असे प्रतिपादन श्री शिवकृपानंद स्वामी फाऊंडेशन चे मुख्य प्रचारक आशिष कलावार यांनी आज पत्रकार परिषदेत केले. त्यावेळी सचिन भट्टभट्ट (कार्यालयीन व्यवस्थापन व देश विदेश समन्वयक.) सह अन्य मान्यवर हि उपस्थित होते समाजाच्या धकाधकीच्या आणि स्पर्धात्मक जीवनात वाढलेला ताणतणाव हाताळताना, दुःखी- कष्टी झालेला मनुष्य मनशांती मिळवण्यासाठी प्रयत्नरत आहे. ध्यानयोगाच्या मार्गाने अंतर्मुख होऊन आपले दुःख दूर करण्याचा उपाय आपल्या आतच आहे व त्यासाठी पूज्य स्वामीजी विश्वभरात हे ज्ञान देऊन मार्गदर्शन करतात.

अजिंक्य भारत
आपलं जालना
जालना, सोमवार, दि. ३० मार्च २०२६ www.ajinkyabharat.com

महत्त्वाचे

दुरुस्त्यांसह आज मनपाचा अर्थसंकल्प सादर होणार

जालना : जालना महानगर पालिकेच्या नवनियुक्त लोकप्रतिनिधींच्या पहिल्या स्थायी समिती समोर सोमवार, दि.३० मार्च रोजी आगामी वर्षाचा ४६३ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प एकूण ६० च्या वर दुरुस्त्यांसह सादर केला जाणार आहे. हा अर्थसंकल्प पालिकेच्या महासभेसमोर मांडला जाणार आहे. स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर यांच्या अध्यक्षतेखाली व आयुक्त आशिमा मित्तल यांच्या उपस्थितीत हा अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे.

वकिलावर चाकू हल्ला करुन लुटले

जालना : जालना शहरात रिक्षाचालक व अन्य तिघांनी वकिलास मारहाण करुन लूट केल्याची घटना घडली असून विष्णुपंत गणपतराव पाटील असे या वकीलाचे नाव आहे. न्यायालयाचे कामकाज ऑटोपून ते जालना येथून मंठा चौफुलीकडे जात असताना रोहनवाडी रोड येथे शुक्रवारी सायंकाळी हा प्रकार घडला. शुक्रवारी सायंकाळी ५.३० वाजेच्या सुमारास ते अंबड चौफुली येथून रिक्षात बसले. त्यांच्यासोबत अन्य काही प्रवासी बसले होते. मंठा चौफुलीकडे जात असताना रिक्षा चालकाने रिक्षा रोहनवाडी रोडकडे नेली. त्यानंतर त्यांच्या शेजारी बसलेल्या व्यक्तीने पाटील यांना चाकूचा धाक दाखवून त्यांच्या खिशातील मोबाईल आणि साडेपाच हजार रुपये रोख रक्कम काढून घेतली.

तेजल साळवेला तिरंदाजी स्पर्धेमध्ये कांस्यपदक

जालना : शहरातील आंतरराष्ट्रीय तिरंदाज तेजल राजेंद्र साळवे हिने बैंकॉक (थायलंड) येथे सुरू असलेल्या आशिया कप तिरंदाजी स्पर्धेत कांस्यपदक जिंकले आहे. आशिया कप वर्ल्ड रैंकिंग तिरंदाजी स्पर्धे (स्टेज १) मध्ये भारतीय महिला कंपाउंड संघाने उत्कृष्ट कामगिरी करत रौप्यपदक जिंकले. तेजल राजेंद्र साळवे, चिकिथा तानिपार्थी आणि राज कौर यांनी उत्कृष्ट समन्वय आणि कौशल्याचे प्रदर्शन करत अंतिम फेरी गाठली आणि देशासाठी महत्त्वाचे रौप्यपदक मिळवले.

जालना जिल्ह्यासाठी हवामान विभागाचा सतर्कतेचा इशारा; नागरिकांनी दक्षता बाळगावी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

जालना, दि. २९ : जालना : जिल्ह्यात येत्या काही दिवसांत वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली असून, नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. भारतीय हवामान विभाग च्या अंदाजानुसार ३० मार्च ते २ एप्रिल दरम्यान जिल्ह्यात विविध ठिकाणी वीजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांनी प्रसिद्ध केलेल्या प्रसिद्धी पत्रिकानुसार, २९ मार्च रोजी दुपारी मिळालेल्या हवामान अंदाजाच्या आधारे पुढील काही दिवसांसाठी 'यलो' आणि 'ऑरेंज' अलर्ट जारी करण्यात आले आहेत.

अलर्टनुसार संभाव्य स्थिती

३० मार्च २०२६ : यलो अलर्ट जारी असून तुरळक ठिकाणी वीजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस व ३० ते ४० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता.

३१ मार्च २०२६ : ऑरेंज अलर्ट जारी; वीजांच्या कडकडाटासह पाऊस, ५० ते ६० किमी प्रतितास वेगाने वादळी वारे आणि काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता.

१ एप्रिल २०२६ : यलो अलर्ट; वीजांच्या कडकडाटासह मध्यम पाऊस व ४० ते ५० किमी प्रतितास वेगाने वारे.

२ एप्रिल २०२६ : यलो अलर्ट; वीजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता कायम.

नागरिकांसाठी प्रशासनाच्या सूचना

*विजांच्या कडकडाट व वादळी वाऱ्याच्या वेळी घराबाहेर अनावश्यक हालचाल टाळावी.

*विजेच्या तारा, झाडे व उंच बांधकामांपासून दूर राहावे.

* मेघगर्जना/वीजांच्या वेळी झाडाखाली उभे राहू नये व सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा.

* मोकळ्या मैदानात, विद्युत खांब, ट्रान्सफॉर्मर व लोंबकळणाऱ्या तारांपासून दूर राहावे.

*वीज कडकडाटाच्या वेळी शक्यतो विद्युत उपकरणांचा वापर टाळावा.

* वाहनचालकांनी सावधगिरी बाळगून सुरक्षित ठिकाणी वाहन उभे करावे.

*शेतकऱ्यांनी काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवावीत.

*वादळी पाऊस व विजांच्या कडकडाटाच्या वेळी जनावरांना सुरक्षित ठिकाणी ठेवावे.

*वादळी वाऱ्यामुळे पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी.

*नागरिकांनी हवामान विभागाच्या अद्ययावत अंदाजावर लक्ष ठेवून स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे.

*जिल्हा प्रशासनाने नागरिकांना हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करून सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

घाणेवाडी जलवाहिनीच्या गर्डरची पुन्हा एकदा चोरी

दुरुस्तीसाठी नवीन जालना भागाचा पाणी पुरवठा उशिराने

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

जालना, दि. २९ : घाणेवाडी ते जलशुद्धीकरण केंद्रापर्यंतच्या मुख्य जलवाहिनीला आधार देणारे लोखंडी गर्डर चोरी गेल्याने शहराच्या पाणी पुरवठ्यावर परिणाम झाला असून, या गंभीर प्रकाराची दखल घेत चंदनझिरा पोलिसांनी चोरीस गेलेले २० फुटी लोखंडी गर्डर हस्तगत केले होते. प्रशासकीय स्तरावर जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरु करण्यात आले आहे. कन्हैयानगर (नाला) परिसरातील जलवाहिनीचे २० फुटी लोखंडी गर्डर दि. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी चोरट्यांनी लंपास केले होते. महापालिका प्रशासनाने याप्रकरणी तक्रार दाखल केल्यानंतर चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या पथकाने दि. १४ मार्च २०२६ रोजी सदर गर्डर जप्त करून पोलीस ठाण्यात जमा केले आहेत. याप्रकरणाचा तपास सुरु असतानाच पुन्हा दि. २५ मार्चच्या मध्यरात्री २० फुट लांबीचे २ लोखंडी गर्डर चोरट्यांनी लंपास केल्याचा प्रकार उघड़कीस आला आहे. महत्वाचे म्हणजे गर्डर चोरीला गेल्यामुळे संपूर्ण जलवाहिनी घसरण्याची भीती निर्माण झाली असून, संभाव्य मोठी दुर्घटना टाळण्यासाठी महापालिकेने सदर जलवाहिनीचा पाणीपुरवठा तात्काळ बंद केला आहे. या तांत्रिक बिघाडामुळे आणि गर्डरच्या पुनस्थापनेच्या कामामुळे नवीन जालना भागातील पाणी पुरवठा नियमित वेळेपेक्षा २ दिवस उशीराने होणार असल्याची माहिती महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाच्यावतीने देण्यात आली आहे.

जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम वेगाने सुरु असून लोखंडी गर्डर बसवून जलवाहिनीला पूर्ववत आधार देण्याचे काम पूर्ण होईपर्यंत नागरिकांनी सहकार्य करावे तसेच पाणी जपून वापरावे असे आवाहन पाणी पुरवठा सभापती सौ. पूनम राज स्वामी यांनी केले आहे.

दरम्यान, महापालिका प्रशासनाच्यावतीने या चोरीच्या घटनेबाबत चंदनझिरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्व.शब्बीर अन्सारी यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी शोकसभा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

जालना, दि. २९ : सर्वपक्षीय नागरी समितीच्यावतीने ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशनचे अध्यक्ष स्व.शब्बीर अहमद अन्सारी यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली शोकसभा अत्यंत भावनिक वातावरणात पार पडली.

या प्रसंगी संपर्कप्रमुख भास्करराव अंबेकर, उपमहापौर राजेश राऊत, इकबाल पाशा, डॉ.संजय राख, राजेंद्र राख, सत्संग मुंढे,

आप्पासाहेब देशमुख, महेमूद शेख, डेव्हिड घुमारे, अविनाश चव्हाण, सगीर अहमद, राम सावंत, दिनकर घेवंदे, कल्याण दळे, अरविंद देशमुख, राजेंद्र जाधव, मोहन इंगळे, अंकुश पाचफुले आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

शोकसभेत बोलताना शिवसेना संपर्क प्रमुख भास्करराव अंबेकर म्हणाले की, जालना जिल्ह्याचे एक प्रभावशाली, दूरदृष्टीचे नेतृत्व आपल्यातून निघून गेले आहे. स्व.अन्सारी साहेबांनी आयुष्यभर समाजाच्या न्याय, हक्क आणि सन्मानासाठी दिलेला लढा हा प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे. त्यांचे कार्य, त्यांची जिद्द आणि समाजसेवेची तळमळ ही येणाऱ्या पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरेल. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून न येणारी आहे.

एका दिवसात अनधिकृत रेल्वे प्रवासाची ५०० प्रकरणे आढळली

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

जालना, दि. २९ : प्रवाशांनी वैध तिकीटासह प्रवास करावा तसेच अनियमित प्रवासावर नियंत्रण ठेवण्यासाठी दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागात व्यापक तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेवर सहाय्यक वाणिज्य व्यवस्थापक नांदेड शैलेश कुमार सिंह यांनी देखरेख ठेवली. या विशेष मोहिमेत २८ तिकीट तपासणी कर्मचारी सहभागी झाले होते. विविध मार्गांवरील २५ गाड्यांची तपासणी करण्यात आली. या तपासणीदरम्यान विनातिकीट प्रवास, अनियमित प्रवास तसेच अनबुक्ड सामान यांची एकूण ५०० प्रकरणे आढळून आली असून त्यावर रेल्वे नियमांनुसार कारवाई करण्यात आली.यामध्ये ४४९ विनातिकीट प्रवास प्रकरणांमधून ₹२,१४,४१० भाडे व ₹१,१५,१९० दंड वसूल करण्यात आला. तसेच १५ अनियमित प्रवास प्रकरणांमधून ₹३,७३० भाडे व ₹३,७५० दंड वसूल करण्यात आला. याशिवाय ३६ अनबुक्ड लगेज प्रकरणांमधून ₹५,५०० रक्कम वसूल करण्यात आली. अशा प्रकारे या एकदिवसीय विशेष मोहिमेत ५०० प्रकरणांमधून एकूण ₹३,४२,५८० इतकी रक्कम वसूल करण्यात आली.

ॲड.बाविस्कर यांची मनसे जिल्हा संपर्क अध्यक्षपदी नियुक्ती

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

जाफ्राबाद, दि. २९ : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशानुसार पक्षाच्या संघटनात्मक रचनेत मोठे फेरबदल करण्यात आले असून पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी आमदार ॲड.जयप्रकाश बाविस्कर यांची जालना जिल्हा संपर्क अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

ॲड.बाविस्कर राज ठाकरे यांचे अत्यंत विश्वासू सहकारी म्हणून ओळखले जातात. त्यांच्याकडे पक्ष संघटनेचा दांडगा अनुभव असून एक उत्तम संघटक म्हणून त्यांची ख्याती आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या स्थापनेपासून ते सक्रिय असून पक्षाच्या विविध आंदोलनांत आणि संघटनात्मक बांधणीत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. बाविस्कर यांच्या नियुक्तीमुळे जालना जिल्ह्यातील मनसे कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून कार्यकर्त्यांनी या निवडीचे स्वागत केले असून त्यांच्या अनुभवाचा फायदा आगामी काळात जिल्ह्यात पक्ष अधिक मजबूत करण्यासाठी होईल, अशी भावना व्यक्त केली जात आहे.

या नियुक्तीमुळे जालना जिल्ह्यातील तसेच जाफ्राबाद तालुक्यात मनसेला नवी उभारी मिळणार आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही निवड अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. जाफ्राबाद तालुका सरचिटणीस पंढरीनाथ म्हस्के आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या निवडीचे स्वागत केले आहे.

भगवान महावीर स्वामी जन्मकल्याणक महोत्सवानिमित्त जालन्यात आरोग्य शिबिर

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

जालना, दि. २९ : भगवान महावीर स्वामी जन्मकल्याणक महोत्सवाचे औचित्य साधून भारतीय जैन संघटनेच्या जालना शाखेच्यावतीने मंगळवारी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळील गुरु गणेश तपोधाम परिसरात रक्तदान शिबीर, कॅन्सर तपासणी व मोफत नेत्र तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

भारतीय जैन संघटनेचे जालना शहराध्यक्ष तथा कार्यक्रमाचे संयोजक रजिश लुणिया यांनी या महोत्सवाच्या निमित्ताने

सेवाकार्याचा हा संकल्प केला आहे. त्या अंतर्गत जालना ब्लड बँकेच्या सहकार्याने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. विरा मेडीसिटी कार्किनोस कॅन्सर सेंटरच्या माध्यमातून व्हीइएल स्कोपद्वारे मुख कर्करोग तपासणी, ब्रेस्ट स्कॅनद्वारे स्तनाच्या कर्करोगाची तपासणी, महिलांसाठी गर्भाशय मुख कॅन्सर तपासणी याच हॉस्पिटलमध्ये निशुल्क करण्यात येणार आहे. लॉयन्स क्लब ऑफ जालनाच्यावतीने डोळ्यांची मोफत तपासणी केली जाणार असून गरजु रुग्णांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. भगवान महावीर जयंतीच्या निमित्ताने सेवा हाच धर्म मानून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमांचा जालना शहरातील जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजक राजेश लुणिया यांच्यासह भारतीय जैन संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

गौरव नागरी सत्कार संयोजन समितीच्यावतीने रोजेकर यांचा सत्कार सोहळा

जिल्ह्याने भिकन रोजेकर यांचा आदर्श घ्यावा-आ.कुचे

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

जालना, दि. २९ : आपल्याला संधी मिळाली की त्याचे सोने करणे हे आपले काम असते. रोजेकर यांना संधी मिळाली, आता तिचे सोने करणे त्यांच्या हातात असल्याचे आ.नारायण कुचे म्हणाले. आई बेबीताई, वडील जगन रोजेकर यांच्या उपस्थितीत भिकन रोजेकर यांचा गौरव सोहळा अत्यंत भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. त्यावेळी ते बोलत होते.

जिल्ह्यातील जळगाव सपकाळ येथे राहणारे भिकन जगन रोजेकर यांनी केंद्रीय लोकसेवा आयोग यूपीएससीच्यावतीने घेण्यात आलेल्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. यानिमित्त त्यांचा नागरी सत्कार संयोजन समितीच्यावतीने जालना शहरातील राजाराम नगर भागात असलेल्या संत सावता महाराज सामाजिक सभागृहात आयोजित करण्यात आला होता.

यावेळी व्यासपीठार महापौर श्रीमती वंदनाताई मगरे, उप महापौर राजेश राऊत, माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर, बाला परदेशी, नगरसेवक अश्विन अंबेकर, दुर्गेश काठोठीवाले, संयोजन समितीचे प्रा.सत्संग मुंढे, शेख महेमूद, विजय कामड, कॉ.सगीर अहेमद रजवी, बाला परदेशी, नगरसेवक अश्विन अंबेकर, दुर्गेश काठोटीवाले, देवराव सोनवणे, संजय इंगळे, वकील दशरथ इंगळे, राहुल देशमुख, अमोल खरात, ईश्वर गाडेकर आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलतांना आ.कुचे म्हणाले की, भिकन रोजेकर यांचे लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतील यश हे सर्वांनाच अभिमान वाटावे असे आहे. त्यांचा आदर्श घेऊन अनेक रोजेकर जिल्हयात निर्माण व्हावेत. रोजेकर यांनी भविष्यातही चांगले काम करावे चांगली माणसे सर्वांनाच हवी असल्याचे सांगून कर्तुत्ववान पुत्र घडविल्याबद्दल त्यांच्या आई वडिलांना धन्यवाद दिले. यावेळी बोलताना माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर म्हणाले की, अनेक जण पदे

मिळाल्यावर सामान्य माणसापासून दुरावतात पण रोजेकर हे अत्यंत प्रतीकूल परिस्थितीतून आल्यामुळे आपले पाय कायम जमिनीवर राहून सामान्य माणसाशी असलेली आपली नळ कधीही तुटेल असे आपणास वाटत नाही. आपल्या यशाचा आनंद केवळ आपले नातेवाईक यांनाच आनंद होतो असे नाही तर आपल्याशी संबंध नसलेल्या अनेकांना होतो. अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असतांना रोजेकर यांनी मिळवलेले यश हे खर्या अर्थाने त्यांची योग्यता सिद्ध करते.

यावेळी बोलताना उपमहापौर राजेश राऊत म्हणाले की, रोजेकर यांनी मिळवलेली यश हे सर्व जिल्हावासियांसाठी अभिमानाची बाब आहे. त्यांच्याकडे पाहून जिल्ह्यातील अनेकांना प्रेरणा मिळेल.

यावेळी महापौर वंदना मगरे यांनीही रोजेकर यांचे अभिनंदन करून भावी आयुष्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. सत्काराला उत्तर देताना भिकन रोजेकर म्हणाले की मला मिळालेले यश हे सहज नाही. प्रतिकूल परिस्थितीत माझे मनोधैर्य टिकवून ठेवण्याचं खूप मोठे आव्हान होतं. परंतु आई-वडील व भावांचा विश्वास हा मला या सगळ्यातून मार्ग काढण्याची प्रेरणा देत होता. जिल्ह्यात सर्व पुढारी, अधिकारी माझे कौतुक करीत आहेत तेंव्हा मला या शिक्षणाची काय ताकद आहे हे जाणवते असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा.सत्संग मुंडे म्हणाले की, जालन्यामध्ये आयोजित केले जाणारे सत्कार सोहळे हे मागील अनेक वर्षांपासून सातत्याने जिल्ह्यातील भूमिपुत्राच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी आयोजित केले जातात. यात कोणत्याही प्रकारची अपेक्षा व स्वार्थ असत नाही. या कार्यक्रमाचा उद्देशच जिल्ह्यातील हजारो विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे हा असल्याचे प्रा.सत्संग मुंढे यांनी सांगितले.

भिकन रोजेकर यांनी आपली कौटुंबिक परिस्थिती मांडताना कथन केलेले अनुभव अत्यंत हृदयविदारक होते. त्यांनी आपल्या आई-वडिलांनी अशिक्षित असतानाही आपल्याला दिलेला पाठिंबा, चार वेळा अपयश आल्यानंतरही दिलेलं प्रोत्साहन, खरंच सुशिक्षित व्यक्तीलाही लाजवेल याप्रमाणे होते. आई-वडिलांना शिक्षणाचे महत्व कळालेले असल्याने व त्यांनी शिक्षणाची ताकद जाणून घेतल्याने त्यांनी माझी हिंमत कधीच कमी होवू दिली नाही. त्यांच्या कष्टाचे चीज केले.

या कार्यक्रमासाठी जालना शहरासह जिल्ह्यातून अनेक विद्यार्थी व मान्यवरांनी उपस्थित राहून रोजेकर यांना शुभेच्छा दिल्या.

जिल्ह्यातील ३० महिला उद्योजकांचा व्यापारी महासंघाच्यावतीने सत्कार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

जालना, दि. २९ : व्यापारी महासंघ जिल्हा जालनाच्यावतीने महिला दिनानिमित्त जिल्ह्यातील लहान-सहान उद्योग, व्यवसाय करणाऱ्या ३० महिलांचा नुकताच पुरस्काराने गौरव करण्यात आला. व्यापारी संघटना कॅटच्या राष्ट्रीय प्रमुख व महिला गृह उद्योग महाराष्ट्र शासनाची राज्य संयोजिका पौर्णिमा शिरीषकर यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी जिल्हाध्यक्ष हस्तीमल बंब यांची प्रमुख उपस्थिती होती. या. कार्यक्रमात उज्वला सोमाणी (टेंभुर्णी), जयश्री आकात (सातोना), सविता घाटगे (जळगाव सपकाळ), जयश्री खरात (हसनाबाद), नंदा गाडे (दाभाडी), कमल वायकर (म. चिंचोळी), स्वाती तौर (आष्टी), रेवती शेळके (जाफराबाद), सिमला गवळी (माहोरा), उमा संभेराव (अण्वापाडा), संगीता थोटे (राजूर ग.), सोनाली सांवत (बदनापूर), वंदना देशमुख (तळणी), अर्चना बोकन (कुं. पिंपळगाव), ऊर्मिला अंबेकर (वडोद तांगडा), ज्योती बोर्डे (पिंपळगाव रे), स्वाती गिराम (सिंधी काळेगाव), राधा पोपळघट (हिसोडा), उषा चव्हाण (रामनगर सा.का.), वैशाली जाधव (भोकरदन), सारिका शेजुळ (जामखेड), रमा भुसारे (शहागड), शकुंतला लोहिया (अंबड), रेणुका पल्लोड (रोहिलागड), शेख आसमा मुजीब (घनसावंगी), कालिंदा अवघड (तीर्थपुरी), स्वाती लव्हाळे (धावडा), दुर्गा काबरा (परतूर) यांचा समावेश होता.

यावेळी जिल्हा महिला अध्यक्षा प्रिया जोशी, मराठवाडा विभागीय अध्यक्षा सीता मोहिते पाटील, सचिव आनंदी अय्यर व इतरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतिभा खाडे यांनी केले. उपस्थितांचे आभार सचिव संगीता पांगारकर यांनी मानले.

अजिंक्य भारत
आपलं अमरावती
अमरावती, सोमवार, ३० मार्च २०२६

जनधन खात्यात ४३७ कोटी जमा!

प्रधानमंत्री जनधन योजनेला जिल्ह्यात मोठे यश; खातेदारांना मिळाले सुरक्षित कवच

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

अमरावती, दि.२९ : प्रत्येक नागरिकाला बँकिंग प्रवाहात आणून आर्थिक व्यवहार पारदर्शक करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने सुरू केलेल्या प्रधानमंत्री जनधन योजनेला जिल्ह्यात मोठे यश मिळाल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्यात ९.६५ लाख नागरिकांनी या योजनेत खाती उघडली असून, यामध्ये तब्बल ४३७.५१ कोटी रुपयांची रक्कम जमा आहे.

जन-धन योजनेने प्रत्येक व्यक्तीला आर्थिक व्यवस्थेशी जोडण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. प्रधानमंत्री जन-धन योजनेंतर्गत देशात ५५ कोटींहून अधिक खाती उघडली असून, त्यात मोठी रक्कम जमा झाली आहे. या योजनेचा उद्देश प्रत्येक नागरिकाला औपचारिक बँकिंग व्यवस्थेशी जोडणे आणि आर्थिक व्यवहार पारदर्शक करणे हा आहे. जिल्ह्यात या योजनेला चांगला प्रतिसाद मिळाला आहे.

ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांपर्यंत बँकिंग सेवा पोहोचवण्यात या योजनेने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. विशेष म्हणजे काही खात्यांमध्ये अद्याप एकही रक्कम जमा नसली, तरी झीरो बॅलन्स सुविधेमुळे खातेदारांवर कोणताही दंड आकारला जात नाही. याशिवाय रूपे कार्ड, थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) आणि

विमा संरक्षणामुळे ही योजना सर्वसामान्यांसाठी अधिक उपयुक्त ठरत आहे. जिल्ह्यात ९,६५,३७८ खात्यांत ४३७ कोटी रक्कम जिल्ह्यात जनधन योजनेचा विस्तार वेगाने झाला आहे. आतापर्यंत विविध बँकांमध्ये मिळून सुमारे ९,६५,३७८ जनधन खाती उघडली गेली आहेत. या खात्यांमध्ये सर्वसामान्यांनी आपल्या बचतीचे ४३७ कोटी ५१ लाख रूपये ६.८६ लाख खातेदारांच्या हाती रूपे कार्ड डिजिटल व्यवहारांना चालना देण्यासाठी जनधन खातेदारांना रूपे डेबिट कार्ड दिले जाते.

जिल्ह्यात आतापर्यंत ६ लाख ८६ हजार २७४ खातेदारांना या कार्डाचे वाटप करण्यात आले आहे. या कार्डचा वापर करून खातेदार एटीएममधून पैसे काढू शकतात किंवा दुकानांमध्ये स्वाइप करून खरेदी करू शकतात. जनधन खात्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे हे खाते झीरो बॅलन्स सुविधा देते. सामान्य बचत खात्यात किमान शिल्लक न राखल्यास बँका दंड आकारतात. मात्र, जनधन खातेदारांच्या खात्यावर शून्य रक्कम असली तरीही त्यांना एक रुपयाचाही दंड आकारला जात नाही. जनधन योजनेंतर्गत खाते उघडणाऱ्यांना विम्याचे मोठे कवच मिळते. २८ ऑगस्ट २०१८ नंतर उघडलेल्या खात्यांच्या रूपे कार्डवर दोन लाख रुपयांचा अपघाती विमा मिळतो.

तसेच, पात्र खातेदारांना ठराविक अटींनुसार नैसर्गिक मृत्यू झाल्यास जीवन विमा संरक्षणाचीही तरतूद आहे, ज्यामुळे

> जनधन योजनेमुळे दुर्गम भागातील नागरिक मुख्य प्रवाहातील बँकिंगशी जोडले गेले आहेत. शून्य शिल्लक असलेल्या खात्यांवर दंड आकारला जात नाही, या खातेदारांना अनेक सुविधेचा लाभ मिळतो.
>
> **नरेश हेडाऊ, व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक**

कुटुंबाला आर्थिक आधार मिळतो. ९.६५ लाख खात्यांपैकी सुमारे ७०,२५७ खात्यांमध्ये सध्या झीरो बॅलन्स आहे. मजुरी करणाऱ्या किंवा अत्यल्प उत्पन्न असलेल्या नागरिकांनी ही खाती उघडली असून, भविष्यातील आर्थिक लाभांसाठी ही खाती सक्रिय राहतील याची काळजी बँकांकडून घेतली जात आहे.शासकीय योजनांचा लाभ मिळवण्यासाठी पूर्वी होणारी दिरंगाई आता पूर्णपणे थांबली आहे. डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफरमुळे गॅस सबसिडी, पेन्शन, शेतकरी सन्मान निधी आणि इतर योजनांचे पैसे मध्यस्थांशिवाय थेट जनधन खात्यात जमा होत आहेत.प्रधानमंत्री जनधन योजनेचा उद्देश देशातील प्रत्येक नागरिकाला बँकिंग सेवांच्या कक्षेत आणणे हा आहे. याअंतर्गत शून्य शिल्लक खात्याची सुविधा, रूपे डेबिट कार्ड, विमा संरक्षण आणि थेट लाभ हस्तांतरणाचा लाभदिला जातो.

ई-गव्हर्नन्समध्ये महानगरपालिकेचा राज्यात पाचवा क्रमांक

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

अमरावती, दि.२९ : महाराष्ट्र सरकारच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स कार्यक्रमांतर्गत केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल, अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांचा मुंबईतील सह्याद्री सभागृहात आयोजित एका कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.या राज्यस्तरीय मूल्यांकनात, अमरावती महानगरपालिकेने २०० पैकी १७९.५० गुण मिळवून २९ महानगरपालिकांमध्ये पाचवे स्थान पटकावले आहे.

विशेष म्हणजे, अमरावती महानगरपालिकेने विदर्भ आणि मराठवाडा विभागातून या प्रतिष्ठित यादीत स्थान मिळवले आहे.आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या तंत्रज्ञान-आधारित, पारदर्शक आणि नागरिक-केंद्रित उपक्रमांमुळे हे यश शक्य झाले आहे. मर्यादित संसाधने असूनही मोठ्या महानगरपालिकांशी स्पर्धा करून मिळवलेले हे यश विशेष उल्लेखनीय आहे.

महानगरपालिकेने राबवलेल्या प्रमुख उपक्रमांमध्ये मर्या अमरावती, व्हॉट्सॲप, चॅटबॉट चॅनेल आणि मोबाईल ॲप्सद्वारे नागरिकांशी सुलभ संवाद; रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानावर आधारित कूल रूफ उपविधी २०२५; शासकीय प्रक्रिया पुनर्रचना अंतर्गत सेवांचे डिजिटायझेशन आणि नवीन वेब पोर्टल्सची निर्मिती; ब्लॉकचेन तंत्रज्ञानाद्वारे परवाने आणि प्रमाणपत्रांची पडताळणी; आणि मालमत्ता करासह विविध विभागांमध्ये जीआयएस तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यांचा समावेश आहे.

थोडक्यात

मुदत ठेवीच्या रकमेत गैरव्यवहार

नांदगाव खंडेश्वर : शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागरी मागासवर्गीय ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था आहे. त्यात एका महिलेसह पुरुषाने संस्थेचे सभासद व ठेवीदार मृतक भीमराव गुलाबराव कटकतलवारे, रा. नांदगाव खंडेश्वर यांनी ११ लाख ८५ हजारांच्या मुदत ठेवीत गुंतवणूक केली होती. मात्र संस्थेचे अध्यक्ष व व्यवस्थापक यांनी संगनमताने मुदत ठेवीच्या रकमेत गैरव्यवहार करीत त्यांची फसवणूक केली होती. याबाबत मृतकाने सहाय्यक निबंधक सहकारी संस्थेकडे तक्रार केली होती. त्या अनुषंगाने १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२१ या कालावधीतील लेखा परीक्षण करण्याचे आदेश वरिष्ठांकडून देण्यात आले होते. त्यात हा प्रकारउघडकीस आला. त्यामुळे संस्थेचे उपलेखा परीक्षक राजेंद्र वसंतराव बहिरुवाले (५४, रा. अमरावती) यांनी नांदगाव खंडेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

चारचाकीच्या धडकेत मायलेक जखमी

लोणी टाकळी : आई व मुलगा दुचाकीन (एमएच २७-बीएम ३२७७) वाटपूर येथून अमरावतीला येत होते. दरम्यान लोणीजवळ मागून आलेल्या भरधाव चारचाकीने त्यांना धडक दिली. त्यानंतर चालक वाहनासह घटनास्थळावरून पळून गेला. त्यात दुचाकीस्वार आई व मुलगा जखमी झाले. जखमी अर्पण अर्जुनराव बनसोड (२५, रा. वाटपूर, ता. नांदगाव खंडेश्वर) यांच्या तक्रारीवरून लोणीटाकळी पोलिसांनी चारचाकीच्या चालकाविरुद्ध अपघाताचा गुन्हा नोंदवला.

बालविवाह जोडणाऱ्यावर गुन्हे दाखल

धारणी : गेल्या पावसाळ्यात १६ वर्षीय मुलगी बहिणीकडे काम करण्यासाठी गेली. त्या वेळी जावयाने तिच्यावर वारंवार अत्याचार केला. त्यातून ती सात महिन्यांची गर्भवती राहिली. दरम्यान तिच्या आईला ही बाब माहिती होताच तिने मुलीचा विवाह लावून दिला. दरम्यान तिला प्रसुतीसाठी अकोला येथे शासकीय रुग्णालयात दाखल केले असता, ती अल्पवयीन असल्याचे दिसून आले. या संदर्भात धारणी पोलिसात तिघांवर गुन्हे नोंदवण्यात आले.

चिखलदरा महानगरपालिकेची मालमत्ता सील

२६ हजार रुपयांचा कर थकीत प्रकरण

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

चिखलदरा, दि.२९ : मालमत्ता कर वसुलीबाबत महानगरपालिका प्रशासन आता कठोर भूमिका घेत आहे. महानगरपालिका प्रशासन थकबाकीदारांच्या मालमत्ता सील करणे सुरूच ठेवत आहे. या उपक्रमांतर्गत, चिखलदरा परिसरातील म्हाडा कॉलनी, वॉर्ड क्र.५ मधील मालमत्ता क्रमांक एलईएआके ००००००७०० ही २६ हजार ८०२ रूपयाच्या कर थकबाकीमुळे आज सील करण्यात आली. ही कारवाई

मुख्य अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार करण्यात आली. वारंवार नोटीस देऊनही मालमत्ता मालकाने प्रतिसाद न दिल्याने प्रशासनाने कठोर कारवाई केली. शहरभरात सध्या एक विशेष वसुली मोहीम सुरू आहे, ज्यामध्ये दीर्घकाळापासून कर न भरलेल्या मालमत्ता मालकांवर लक्ष केंद्रित केले जात आहे. थकबाकीदारांना इशारा महानगरपालिका प्रशासनाने थकबाकीदारांना ताकीद दिली आहे की त्यांनी तात्काळ कर भरावा, अन्यथा मालमत्ता सील करणे, जप्त करणे किंवा इतर कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल. शहराच्या विकासासाठी मालमत्ता कर भरणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे आवाहन करण्यात आले आहे.

८० वर्षीय वृद्धाचा मृत्यू

दर्यापूर : तालुक्यातील थिलोरी येथील एका ८० वर्षीय वृद्धाचा त्यांच्या मुलाच्या नाचोना येथील राहत्या घरी पडल्यामुळे मृत्यू झाला. डोक्याला मार लागल्याने त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये हलविण्यात आले होते. मात्र त्यांचे प्राण वाचू शकले नाहीत. पंजाबराव वाकपांजर असे मृताचे नाव आहे. खल्लार पोलिसांनी २६ मार्च रोजी मृत्यूची नोंद केली. या प्रकरणाचा तपास दर्यापूर पोलिस करीत आहे.

कर्जबाजारी कामगाराची आत्महत्या

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

अमरावती, दि.२९ : शेअर बाजारात गुंतवणूक करण्यासाठी पाच राष्ट्रीय बँकांकडून लाखो रुपयांचे कर्ज घेतलेल्या एका कामगाराने नांदगाव पेठेतील बिझीलँड बिझनेस कॉम्प्लेक्समध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली. कामगाराचे नाव रोहित छगनलाल रंक (३०, जामनगर, गुजरात) असे आहे.नांदगाव पेठ पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक गणेश राऊत यांनी सांगितले की, या बिझनेस कॉम्प्लेक्समध्ये मोटर पंपांच्या विक्रीचे गोदाम आहे.रोहित रंक आणि त्याचा गुजरातचा साथीदार

तिथे काम करत होते. दोघे एकत्र राहत होते. गेल्या चार दिवसांपासून रोहित कामामुळे व्हीआरएल गॅरेजशेजारील मोटर पंपाच्या गोदामात झोपत होता. गुरुवारी जेव्हा मित्राने फोन केला, तेव्हा रोहितने उत्तर दिले नाही.त्यानंतर तो मित्र बिझीलँड कॉम्प्लेक्समध्ये पोहोचला. त्याने शटर उचलले असता रोहित रंक गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसला. त्याने तात्काळ पोलिसांना माहिती दिली. नांदगाव पेठ पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी त्याचा मोबाईल फोन तपासला, तेव्हा रोहितने अनेक बँकांकडून लाखो रुपयांचे कर्ज घेतल्याचे उघड झाले. २५ मार्च रोजी त्याने २.४ लाख रुपयांचे कर्ज घेऊन ती रक्कम शेअर बाजारात गुंतवली होती.उपनिरीक्षक गणेश राऊत यांनी दिलेल्या अहवालानुसार, त्याचे व्यवहार गुगल पे द्वारे दिसत होते. याच कारणामुळे रोहित रंकने आत्महत्या केली असावी, असा पोलिसांना संशय आहे.

रेल्वेने कटलेल्या मृतदेहाची ओळख पटली

अमरावती, दि.२९ : बडनेरा रेल्वे स्थानकाजवळील रेल्वे ट्रॅकवर गुरुवार, २६ मार्च रोजी आढळलेल्या अज्ञात व्यक्तीच्या मृतदेहाची ओळख पटवण्यात बडनेरा लोहमार्ग पोलिसांना (जीआरपी) यश आले आहे. नागेश पांडुरंग खडसे (वय ४५, रा. अंजनगाव बारी) असे मृत व्यक्तीचे नाव असून, त्यांचा मृत्यू रेल्वे अपघातात झाल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, नागेश खडसे यांची मानसिक प्रकृती मागील काही दिवसांपासून अस्थिर होती आणि त्यांच्यावर उपचार सुरू होते. गुरुवारी ते घरातून बाहेर पडले आणि बडनेरा येथील नागपूरकडे जाणाऱ्या डाऊन रेल्वे ट्रॅकवर पोहोचले. त्याचवेळी रेल्वेची धडक बसून त्यांचा जागीच मृत्यू झाला, अशी प्राथमिक माहिती पोलिस तपासात समोर आली आहे. घटना घडल्यानंतर परिसरात मोठी खळबळ उडाली होती. अज्ञात मृतदेहाची ओळख पटवण्यासाठी बडनेरा जीआरपी पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला.

गोबरखाऊ येथे शॉर्टसर्किटमुळे गहू-हरभरा जळून खाक

काढणीला आलेला घास नियतीने हिरावला

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

धारणी, दि.२९ : धारणी तालुक्यातील गोबरखाऊ येथे वीज तारांमध्ये झालेल्या शॉर्टसर्किटमुळे भीषण आगीत शेतकरी सुरेश ढिमरेकर यांचे ७ एकरांवरील गहू व हरभऱ्याचे पीक पूर्णत: जळून खाक झाले. काढणी करून एकत्र साठवून ठेवलेले हे पीक काही क्षणांत राखेत परिवर्तित झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ढिमरेकर यांनी वर्षभर मेहनत घेऊन गहू आणि हरभऱ्याचे पीक घेतले होते. पीक काढणीला आल्याने त्यांनी काही दिवसांपूर्वीच ते कापून शेतात एकत्र

साठवले होते. दरम्यान, शेतातून गेलेल्या वीज तारांमध्ये अचानक शॉर्टसर्किट होऊन ठिणग्या पडल्या आणि त्या वाळलेल्या पिकाच्या ढिगाऱ्यावर जाऊन पडताच आग भडकली. वाऱ्याच्या वेगामुळे आगीने काही क्षणांतच रौद्र रूप धारण केले. त्यामुळे शेतकऱ्याला पीक वाचवण्याची संधीही मिळाली नाही. या आगीत 4 एकर गहू आणि ३ एकर हरभरा असा एकूण ७ एकरांवरील लाखो रुपयांचा माल भस्मसात झाला. घटनेची माहिती मिळताच धारणी पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. तसेच अग्निशामक दलाला पाचारण करण्यात आले. सुदैवाने जीवितहानी टळली असली तरी आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात झाले आहे.दरम्यान, कष्टाने पिकवलेला माल बाजारात जाण्याच्या उंबरठ्यावर होता. मात्र वीज विभागाच्या निष्काळजीपणामुळे आम्ही उघड्यावर आलो आहोत. शासनाने तात्काळ पंचनामा करून योग्य भरपाई द्यावी, अशी मागणी पीडित शेतकरी सुरेश ढिमरेकर यांनी केली आहे.

दुर्लक्ष पोलीस हस्तक्षेपाची गरज; महसूली व अन्नपुरवठा यंत्रणेवर प्रश्नचिन्ह

शासकीय धान्याच्या काळाबाजाराला प्रशासकीय पाठराखण ?

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

अंजनगाव सुर्जी, दि.२९ : तालुक्यात शासकीय स्वस्त धान्य योजनेअंतर्गत वितरित होणाऱ्या तांदळाच्या काळाबाजाराचे गंभीर स्वरूप उघड होत असून, यामागे संगनमत आणि प्रशासकीय दुर्लक्ष असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे. शिधापत्रिकाधारकांसाठी असलेला तांदूळ मोठ्या प्रमाणावर तस्करांच्या साखळीमार्फत परतवाडा-चांदूरबाजार मार्गावरील गोडाऊनमध्ये साठवला जात असल्याचे समोर येत आहे. मात्र तरीही प्रशासकीय पाठराखणमुळे हा माल खुल्या बाजारा विकल्या जात असल्याची माहिती आहे. आता यामध्ये पोलीस विभागाने हस्तक्षेप करणे

गरजेचे झाले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, काही लाभार्थी स्वस्त दरात मिळणारा तांदूळ २० ते २२ रुपये प्रति किलो दराने विकत असून, तस्करांचे एजंट गावागावांत जाऊन थेट घरोघरी हा तांदूळ खरेदी करत आहेत. या व्यवहारासाठी व्यवस्थित जाळे उभे करण्यात आले असून, अंजनगाव सुर्जी, पथ्रोट, परतवाडा-अचलपूर, चिखलदरा आणि धारणी परिसरातून तांदूळ गोळा करून त्याची वाहतूक व साठवण केली जात असल्याची माहिती पुढे येत आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणामागे काही प्रभावशाली व्यक्ती व अधिकाऱ्यांचे संरक्षण असल्याचा संशय व्यक्त होत आहे. त्यामुळेच एवढ्या मोठ्या प्रमाणावर काळाबाजार होत असतानाही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.स्थानिक पोलिसांना तांदूळ वाहतूक करणाऱ्या वाहनांची माहिती असूनही निष्क्रियता दिसून येत असल्याने नाराजी वाढली आहे. अन्नपुरवठा व महसूल विभागाच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, रेशनचा तांदूळ उघडपणे विकला जात असताना प्रशासन नेमके काय करत आहे? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

विशेष पथकाने कारवाई करण्याची गरज

या प्रकरणाची जिल्हास्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच पोलीस अधीक्षकांनी विशेष पथकाद्वारे तस्करीविरोधी मोहीम राबवावी, अशी मागणी जोर धरत आहे. अन्यथा गरिबांच्या हक्काचा अन्नसाठा तस्करांच्या ताब्यात जाण्याचा धोका अधिक वाढण्याची भीती व्यक्त होत आहे.

राजकमल उड्डाणपुलावर तरुणावर हल्ला

अजिंक्य भारत प्रतिनिधी

अमरावती, दि.२९ : राजकमल चौक ते रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या उड्डाणपुलावर गुरुवारी रात्री एका २५ वर्षीय तरुणावर चाकूने हल्ला करून त्याला ठार मारण्याचा प्रयत्न करण्यात आला. रामनवमीच्या रॅलीदरम्यान झालेल्या एका किरकोळ वादाचा बदला घेण्यासाठी हा हल्ला करण्यात आला. शहर कोतवाली पोलिसांनी या प्रकरणी हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार विनोद सूर्यकांत अजबे (२५, रा. हमालपुरा) आणि जखमी पवन विलास भगत हे मित्र आहेत. २६ मार्च रोजी रामनवमीच्या रॅलीदरम्यान राजकमल चौकात आरोपी यश काटे आणि पवन यांच्यात वाद झाला. हा वाद मिटवण्याच्या बहाण्याने आरोपी यश काटेने पवन भगतला बोलावून रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या बंद उड्डाणपुलावर बोलावले.जेव्हा पवन आपल्या मित्रांसोबत तिथे पोहोचला, तेव्हा आरोपी यश काटे आणि त्याच्या दोन साथीदारांनी त्याला घेरले. वाद वाढल्याने आरोपींनी पवनला पकडले आणि त्यांच्या एका साथीदाराने चिनी चाकूने त्याच्या पोटात वार करून त्याला गंभीर जखमी केले. हल्ल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पळून गेले. जखमी पवनला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. शहर कोतवाली पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या कलम १०९ (१), ११५ (२), ३५२, ३ (२) आणि महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम १३५ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

अजिंक्य भारत
आपलं अमरावती
अमरावती, सोमवार, ३० मार्च २०२६

मनपाच्या उदासिनतेमुळे कोट्यवधीचे भाडे व मालमत्ता कर बुडाला

■ २० वर्षांपासून ८४ दुकानदारांना पालिकेचे अभय ■ नियमित कर भरणाऱ्यांना तगादा

अजिंक्य|भारत प्रतिनिधी

अचलपूर, दि.२९ : जसापूर चांदूरबाजार नगरपरीषदेच्या नगरपरिषद प्रशासनाच्या उदासीनतेने सर्व विक्रम तोडले असल्याचे दिसते. गेल्या २० वर्षापासून शहरातील स्टेट बँकेसमोरील ८४ दुकानाचे लिज रद्द झाली. परिणामी ते कायद्यानुसार अतिक्रमण असतानाही अद्याप सदर अतिक्रमण काढण्यात तर आलेच नाही, तर त्यांच्याकडून गेल्या २० वर्षात एक पैसाही भाडे व मालमत्ता करापोटी वसुल करण्यात आला नाही. यात पालिकेचा कोट्यवधीचा कर बुडाला, हे वास्तव असताना अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. आता नवनिर्वाचित पदाधिकारी विराजमान झाले आहे. त्यांच्यासमोर या गंभीर प्रकरणाचे आव्हान उभे ठाकले आहे. यावर ते काय भूमिका घेतात, याकडे नागरिक व नियमीत भाडे व मालमत्ता कर भरणाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

नियमित भाडे व मालमत्ता कर भरणाऱ्यांना पालिकेचे वसुली पथक अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार तगादा लावतात. अशातच कित्येक वर्षापासून थकीत व चालू भाडे थकीत असणाऱ्यांवर कारवाई करतात. अशातच थकीत गाळेधारकांच्या दुकानाला सील लावले जाते. हे सर्व पालिका व वरिष्ठांच्या निर्देशानुसार होत असले तरी स्टेट बँकेसमोरील ८४ दुकानांना मात्र यातून अभय देण्यात येत आहे. हे दुकानदार गेल्या २० वर्षांपासून पालिकेने लिज रद्द केल्यानंतरही पालिकेच्या मालकीच्या जागेवर आपली ८४ दुकाने थाटून व्यवसाय करीत आहेत: मात्र या काळात पालिकेचा एक कोटीच्यावर भाडे व मालमत्ता कर बुडाला.

पालिकेने सन २००६ मध्ये त्या दुकानांची लिज रद्द केली. तरी पालिकेच्या मालकीच्या जागेवर गेल्या २० वर्षापासून ८४ दुकानदार दुकाने थाटून आहेत. नियमित भाडे व कर भरणाऱ्या दुकानदाराकडून सालाना भाड्यात ५ टक्के वाढ करून भाडे व या व्यतिरिक्त मालमत्ता पालिका एकत्रित वसुल करते: मात्र अतिक्रमित दुकानदारांना अभय देते. या ८४ दुकानावरील भाडे, मालमत्ता कर व व्याजाची आकारणी करता पालिकेचा कोट्यवधीचा महसूल बुडाल्याचे स्पष्ट होते. अतिक्रमित दुकानांचा लाखो रुपयात बेकायदा विक्री करण्याचा गोरखधंदा सुरु असतानाही पालिकेचे दुर्लक्ष पदाधिकारी व प्रशासनाच्या हेतूवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे ठरत आहे. यात नियमित कर भरणाऱ्यात असंतोष वाढत आहे. याचा त्वरित तोडगा काढण्यासाठी पत्रकार खंडारे यांनी पालिका कार्यालयासमोर उपोषण केले होते. त्यावेळी तत्कालीन मुख्याधिकारी यांनी उपोषणकर्त्याला सदर प्रकरण तातडीने सोडविण्याचे लेखी आश्वासन दिले होते: परंतु त्यावर अद्यापही काहीच कारवाई झाली नाही. विद्यमान आमदारांनीही वात अद्याप लक्ष घातले नाही. आजही हे अतिक्रमित दुकानदार दोन मजली लोखंडी बांधकाम करून दिमाखात व्यवसाय करीत आहेत. तत्कालीन मुख्याधिकारी पराग वानखडे यांनी सदर दुकानावर अतिक्रमणविरोधी कारवाई करण्यासाठी पोलिस बंदोबस्तासह सर्व प्रशासकिय प्रक्रिया सुरु केली असतानाच त्यांची येथून तातडीने बदली करण्यात आली, हे विशेष.

वादग्रस्त ८४ दुकानदारांची लीज रद्द केल्यानंतर त्यावर तत्कालीन लोकप्रतिनिधीने मंत्रालयातून स्थगनादेश आणल्यामुळे सदर दुकानदार गेल्या २० वर्षापासून भाडे व कर न भरता व्यापार करीत आहे. यात पालिकेचे कोट्यवधीचे नुकसान झाले, याला तत्कालीन लोकप्रतिनिधी जबाबदार असून ही नुकसान भरपाई त्यांच्याकडून वसूल करावी.

गोपाल तिरमारे, माजी नगरसेवक

जनगणनासह इतर कामे असल्याने अतिक्रमणाकडे लक्ष देण्याला वेळ नाही. सदर वादग्रस्त दुकानाचे प्रकरण न्याय प्रविष्ट असल्याने पालिका प्रशासन न्यायालयाच्या आदेशानंतरच कारवाई करेल.

गीता ठाकरे,
मुख्याधिकारी न.प. चांदूरबाजार

सदर दुकानाच्चे अतिक्रमित दुकानदार भाडेव कर गेल्या २० वर्षापासून अदा करत नसल्याने पालिकेचे कोट्यवधीचे नुकसान होत आहे. यावर तोडगा काढणे गरजेचे आहे. हीच आमच्या सर्व नगरसेवकांची भूमिका आहे. न्यायालयात या प्रकरणात पालिका जिंकल्याची माहिती आहे. न्यायालयाचा आदेश प्राप्त झाल्यानंतर मार्चनंतर यावर कारवाई केली जाईल.

मनीषा नांगलीया,
नगराध्यक्ष न. प. चांदूर बाजार

थोडक्यात

शहरात दोघांचा आकस्मिक मृत्यू

अमरावती : शहरात एकाच दिवशी दोघांचा आकस्मिक मृत्यू झाल्याच्या घटना घडल्यात. चंद्रशेखर मनोहराव पाठक (५३, रा. श्री कॉलनी, साईनगर) व शुभम मनोहर इथापे (३५, रा. आर्वी, जि. वर्धा) अशी मृतकांची नावे आहेत. याबाबत राजापेठ व कोतवाली पोलिसांनी मर्ग दाखल केला.

दुचाकीच्या धडकेत युवक जखमी

अमरावती : दोन दुचाकी समारोसमोर धडकल्याने अपघात घडला. त्यात एक जण जखमी झाला. ही घटना गुलशन नगरच्या कॉर्नरवर घडली. जखमीवर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्याचे मामा मोहम्मद तलहा अब्दुल रऊफ (३९, रा. हबीब नगर) यांनी गाडगे नगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी ट्रिपल सीट असलेल्या तिन अज्ञात दुचाकीस्वरांविरुद्ध अपघाताचा गुन्हा दाखल केला.

चारचाकी चालकाची भाजी विक्रेत्याला मारहाण

अमरावती : भरधाव चार चाकीच्या (एमएच २९-एडी ५५५५) चालकाने एका भाजीपाला विक्रेत्याच्या हातगाडीला धडक दिली. त्यात इतकचे नव्हे, तर चालकाने त्याला शिवीगाळ करीत विक्रेत्याचे अंदाजे १० हजारांचे नुकसान झाले. लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. ही घटना एमआयडीसी परिसरात घडली. जखमी अरिहंत रामदास चोपडे (३०, रा. दहिगाव, ता. नांदगाव खंडेश्वर) यांनी राजापेठ पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी चारचाकीचा चालक नारायण देशमुख (४१, रा. वृंदावन कॉलनी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. या घटनेचा पुढील तपास राजापेठ पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली राजापेठ पोलीस करीत आहे.

शहरात एकाच दिवशी दोन घरफोडी

अमरावती : कुठे ना कुठे दर दिवशी घरफोडीचे सत्र सुरूच आहे. त्यामुळे आधीच नागरिक भयभीत झाले आहेत. घर कुलूपबंद करून कुठे जाणे टाळत आहेत. परंतु अपरिहार्य कारणास्तव जावे लागल्यास चोरटे लगेचडाव साधून ऐवज लुटून नेतात. अशाच घरफोडीच्या दोन घटना एकाच दिवशी वलगाव व खोलापुरी गेट पोलीस ठाण्यांतर्गत घडल्यात. एका घरातून चोरट्यांनी २८ हजार ४२० रुपयांचा ऐवज चोरून नेला, तर दुसऱ्या घरात त्यांनी काहीही हातात न लागल्याने खाली हात परत जावे लागले.वलगाव पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आष्टी येथील रहिवाशी भरत दत्तात्रय जुवार (४९) यांनी घरफोडीबद्दल फिर्याद दिली.

मांजरी मसला येथे रामनवमी उत्सव

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

अंजनगाव बारी, दि.२९ : नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील मांजरी मसला येथे रामनवमी उत्सवाची धार्मिक आणि सांस्कृतिक सांगड घालत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. मंदिर परिसरात सकाळपासूनच रामभक्तांची गर्दी उसळली. पूजा-अर्चा, रामजन्मोत्सव, अखंड नामस्मरण आणि भजन यांसह दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचा समावेश होता.संध्याकाळी आयोजित विशेष कीर्तनात हरिभक्त परायण ह.भ.प.पंकज महाराज पोहेकर (मांजरी हसला)यांनी हिंदुत्ववादी विचारांनी परिपूर्ण असे प्रभावी कीर्तन सादर केले. श्रीरामांच्या आदर्शांचे वर्णन करताना त्यांनी भक्ती, कर्तव्यनिष्ठा आणि समाजातील एकात्मतेचे महत्व पटवून दिले. त्यांच्या ओजस्वी वाणीतून रामकथांचे सादरीकरण होताच श्रोते मंत्रमुग्ध झाले.गावातील सर्व रामभक्त, महिला-पुरुष, युवक-युवती यांची उत्स्फूर्त उपस्थिती दिसून आली. कार्यक्रमाचे सुरळीत आयोजन करण्यासाठी रामनवमी उत्सव समितीचे पदाधिकारी, स्वयंसेवक आणि गावातील कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली. शिस्तबद्ध आयोजन, सजावट आणि भक्तिमय वातावरणामुळे संपूर्ण परिसरात आध्यात्मिकतेची अनुभूती पसरली.

श्री विठोबा संस्थानचा यात्रा महोत्सव नियोजनबद्ध; मात्र प्रशासनाचे भाविकांच्या सुविधांकडे दुर्लक्ष

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

चांदूर रेल्वे, दि.२९ : श्री विठोबा संस्थान, सावंगा विठोबा तर्फे आयोजित गुढीपाडवा-रामनवमी यात्रा महोत्सव अत्यंत उत्साहात व शिस्तीत पार पडला. या यशाचे संपूर्ण श्रेय येथील विश्वस्त मंडळाच्या उत्कृष्ट नियोजनाला जात असल्याचे मत व्यक्त होत असतानाच, भाविकांना आवश्यक सोयी-सुविधा पुरविण्यात प्रशासन व लोकप्रतिनिधी अपयशी ठरल्याचे चित्रही यावेळी पाहायला मिळाले, अशी खंत ज्येष्ठ पत्रकार प्रभाकर भगोले यांनी व्यक्त केली.श्री विठोबा संस्थान हे महाराष्ट्रातील प्रसिद्ध संस्थान असून या ठिकाणी महाराष्ट्र नव्हे तर इतर राज्यातून भाविक दर्शनासाठी येतात.या संस्थानचा गुढीपाडवा रामनवमी यात्रा

ज्येष्ठ पत्रकार प्रभाकर भगोले यांचे प्रतिपादन

महोत्सव सर्वात मोठा असून अंदाजे ४ ते ५ लाख भाविक भक्त या स्थळी दर्शनासाठी उपस्थित असतात.या यात्रेचे आयोजन जिल्हा परिषद अधिनस्त होत असल्याने यात्रा नियोजनाचे दृष्टीने भाविकांकरिता आवश्यक सुविधांचा अभाव दिसून येत आहे,या यात्रेकरिता विशेष बाब म्हणून जिल्हा परिषदचे अर्थसंकल्पात भरीव निधीची तरतूद करण्यात यावी.अवधूत महाराजांचे 'ब' वर्ग दर्जा प्राप्त असलेल्या या देवस्थानाकडे जाणारे रस्ते अत्यंत खराब अवस्थेत असल्याने भाविकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. तसेच गावाशेजारील नदीवरील पुलावर कठडा नसल्यामुळे भाविकांच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे. या संदर्भात प्रशासनाकडे वारंवार पत्रव्यवहार करूनही कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याची नाराजी संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे यांनी व्यक्त केली. दरम्यान, भाविकांच्या सोयीसाठी संस्थानच्या वतीने उत्कृष्ट नियोजन करण्यात आले होते. रस्त्यापासून मंदिरापर्यंत हिरव्या नेटची सावली, लाखो भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, सुरक्षेसाठी सीसीटीव्ही यंत्रणा, सुयोग्य दर्शन रांगा तसेच महाप्रसादाचे नियोजन यामुळे भाविकांना मोठा दिलासा मिळाला. या सर्व व्यवस्थेबद्दल पत्रकार भगोले यांनी संस्थानच्या कार्याचे कौतुक केले.

परिवर्तन साहित्य संमेलनात सत्यशोधकीय कवितांचा जागर

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

अमरावती, दि.२९ : सामाजिक परिवर्तन परिषद अमरावती,श्री माळी वैभव नागपूर द्वारा,विदर्भ माळी क्षत्रिय बोर्डिंग, वऱ्हेकर सभागृह मुधोळकर पेठ अमरावती येथे नुकतेच परिवर्तन साहित्य संमेलन मोठ्या थाटात पार पडले. मनोहरराव चलपे (संचालक माळी वैभव नागपूर) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सत्यशोधकीय कवी संमेलनात शब्दास्त्र प्रमुख प्रवीण कांबळे यांनी, सावित्रीबाई फुले यांच्या कार्य

कर्तृत्वाला उजाळा देणारी, क्रांतिमा नावाची कविता सादर केली.विद्रोही अविनाश गोंडाणे यांनी सद्यस्थितीत सुरू असलेल्या युद्धामुळे मनुष्यमात्राला होत असलेला त्रास आपल्या कवितेतून व्यक्त केला.प्रा.देवानंद पाटील यांनी एकात्मतेचा संदेश देणारी कविता सादर केली.कवयित्री शारदा गणोरकर यांनी कवितेची लेखणी, पल्लवी मते फुले विद्यालय नावाची कविता सादर केली तर नाना रमतकार, दीपिका पांडे, प्रा. हंसराज रंगारी, रिजवान शेख, शालिनी बेलसरे, राजेश्वरी नंदागवळी यांच्यासह अन्य सहभागी कवींनी सत्यशोधकीय संमेलनात बुद्ध, फुले, शाहू , आंबेडकरी मानवतावादी विचार, देश गौरव, भारतीय संविधान,समृद्ध लोकशाही, शेतकऱ्यांच्या व्यथा,कष्टकऱ्यांच्या समस्या असे विविधांगी विषय कवितेतून मांडले.

याप्रसंगी अध्यक्ष मनोहरराव चलपे यांनी सहभागी कवींच्या वैचारिक प्रगल्भतेची स्तुती करीत आपले विचार व्यक्त केले. कवी संमेलनाचे सूत्र संचालन शारदा गणोरकर यांनी केले.

राणा कुटुंबाकडून वसुधाताई देशमुख यांचा सन्मान

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

अमरावती, दि.२९ : माजी मंत्री वसुधाताई देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित जीवन गौरव सोहळा सांस्कृतिक भवन, अमरावती येथे मोठ्या उत्साहात व दिमाखात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान पालकमंत्री नामदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी भूषविले. या प्रसंगी आमदार रवी राणा व माजी खासदार नवनीत राणा यांच्या वतीने सुनील राणा यांनी वसुधाताई देशमुख यांचा शाल व पुष्पगुच्छ

देऊन सन्मानपूर्वक सत्कार केला. तसेच आई अंबा देवी व एकविरा देवी यांच्या कृपेने त्यांना उदंड आयुष्य लाभावे, अशा शुभेच्छा उपस्थित शुभचिंतकांनी व्यक्त केल्या.कार्यक्रमास युवा स्वाभिमान पक्षाचे नेते जयंतराव वानखडे, आमदार रवी राणा यांचे सचिव उमेश ढोणे तसेच युवा स्वाभिमान पक्षाचे नितीन अनानसने, हर्षल रेवने,इतर पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थितांनी वसुधाताई देशमुख यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या सामाजिक व राजकीय योगदानाची प्रशंसा केली.

अमरावती महामार्गावर रस्त्याच्या दुभाजकावरील झाडांना कडक उन्हातही पाणी

परतवाडा येथील रस्ता दुभाजकावर लावलेली झाडे सुकण्याच्या मार्गावर

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

परतवाडा, दि.२९ : शहर करण्याच्या सौंदर्यीरण आणि रस्ते सौंदर्यीकरण उद्देशाने परतवाडा शहरातीलमिल कॉलनीकडे जाणाऱ्या अमरावती महामार्गावर रस्त्याच्या दुभाजकावरील झाडांना कडक उन्हातही पाणी देण्याची व्यवस्था संबंधित यंत्रणेकडून करण्यात आली नाही. त्यामुळे दुभाजकावरील निम्म्यापेक्षा जास्त झाडे मृतप्राय झाली असून उर्वरित शिल्लक असलेली झाडेही आठवड्याच्या आत वाळणार असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.

काही वर्षापूर्वी सदर नव्याने महामार्गाचे विस्तारीकरण करून महामार्गाच्या मधोमध दुभाजक तयार

करण्यात आले आहे. प्रवाशांचा प्रवास सुखकर व्हावा, रस्ता सुंदर दिसावा, यासाठी दुभाजकावर शोभिवंत झाडे लावण्यात आली होती. सुरुवातीच्या काळात झाडांना नियमित पाणी देण्यात येत होते. त्यामुळे सदर झाडे हिरवीगार दिसायची आणि त्यावर फुलेफुलल्याने सौंदर्यात अधिकच भर पडायची. त्यामुळे प्रवाशांना या मार्गावर प्रवास करताना आनंद वाटत होता.अलीकडच्या काळात मात्र या दुभाजकावरील शोभिवंत झाडांची वाट लागली आहे. ही वाळलेली झाडे पाहून प्रवासाचा आनंद हिरावला गेला आहे. झाडे लावली होती, तर त्याचे व्यवस्थापन योग्यप्रकारे करावयाचे होते. सुकण्यासाठी झाडे लावायची होती, तर लावलीच कशाला, असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. या झाडांच्या लागवडीवर लाखो रु. चा खर्च झाला आहे. हा खर्च व्यर्थ ठरत असतानाच शहराच्या सौंदर्गीकरणाची खिल्ली उडवली जात आहे. स्थानिक नेत्यांनी आणि संबंधित विभागाने याकडे लक्ष घालावे, अशी मागणी होऊ लागली आहे. हा मार्ग सार्वजनिक बांधकाम उपविभाग अचलपूर यांच्याकडे याकडे दुर्लक्ष का, असा प्रश्न विचारला असता ते काहीतरी अतार्किक कारण सांगून मोकळे होतात. याकडे संवेदनशील नजरेने अधिकाऱ्यांनी पाहिले पाहिजे.

चांदूर बाजार : चांदूर बाजार नगर परिषदच्या गलथान कारभारामुळे नाली सफाई महिन्याकाठी थातुर-मातुर काढून नागरिकांचा आरोग्याशी खेळ? उन्हाळा सुरू असताना डेंग्यूची लागण होत असताना न.प. उघड्या डोळ्यांनी पाहत आहे.

(छाया-गजानन ढवळे पत्रकार)

थोडक्यात

पत्रकाराला धक्काबुक्की करणाऱ्या एपीआय दाभाडेविरुद्ध कारवाई करा

दिग्रस : दारव्हा तालुक्यातील भुलाई टोल नाक्यावर महाविकास आघाडीच्या आंदोलनाचे वृत्तसंकलन करणाऱ्या पत्रकार केशव सवळकर यांना सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज दाभाडे यांनी धक्काबुक्की व शिवीगाळ केली. या घटनेच्या निषेधार्थ २७ मार्च रोजी 'व्हॉईस ऑफ मीडिया' दिग्रस शाखेने तहसीलदारामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देऊन कायदेशीर कारवाईची मागणी केली. आंदोलनस्थळी ओळखपत्र दाखवूनही सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज दाभाडे यांनी सवळकर यांना अश्लील भाषेत बोलून जोरात पुढे ढकलले. पोलीस प्रशासन व माध्यमांमधील सुसंवाद बिघडवणाऱ्या अशा उद्धट अधिकाऱ्यावर सेवाशिस्त भंगाची कारवाई करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे. घटनेनंतर एसडीपीओ डॉ. सिद्धेश्वर भोरे व ठाणेदार मुळे यांनी सामोपचाराचा प्रयत्न केला, मात्र दाभाडे यांच्या वर्तणुकीत पश्चात्तापाचा अभाव दिसून आला. पत्रकाराचा सार्वजनिक अवमान केल्याबद्दल दाभाडे यांच्यावर कडक पावले उचलण्याची विनंती संघटनेने केली आहे. या निवेदनावर धर्मराज गायकवाड, प्रशांत झोळ, जुबेर खान, सुनील हिरास, किशोर कांबळे, सदानंद जाधव, साजिद पतलेवाले, जय राठोड, आजीस शेख आणि शोएब सय्यद यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. पोलीस अधीक्षकांनी या प्रकरणात गांभीर्याने लक्ष देऊन पत्रकारांना न्याय देण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

धम्मपरिषदेत 'संत गाडगेबाबा व डॉ. बाबासाहेबांची भेट' नाट्यप्रयोग यशस्वी

यवतमाळ : नेर तालुक्यातील खरडगाव-खडगा येथे आयोजित भव्य बौद्ध धम्मपरिषदेत यवतमाळच्या 'सावित्रीच्या लेकी' महिला समूहातर्फे 'संत गाडगेबाबा व डॉ. बाबासाहेबांची अविस्मरणीय भेट' या सामाजिक नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला. अंधश्रद्धा निर्मूलन आणि मानवतावादी विचारांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने आयोजित या प्रयोगाला ग्रामीण भागातील प्रेक्षकांनी मोठी गर्दी केली होती. या नाटकात शुभांगी लिहीतकर यांनी संत गाडगेबाबा, तर स्नेहा डोंगरे यांनी बाबासाहेबांची भूमिका प्रभावीपणे साकारली. जयश्री सोनवणे, राखी नगराळे, कुसुम तलवारे, रमा इंगळे आणि शिला राऊत यांनीही उत्तम अभिनय केला. या प्रयोगाचे लेखन व दिग्दर्शन शुभांगी लिहीतकर यांनी केले, तर संचालन प्रा. अनिता गेडाम यांनी केले. याप्रसंगी साहित्यिका वैशालीताई डोळस, वटफळी बुद्धविहाराचे अध्यक्ष नागघोष भन्तेजी आणि धम्मपरिषदेचे प्रमुख सुधाकरराव तलवारे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते नाट्य कलावंतांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यवतमाळ जिल्ह्यात आतापर्यंत १५ प्रयोग यशस्वी झाले असून, भविष्यात १०० प्रयोग करण्याचा मानस दिग्दर्शिकेने व्यक्त केला आहे. या प्रयोगाने उपस्थितांच्या डोळ्यांच्या कडा ओलावल्या असून परिवर्तनवादी विचारांची शिदोरी या नाटकाने प्रेक्षकांना दिली.

भरधाव रिक्षाला वाहनाची धडक

दिग्रस : दिग्रस येथील साखर कारखाना परिसरात २५ मार्च रोजी रात्री ८ वाजेच्या सुमारास रिक्षाला अज्ञात वाहनाने धडक दिल्याने अपघात झाला. असलम बेग रफीक बेग हे आपल्या रिक्षातून वझीर कोथमीरे, नशिम कोथमीरे आणि नदीम कोथमीरे यांना घेऊन जात असताना वाहन क्रमांक एमएच १४ जी ए ९०९० च्या चालकाने भरधाव वेगाने वाहन चालवून त्यांच्या रिक्षाला धडक दिली. या भीषण अपघातात रिक्षा चालक आणि प्रवासी जखमी झाले असून, याप्रकरणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

केवळ सात हजार हेक्टरवर रब्बीचा हंगाम, प्रकल्पांना लागले मोठ्या भ्रष्टाचाराचे ग्रहण

पाणी असूनही शेती तहानलेलीच!

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ उमेश इंगोले

नेर (परसोपंत), दि. २९ : तालुक्यात बेंबळा प्रकल्प आणि अडाण नदीसारखी मुबलक नैसर्गिक साधनसंपत्ती उपलब्ध असली तरी, प्रबळ राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे सिंचनाचा टक्का वाढू शकलेला नाही. धरणांचे कालवे पूर्णपणे कोरडे पडल्याने सध्या केवळ सात हजार हेक्टरवर रब्बीचा हंगाम उभा आहे. 'धरण उशाला आणि कोरड घशाला' अशी सर्वसामान्य शेतकऱ्यांची दयनीय अवस्था झाली असून, तालुक्याला समृद्ध करण्यासाठी व रोजगारासाठी सिंचन प्रकल्पांना तातडीने भरीव निधी देण्याची नितांत आवश्यकता निर्माण झाली आहे.

नेर तालुक्याला निसर्गाने भरभरून दिले आहे. शेती व्यवसायासाठी आणि सिंचनासाठी अत्यंत पोषक अशी नैसर्गिक साधनसुविधा या परिसरात उपलब्ध आहे. मात्र, केवळ प्रशासकीय आणि राजकीय उदासिनतेमुळे या पाण्याचा शेतीला थेट फायदा होत नसल्याचे विदारक चित्र आहे. एकीकडे नद्या आणि प्रकल्पांमध्ये पाणीसाठा उपलब्ध आहे, परंतु ते पाणी शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचविण्यासाठी आवश्यक असलेल्या कालव्यांची कामे अनेक वर्षांपासून अपूर्ण स्थितीत रखडली आहेत. त्यामुळे 'असून अडचण आणि नसून खोळंबा' अशी बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. पाण्याचे योग्य नियोजन न झाल्याने कालवे कोरडेठाक पडले आहेत आणि याचा थेट फटका बळीराजाला बसत आहे. सध्या तालुक्यात रब्बीचा हंगाम सुरू असून, केवळ सात हजार हेक्टर क्षेत्रच ओलिताखाली येऊ शकले आहे. विशेष म्हणजे हे सिंचन कोणत्याही कालव्याच्या किंवा धरणाच्या पाण्यावर अवलंबून नसून, ते पूर्णपणे शेतकऱ्यांच्या खाजगी विहिरींच्या पाण्यावर तग धरून आहे. कालव्याद्वारे पाण्याची शाश्वत उपलब्धता असणे अत्यंत गरजेचे असताना, प्रशासकीय पातळीवर याबाबत प्रचंड अनास्था दिसून येते. तालुक्यातील शेतजमीन पिकांच्या वाढीसाठी अत्यंत सुपीक आहे. जर सिंचनाच्या टक्केवारीत योग्य वाढ झाली, तर संपूर्ण तालुक्याचा कृषी-कायापालट करण्याची अफाट क्षमता या काळ्या आईमध्ये दडली आहे. सिंचनाची सुविधा वाढल्यास शेतीत नवनवीन प्रयोग करता येतील आणि त्यातून रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील. हाताला काम मिळाल्यास स्थानिक तरुणांना रोजगारासाठी शहराकडे धाव घेण्याची वेळ येणार नाही. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेला शेती व्यवसाय भरभराटीस आल्यास स्थानिक बाजारपेठांनाही मोठी चालना मिळेल. सध्या कर्जाच्या आणि नापिकीच्या दुष्टचक्रात अडकलेला शेतकरी ओलिताची शेती करू लागल्यास आर्थिक संकटातून सहज आणि सन्मानाने बाहेर पडू शकतो. यासाठी शासनाकडून मोठ्या आणि भरीव निधीची गरज आहे. केवळ निवडणुकीपुरत्या आश्वासनांची खैरात न करता, ठोस कृती आराखडा तयार करून कालव्यांची कामे मार्गी लावणे अपेक्षित आहे.

'डेहनी' उपसा योजना ठरली पांढरा हत्ती

बेंबळा प्रकल्पांतर्गत येणाऱ्या डेहनी उपसा सिंचन योजनेला भ्रष्टाचाराचे मोठे ग्रहण लागले आहे. काँग्रेसची सत्ता असताना हा प्रकल्प पूर्णत्वास जात होता. मात्र, कोट्यवधी रुपये खर्च करूनही ही योजना शेतकऱ्यांसाठी पूर्णपणे निरुपयोगी ठरली असून, ती केवळ एक 'पांढरा हत्ती' पोसण्यासारखी झाली आहे. या प्रकल्पाकडे वेळीच लक्ष न दिल्याने सार्वजनिक निधीचा मोठा अपव्यय झाला आहे.

वशिलेबाजीने घोटला 'शिरसगाव'चा गळा

शिरसगाव (पांढरी) येथील कालव्याचे काम सुरू असताना राजकारणातील वशिलेबाजीचा मोठा फटका या प्रकल्पाला बसला. चुकीच्या नियोजनामुळे आणि स्वार्थापोटी या कालव्याचे पाणी शेवटच्या टोकावरील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेच नाही. परिणामी, प्रकल्प उभा राहूनही अनेक गावांतील शेतकरी पाण्यापासून वंचित राहिले आहेत आणि त्यांच्या हक्काच्या पाण्याचा गळा घोटला गेला आहे.

घमापूर येथील वृत्तपत्र विक्रेत्याच्या प्रयत्नाने घडले दोन डॉक्टर

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

फुलसावंगी, दि. २९ : यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड तालुक्यातील दुर्गम घमापूर येथील वृत्तपत्र विक्रेते नंदकिशोर जाधव यांनी कष्टाच्या जोरावर आपला भाऊ विठ्ठल आणि मुलगा गोपाल यांना डॉक्टर बनवून शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. प्रतिकूल आर्थिक परिस्थिती आणि मर्यादित साधनांवर मात करत, केवळ पेपर विक्रीच्या व्यवसायातून मिळालेल्या उत्पन्नातून या कुटुंबाने हे देदीप्यमान यश संपादन केले आहे.

नंदकिशोर जाधव हे गेल्या दहा वर्षांपासून वृत्तपत्र विक्रीचा व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांचे बंधू डॉ. विठ्ठल जाधव यांनी नांदेड आणि ढाणकी येथे शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर 'नीट' परीक्षेत यश मिळवून नागपूर येथून बीएएमएस पदवी संपादन केली. सध्या ते संगमनेर येथील अश्विन रुरल आयुर्वेदिक कॉलेजमध्ये सर्जरी विषयात उच्च शिक्षण घेत आहेत. तसेच, नंदकिशोर जाधव यांचा मुलगा डॉ. गोपाल जाधव यानेही फिजिओथेरपीची पदवी मिळवून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. या यशामागे नंदकिशोर जाधव आणि त्यांचे बंधू शंकर जाधव यांचे परिश्रम, तसेच घरातील महिलांचा मोठा त्याग आहे. आर्थिक चणचण असूनही त्यांनी मुलांच्या शिक्षणात कधीही खंड पडू दिला नाही. या यशाबद्दल नागपूर व नांदेड येथे दोन्ही डॉक्टरांचा सत्कार करण्यात आला. घमापूर सारख्या लहान गावातील या यशोगाथेमुळे उमरखेड तालुक्यात जाधव कुटुंबाचे कौतुक होत असून, ग्रामीण भागातील इतर विद्यार्थ्यांना यातून मोठी प्रेरणा मिळत आहे.

दिग्रस तालुक्यातील सामाजिक वनीकरणातील मजुरांचे मानधन थकले

खासदार संजय देशमुख यांना दिले निवेदन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

दिग्रस, दि. २९ : तालुक्यातील मोरखेड व हरसुल शिवारात सामाजिक वनीकरण विभागांतर्गत वृक्षलागवडीचे काम करणाऱ्या मजुरांनी खासदार संजय देशमुख यांना निवेदन दिले. एका सामाजिक कार्यकर्त्याने केलेल्या खोट्या तक्रारीमुळे मजुरांची बिले थांबवण्यात आल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. या प्रकरणाची तातडीने चौकशी करून न्याय मिळवून देण्याची मागणी मजुरांनी केली आहे.

आनंद अटल घनवन योजनेअंतर्गत मोरखेड येथील गायरान जमिनीत ४८ प्रकारच्या विविध प्रजातींची वृक्षलागवड करण्यात आली आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी औषधी आणि दुर्मिळ वनस्पतींचे वन उभारण्याचे काम मजुरांनी दर्जेदार पद्धतीने पूर्ण केले. मात्र, आर्णी तालुक्यातील एका व्यक्तीने या कामाशी संबंध नसताना खोटी तक्रार केल्याने मजुरांचे मानधन रखडले आहे. या कठीण काळात कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे मजुरांना अशक्य झाले असून, खोट्या तक्रारदारावर कारवाई करण्याची विनंती त्यांनी केली आहे. निवेदनावर नितीन कुरे, प्रमोद राठोड, गोविंद राठोड, योगेश चव्हाण, आकाश पवार, उदय चव्हाण, राजू पवार, मदन राठोड, गजानन दुमारे, गोपाल राठोड, पवन आडे आणि रामचंद्र चव्हाण यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. खासदारांनी याप्रश्न सकारात्मक तोडगा काढण्याचे आश्वासन दिले आहे.

विडूळ व्याख्यानमालेत सुजान पालकत्वावर मार्गदर्शन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

विडूळ, दि. २९ : उमरखेड तालुक्यातील विडूळ येथील उमा महेश्वर संस्थान येथे विडूळ व्याख्यानमालेचे सहावे पुष्प उत्साहात संपन्न झाले. यवतमाळच्या सावित्री ज्योतिराव फुले महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. सीमा शेटे नवलाखे यांनी 'सुजान पालकत्व व बालकांचे भविष्य' या विषयावर मार्गदर्शन करत पालकांना मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी सृजनशील प्रक्रियेचा अवलंब करण्याचे आवाहन केले.

व्याख्यानात बोलताना प्रा. सीमा शेटे नवलाखे यांनी स्पष्ट केले की, सज्जन माणूस घडवण्याची जबाबदारी केवळ आई-वडिलांची असते. मुलांच्या आवडीनिवडी जपणे, त्यांना श्रमाचे महत्व सांगणे आणि अपयश स्वीकारण्याची ताकद देणे ही काळाची गरज आहे. मुलांचे व्यक्तिमत्व घडविण्यासाठी घरातील ज्येष्ठांनी स्वतःच्या वर्तनातून आदर्श निर्माण करावा, असेही त्यांनी अधोरेखित केले. याप्रसंगी पुसद येथील आदर्श शिक्षक विश्वांभर वानखेडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या व्याख्यानमालेचे आयोजन उमा महेश्वर संस्थान, शिवनाम सप्ताह समिती, वीरशैव सेवा मंडळ, मन्मथ ज्योत यात्रा मंडळ आणि शिक्षण दृष्टी केंद्र, विडूळ यांच्यावतीने करण्यात आले आहे. परिसरातील नागरिकांनी उर्वरित सत्रांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले असून या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

सहाय्यक पोलिस निरीक्षकाची पत्रकाराला धक्काबुक्की

बडतर्फ करण्याची महागाव पत्रकार महासंघाची मागणी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

महागाव, दि. २९ : दारव्हा तालुक्यातील भुलाई टोल नाक्यावर महाविकास आघाडीच्या वतीने आयोजित आंदोलनाचे वृत्तसंकलन करत असताना सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज दाभाडे यांनी 'दैनिक लोकसूत्र'चे कार्यकारी संपादक केशव सवळकर यांच्याशी धक्काबुक्की व गैरवर्तन केले. या घटनेच्या निषेधार्थ महागाव तालुका पत्रकार महासंघाने तहसीलदार अभय मस्के यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देऊन संबंधित अधिकाऱ्यावर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१-सी वरील भुलाई टोल प्लाझा बंद करण्यासाठी पुकारलेल्या आंदोलनादरम्यान ही घटना घडली. वृत्तसंकलनासाठी उपस्थित असलेल्या पत्रकारांना ओळखपत्राची पडताळणी केल्यानंतर पोलिसांनी पुढे जाण्याची परवानगी दिली होती. मात्र, कर्तव्यावर असलेल्या सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज दाभाडे यांनी अचानक आक्रमक पवित्रा घेत नागरिक आणि पत्रकारांना हटवण्यास सुरुवात केली. यावेळी केशव सवळकर यांनी आपले ओळखपत्र दाखवूनही दाभाडे यांनी त्यांच्याशी उद्धट भाषेत बोलून धक्काबुक्की केली. घटनास्थळी इतर वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित असतानाही केवळ एका अधिकाऱ्याने घेतलेल्या या भूमिकेमुळे पत्रकारांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या संतापजनक प्रकारामुळे पत्रकारितेच्या प्रतिष्ठेला धक्का बसल्याची भावना व्यक्त करत महागाव तालुका पत्रकार महासंघाने दाभाडे यांना सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी केली आहे. प्रशासनाला निवेदन देताना पत्रकार महासंघाचे अध्यक्ष गणेश भोयर, मार्गदर्शक संजय भगत, गजानन वाघमारे, विनोद कोपरकर, अमोल राजवाडे, नंदकुमार कावळे, निलेश पाटील नरवाडे, डॉ. गजानन वैद्य, धम्मानंद कावळे, रियाज पारेख, राज पाटील नरवाडे, मनोज सुरोशे, बाळुभाऊ राठोड आणि अजय पाचंगे उपस्थित होते. लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारांवर होणारे असे हल्ले खपवून घेतले जाणार नाहीत, असा इशारा महासंघाने दिला आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मध्यस्थीनंतरही संबंधित अधिकाऱ्याच्या वर्तनाबाबत पत्रकारांनी तीव्र नाराजी कायम ठेवली असून, सेवाशिस्तभंगाच्या आरोपाखाली तात्काळ कारवाई करण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

'तालुका सुराज्य व्यवस्थे'चे पहिले अधिवेशन संपन्न

नेर तालुक्यातील पाथ्रड गोळे येथे आयोजन, खेडी आत्मनिर्भर करण्यावर भर

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

नेर, दि. २९ : तालुक्यातील पाथ्रड (गोळे) येथे नुकतेच 'तालुका सुराज्य व्यवस्थे'चे पहिले अधिवेशन संपन्न झाले. महाराष्ट्र सुराज्य सायकल यात्रेचे रवी मानव यांच्या पुढाकारातून आयोजित या अधिवेशनात ग्रामविकासाचा अजेंडा मांडून खेडी आत्मनिर्भर करण्याचा निर्धार करण्यात आला. राष्ट्रसंतांच्या ग्रामोद्धाराच्या विचारांची प्रत्यक्ष अंमलबजावणी गाव स्तरावर व्हावी, या उद्देशाने हे विशेष प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

रवी मानव यांनी महाराष्ट्र शासनाला सादर केलेल्या 'तालुका सुराज्य व्यवस्था' या संकल्पनेचे पहिले प्रायोगिक पाऊल पाथ्रड गोळे गावात पडले आहे. या अधिवेशनादरम्यान गावच्या सर्वांगीण विकासासाठी एका सल्लागार समितीचे गठन करण्यात आले. या समितीमध्ये ग्रामपंचायत प्रशासक, प्रशासक समितीसह गावातील प्रमुख राजकीय व सामाजिक मंडळींचा समावेश आहे. ही समिती ग्रामपंचायत प्रशासकीय नियम आणि ग्रामसभेच्या मंजुरीच्या अधीन राहून विकासाचे धोरण ठरवणार आहे. अधिवेशनात प्रामुख्याने गावातील युवकांना रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करून देणे, बचत गटांच्या माध्यमातून दुग्ध व्यवसायाची उभारणी करणे, जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी संख्या वाढवणे आणि ग्रामपंचायतची थकीत कर वसुली प्रभावीपणे करणे या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या नव्या व्यवस्थेमुळे गावपातळीवर निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता आणि गती येण्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे. या सल्लागार समितीच्या अधिवेशनासाठी निलिमा चोपडे (ग्रामपंचायत प्रशासक), रजनी खडसे (माजी उपसरपंच), अमोल घावडे (ग्रामसेवक), प्रफुल नेरकर (पोलीस पाटील), मनीषा गोळे (माजी सभापती) उपस्थित होते. तसेच प्रीतम गावंडे, नितीन चहांदे, आकाश तोंडरे, माधुरी आडे, मंदाताई गणविर, धर्मेंद्र गायनर, भालचंद्र गोळे, अविनाश गोळे, रवि मानव, धनराज गायनर, उमेश गोळे, सतीश चव्हाण, संदीप चव्हाण, रोशन चोपडे, आशिष गावंडे, हरीश तुपटकार, सोनाली चव्हाण या सदस्यांनी सहभाग नोंदवला. अधिवेशनाच्या यशस्वीतेसाठी सौरव सार्वे, श्रीधर घोडे, नरेंद्र गायनर आणि देवानंद गायनर यांनी परिश्रम घेतले. ग्रामविकासाचे हे मॉडेल भविष्यात संपूर्ण तालुक्यासाठी दिशादर्शक ठरणार आहे.

चिखलदरा वन प्रशिक्षण संस्थेत वनरक्षकांसाठी ऐतिहासिक कराटे शिबिर संपन्न

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

पांढरकवडा, दि. २९ : चिखलदरा येथील वन प्रशिक्षण संस्थेत १६ ते २६ मार्च २०२६ दरम्यान ४७ शिकाऊ वनरक्षकांसाठी विशेष कराटे आणि आत्मसंरक्षण शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. यवतमाळ जिल्हा कराटे असोसिएशनच्या प्रशिक्षकांनी वनरक्षकांना जंगलात हिंस्त्र श्वापदे व समाजकंटकांपासून विना शस्त्र स्वतःचा बचाव करण्याचे शास्त्रोक्त धडे दिले. २८ मार्च रोजी दीक्षांत समारंभाने या सत्राची सांगता झाली.

वनविभागाच्या इतिहासात चिखलदरा येथील प्रशिक्षण केंद्रात अशा प्रकारचे अभिनव 'कराटे प्रशिक्षण' पहिल्यांदाच राबवण्यात आले. १ ऑक्टोबर २०२५ पासून सुरू असलेल्या 'पायाभूत प्रशिक्षण सत्र क्रमांक ६३' चा महत्त्वाचा भाग म्हणून या १० दिवसीय शिबिराचे नियोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणासाठी प्रसिद्ध कराटे प्रशिक्षक डॉ. आनंद भुसारी, योगेश पडोळे आणि हितेश नागभीडकर यांनी वनरक्षकांना मोलाचे मार्गदर्शन केले. जंगलात गस्त घालताना हिंस्त्र श्वापदे, लाकूड तस्कर किंवा शिकारी लोकांशी अचानक सामना झाल्यास विना शस्त्र आपला बचाव कसा करावा, याचे तंत्र या ४७ वनरक्षकांनी आत्मसात केले. १० दिवसांच्या या सत्रात शारीरिक चपळता आणि मानसिक कणखरता वाढविण्यावर विशेष भर देण्यात आला. या प्रशिक्षणामुळे दुर्गम भागात कार्यरत राहणाऱ्या वनरक्षकांचे मनोबल उंचावण्यास मोठी मदत झाली आहे. शनिवार, २८ मार्च रोजी सकाळी ८ वाजता वन प्रशिक्षण संस्थेच्या मैदानावर 'पासिंग आऊट परेड' व दीक्षांत समारंभ पार पडला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून सिपना वन्यजीव विभागाच्या उपवनसंरक्षक नीता कट्टे आणि मेळघाट वन्यजीव विभागाचे विभागीय वन अधिकारी अनंता डिगोळे उपस्थित होते. संस्थेच्या संचालक मुक्ताबाई टेकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली हे संपूर्ण प्रशिक्षण सत्र यशस्वीरीत्या पूर्ण झाले. या सोहळ्यात यशस्वी प्रशिक्षणार्थींचा गौरव करण्यात आला. वनरक्षकांच्या दैनंदिन कर्तव्याच्या दृष्टीने हे आत्मसंरक्षण प्रशिक्षण अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचा विश्वास संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे. दुर्गम वनक्षेत्रातील आव्हानांचा सामना करण्यासाठी हे कौशल्य वनरक्षकांसाठी संरक्षक कवच ठरेल.

अजिंक्य भारत
आपलं यवतमाळ
सोमवार , दि. ३० मार्च २०२६ www.ajinkyabharat.com

महत्वाचे

वाहनाच्या धडकेत गंभीर दुखापत

यवतमाळ : यवतमाळ ते दारव्हा मार्गावरील तुळजाई लॉनसमोर तेवीस मार्च रोजी पहाटे दीड वाजता भरधाव वेगाने येणाऱ्या चिंतामणी वाहनाच्या धडकेत एक व्यक्ती गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. अब्दुल सलार अब्दुल रऊफ असे या घटनेत जखमी झालेल्या पन्नास वर्षीय व्यक्तीचे नाव असून ते आपल्या कारने दारव्हा येथून यवतमाळकडे प्रवास करत होते. त्यावेळी अचानक येणाऱ्या एमएच अठरा बीए आठ सहा तीन चार या क्रमांकाच्या चिंतामणी वाहनाच्या चालकाने अतिशय निष्काळजीपणे आणि भरधाव वेगाने वाहन चालवत त्यांच्या गाडीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात त्यांच्या पोटावर आणि छातीवर गंभीर मार लागला आहे. तसेच त्यांच्या कारचे साठ हजार रुपयांचे मोठे नुकसान झाले आहे. या संपूर्ण प्रकरणाची नोंद अठ्ठावीस मार्च रोजी रात्री लोहारा पोलिस ठाण्यात करण्यात आली असून आता पोलिस या घटनेचा पुढील सविस्तर तपास करत आहेत.

क्षुल्लक कारणावरून बेदम मारहाण

बाभुळगाव : बाभुळगाव तालुक्यातील लोणी येथे सत्तावीस मार्च रोजी सायंकाळी सात वाजता क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादात एका व्यक्तीला लोखंडी गजाने मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली आहे. बबन हनुमान खंगार हा विनाकारण बडबड करीत असल्याने राजेंद्र पांडुरंग मेश्राम यांनी त्याला तसे करण्यास मनाई केली होती. याच रागातून बबन खंगार आणि सुरेश हनुमान खंगार या दोघांनी एकत्र येऊन संगणमताने राजेंद्र यांच्यासोबत वाद घालण्यास सुरुवात केली. वाद वाढल्यानंतर आरोपींनी त्यांना शिवीगाळ करून त्यांच्या डोक्यात लोखंडी गजाने मारून त्यांना गंभीर जखमी केले. एवढेच नव्हे तर मध्ये आलेल्या त्यांच्या पत्नीला देखील धक्काबुक्की करून मुलाला शिवीगाळ केली. याशिवाय त्यांना जीवे मारण्याची गंभीर धमकी देखील देण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकरणाची सविस्तर नोंद अठ्ठावीस मार्च रोजी स्थानिक बाभुळगाव पोलिस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सुरू केला आहे.

कारच्या धडकेत भाविक जखमी

दिग्रस : दिग्रस ते आर्णी मार्गावरील तूप टाकळी गावाजवळ एकवीस मार्च रोजी सकाळी अकरा वाजता झाडाखाली बसलेल्या भाविकांना भरधाव कारने धडक दिल्याची भयंकर घटना घडली आहे. लखन राठोड हे आपली पत्नी मुलगी आणि मित्र कैलास चव्हाण यांच्या कुटुंबासह देवदर्शनासाठी निघाले होते. वाटेत तहान लागल्याने ते सर्वजण पाणी पिण्यासाठी एका लिंबाच्या झाडाखाली विश्रांती घेण्यासाठी बसले होते. नेमक्या त्याच वेळी तिकडून येणाऱ्या एमएच एकोणीस ईएल चोवीस शून्य शून्य या क्रमांकाच्या व्हेन्यू कार चालकाने स्वतःच्या ताब्यातील वाहन अतिशय निष्काळजीपणे आणि भरधाव वेगात चालवून तिथे बसलेल्या या सर्व लोकांना जोरदार धडक दिली. या अचानक झालेल्या जीवघेण्या अपघातामध्ये सर्व भाविक गंभीररीत्या जखमी झाले आहेत. या धक्कादायक अपघाताची सविस्तर नोंद अठ्ठावीस मार्च रोजी सायंकाळी स्थानिक दिग्रस पोलिस ठाण्यात करण्यात आली असून आता पोलिस याचा पुढील तपास करत आहेत.

आर्णीत आजपासून शिवमहापुराण कथा

भक्तीचा महाकुंभ; पंडित प्रदीप मिश्रांच्या स्वागतासाठी अवघी सिद्धेश्वरनगरी सज्ज!

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

आर्णी, दि.२९ : आर्णीच्या इतिहासात प्रथमच आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कथावाचक, भागवतभूषण पंडित प्रदीप मिश्रा यांच्या अमृतवाणीतून 'शिवमहापुराण'कथेचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, दि. ३० मार्च ते रविवार, दि. ५ एप्रिल २०२६ या कालावधीत होणाऱ्या या सोहळ्यासाठी आज, रविवार (दि.२९) रोजी पंडित प्रदीप मिश्रा यांचे शहरात मोठ्या थाटात आगमन झाले. त्यांच्या स्वागतासाठी काढण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेने आर्णी नगरी अक्षरशः शिवमय झाली आहे.

वाहतूक आणि बाजारपेठ

सोमवारचा बाजार बंद : भाविकांच्या गर्दीमुळे ३० मार्च रोजीचा आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी विकास मीना यांनी दिले आहेत. जादा बस फेऱ्या: यवतमाळ, दारव्हा, दिग्रस, माहूर आणि घाटंजी येथून एसटी महामंडळाने दररोज २० अतिरिक्त बसफेऱ्या सुरू केल्या आहेत. पार्किंग: कोळवण जवळ आणि दिग्रस रोडवर स्वतंत्र पार्किंगची व्यवस्था करण्यात आली असून, तेथून कथा मंडपापर्यंत वृद्ध भाविकांसाठी मोफत ऑटो रिक्षाची सोय आहे.

या शोभायात्रेत भजनी मंडळ, हरिपाठ मंडळ, वारकरी संप्रदायासोबतच सजीव चित्ररथ आणि कलशधारी महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. ३० मार्चपासून दररोज दुपारी १ ते ४ या वेळेत पंडित मिश्रा कथेचे वाचन करणार आहेत. कथेसाठी ६५ एकर परिसरात ३ लाख २० हजार फुटांचा विस्तीर्ण कथा मंडप उभारण्यात आला आहे. भाविकांच्या सोयीसाठी श्री बहिरमदेव शिवमहापुराण सेवा ट्रस्ट, महसूल विभाग, नगर परिषद आणि पोलिस प्रशासन रात्रंदिवस मेहनत घेत आहे. दररोज ४० हजार भाविकांच्या भोजनाची आणि निवासाची चोख व्यवस्था करण्यात आली आहे. या कथेमुळे परिसरात उत्साहाचे वातावरण असून स्थानिक बेरोजगारांनाही तात्पुरता रोजगार उपलब्ध झाला आहे. सुमारे २५०० स्वयंसेवक या महासोहळ्यासाठी सेवा देत आहेत.

'लाखो भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून नगर परिषदेने फिरते शौचालय, अग्निशमन दल आणि स्वच्छता पथके तैनात केली आहेत. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी नदीवर स्वतंत्र पुलाची उभारणी करण्यात आली आहे, ज्याचा फायदा पायी येणाऱ्या भाविकांना होईल,'

-नालंदा भरणे,
नगराध्यक्ष, नगरपरिषद आर्णी

सुरक्षेसाठी ९५० पोलिस तैनात

पोलिसांनी सुरक्षेसाठी चोख बंदोबस्त ठेवला असून ३५ अधिकारी व ९५० कर्मचारी तैनात आहेत. भाविकांनी मौल्यवान वस्तू सोबत आणू नयेत आणि गर्दीत सतर्क राहावे, असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे.

CAPTION आर्णी नगरी झाली शिवमय!...

आर्णी: शहराच्या इतिहासात पहिल्यांदाच आयोजित 'शिवमहापुराण' कथेसाठी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कथावाचक पंडित प्रदीप मिश्रा यांचे रविवारी मोठ्या थाटात आगमन झाले. त्यांच्या स्वागतासाठी काढण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेने संपूर्ण आर्णीनगरी अक्षरशः शिवमय झाली होती. यावेळी हजारो भाविकांनी शिस्तबद्धपणे उपस्थित राहून पंडितजी यांचे स्वागत केले.

दिग्रस-कारंजा बस सेवेसाठी खासदारांना साकडे

प्रवाशांचे हाल : प्रवासासाठी करावा लागतो वळसा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

दिग्रस, दि.२९ : दिग्रस आणि वाशिम जिल्ह्यातील कारंजा (लाड) या दोन शहरांमधील व्यावसायिक व कौटुंबिक संबंध जुने असूनही, या दोन्ही शहरांना जोडणारी थेट बस सेवा उपलब्ध नसल्याने नागरिकांना प्रचंड मन:स्ताप सहन करावा लागत आहे. ही गैरसोय दूर करण्यासाठी यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजय देशमुख आणि स्थानिक आगार प्रमुखांना सुज्ञ नागरिकांच्या वतीने २८ मार्च रोजी लेखी निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनात नमूद केल्यानुसार, दिग्रस आणि कारंजा आता एकाच लोकसभा मतदारसंघात आहेत. कारंजा ही एक मोठी बाजारपेठ म्हणून उदयाला आली असून, दोन्ही तालुक्यांतील

लोकांचे एकमेकांकडे नेहमी येणे-जाणे असते. मात्र, थेट बस नसल्यामुळे प्रवाशांना प्रथम मानोरा किंवा दारव्हा येथे जावे लागते. तिथे तासन्तास ताटकळत राहिल्यानंतर दुसरी बस पकडावी लागते. यामध्ये महिला, वृद्ध आणि लहान मुलांचे अतोनात हाल होत आहेत.

या निवेदनावर दिग्रस तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष पी. पी. पप्पूवाले, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे तालुका सचिव किशोर कदम, पत्रकार अनिल राठोड, समीर चिवती कव्वाल, अजमत खान, गणेश मालाधारी, रमेश आडे, संदीप केशवानी, तुकाराम सोनटक्के, शेख रफीक, दीपक लेहेकर, कैलास कलोसे, दादाराव पंडागळे, नोमान खान आदींच्या साक्षऱ्या आहेत. आगार प्रमुख भदाडे यांनी या मागणीवर सकारात्मक विचार करून लवकरच बसफेऱ्या सुरू करण्याचे आश्वासन दिले आहे.

अवैध गॅस सिलिंडर साठवणुकीवर धाड

७५ हजारांचा मुद्देमाल केला जप्त, ब्रम्हणपुरी परिसरात कारवाई

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

दिग्रस, दि. २९ : येथील ब्रम्हणपुरी परिसरात शनिवारी (दि. २८) दुपारी ३ वाजता सहाय्यक पोलिस अधीक्षक डॉ. तेजस सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने अवैध गॅस साठवणुकीवर छापा टाकला. राजू शाम पदमावार हा विनापरवाना गॅस सिलेंडरांची विक्री करीत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्याने पोलिसांनी ही कारवाई करून ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलिस आणि पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी राष्ट्रीय महाविद्यालयाजवळील आरोपीच्या घरावर संयुक्त कारवाई केली. यावेळी झडती घेतली असता घरातून १० मोठे आणि २ लहान गॅस सिलेंडर, ४

रेग्युलेटर तसेच एक इलेक्ट्रॉनिक वजन काटा असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. या अवैध साठ्याबाबत राजू पदमावार याच्याकडे कोणत्याही प्रकारची वैध कागदपत्रे किंवा परवाना आढळून आला नाही. गॅस सिलेंडरांची बेकायदेशीर साठवणूक करून चढ्या दराने विक्री केल्याप्रकरणी त्याच्यावर जीवनावश्यक वस्तू कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या धडक कारवाईमुळे दिग्रस शहरातील अवैध व्यवसायिकांचे धाबे दणाणले आहेत. सहाय्यक पोलिस अधीक्षक तेजस सारडा यांनी अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याचे संकेत दिले असून, नागरिकांनी अशा प्रवृत्तींची माहिती पोलिस प्रशासनाला द्यावी, असे आवाहन केले आहे. यामुळे गॅसची काळाबाजारी रोखण्यास मोठी मदत होईल. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही कारवाई अत्यंत महत्वाची असून पोलिस पथक व पुरवठा विभाग यांच्याकडून पुढील तपास सुरू आहे.

नाथनगरच्या हायप्रोफाईल वस्तीत चोरांचा धुमाकूळ

उमरखेडमध्ये भरवस्तीत घरफोडी : शिक्षकाचे बंद घर फोडून ९९ हजारांचा ऐवज लंपास

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

उमरखेड, दि.२९ : शहरातील उच्चभ्रू वस्ती म्हणून ओळख असलेल्या नाथनगर परिसरात चोरट्यांनी एका शिक्षकाच्या बंद घराला लक्ष्य केले. चॅनल गेटचे कुलूप तोडून चोरट्यांनी घरातील सोन्या-चांदीचे दागिने आणि रोकड असा एकूण ९८हजार ९०० रुपयांचा ऐवज लंपास केला. २३ मार्चच्या रात्री घडलेली ही धक्कादायक घटना उघडकीस येताच परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गोविंद विठ्ठलराव फड (४५, रा. नाथनगर) हे व्यवसायाने शिक्षक आहेत. सलग तीन दिवस शाळेला सुट्ट्या असल्याने ते २० मार्च रोजी कुटुंबासह बीड जिल्ह्यातील आपल्या मूळ गावी गेले होते. २४ मार्च रोजी सकाळी शेजाऱ्यांनी त्यांना फोन करून घराचे गेट आणि मुख्य दरवाजा उघडा असल्याचे कळवले. फड यांनी तातडीने उमरखेड गाठून घराची पाहणी केली असता, घरातील सामान अस्ताव्यस्त पडले होते आणि कपाटातील दागिने गायब असल्याचे दिसून आले. चोरट्यांनी मंगळसूत्र, कानातील फुले, अंगठी, चांदीचे दागिने आणि ८,९०० रुपये रोख असा मुद्देमाल पळवला आहे. या प्रकरणी उमरखेड पोलिसांनी कलम ३०५(अ) व ३३१(४) अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

तपास पथके सक्रिय; 'सीसीटीव्ही'वर भिस्त

घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांसह ठसे तज्ज्ञ आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सक्रिय झाले आहे. २८ मार्च रोजी फौजदार शरद लोहकर यांच्या नेतृत्वाखाली पथकाने घटनास्थळाची पाहणी केली. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू असून चोरट्यांच्या 'मोडस ऑपरेंडी'वरून त्यांचा शोध घेतला जात आहे. आमदारांपासून ते राजकीय हस्तींपर्यंत सर्वांचे वास्तव्य असलेल्या नाथनगरमधील ही गेल्या दोन वर्षांतील दुसरी मोठी घरफोडी असल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

मैनाबाईंनी ऐकली ६४ वेळा 'महाशिवपुराण कथा'

भक्तिची अपूर्व ओढ; 'पंडित प्रदीप मिश्रांची कथा ऐकण्यासाठी मैनाबाईंचा भारतभर प्रवास

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ सचिन शिंदे

आर्णी, दि.२९ प्रतिनिधी 'आवड असली की सवड मिळतेच' या म्हणीचा प्रत्यय संभाजीनगर येथील ७२ वर्षीय मैनाबाई दगडू करटमल यांच्याकडे पाहून येतो. 'शिवमहापुराण कथे'ची अशी काही ओढ त्यांना लागली आहे की, पंडित प्रदीप मिश्रा यांची कथा देशात कुठेही असो, तिथे मैनाबाईंची हजेरी ठरलेलीच असते. आतापर्यंत ६४ वेळा त्यांनी ही कथा ऐकली असून, आर्णी येथील ६५ व्या कथेसाठी त्यांनी चार दिवस आधीच आर्णीत मुक्काम ठोकला आहे.

धोनीच्या चाहत्यासारखीच भक्ती!

मैनाबाईंची ही निष्ठा पाहून लोक त्यांची तुलना क्रिकेटपटू महेंद्रसिंग धोनीच्या कट्टर चाहत्यांशी करतात. ज्याप्रमाणे धोनीची मॅच कुठेही असो, त्याचे चाहते तिथे पोहोचतात, तशीच काहीशी अवस्था मैनाबाईंची झाली आहे. महाराष्ट्रासह देशातील कोणत्याही राज्यात 'शिवमहापुराण कथा'असली की मैनाबाई तिथे हजर असतातच. यावेळीही त्या न विसरता चार दिवसांपूर्वीच आर्णीत पोहोचल्या आहेत.

मैनाबाईंची ही जीवनकहाणी संघर्षातून भक्तीकडे जाणारी आहे. त्यांचे पती दगडू करटमल हे एस.टी. महामंडळात वाहक होते. त्यांच्या निधनानंतर अनुकंपा तत्त्वावर मैनाबाईंनी स्वतः वाहक म्हणून सेवा बजावली. २०११ मध्ये त्या सेवानिवृत्त झाल्या. त्यांचा मुलगा आज चांगल्या नोकरीवर असून घरची परिस्थिती सुखासमाधानाची आहे. २०१९ च्या लॉकडाऊन काळात टीव्हीवर पंडित प्रदीप मिश्रा यांची 'शिवमहापुराण' ही कथा ऐकली आणि त्यांच्या जीवनाला एक नवी दिशा मिळाली. मार्च २०१९ मध्ये इंदूरला जाऊन त्यांनी पहिली प्रत्यक्ष कथा ऐकली आणि तेव्हापासूनच हा 'सिलसिला' सुरू झाला. 'या कथेमुळे माझ्या जीवनात आमूलाग्र बदल झाला आहे, म्हणूनच मी यात कधीही खंड पडू देत नाही,' असे मैनाबाई अभिमानाने सांगतात. आर्णी येथील ही त्यांची ६५ वी कथा असून, यानंतरची पुढची कथा कुठे आहे, याचीही पूर्ण माहिती त्यांच्याकडे तयार आहे. ईश्वराप्रती असलेले प्रेम, अतूट विश्वास आणि श्रद्धा यांच्या जोरावर वयाच्या ७२ व्या वर्षीही मैनाबाईंचा हा भक्तीचा प्रवास अविरत सुरू आहे. त्यांच्या या जिद्दीचे आर्णी परिसरात मोठे कौतुक होत आहे.

जाहीर सूचना

तमाम जनतेस या सूचनेद्वारे कळविण्यात येते की, श्री. पांडुरंग पुंजाजी इंगोले (वय ७० वर्षे, रा. डोल्हारी देवी, ता. दारव्हा, जि. यवतमाळ, हल्ली मुक्काम: अंबिका नगर, दारव्हा) यांनी सन १९७६-७७ मध्ये श्री. शिवाजी अध्यापक विद्यालय, पुसद, जि. यवतमाळ येथून डी.एड. (D.Ed.) अंतिम वर्ष उत्तीर्ण केले होते. उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांना विद्यालयाकडून डी.एड. अंतिम वर्षाचा मूळ शाळा सोडल्याचा दाखला (T.C.) प्राप्त झाला होता. परंतु, सदर मूळ टी.सी. त्यांच्याकडून गहाळ झाली असून, बराच शोध घेतला असता ती मिळून आली नाही.

आता पुढील शासकीय व कार्यालयीन कामकाजासाठी त्यांना सदर टी.सी.ची दुय्यम प्रत (Duplicate Copy) काढणे आवश्यक आहे. तरी सदर टी.सी. कोणास मिळून आल्यास किंवा कोणाची याप्रकामी काहीही हरकत असल्यास, त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर किंवा भ्रमणध्वनी क्रमांकावर लेखी कळवावे. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही आणि कोणाचीही हरकत नाही असे गृहीत धरून पुढील प्रशासकीय कार्यवाही पूर्ण केली जाईल, याची नोंद घ्यावी.

ठिकाण: दारव्हा
दिनांक: २९/०३/२०२६